UNIVERSAL LIBRARY

OU_192871
UNIVERSAL LIBRARY

विहंगम-वृंद : पुस्तक ५ वें

# धबधब्याच्या धारेंत

लेखक

प्रो० यादव मुकुंद पाठक, एम्. ए., एल्एल्. बी.

---

१९४०

[ लेखनकाल : ४ एप्रिल ते २९ एप्रिल १९३९ ]

---

किंमत

१-१२-०

प्रकाशक–

**ब. गो. गर्गे** एम्. ए.

'वीणा'–प्रकाशन,

सीताबर्डी, नागपूर.

[ या कादंबरीचे सर्व हक्क लेखकाकडे आहेत. ]

मुद्रक–

'विहंगम' मुद्रणालय, कांग्रेसनगर, नागपूर.

व

रामेश्वर प्रिंटिंग प्रेस, सिताबर्डी, नागपूर.

# निवेदन

" ये ग्रंथीचें हेंचि आश्चर्य ।
जें रोकडें स्वानुभवसौंदर्य "

—मुकुंदराज—

जग ही एक रंगभूमी मानली तर माणूस हा एक बहुरूपी नटच म्हणावा लागेल! जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या सात अवस्थाच तर काय, पण प्रत्येक दिवशीं नव्हे, प्रत्येक क्षणास, आपणास नव्या नव्या व तऱ्हेतऱ्हेच्या भूमिका सारख्या रंगवाव्या लागतात! समजा, आपण शिक्षक असलों तर ती आपली एक व्यवसायात्मक प्रमुख भूमिका झाली. समाजांत लोक आपणांस " मास्तर " म्हणूनच ओळखत असतात. केवळ पोटाकरितांच आपणास कधी कधी तो उद्योग करावासा वाटतो, तर कधी कधी आचार्यांची उच्च भूमिका घेऊन, " सकळ जन शहाणे करून " सोडण्यासाठीं, आपण " जें जें आपणास ठावें तें तें इळहळु " शिकवूं लागतों. पिता, पति, बंधु, मित्र, पुत्र—अशा खाजगी, ऋणको, धनको, गिऱ्हाईक, मालक, नोकर—अशा व्यावहारिक, अपघातांत सापडलेला, आजारी असलेला, मदतीस धाऊन जाणारा, शुभ कार्यी पुरखा झोडणारा अशा नैमित्तिक; अरे हरवू नकोस हां ' म्हणत धोब्यापुढे एक एक कपडे टाकणारा, ' हा गाढवा येवढंही समजत नाही,' असें नोकरावर मधूनच रागावणारा, 'अरे जा रे बुवा...पुढं जा' म्हणून चिडून भिकाऱ्यावर क्वचित् ओरडणारा, ' बस् बस्...पुरे झालं...जा जा आता ' म्हणून टांगेवाल्याशी कधीकधी हुज्जत घालणारा, " नको नको...अरे नको रे बुवा " म्हणून लोंचट फेरीवाल्यास पुन: पुन्हा जीव तोडून सांगणारा, आणि " हां हां जल्दी...आणखी हें पहा...मागून अगदी गुळगुळीत...बरं का " अशा प्रेमळ सूचना देत देत आपलें प्रत्यक्ष डोकेंच ( विद्वत्तेचें माहेरघरच ) नापिताहातीं नाइलाजाने देणारा-अशा किरकोळ; ...एक ना दोन, शेकडों, हजारो चित्रविचित्र भूमिका आपण न कळतच, पण प्रत्यही नटवीत असतोंच कीं नाहीं? आपल्या वैयक्तिक आणि सामुदायिक जीवनांत ह्या ज्या आवश्यक व तऱ्हेतऱ्हेच्या भूमिका आपण रंगवीत जातो, त्याच एखाद्या निष्णात लेखकाने एखाद्या ललित कृतीच्या रूपाने आपणापुढे मांडल्या, की आपण आनंदाने एकाएकी उद्गारतो, " छान आहे हां लेखक-मोठें हुबेहुब नि मार्मिक चित्र रंगवतो पठ्ठा! " साहित्याच्या इतर दालनांपेक्षा कादंबरीकारांस जर का हा अनुभूतींचा सूक्ष्म साक्षात्कार वेळोवेळी होत गेला व उज्ज्वल प्रतिभेच्या साहाय्याने त्याचें तंतोतंत व रसाळ चित्रण करण्याचें कौशल्य जर त्यास दैववशात् व श्रमसातत्याने साधलें, तर तो कालांतराने

यशस्वी साहित्यकार झालाच असें खुशाल भाकित करावयास हरकत नाहीं. कोणतीही कादंबरी शंभरनंबरी आहे किंवा नाही हें पाहावयाचें झाल्यास, सामान्य वाचकरूपी सुवर्णकार हा एकमेव निकष अगदी नकळत वापरीत असतो. हीच कादंबरीच्या परीक्षेची खरीखुरी कसोटी ! हें कसब ज्यास साधलें आहे तोच खरा लोकप्रिय व पर्यायानें आदर्श कादंबरीकार ! मराठीचे आद्य व अमर कादंबरीकार हरीभाऊ आपटे यांना हीच विलक्षण जादूगिरी साधलेली होती ! आणि आजचे अग्रेसर उपन्यासकार प्रो० फडके आज अत्यंत यशस्वी झालेले वाटतात, ते तरी हीच यक्षिणीची कांडी त्यांच्याजवळ हमखास आहे म्हणून !

वरील मूलग्राही पृथःकरण एकदां नीट ध्यानांत आलें व मान्य झालें, तर साहित्यांतील कला व नीतीचा झगडा, केवळ व्यर्थ वा अतिरिक्त आहे असेंच म्हणावें लागेल !

जिव्हाळ्यानें लिहिलेल्या प्रत्येक साहित्यकृतींत कला व नीति ( म्हणजेच तत्त्वप्रतिपादन ) यांचें सुखद संमिश्रण सांपडेलच सांपडेल ! केवळ विदग्ध वाङ्मयासंबंधीच हें बोलणें नाही, तर " अशेष शद्बब्रह्म " बद्दल आहे. प्रस्थानत्रयींतील गीता चिरंतन लोकमान्यता पावली ती तरी केवळ तिच्यांतील अनुभूति व सौंदर्य यांच्या परमानंददायी अविभक्त मिश्रणामुळेच ! ज्ञानेश्वरांची " भावार्थदीपिका " असल्यापैकीच एक आदर्शांतील आदर्श कलाकृति आहे ! आदिकवि मुकुंदराज आपल्या " विवेकसिंधु " नांवाच्या अमूल्य व अमर ग्रंथांत म्हणतात—

> " ये ग्रंथींचें हेंचि आश्चर्य ।
> जें रोकडें स्वानुभवसौंदर्य ।
> म्हणून ऐकती मुनिवर्य । विवेकसिंधु ॥ "

जगांतील कुठल्याही साहित्यांतील अभिजात ग्रंथांत हीच '**स्वानुभवसौंदर्याची**' प्रचीति नित्य येत असते व म्हणूनच त्यास चिरंतनत्व लाभते. आजच्या मराठी साहित्याकडेच पहा ना ! कलावादी फडक्यांच्या कादंबऱ्यांत तत्त्वप्रतिपादन आढळतें, तर नीतिवादी खांडेकर हे कलेचे एक निष्ठावंत उपासक दिसून येतात ! हें पाहिलें म्हणजे आपण गोंधळून म्हणतों: " अरेच्या, हें आहे तरी काय ? "···याला उत्तर येवढेच देतां येईल, की कला व नीति यापैकी एकेकीचा पक्ष, तात्कालिक व अभिनिवेशानें केवळ चर्चेपुरतांच घेतां येतो, पण प्रत्यक्ष साहित्यकृतींत त्यांची फारकत करतां येणेंच शक्य नसते ! दूध व साखर यांच्या मधुर व अविभाज्य मिश्रणाप्रमाणेच स्वानुभव व सौंदर्य यांचें रसाळ व बेमालुम मिश्रण प्रत्येक थोर ग्रंथांत असतेंच असतें !

वाचकांपुढे हा एक सरळ, स्पष्ट व अचूक दृष्टिकोण येथे ठेवला आहे. ह्या निकषावरच कोणतीही साहित्यकृति पारखली जाते—मग ती कळत असो वा न कळत असो ! "धबधब्याच्या धारें"त या कादंबरींत कांही स्वानुभवसौंदर्य असेल, तरच ती वाचकास रुचेल, आवडेल व टिकेल. नाहीपेक्षा सर्वभक्षक काळ हा टपलेलाच आहे !

प्रस्तुत "निवेदनां"त साहित्यसमालोचकाची भूमिका घ्यावयाची नाही—तर केवळ लेखकाचा व कादंबरीचा थोडक्यांत परिचय करून द्यावयाचा आहे—

आत्मनिवेदनांत आढ्यतेचा आरोप येण्याचा संभव असला, तरी बदललेल्या नव्या पिढीसाठी थोडासा खुलासा करणें भाग आहे. सामान्य प्रवासांतही स्वतःचा परिचय करून देण्याचा प्रसंग पदोपदीं येतो, तर जीवनप्रवासांत तरी तो कधीमधी कां येऊ नये ? या कादंबरीचे लेखक अगदी बालपणापासून सरस्वतीची उपासना करीत असले, तरी मध्यम वयाची मंडळी आज त्यांना "शशिमोहन" कर्ते या नात्यानेच मुख्यतः ओळखते. "शशिमोहन" काव्य अकरा वर्षांपूर्वी म्हणजे १९२९ त प्रसिद्ध झालें ! त्याकाळीं सर्व प्रमुख नियतकालिकांत त्यावर प्रशंसात्मक दीर्घ परीक्षणें आलीं व चोहीकडून त्याचा उदो उदो झाला. गोव्याच्या साहित्यसंमेलनांत, अध्यक्ष प्रो० वामन मल्हार जोशी यांनी आपल्या भाषणांत केवळ दोनच काव्यांचा गौरव केला. एक मित्रवर्य कै० डॉ० पटवर्धनांच्या "सुधारका"चा व दुसरा "शशिमोहना"चा ! आधुनिक मराठी काव्याच्या ऐतिहासिक समालोचनपर निबंधांत वा प्रबंधांत पाठकांचा जो उल्लेख येतो, तो तरी या काव्यामुळेच ! आणि कोंकणांतील श्री० पटवर्धन नामक हरिदासांनी तर "शशिमोहन" काव्यावर कीर्तनें करून, त्यांचे नातलग नागपूरचे डॉ० पटवर्धन यांच्याकरवीं, असल्या तऱ्हेच्या दुसऱ्या काव्याची गेल्या सात-आठ वर्षांपासून-सारखी मागणी केली आहे !

काव्य आणि कादंबरी हीं विदग्ध वाङ्मयाचीं दोन प्रधान अंगें होत. तीं बाह्यात्कारी परस्पर भिन्न भासलीं, तरी स्वानुभव-सौंदर्याची प्रचीति दोन्हींतून आलीच पाहिजे. कवि या नात्यानें जर एखादी व्यक्ति प्रतिभाशाली ठरली असेल, तर तीच कादंबरीकार या नात्यानें तरी निष्प्रभ कां ठरावी ? स्वानुभव-सौंदर्याचें प्रसाधन जर त्यास कवीची भूमिका रंगवतांना साधलें असेल, तर आता कादंबरीकाराचें सोंग नटवीत असतांना तो त्याचा स्वयंभू गुण कां बरें लुप्त व्हावा ? प्रतिभा ही दिव्य अद्भुत शक्तीच ना ललित साहित्याच्या अंगोप्रत्यंगाला जीवनाधार ? मग एका क्षेत्रांत जर एखाद्या लेखकानें तिची चमक कधीं कालीं दाखविली असेल, तर दुसऱ्या क्षेत्रांत तरी त्यास ती आज कां बरें दाखवितां येऊ नये ?

या कादंबरीचा लेखनकाल ४ एप्रिल ते २९ एप्रिल १९३५. केवळ पंचवीस दिवसांत ती हातावेगळी झाली! रोज सुमारे बारा तास लेखन चाले! कादंबरीतील पहिलीं

सहा प्रकरणें लेखकानें तोंडीं सांगून लिहवून घेतलीं, पण सातव्या प्रकरणापासून थेट शेवटपर्यंत मात्र त्यानें तीं स्वहस्तेंच लिहून काढलीं! ह्या पंचवीस दिवसांत लेखकानें एकदाही घराबाहेर पाऊल ठेवलें नाहीं, खाण्यापिण्याकडे नीटसें लक्ष दिलें दिलें नाहीं, व स्मश्रू-स्नानादि दैहिक कर्मांना तर अजिबात रजाच दिली! आपणच निर्माण केलेल्या काल्पनिक सृष्टींत तो इतका रंगून गेला!

कादंबरींतील पहिलीं सहा प्रकरणें व पुढील भाग यांत—कथानक, व्यक्तिदर्शन व भाषाशैली इत्यादि बाबींत कांहीं फरक पडला? असेल, तर तो तोंडीं सांगणें व स्वतः लिहिणें ह्या भिन्न लेखनपद्धतींमुळेच पडला असला पाहिजे, हें स्पष्ट दिसून येईल.

प्रस्तुत प्रदीर्घकथा "विहंगम-" मासिकांतून जुलै १९३५ ते जून १९३६ या काळांत प्रसिद्ध झालेली आहे. म्हणजे हिच्या प्रसिद्धीचा काळ १९३६ च मानला पाहिजे. कथानकाची एक अभिनव तंत्रपद्धति ह्या कादंबरींत अवलंबिलेली दिसेल. अगदी प्रथमपासून तें विसाव्या प्रकरणापर्यंत आपण नायकाच्या सहवासांत असतो, आणि त्यापुढे अगदी अखेरपर्यंत नायिकेच्या संगतीचा आपणांस लाभ होतो. आत्मनिवेदनपर पद्धतींत आपण एकाच व्यक्तीच्या सहवासांत असतो पण, लेखकानें सांगितलेल्या कथेंत, हें बंधन आवश्यक नसतें. हीच या नवीन तंत्राची अभिनवता! या कालानंतर प्रो० फडके यांनी ह्या पद्धतीचा अवलंब केलेला आहे. प्रो० फडके यांच्यावर अनुकरणाचा आरोप करण्यासाठीं ही गोष्ट येथे नमूद केलेली नाहीं. प्रो० फडके हे एक प्रतिभाशाली व कलावंत लेखक आहेत यात शंकाच नाहीं. पाठकांसारख्या लेखकांच्या ओंजळीनें पाणी पिण्याचें त्यांना कांहीं एक कारण नाहीं. पण मराठी वाङ्मयांत असलें अभिनव वास्तवनिर्माते आणि परिणामकारक कथातंत्र ह्या कादंबरींत प्रो० फडक्यांपूर्वीच वापरलें गेलें होतें, हें साहित्यसमीक्षकांनी पाहण्यासारखें आहे! पुढे रूढ झालेली राजकीय वातावरणनिर्मितीही या कादंबरींत दिसून येईल.

प्रस्तुत कादंबरी अल्प काळांत लिहून झाली असली, तरी तिचें कथानक मात्र मनांत बराच काळ घोळत होतें! आधीची कल्पना अगदी सरळ आणि सुटसुटीत होती! "कुमारी माता" हें या कादंबरीचें पहिलें योजलेलें नांव. "कुमारी विधवा" हा सामाजिक प्रश्न पाठकांनी "विहंगमांतून" ऑगस्ट १९३४ त मांडला होता. त्यावर "महाराष्ट्र" कारांनी साडेचार कॉलम मजकूर लिहून त्यांच्या सिद्धांतास उचलून धरलें! त्यांनंतर त्यावर बहुतेक नियतकालिकांतून खूब अनुकूल—प्रतिकूल टीका आली! हा अतिप्रौढ कुमारिकांचा प्रश्न समाजापुढे आजही अतीव भीषण स्वरूपांत उभा आहे! महाराष्ट्रांतील कुठल्याही अनाथालयाचीं प्रतिवृत्तें पहा अगर प्रत्यक्ष समाजाचेंच बारकाईनें निरीक्षण करा, म्हणजे उज्ज्वल व दीर्घकालीन टिकलेल्या विवाहसंस्थे-

वरच गदा येत आहे, असें दिसून येईल. येवढेंच नव्हे, तर अशा कल्पना प्रसृत होण्याचा पद्धतशीर व जोरदार प्रचार फ्रूड, हॅवलॉक एलिस, रोमा रोलाँ यांचे नांवें आज चालू असलेला दिसेल !

ह्या प्रश्नाचें अक्राळविक्राळ व भयंकर स्वरूप निदर्शित करण्यासाठी एका हतभागी "कुमारीमाते"ची करुण कहाणी समाजापुढे ठेवावी हा या कादंबरीचा मूळ उद्देश ! तथापि प्रत्यक्ष कादंबरी-लेखन करतांना अनेक प्रमुख वा गौण पात्रांनी आपापली छाप पाडावयास सुरुवात केली व प्रत्येकाने आपापला एक वेगळाच प्रश्न समाजापुढे ठेवला ! कादंबरीच्या अखेरी-अखेरीस नायक नायिकेला म्हणतोः--"शकू, आपलं आयुष्य म्हणजे नदीच्या प्रवाहासारखंच नाही का ? मध्येंच एखादा धबधबा येतो आणि त्याच्या धारेंत माणूस सांपडलं म्हणजे कोसळतें खालीं, किती गटंगळ्या मिळतात जीवाला त्यावेळीं ! पापा, तात्या, रमाकाकू, लीला, विलास, शालिनी, टिमथी, तूं नि मी-सारेच त्या धारेंत सांपडलों ! "......

कादंबरीकार म्हणजे संसाराचा वा समाजाचा एक प्रांजल नि कलावंत टीकाकार !

**"यततो ह्यपि कौंतेय पुरुषस्य विपश्चितः ।**
**इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः ॥**

या गीताश्लोकाचें ही कादंबरी म्हणजे एक कथात्मक भाष्यच मानतां येईल ! काममूलक प्रमादांचें पृथक्करण करून त्यांचें उघडेंनागडें व परिणामीं भीषण स्वरूप कादंबरीकाराने येथे प्रकर्षत्वाने प्रकट केलें आहे ! जीवन ही एक नदी कल्पिली तर असले स्खलनाचे प्रसंग म्हणजेच त्यांतील प्रपात ! ह्या "धबधब्याच्या धारें"त प्रस्तुत कादंबरींतील बहुतेक व्यक्ति गुणसंपन्न असूनही सांपडल्या आहेत ! पवित्र, उदात्त व केवळ प्रेमस्वरूपच अशी कादंबरीची नायिका "शकुंतला" ही केवळ दुर्दैववशात् मातृपद आलेली एक कुमारीमाता आहे. आणि विपश्चित् पुरुष म्हणून ज्यास खासच म्हणतां येईल, असा ध्येयनिष्ठ नायकच या कुमारीमातेच्या संकटपरंपरेस दुर्दैवाने कारणीभूत झालेला आहे ! संसाराच्या खडकाळ सागरांत जीवनप्रवाशास सावध करण्यासाठी प्रस्तुत कलात्मक वास्तवकथा एक दीपस्तंभ ठरो !

॥ ॐ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

वर्धा
रविवार, २५ ऑगस्ट १९४०
श्रीकृष्ण जयंती

**यादव मुकुंद पाठक**

# प्रो. पाठककृत पुस्तकें

## काव्य—

१ पिंपळपान .... .... .... .... ( गीतसंग्रह )

२ शशिमोहन .... .... .... .... ( दीर्घकाव्य )

३ फुलें नी मुलें .... .... .... .... ( कवितासंग्रह )

४ राष्ट्रबोध .... .... ( लोकनायक अणे यांचें चारित्र )

आगामीः—

५ साधना .... .... ....(

६ लोकमान्य टिळकचरितामृत .... .... ....

७ महात्मा गांधीचरितामृत .... .... ....

८ महाकवि माधवप्रशस्ति (डॉ. माधवराव पटवर्धन यांना श्रद्धांजलि)

## नाटक—

९ कायदेभंग .... .... .... .... ( नाटिका )

१० देहांतशासन .... .... .... .... ( अप्रकाशित )

## कादंबरी—

११ धबधब्याच्या धारेंत .... .... .... ....

१२ प्रलयाच्या वणव्यांत .... .... .... ....

## इतर—

१३ "विहंगम" मासिकाचीं १९३३ ते १९३८ या पांच वर्षांचीं बांधीव पुस्तकें

१४ पारिजाताचीं फुलें .... .... .... ( लघुकथासंग्रह )

१५ जाईच्या कळ्या .... .... .... ( बालकथासंग्रह )

अनुक्रमणिका.

# समर्पण

हास्यमुख, मितभाषी, कार्यरत, कलाप्रिय, व्यायामपटु, ध्येयनिष्ठ,

— पण अल्पायुषी —

( " विहंगमा " चे माजी सहसंपादक )

**कै० दामोदर केशव पेंडसे,**

बी. ए., एलएल. बी.

यांना—

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | परिचय ... ... ... ... ... ... | |
| १ | देवादारीं दानव ... ... ... ... ... | |
| २ | साखरझोपेंतलें स्वप्न ... ... ... ... ... | ९ |
| ३ | वेल, कळी आणि वारा- ... ... ... ... ... | १९ |
| ४ | अरुणाचा अस्त ... ... ... ... ... | २४ |
| ५ | उषेचा विजय ... ... ... ... ... | २८ |
| ६ | शकुंतलेचें जन्मरहस्य ... ... ... ... ... | ३३ |
| ७ | न्यायाधिशाचा निर्णय ... ... ... ... ... | ३९ |
| ८ | गोंधळ ! ... ... ... ... ... ... | ४३ |
| ९ | विलासची लीला ... ... ... ... ... | |
| १० | त्रस्त जीवनातलें समाधान ... ... ... ... | |
| ११ | प्रेमवेडी मार्गारेट् ... ... ... ... ... | ६१ |
| १२ | वादळ ... ... ... ... ... ... | ६६ |
| १३ | रोजनिशींतील पहिलीं तीन पानें ... ... ... ... | ७१ |
| १४ | पांच प्रमुख पत्रें ... ... ... ... ... | ७२ |
| १५ | कलियुगांतील चंद्रसेना ... ... ... ... ... | ७९ |
| १६ | त्रिवेणीसंगम ... ... ... ... ... ... | ९५ |
| १७ | पत्त्यांचा डोलारा ! ... ... ... ... ... | ९५ |
| १८ | धर्मावतार ! ... ... ... ... ... ... | ९८ |
| १९ | लिटल् फॉल् ... ... ... ... ... ... | १०५ |
| २० | जटाशंकरापुढील पाणिग्रहण ... ... ... ... | ११२ |
| २१ | निराशेंतून उदय पावलेल्या आशा ... ... ... ... | १२३ |
| २२ | रानावनांत थाटलेला संसार ... ... ... ... | १२९ |
| २३ | दोन निरोप ... ... ... ... ... ... | १३६ |
| २४ | निराशा ... ... ... ... ... ... | १४६ |
| २५ | कुंकू पुसलें-कुंकू लावलें ! ... ... ... ... | १५३ |
| २६ | कोळशांतलें माणिक ... ... ... ... ... | १५८ |
| २७ | अंतरपाट ... ... ... ... ... ... | १६४ |
| २८ | पेंच ... ... ... ... ... ... | १७० |
| २९ | गटंगळ्या ! ... ... ... ... ... ... | १७६ |
| ३० | स्फोट ! ... ... ... ... ... ... | १८५ |

# आभार-प्रदर्शन

श्री. कल्याणराव आंबेवाडी, सन्मित्र श्री. रामेश्वर बजाज, 'वीणा प्रकाशना' चे संपादक श्री. ब. गो. गर्गे, 'विहंगमा' चे माजी प्रबंधसंपादक आणि 'महाराष्ट्र' चे हल्लीचे उपसंपादक श्री. ज. रा. जोशी, वगारे आर्ट गॅलेरीचे श्री. गंगाधरराव बेलेकर, पाठक ब्रदर्सचे श्री. पाठक, शिवराज लिथो वर्क्सचे श्री. धनवटे - या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतों. इतर अनेकांचें साहाय्य झालें आहे, पण त्यांचे औपचारिक आभार मानणें युक्त व्हायचें नाही.

विद्यामंदिर ट्रेनिंग कॉलेजचे माजी व्हाइस-प्रिन्सिपल व सध्याचे शिवनी येथील बेसिक नॉर्मल स्कूलचे सुपरिंटेंडेंट कलावंत श्री. उत्तमसिंह टोमर यांच्या मुखपृष्ठावरील चित्राबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

या. मु. पाठक

# १.

# देवादारीं दानव

त्रिपुरी पौर्णिमेचा पणतीच्या ज्योतीसारखा दिसणारा रामटेकचा तो त्रिपूर नागपूरकर मंडळींना जितका उत्साहानें बघावासा वाटतो, तितक्याच आतुरतेनें वैकुंठचतुर्दशीच्या मध्यरात्रीं पिंडीवर तुळशीपत्र वाहायला जागोबा उर्फ जागेश्वराच्या देवळांत अलोट गर्दी लोटते. 'महाला'कडील पांढरपेशा स्त्रिया मुसलमानाच्या खच्याळ वस्तींतल्या त्या निमुळत्या नागमोडी बोळांतून रात्रभर बेधडक 'ये जा' करीत असतात. त्या बोळांतल्या सावली-चांदण्याप्रमाणेंच आजूबाजूंच्या घरांतून डोकावणाऱ्या दाढ्यांचेंही सितकृष्ण मिश्रण झालेलें दिसतें.

त्या देवालयासाठीं, त्या पिंडीसाठीं, त्या दर्शनासाठीं, उत्सुक असणाऱ्या बिचाऱ्या स्त्रियाच ! मात्र बहुतेक पुरुष भाविकगण हा ह्या देवतांच्या भोंवतींच त्या रात्रीं सारखा घुटमळत असतो. तें चांदणें आणि त्या चांदण्या !

गाभाऱ्याच्या महाद्वारावर असंख्य पुरुष एकमेकाला चिकटून आंत प्रवेश मिळण्यासाठीं तिष्ठत उभे होते. त्या प्रचंड लोंढ्याच्या गतीला संथ प्रवाहाची, मुंगीच्या चालीची कसलीही उपमा चालायची नाहीं. मॅजिक् लॅंटर्नचें स्थिर चित्रच होतें जणुं तें ! त्याला खच्याळ विद्यार्थी प्रेक्षकांच्या गोंगाटाची साथ द्यावी म्हणजे झालें ! आणि मॅजिक् लॅंटर्नचें चित्र जसें झट्दिशीं हलून चित्रांतर होतें, तसेंच ह्याहि दृश्यांत मंदगतीनें चार बोटें पुढें सरकलेला तो लोंढा एखादेच वेळीं द्रुतगतीनें खूब लांब मागें फेंकला जाई. या अकस्मात पुच्छ प्रगतीनंतर पुन्हां तो भाविकगण आस्ते कदम पुढें पुढें जाऊं लागे !

बाबासाहेब त्या पुरुषांच्या शेवटच्या ओळींत जाऊन उभे राहिले, तरी विजय आपला चार पावलें मागेंच. बाबासाहेबानीं त्याच्या हातास एक नाजुकसा हिसका दिला आणि हंसून म्हटलें,

'अरे वेड्या, असा अजागळासारखा इकडे तिकडे काय पाहातोस ? तुळशीपत्र ला सारीं वीस मिनिटें शिल्लक राहिलीं आहेत. तेवढें तरी पुण्य तुझ्याहातून घडूं दे."

"पापा !" विजय त्रासिक मुद्रेनें म्हणाला "ह्या प्रचंड लोंढ्याबरोबर पिंडीजवळ जाऊन पोंहचण्यास तब्बल एक तास-तरी लागेल. मला तें घामाघूम होणेंही नको, आणि तें भाविकतेनें मिळविलेलें पुण्यही नको. मी आपला बाहेरच राहतों ! कसा"

ह्यावर बाबासाहेब किंचित् हंसले. विजयच्या कानांत जें कांहीं ते थोडेसें कुजबुजले त्याचा भाव त्या गजबजाटांत असा असावा असें विजयला वाटलें कीं, "हें देवस्थान म्हणजे तुझ्या फर्ग्युसन कॉलेजसारखी सहशिक्षण देणारी संस्था नव्हे, इथें गंमत ती काय पाहतोस ?"

ह्यावर विजयनें एका चबुतऱ्याकडे बोट दाखविलें आणि बाबासाहेबांना सूचना केली कीं, "तुम्ही बाहेर आलांत, म्हणजे मी एक तर त्या चबुतऱ्यावर तरी असेन किंवा आपल्या मोटारींत तरी सुखानें झोंप घेत पडलों असेन."

यावर "वेड्या, तुला धर्माबिर्माची कांहीं कदर नाहींरे," असें पुटपुटत बाबासाहेब आपला कठतम भक्तिमार्ग महाप्रयासानें आक्रमूं लागले, आणि आमच्या तरुण विजयनें देवळाच्या डाव्या बाजूनें, केवळ निरीक्षणासाठीं, प्रदक्षिणा घालण्यास आरंभ केला.

'आपल्या समाजांत स्त्रीपुरुषांना एकत्र यायला कुठें वावच नसतो हें खरें आहे काय ? सभ्य स्त्रीपुरुषांना रोजच्या सच्छील व्यवहारांत एकमेकाजवळ केवळ उभें राहण्यास वाव नाहीं, पण ह्या धर्मक्षेत्रांत हें कसलें ओंगळवाणें दृश्य पहावयास मिळतें ? आपले गुलजार केंस भांग पाडून नीट केलेले, सरदारी थाटाचा सदरा व हिंदुस्थानी थाटाचें कमरबंद धोतर असाव बहुतेक येथील पुरुषभक्तांचा थाट आहे. भक्तिभावाच्या सात्विक तेजापेक्षां खुशालचेंडूपणाची विलासी वृत्तीच त्यांच्या चेहऱ्यावर झळकते आहे'

अशा तऱ्हेचे विचार विजयच्या मनांत चालले होते तोंच तो स्त्रियांच्या दरवाजापाशीं आला. त्यानें पाहिलें कीं राकट अडाणी स्त्रियांपेक्षां सुकुमार उच्च वर्णाच्या स्त्रियांचाच भरणा तेथें जास्त होता. त्या स्त्रीसमूहांत जख्खड म्हाताऱ्यांची संख्या मुळीच नव्हती म्हटली तरी चालेल. ज्या कांहीं होत्या त्या तरुण कुमारिका वा विधवा ! तुळशीपत्र नेमक्या वेळीं आपल्या हातून महादेवावर पडावें, ह्या सात्विक भावानें देवाच्या गाभाऱ्यांत प्रवेश मिळावा म्हणून, त्यांची जी धडपड चालली होती तिला एका लहानशा लढाईचेंच स्वरूप आलें होतें. त्या दाराच्या नजीकच जो ओटा होता त्यावर दर्शन घेऊन बाहेर आलेली मंडळी किंचित् काळ विसांवा घेत बसली होती. कांहीं मुलांच्या जवळ हातकंदील ठेवलेले होते, त्यावरून एकेका स्त्रियांच्या घोळक्याचे हे चिमुकले वीर संरक्षक असावेत असा विजयनें तर्क केला. ह्या सर्व प्रचंड जनसमुदायांत हिंदूंचा पोशाख करून कांहीं मुसलमान गुंडही आपल्या स्पर्शक्षुधेचें शमन करीत नसतील कशावरून ?

विजय पुढें पुढें चालला. आणखी पलीकडच्या बाजूस एक तिसरा दरवाजा त्यास दिसला तो जवळ जवळ मोकळा होता. त्या दरवाजाचे कांहीं काळ शून्य मनानें निरीक्षण

करांत विजय उभा होता, तोंच त्यांतून एक पुरुषभक्तांचा प्रचंड प्रवाह बाहेर पडला. पुन्हां कांहीं काळ त्या दरवाजांतून कुणासही बाहेर पडतां येईनाशी परिस्थिति निर्माण करण्यांत आली. दोन पोलीस शिपाई त्या दरवाजाच्या बाजूच्या ओट्यावर उभे होते, आणि त्या दरवाजांतून बाहेर सोडणें न सोडणें, हा त्यांच्या खुशीचा प्रश्न होऊन बसलेला दिसत होता.

इतक्यांतच एक पांचपंचवीस गुंडांचा नायक त्यापैकीं एका शिपायाकडे गेला आणि त्यानें त्यांस कसलीशी विनंति करावयास सुरवात केली. विजयनें तात्काळ ओळखलें, कीं ही मंडळी ह्या मोकळ्या दारांतून आंत जाऊं पहात आहेत. त्या टोळीस या दारानें आंत जाण्याची परवानगी मिळतांच विजयलाही आंत काय चाललें आहे, हें पाहण्याची जिज्ञासा झाली आणि तो त्या मंडळींत सामील झाला. कांहींही प्रयास न करितां व फारसा वेळ न लागतां विजयला देवाच्या गाभाऱ्यांत एकदांचा प्रवेश मिळाला. गाभाऱ्यांतलें दृश्य घृणा आणणारें होतें. कांहीं नव्या नीतीच्या पुरस्कर्त्यांनीं स्त्रीपुरुषांचें संघटण वाढविण्यासाठीं असलें एखादें विहारस्थान निर्माण केलें असतें तर प्रश्नच नव्हता, परंतु परपुरुषस्पर्श हें ज्या समाजांत पाप समजलें जातें, विधवांना पुनर्विवाहाची सरसहा परवानगी धर्मभ्रष्टतेच्या नांवाखालीं ज्या समाजांत अजूनही दिली जात नाहीं, त्या समाजाच्या स्त्रियांनीं देवाच्या गाभाऱ्यांत तासचे तास उभे राहून गुंडांच्या देहांचें घर्षण भक्तीच्या नांवाखालीं मुकाट्यानें सहन करावें, ही कोणती नीति? पिंडीवर तुळशीपत्र वाहण्यासाठीं स्त्रिया ओणव्या झाल्या म्हणजे जे कांहीं अश्लील प्रकार चालत, ते विजयला पाहवले गेले नाहींत. तेथें दोष तरी कुणास कोण देणार? कोणाची हजेरी कोण कशी घेणार? कारण गाभाऱ्यांत असलेल्या जागेच्या मानानें गर्दीच इतकी भयंकर होती कीं, अगदीं मनांत नसताही स्त्रीपुरुषांचा परस्परांस सहजासहजी स्पर्श व्हावा. विजय विषण्ण मनानें एकाएकी बाहेर पडला.

दिवस जरी थंडीचे होते तरी आंत त्याला उकडल्यासारखें झालें. बाहेर चबुतऱ्यावर किंचित् काळ तो बसला, आणि रुमालानें त्यानें आपल्या गळ्याचा मागचा भाग पुसून काढला. बाबासाहेब त्याला आंतही दिसले नाहीत. अजूनही त्यांना आंत प्रवेश मिळाला नसेल काय? त्यांच्यासाठीं आतां वाट पाहणेंसुद्धां त्यास कंटाळवाणें होऊन गेलें होतें. हरिदासाच्या निरूपणाचा अस्पष्ट ध्वनि त्यास तापदायक होऊं लागला. धर्माच्या नांवानें चाललेले सारें थोतांड! तो मनाशींच पुटपुटला, 'कसला धर्म! कसलीं देवळें! कशाची नीति! नि कशाची मुक्ति!'

चबुतऱ्यावरच तो आडवा झाला, आणि आकाशांतील चतुर्दशीच्या चंद्राकडे त्यानें आपली दृष्टि लावली. त्याच्या चिंतनशील स्वभावामुळें त्या कोलाहलांतही त्यास एकांतवासाचें सुख लाभलें व त्याची थोडीशी तंद्री लागली.

असा किती काळ गेला असेल कुणास ठाऊक! एकवार शून्य दृष्टीनें त्यानें त्या बाहेर पडण्याच्या दरवाजाकडे नजर फेकली. हेतु इतकाच कीं बाबासाहेब अजून तरी आले किंवा नाहीं तें बघावें. तों त्यास कांहींसें निराळेंच दृश्य दिसलें. २५-३० कुलीन स्त्रिया त्या

शिपायास कांहीं विनंति करीत होत्या, आणि पुन:पुन्हा तो नकारार्थी मान हलवीत असावा असें दिसत होतें. त्या शिपायामागें तीन चार गुंडही उभे होते. त्यांच्या हास्यकल्लोळावरून त्यांची आपसांत कांहीं थट्टामस्करी चालली होती, असाच तर्क कुणीही झालें तरी केला असता.

विजय उठला आणि त्या दरवाजाकडे जाऊं लागला. त्या शिपायाच्या गुंड मित्रांपैकीं एक जण त्या स्त्रियांच्या घोळक्याकडे पाहून मोठमोठ्यानें ओरडूं लागला—" अच्छा! अच्छा! बायांनों, पर ह्याच वख्तास आदमी लोक बाहेर पडले; तो फिर हम जबाबदार नही. तुम खुषीसे आंतमधी जाव. " आणि त्या पडत्या फळाची आज्ञा घेऊन त्या बिचाऱ्या दर्शनासाठीं आतुर झालेल्या भाबड्या भक्तिणी त्या दाराच्या सात पायऱ्या घाईघाईत चढूं लागल्या.

त्याच क्षणीं त्या शिपाईमित्रांपैकीं पलीकडील एका गुंडानें आंत कसलीशी खूण केली. आणि एखाद्या धबधब्याप्रमाणें आंतील पुरुषमंडळी धाडधाड बाहेर पडूं लागली. त्या धबधब्याच्या धारेंत बिचाऱ्या स्त्रियांची टोळी अशा कांहीं रीतीनें सांपडली, कीं त्या स्त्रियांस आतां काय करावें आणि काय नाहा हा विचार करण्याचें मुद्धां भान राहिलें नाहीं. आम्ही हिंदी लोकांनीं स्त्रीदाक्षिण्याच्या नुसत्या गप्पाच माराव्या, असें विजयला वाटलें. नाहींपेक्षां वरून खालीं उतरणाऱ्या पुरुषांना काय त्या स्त्रिया दिसल्या नाहींत? त्या पुरुषमंडळींत एखादा दुसरा गृहस्थ संभावितासारखा दिसला, आणि मनांत नसतांना स्त्रियांशी धक्काबुक्की करण्याचा प्रसंग आला म्हणून अशा समंजस पुरुषांना कसेंसेंच झाल्यासारखें दिसलें. परंतु ते बिचारे काय करणार? खवळलेल्या समुद्राच्या लाटेंत एखाद्या पामर जीवानें जसे हेलकावे खावे त्याप्रमाणेंच अशा व्यक्तींची तेथें स्थिति झाली होती! स्त्रिया आपल्या मार्गांत अनायासें सांपडल्या आहेत हें ज्यावेळीं त्या लोंढ्यांतल्या शेंकडों भक्तगणांच्या लक्षांत आलें तेव्हां त्यांचा उत्साह काय वर्णावा? त्यांचे बाहु, देह, मन, आसुरी इच्छा—सर्वस्वच जणुं एकाएकीं स्फुरण पावलें. म्हातारीशी बाईमाणसें आली कीं तिला ढकलावें आणि तरुणींकडे आपला मोर्चा वळवावा असा कावेबाजपणाचा प्रचार जणुं स्वाभाविकपणेंच सुरू झाला. स्त्रीपुरुष एखाद्या गोफांतल्या रंगीबेरंगी धाग्याप्रमाणें पूर्णपणें मिसळले गेले. उर्मट पुरुषांचे खट्याळपणाचे वाक्प्रहार आणि भांबावून गेलेल्या स्त्रियांचे मंजुळ ध्वनि ह्या तऱ्हेतऱ्हेच्या स्वरांची सरमिसळ होऊन कांहींसें चमत्कृतिजनक भेसूर संगीतच तेथें निर्माण झालें आणि त्या गर्दींत सांपडलेल्या त्या स्त्रियांची विजेच्या लखलखाटांत होत असलेली विटंबना—

ते दृश्य पाहतांच विजयचा त्वेष अनिवार झाला. पण हा सर्व प्रकार इतका कांहीं आकस्मिक रीतीनें घडला कीं तोही कांहीं काळ आश्चर्यानें तटस्थच उभा राहिला. काय करावें आणि काय नाहीं हें त्यासही कळेनासें झालें. इतक्यांत त्याच्या कानावर कोणीसा करुणालाप पडला. 'आई ग! ए आई! कशाला सोडलास माझा हात? कुठं फसली गेलीस तूं?–हे बघ–बघ शिपुरडे काय करताहेत ते! मेल्यानों, तुम्हांला लाजा नाहींत, कां रे?—आयाबहिणी नाहींत? देवाच्या समोर असला पाजीपणा करतां?" असेच कांहीं तरी ते करुणोद्गार होते. ज्या कोपऱ्यांतून त्या किंकाळया ऐकूं आल्या तिकडे साहजिकच

विजयनें लक्ष वेधलें गेलें. प्रकार पाहिला तो डोळ्यावर विश्वास ठेवण्यासारखा नव्हता. तो खुशालचेंडू भाविकगण जी स्त्रियांची विटंबना करीत होता, ती चोरीच्या आणि शिताफीच्या भावनेनें बऱ्याच प्रमाणांत कमी प्रतीची होती. परंतु तो पोलीसशिपाई आणि त्याचे तीन चार गुंड साथीदार ह्यांना त्या स्थळीं कुणाची भीति असणार? गर्दीतून बाहेर असल्यामुळें त्यांचीं दाणगट शरीरेंही अगदीं स्थिर होतीं. आपले हात शक्य तितके लांब करून त्यांनीं गर्दीत घालावे, एखाद्या निराधार स्त्रीस आपल्याकडे ओढावें आणि निर्धास्तपणें तिच्या भांबावलेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन मनास येईल ती शक्य तेवढी अश्लील लीला त्यावेळीं चालवावी!

त्या किंकाळ्या ऐकून व तो प्रकार पाहून आतां मात्र विजयची प्रसंगावधानी वृत्ति जागृत झाली. तात्काळ तो ओटा चढला. त्या शिपाई गुंडांकडे धांवून गेला व त्वेषानें ओरडला, 'ए बदमाश यह क्या चलाया है?' तत्क्षणी गुंडाच्या लीला थांबल्या आणि त्यांची दृष्टि त्या बेडर तरुणाकडे गेली. तरुणाचा पोशाख साधा असला तरी तो उच्च घराण्यांतला असावा हें उघडच होतें. शिकल्यासवरलेल्या माणसांची अभिमानी वृत्ति त्याच्या चेहऱ्यावर झळकत होती. त्याचा चेहरा सावळा होता. गाल किंचित बसलेले होते. डोळे थोडेसे खोल गेलेले होते आणि शरीर सडपातळच होतें. पण अशी त्याची ठेंगणी मूर्तीही काटक दिसत होती. आणि शिवाय तो इतका रुबाबदार होता, कीं त्याच्या सात्विक व्यक्तित्वाची छाप त्य दांडगटावर तात्काळ पडली. ते किंचितसे दचकले आणि त्यांपैकीं एक जराशा हलक्या आवाजांतच म्हणाला की " अच्छा, अच्छा तुम्ही आपल्या वाटेला लागा; आमच्या भानगडींत पडूं नका." त्यावर विजयनें आणखी एक वार हिंदींतच दरडावलें कीं " खबरदार याद राखा. तुम्हांला इथें बंदोबस्त करायला ठेवलें आहे कीं स्वतःच बदमाशी करायला ठेवलें आहे? अशा स्वरूपाचें विजयचें दटावणें आणखी कांही काळ चालूंच होतें. त्याचा एकाएकी असा पथ्यकर परिणाम झाला की, दरवाजाच्या पायऱ्यांवरील खट्याळ, ऋगणांच्या लीला आतां थांबल्या. पलीकडच्या शिपायानें आंतील येणाऱ्या पुरुषांची गर्दी एकाएकीं अडविली. दर्शनोत्सुक संकटांत सांपडलेल्या भावड्या स्त्रियांचा मार्ग मोकळा झाला. तें गडबडीचें वातावरण कांहीसें शांत झालें. आणि आपल्या हातून झालेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या आनंदाच्या भरांत विजयला हायसें वाटून तो ओट्यावरून सिंहाच्या ऐटींत पुनः संथपणें चौकांत उतरला

नंतर तो जरासा थबकला आणि त्यानें त्या पायऱ्यावरील स्त्रियांच्या घोळक्याकडे एकवार पाहिलें. बहुतेक स्त्रिया आतां गाभाऱ्यांत पोंचल्या होत्या. मात्र ती [illegible]णी स्थिति झालेली मघांची तरुण मुलगी एका पोक्त स्त्रीशीं बोलत बोलत कांहीं[illegible]कावे खातच पायऱ्या उतरत होती. दोघींच्याही साधारणतः सारख्या दिसणाऱ्या तोंड[illegible]रून आणि त्या तरुणीनें किंकाळ्या फोडल्या त्यावेळीं तिच्या मुखांतून निघालेल्या 'आ[illegible] या उद्गारावरून विजयनें त्या दोघींचें नातें बरोबर ताडलें. तो त्या मायलेकींकडे अनिमिष नेत्रांनीं पाहूं लागला. सौंदर्याची व्याख्या कुणी कशी करावी? मनुष्यानें मन मोठें वैचित्र्य-

पूर्ण आहे. त्यास अठरा धान्याचें कडबोळयाचें उदाहरण देऊन भागायचें नाहीं. प्रत्येक व्यक्तीची रुचि निराळी! विजयला ती मुलगी फार गोड वाटली. तिच्यांत कांहींतरी इतर मुलींपेक्षां विशेष आहे असा त्याचा एकाएकी ग्रह झाला. तो निमिषार्धांत तऱ्हेतऱ्हेचे शोध करूं लागला. बहुतेक महाराष्ट्र मुली कानांत एकाच पद्धतीची कुडीं घालतात ह्या मुलीनें आपल्या चेहरेपट्टीला साजेल अशा सुंदर ईयररिंज कानांत घातल्या होत्या, म्हणूनच का हा निराळेपणाचा भास तिच्या ठायीं उत्पन्न झाला असेल? तिनें अंबाडा घातला नव्हता, आपला लांब नागिणीचा शेपटा यावेळीं पुढ्यांत घेऊन, ती सुटलेली वेणी विणण्यांत तिच्या कोंवळ्या बोटाचे चाळे चालले होते.

अगदीं कमी किंमतीचें नारिंगी वर्णाचें साधें पातळ ती नेसली होती. पण तिची नेसण्याची पद्धत इतकी टापटिपीची होती, आणखी तें तिच्या देहावर इतक्या ठाकठिकीनें बसलें होते का, इतक्या ओढाताणीनंतरसुद्धां तिच्या पोशाखांत गबाळपणाचा अंशमात्र शिरला नव्हता. अंगांत पोलका नव्हता, अगदीं साध्या पद्धतीची नारिंगी रंगाच्याच खादीची चोळी होती. तीवर बदामाच्या आकाराचे पांढरे ठिपके छापलेले होते. आंग्लविद्येनें थोडीशी रसिकता निर्माण झालेल्या विजयला एक ओझरता विचार आला, कीं हे ठिपके म्हणजे तिच्या हृदयाचीं प्रतीकें तर नव्हत ना! तिचे डोळे विशाल होते—बदामाच्या आकाराचे होते. नासिका विशेष वाखाणण्यासारखी नव्हती, पण सौंदर्याची विशेष हानि करणारीहि नव्हती. ओंठ जाड नव्हते पण फिकट होते. जिवणी लहानच होती. तिच्यांतल्या दोनच गोष्टी विजयला आवडल्या नाहींत. रागारागानें व किंचित् त्राग्यानें, ती आईशीं जेव्हां बोलूं लागली, तेव्हां तिचे दांत विजयला स्पष्टपणें दिसले; ते पांढरे स्वच्छ नव्हते. ती संथपणें खालीं उतरत असतांना विजयचें लक्ष तिच्या पावलांकडे गेलें, तीं त्याला थोडीशीं बेढब वाटलीं.

आणि हें सारें निरीक्षण त्यानें खरोखरच निमिषार्धांत केलें.

—त्या मुलीवरून त्याची दृष्टि किंचित् काळ तिच्या आईवर स्थिर झाली. बाई पोक्त होत्या. साधारणतः पस्तीशीच्या घरांत असतील. कपाळीं कुंकूं नव्हतें. सकेशा होत्या, दिसायला बऱ्यापैकीं होत्या. पण एक गोष्ट मात्र विजयच्या लक्षांत आली, कीं कांहींतरी दुःखाकष्टाच्या छायेनें बाईचा चेहरा किंचितसा काळवंडलेला आहे.

मुलगी म्हणाली, 'आई ग, मेले नुसते चांडाळ आहेत. पार्वतीकाकूंच्या सांगण्यावरून सारा घोटाळा झाला. या जागोबाला यायची कुणाची मेली एवढी हौस होती? कुठें आहेत पार्वतीकाकू?'

'त्या गेल्या देवळांत' आई भांबावून म्हणाली 'नि जातांना मलाही पण आग्रह होत्या, कीं असें अगदी दारांतून परत जाऊन देवाचा अपमान करूं नये!'

'मग आतां कसें करायचें?' मुलीनें विवंचनात्मक प्रश्न केला. "त्या आतां बाहेर केव्हां येतील कुणास ठाऊक! रमामावशी, चिंगी, बनूताई, सिताआत्या साऱ्याच का गेल्या तिच्याबरोबर?—मग त्यांच्यासाठीं आतां वाट पहायची मला बाई भीतिच वाटते. पहा त्या मेल्या शिपुरड्यांकडे! अजूनही सारी आपल्याकडेच मेल्यांची नजर आहे—'

ते शिपाई आपसांत कांहीं कुजबुजत होते आणि कांहींसे बेत रचीत सैतानी आनंदानें हंसत खिदळत होते.

आई म्हणाली " आतां मी तरी काय करूं बाई ? मेल्यांच्या मनांत काय आहे नि काय नाहीं कुणास ठाऊक ? झपाझप पावलें टाकीत परत निघून जावें म्हटलं तर आपल्याला जायचें आहे मुसलमानांच्या वस्तीतनं. येतांनाच नाहीं कां पाहिलेंस तूं की दोन्ही बाजूच्या घरांतल्या मुसलमानांच्या नजरा कशा कावळ्यासारख्या टपल्या होत्या त्या. "

' खरंच. आतां कसं करायचं ? ' असें म्हणून त्या बालिकेनें आपली भांबावलेली केंविलवाणी दृष्टि आशाळभूतपणानें जेव्हां विजयवर रोखली तेव्हा त्याला वाटलें कीं सहाय्यार्थ पुनश्च एकवार तें आपल्याला पाचारणच आहे. पण परक्या स्त्रियांशीं एकाएकी आपणच कसें बोलायचें ? मीच तुम्हांला पोंचवितों असें कसें म्हणायचें ? माझ्यासारख्या परक्यावर त्यांनीं तरी कसा विश्वास ठेवायचा ? त्या मुलीच्या नजरेचा अर्थ कांहीं वेगळाच नसेल कशावरून आणि बाबासाहेब येण्यापूर्वी या स्त्रियांना बरोबर घेऊन बाहेर कसें पडायचें ? अशा अनेक शंकाकुशंकांनीं त्याचें मन गोंधळून गेलें आणि त्या स्त्रियांकडे मधून मधून आधारभूत दृष्टीनें पाहात तो जागच्या जागींच थबकून उभा राहिला. पण अखेर त्यानें मनाशीं निश्चय केला कीं काय होईल तें होवो, ह्या भांबावलेल्या कुलीन स्त्रियांना अवश्य ते साहाय्य करायचेंच आणि ह्याच उदात्त हेतूनें त्याच्याकडे मोकळेपणानें पाहातच त्यानें एक दोन पावलें पुढें टाकलीं.

अगदी नेमकें त्याच वेळी तो शिपाई आणि त्याचे जिगरदोस्त त्याला एकाएकी आडवे झाले. शिपायानें खिशांतली एक चोपडी बाहेर काढली व जणु नम्रपणें प्रश्न केला–'महाराज आपलें नांवपत्ता कळविण्याची तसदी घ्याल काय ? '

" काय म्हणून–? "

तोंच त्यापैकीं एक दांडगा गडी पुढें होऊन खोंचदारपणानें खेकसला–" क्यों मिस्टर, पढे लिखे होकर ये भी धंदे सीखे हो "

क्षणमात्र विजयला कांहींच उत्तर सुचेनासें झाले. पण लागलीच त्याच्या तोंडून सहजासहजी उद्गार निघाले कीं " बदमाष, स्वतःच वात्रटपणा करून दुसऱ्यास तसा बोल लावतांना कांहीं शरम–! "

तथापि हें त्याचें त्वेषाचें वाक्य पुरें होतें न होतें तोंच त्याच्या पाठीवर एक अनपेक्षित ठोसा बसला. लागलीच आणखी दोघांचौघांनीं चापटा, थापडी, गुद्दे इत्यादिकांचा वर्षावही विजयवर सुरू केला. त्याची विचार शक्तिच लुप्त झाली आणि त्याचे हातपाय मारामारी करण्यांत गुंतून गेले. शिपुरड्याची दाढी धरून ओढण्यासही त्यानें कमी केलें नाहीं. एकाच्या पोटांत ठोसा मार, एखाद्यास चांगलासा गुद्दा हाण, तर एखाद्यास लाथेनें जोरानें ढकलून दे, असा प्रकार नकळत त्याच्याही हातून सुरू झाला. एकाएकी हलकल्लोळ झाला. तऱ्हेतऱ्हेची मंडळी पाहतां पाहतां भोंवतीं

जमा झाली आणि एक दोन मिनिटांच्या अवकाशांतच त्या बाजूस मंडळीची सारी धांवपळ सुरू झाली. त्या बदमाष शिपाईगड्यांनीही मोठमोठ्यानें चोराच्या उलट्या बोंबा सुरू केल्या. "आयाबहिणींवर देवाच्या देवळांत सारखा हात टाकणारा बदमाष एकदांचा सांपडला" अशा तऱ्हेचा भाव विजयाविरुद्ध त्यांनीं शिताफीनें लोकांत निर्माण केला. सत्यासत्याची परीक्षा करण्याची चाड आमच्या भाविक जनतेंत कशी असेल? चोर शिरजोर झाले, साव ठरले गेले आणि संन्याशावर सुळीं जाण्याचा प्रसंग गुदरला. विजयविरुद्ध एकाएकी असें कांहीं वातावरण निर्माण झालें कीं आतां ओरडूनही कांहीं गत्यंतर नाहीं हें त्याच्या तात्काळ ध्यानांत आलें. मारामारी, झटापट मात्र सारखी चालूच होती. विजयला अमानुषपणें बेदम मार बसत होता हें त्यावेळीं त्याच्याही लक्षांत आलें नाहीं. त्याला न कळत त्याची कांहीं-तरी शक्त्यनुसार सारखी धडपड धडपड चालली होती.

---

# २

# साखरझोंपेंतलें स्वप्न

आधुनिक काळच असा कांहीं चमत्कारिक आला आहे कीं, आतां लुच्चा लफंग्यांचाच जगांत निभाव लागणार! असत्यानें, शिताफीनें, युक्तीप्रयुक्तीनें, अहंमन्यतेनें, आत्मप्रशंसतेनें आणि स्वतःचें ढोलके वाजविल्यानेंच कोणताही मनुष्य आतां थोरपदास चढणार! खरी सात्विकता जगाला नको, निखालस सत्याची दुनियेला चाड नाहीं. पण सात्विकतेचा आणि सत्याचा आभास मात्र ज्यास स्वतःविषयीं निर्माण करितां येईल, तोच जगात महात्मा! सात्विक तरुणाचें सळसळणारें रक्त, हा जगाचा साधा व्यवहार जाणत नाहीं. तरुण सत्याचा खरोखरच प्रयोग करावयास बसतो आणि सपशेल फसतो. असा हांवरेपणा करणाराच आजच्या जगांत पाजी ठरतो. विजयच्या हातून असलेंच पाप घडलें नव्हतें कां? आणि म्हणूनच आधुनिक जगानेंही त्याच्या पापाचें त्याला चांगलेंच प्रायश्चित्त घ्यावयास लावलें.

तसें म्हटलें तर ते शिपाई आणि त्यांचे दांडगे मित्र शेवट करून काय करणार होते? प्रत्यक्ष खुनी माणसाचाही खून करण्याचा अधिकार कांहीं पोलिसास कायद्यानें दिला नाहीं. त्या मारामारीचें आयुष्य आणखी कांहीं काळ लांबलें असतें तें मात्र लागलीच घडलेल्या एका प्रसंगानें लवकरच संपुष्टांत आलें.

स्त्रियांवर हात टाकणारा कोणी एक बदमाष, पोलिस अधिकाऱ्यास सांपडला आहे ही बातमी बाबासाहेबांस जेव्हां लागली तेव्हां देवळाच्या बाहेर कांहीं काळापूर्वी पडलेल्या बाबासाहेबांस विजयचा जरासा विसर पडून तो बदमाष पाहण्याची इच्छा झाली. परंतु आपला प्रिय पुत्र आणि तो अनीतिमान आरोपी हे दोघेही बाबासाहेबांस साश्चर्य एकाच व्यक्तींत आढळले. विजयला जरी कोणी ओळखत नव्हतें तरी बाबासाहेब मशहूर होते. अपराधी तरुण प्रत्यक्ष बाबासाहेबांचा मुलगा आहे हें जाहीर होतांच तो पापी असो सर्वांस अशक्य कोटींतील वाटूं लागलें. खऱ्या अपराध्यांनीं तर तेथून लागलीच पाय

काढला आणि भोंवतालची जनताही सहानुभूतिपर उद्गार काढीत आपापल्या मार्गाला लागली. तें खडाजंगीचें वातावरण थोडक्याच काळांत पूर्णपणें निवळलें.

पित्यानें पुत्राला मायेनें प्रश्न केला, "विजय, त्या चवुतऱ्यावर चल पाहूं. तुला चांगलंच लागलेलं दिसतंय्."

विजयनें जमिनीवर पडलेली टोपी उचलून झटकली, डोक्यावर घातली, धोतर जरासें नीट केलें, कोटाच्या सुटलेल्या गुंड्या लावल्या व तो धापा टाकीत पण शांतपणें म्हणाला, "माझ्या लागण्याचें कांहीं विशेष नाहीं पापा, पण त्या दोन स्त्रियांना"—असें म्हणता म्हणतांच ती गर्दी वितळल्यामुळें आतां पुनः स्पष्टपणें दिसणाऱ्या त्या मायलेकींकडे विजयनें बोट दाखविलें. त्याही याचवेळीं त्या बापलेकाकडेच येत होत्या. यावर बाबासाहेब जरा रागावून म्हणाले, "चल, मूर्ख कुठला. येवढा बेदम मार बसला तरी तुझें बायकांच्या नादीं लागणें कांहीं सुटत नाहीं."

विजय आश्चर्यानें उद्गारला, "म्हणजे पापा, माझ्या हातून स्त्रियासंबंधीं कांहीं अघोर पाप घडलें असें या लोकांप्रमाणे तुम्हालाही वाटूं लागलें की काय!"

"हें पहा," बाबासाहेब त्याला प्रेमानें जवळ ओढून म्हणाले, "प्रथम आपल्या दवाखान्यांत चल पाहूं. तुला जें कांहीं लागलें असेल त्यावर मला प्रथम इलाज केला पाहिजे आणि मग तूं काय प्रताप गाजविलेस, कसकसे गाजविलेस याचा मागाहून विचार करूं."

या संभाषणांतले बाबासाहेबांचे शेवटचे उद्गार त्या मायलेकींच्या स्पष्टपणें कानावर पडले आणि ती पोक्त बाई जराशी गंभीरपणानें बाबासाहेबांना म्हणाली, "आपल्या मुलाचे आम्ही दोघी खरोखरच ऋणी आहोंत. प्रत्यक्ष त्या शिपायांनींच ह्या माझ्या मुलीची नाहीं नाहीं ती विटंबना केली. तुमचा मुलगा धावून आला, आम्हां सर्वांना त्यानें संकटांतून सोडवलें आणि स्वतः निंद्य ठरवून असा चमत्कारिक रीतीनें मार खाल्ला."

आकस्मिकपणें त्या बाईचें धिटाईनें पुढें येणें, अनोळखीपणास न जुमानतां अविनयपूर्वक बोलणें चालणें हा सारा प्रकार बाबासाहेबांस मोठा चमत्कारिक वाटला. पण त्या बाईच्या तेवढ्याच उद्गारावरून बाबासाहेबांनीं एकाएकीं ताडलें कीं, आपल्या मुलानें कांहींतरी अभूतपूर्व मर्दुमकीच गाजविली आहे. तसें बाबासाहेबांत स्त्रीदाक्षिण्यही फार होतें. लागलीच त्यांच्या तोंडून पोक्तपणाची सहानुभूतिपूर्वक भाषा निघूं लागली. विजयनें थोडक्यांत परिस्थितीची पूर्ण कल्पना आणून दिली आणि बाबासाहेबांस पटवून दिलें कीं, आतां या स्त्रियांस त्यांच्या घरीं सुखरूपपणें पोंचवून देणें अत्यंत जरूरीचें आहे.

स्त्रियांवर येवढेसे उपकार सहजासहजीं कुणीही करील, आणि बाबासाहेब तसे दिलदार होते. लागलीच बेत ठरला आणि मंडळी देवळाबाहेर पडून मोटारींत येऊन बसली. रात्रीच्या वेळीं आकस्मिक रीतीनें देवळास जाण्याचें ठरल्यामुळें शॉफर बरोबर घेतला नव्हता. बाबासाहेबांस मोटार चालवितां येत नव्हती. अर्थातच चाक विजयच्या हातीं पडलें.

बाबासाहेब त्याच्या डाव्या बाजूस बसले आणि त्या नवख्या स्त्रिया मोटारींत मागच्या बाजूस बसल्या.

त्या तरुण मुलीला विजयसंबंधीं वाटणारा आदरभाव प्रगट करून दाखविण्याची थोडीशी संधि ह्यावेळीं एकदांच काय ती मिळाली. स्त्रियांनीं आंत बसावें म्हणून विजयनें जेव्हां अदबीनें मोटारीचें दार उघडलें तेव्हां त्याचा उजवा तळहात रक्तबंबाळ झालेला तिला दिसला. तें दृश्य पाहतांच त्या अजाण बालिकेच्या हृदयांत चर्र झालें आणि एकवार विजयकडे तिनें अशा मुद्रेनें पाहिलें कीं, त्याला जखमामुळें होणाऱ्या दुःखाचें जणूं परिमार्जनच झालेलें दिसलें. चालू मोटारीच्या घर्र आवाजांत मायलेकींचें जें कांहीं थोडेसें कुजबुजणें त्याच्या कानावर पडलें, तें ऐकतांच त्याला मोठें धन्य वाटलें.

मुलीचें बोलणें ऐकूं येत होतें—"पाहिलेंस आई, ह्यांना किती लागलें आहे तें." आणि आई कांहींसें म्हणत होती कीं, "शकू, जगांत अशींच कांहीं देवमाणसें असतात बरं!"

मोटार चालवितांना विजयच्या सर्वांगांतून वेदनेच्या आरपार कळा निघत होत्या. परंतु कानावर पडलेल्या असल्या या स्तुतिश्रवणानें त्याला कांहीं काळ दुःखाचा विसर पडला.

चिटणीस पुऱ्यांत डॉ. मुंज्यांच्या घरापुढें एका अरुंद बोळाच्या तोंडाशीं त्या पोक्त बाईनें मोटार थांबविण्यास सांगितलें. विजयनें विचारणा केली, "इथून फार लांब नाहीं ना आपलें घर? नाहींतर मी येतों पोंचवायला."

त्यावर ती बाई किंचित् हंसून म्हणाली, "नाहीं नाहीं इथून अगदींच जवळ आहे आमचें घर. आणि हा कांहीं मुसलमानपुरा नाहीं." यावर बाबासाहेबही थोडे थट्टेच्या स्वरांत म्हणाले, "आणि शिवाय डॉ. मुंज्यांचा वाडाही जवळच आहे."

हें बाबासाहेबाचें मोकळेपणाचें बोलणें ऐकून त्या बापलेकांना एक लहानशी विनंति करण्याचें धार्ष्ट्य त्या बाईनें केलें. ती कांहींशा संकोचानेंच म्हणाली, "आम्हांला पोंचवायला येण्याचें कारण नाहीं खरें, पण गरीबाच्या झोपडीला आपणासारख्यांचे जर पाय लागले तर मनाला मोठें बरें वाटेल."

बाबासाहेब म्हणाले, "आतां पुढें केव्हां तरी येऊं. विजूच्या दुखापतीची व्यवस्था आधीं करायला हवी." परंतु ज्या रोग्याचीं बाबासाहेबासारखे डॉक्टर येवढी काळजी वहात होते तोच एकाएकीं मोटारीखालीं उतरला आणि बाबासाहेबांना म्हणाला, "पापा, बघूंया तर एकदां यांचें घर. हा मी आतां आलोंच परत."

विजयला त्या स्त्रियांचें घर पाहण्याची जिज्ञासा अशा वेळीं कां झाली कुणास ठाऊक! त्याच्या शरीरावरील जखमांपेक्षां त्याच्या हृदयांत लागलेल्या जखमेची त्याला आधीं काळजी वाहाविशी वाटली काय? आमचा हा तर्क कदाचित् उतावीळपणाचाही असेल. तो त्या स्त्रियांकडे एकाएकी कां ओढला गेला ह्याचें कारण स्वतः विजयलाही माहित नसेल. ते तिघेही पांच पंचवीस पावलें चालून गेल्यावर कुठें मोटारींत बसलेल्या बाबासाहेबांना वाचा फुटली कीं, "ए वेड्या लौकर परत ये."

रस्त्यांतून जातां जातां संभाषण कांहीं असे विशेष झालें नाहीं. मुलगी म्हणाली,

"आई, अजून ऊर कसा धडधडतो आहे ग !" "शकुंतलाबाईवर आज एक मोठेंच संकट आलें होतें म्हणायचें."

म्हणजे ! आश्चर्यानें बाई उद्गारल्या, "शकूला तुम्ही ओळखतां कीं काय ?"

विजय जरासा हंसला. "मला शकुंतलाबाईचें नांव कसें कळलें म्हणतां होय ? हात तिच्या ! त्यांत काय आहे ? मघाशीं तुम्हीच नाहीं कां तिला 'शकू' म्हणालात ?"

आई, शकुंतला म्हणाली, "हरवलेल्या 'उंटां'तील फकिरासारखेच आहेत म्हणायचे विनायकराव."

यावर विजय खो खो हंसून म्हणाला, "सर्वांनाच कांहीं फकिरी साधत नाहीं. माझें नांव विनायक नाहीं. विजय आहे !"

ही चुकीची दुरुस्ती ऐकून शकुंतलेच्या आतां लक्षांत आलें कीं, बाबासाहेबांनीं आप-ल्या मुलाला मघाशा 'विनू' म्हटलें नव्हतें— 'विजू' म्हटलें होतें.

वाड्यांत शिरण्यापूर्वीं मोठ्या दरवाजाच्या दिंडीची आंतली साखळी शकुंतलेनें शिताफीनें हात घालून उघडली. तेव्हां विजय उद्गारला,"ह्या वाड्याला कां तुम्ही झोपडी समजतां ?" आणि त्यावर चटदिशीं बाईनीं उत्तर दिलें," अहो, ह्या वाड्यांतल्या सात बिऱ्हाडांपैकीं दोन भाड्याच्या खोल्या काय त्या आमच्या...जपून आंत या हो. अडगळींतून नवख्या माणसाला मोठ्या प्रयासानेंच पार पडावे लागते."

बाईनीं दाराचें कुलूप काढलें आणि म्हणाल्या, "थांबा हं थोडे. मी पलीकडल्या बैठकीच्या खोलीचें दार उघडतें."

विजय बाहेरच थबकला आणि त्या मायलेकी अंधारांत कांहींशा चांचपडत आंत जाऊं लागल्या. चार पावलें मागे असलेल्या शकुंतलेला विजयनें सहजासहजी प्रश्न केला— "आपलें आडनांव काय ?"

"देशपांडे." आणि ह्या प्रश्नाचें उत्तर देण्यासाठीं म्हणून मनांत नसतांही शकुंतलेला दाराच्या आंतील बाजूस थांबावेंच लागलें.

"शकुंतला देशपांडे" विजय कांहींसें आठवल्यासारखें करून पुटपुटला. तोंच पलीकडच्या दारानें हातकंदील घेऊन त्या बाई बाहेर डोकावल्या आणि म्हणाल्या—

"या असे इकडे." दारांतून प्रवेश करीत असतांना विजय म्हणाला," शकुंतलाबाईनीं खूपच नांवलौकिक मिळविला आहे. इतक्या लहान वयांत मॅट्रिकची परीक्षा चांगल्या-रीतीनें पास होणें हें कांहीं सर्वच मुलींना साधत नाहीं." त्या बाईंना ह्या उद्गारांनीं धन्य वाटण्याऐवजीं त्या आपल्या मुलीलाच उसन्या रागानें म्हणाल्या, "शकू, उगाच उठल्या बसल्या स्वतःची टिमकी गाजविणें कांहीं मोठें चांगलें समजत नाहींत." त्यावर शकूही पण फणकाऱ्यानेंच म्हणाली," हें मी कधीं ग सांगितलें ह्यांना माझ्याविषयीं कांहीं ?"

" मग यांना कसें कळलें हें ?"

" हें पहा " विजय हंसत हंसत म्हणाला, " कॉलेजांतल्या मुलांना किनई मुलींचा रिझल्ट मोठ्या काळजीपूर्वक वाचावासा वाटतो. आतां सहा महिन्यापूर्वीच मॅट्रिक पास झाल्या आहेत ना ह्या. कुठल्या कॉलेजांत आहेत आतांशा ? "

" सैंपाकिणीची तर ती मुलगी." बाई गंभीरपणानें म्हणाल्या. "तिचें कुठें आहे एवढें भाग्य कॉलेजांत शिकायला !" असें म्हणून बाईंनी आपलें चिमुकलें बिऱ्हाड दाखविण्याच्या उद्देशानें त्या खोलींतून विजयला स्वयंपाकघरांत नेले आणि शकुंतला बैठकीच्या खोलींत अंधारांतच तबकांत सुपारी कातरू लागली.

तीं स्वैपाकाचीं उपकरणीं त्याला लुटुपुटीच्या संसारासारखींच वाटलीं. तात्काळ त्याच्या तर्कट बुद्धीनें बिनचूक ताडलें कीं, बाई कुठें तरी स्वैंपाकपाण्याच्या कामाला नोकरीवर गेल्या. म्हणजे घरीं जेवणारा एकटादुकटाच जीव काय तो असेल. आणि आपला तर्क बरोबर आहे की नाहीं हें पडताळून पाहण्यासाठीं त्यानें पृच्छा केली, "आपण किती माणसें आहांत?"

बाईंनीं आंग धुण्याची खोली दाखवितांना सांगितलें. " आमच्या घरांतलीं सर्व माणसें आतां तुमच्या ओळखीचीं झालीं आहेत." आणि औपचारिकपणें विचारलें," चहा घेतां कां ? "

विजय उत्तरला, " नको. आतां बाबासाहेब मोटारींत माझी वाट पाहत असतील. आतां गेलें पाहिजे. "

विजयचा हा नम्रपणाचा नकार ऐकून बाईला हायसें वाटलें. कारण त्या अपरात्रीं घरांत दूध तरी कुठें होतें ! पुनः बैठकीच्या खोलींत येतां येतां बाईंनीं आर्जवाची विनंति केली कीं,' उद्यां सकाळीं बाबासाहेबांना घेऊन गरीबाच्या घरीं चहा घ्यायला येण्याची कबुली देत असाल तरच मी आतां तुम्हांला तरी जाऊं देतें.' शकुंतलेनें तबक पुढें केलें. त्यांतली सुपारीची चिमूट उजव्या हाताची जखम दिसू नये म्हणून डाव्या हातानें विजयनें उचलली आणि ती तोंडांत टाकलीशी करून तो म्हणाला—

" बाबासाहेबांची कबुली मी काय देऊं ? मी मात्र सकाळीं आठालाच येतों कीं नाहीं बघा. "

कंदिल घेऊन मायलेकींनीं विजयला दिंडी दरवाजापर्यंत पोंचविलें आणि बाईंनीं तात्पुरता प्रेमाचा निरोप दिला कीं, ' उद्यां सकाळीं आठवणीनें आलेच पाहिजे बरं का ' !

विजय झपाझप पावलें टाकीत मोटारींत येऊन बसला आणि ती चालू होतांच बाबासाहेब म्हणाले, ' बराच लवकर आलास कीं ! '

बाबासाहेबांचे हे उद्गार सरळ असून मुद्दां विजयला ते किंचित् टोमणेवजा वाटले. तरी तिकडे विशेष लक्ष न देतां घरी पोंचतपर्यंत देवळांत घडलेली इत्थंभूत हकीगत त्यानें बाबासाहेबांना सांगितली.

दोघेही पितापुत्र आपल्या बंगल्यांतच असलेल्या दवाखान्यावजा भागांत शिरले. रक्त वाहणारी उजव्या तळहातावर काय ती एकच जखम विजयला लागली होती. त्यावर

औषधोपचार करून बाबासाहेबांनीं बँडेज बांधलें व ' विलास विलास ' अशा मोठमोठ्यानें हांका मारण्यास आरंभ केला. बऱ्याच वेळानें जरासा त्रासिक मुद्रेनें डोळे चोळीत एक विजयच्याच वयाचा तरुण तेथें येऊन दाखल झाला. त्याला बाबासाहेबांनीं आज्ञा केली कीं " विजयला जागजागीं खूप मार लागला आहे. त्यावर हें आयोडेक्स चांगल्या रीतीनें चोळ, स्टोव्ह पेटव आणि गरम पाण्याच्या थैलीनें विजयचें सारें आंग शेकून काढ." मुलाच्यानें ' होय ' म्हणून विलास बाबासाहेबांच्या आज्ञेप्रमाणें उपचार करण्यांत गुंतला.

झोपावयास जाण्यापूर्वी बाबासाहेबानें विजयनें उतावीळपणें गाजविलेल्या मर्दुमकी-बद्दल त्यास थोड्याशा उपदेशाच्या रूपानें म्हटलें, " विजू, तूं सत्यवक्ता आहेस, अनीति तुला पाहवत नाहीं हें सारं खरं पण निधड्या छातीनें कांहींही करणं नेहमीच कांहीं बरं नव्हे. त्या गुंडांशीं भांडण्यापूर्वी तूं आपल्या शक्तीचा, आपणास मिळूं शकणाऱ्या मदतीचा, भोळ्या लोकांच्या मनोवृत्तीचा थोडासा विचार करायचा होतास. आतां पुढें ही गोष्ट लक्षांत ठेव. नाहींतर नेहमींच कांहींतरी चांगलं करायला जाशील अन् असाच तोंडघशीं पडशील."

बाबासाहेबांचे हे सांत्वनपर शब्द ऐकत असतां विजय सारखा ' अयाई ग ' म्हणून विवळत होता. तेव्हां बाबासाहेबानें त्याला कसलीशी एक गोळी घ्यावयास सांगितली व ' आतां तुला चांगली झोंप येईल ' असें सांगून ते तेथून निघून गेले.

आयोडेक्स चोळून झाल्यावर विजय विलासला म्हणाला, "आतां अंथरुणावरच मी लोळतों नव. तेथेंच तूं आपलें शेकण्याचें काम चालूं दे."

विजयचें वैभव सारें राजेशाही थाटाचें होतें. आपल्या छप्परपलंगावर तो कांहींसा रुबाबदारपणानें पण कण्हत आडवा पडला असतांना विलासनें त्याच्या सर्व अवयवांवर क्रमाक्रमानें गरम पाण्याची पिशवी ठेवण्यास आरंभ केला.

त्यानें कांहींशा कुतूहलानें पृच्छा केली ' मोटारबिटार उलटली कीं काय ? '

तो त्याचा प्रश्न ऐकून विव्हळत असतांही विजयला हंसूंच आलें. तो गमतीनें म्हणाला, " अरे ठोंब्या, मोटार उलटली असती तर माझ्याबरोबर पापांना नसतं कां लागलं ?... जाउं दे झालं. उगाच कशाला करतोस चौकशी ? यंदातरी आपल्या इंग्रजी सहावींतून निसटशील कीं एकाच वर्गांत एक तप पूर्ण घालविलंस म्हणजे त्याच वर्गाचा मास्तर होशील !... आतां तरी कांहीं अभ्यासबिभ्यास करतोस कीं नाहीं रे ? "

इतक्यांत कांहींशीं पावलें वाजण्याचा भास झाला आणि एक विकेशा पोक्त बाई खोलींत शिरतां शिरतां म्हणाली, " विजू, असं काय रे त्याला सदान्‌कदा टोंचून बोलतोस ? देवानं सगळ्यांनाच कांहीं सारखी बुद्धि दिली नसते...माझा विलास हुशार नसला तरी सालस आहे. तुझ्यासारखा कांहीं अशा हलक्या माणसांकडून लाथा खात नाहीं."

रमाकाकूंचे टोमणे, त्यांचं विलासवरचें वात्सल्यप्रेम, या साऱ्या गोष्टी विजयला आतां-पर्यंत परिचयाच्या होत्या. परंतु आजच्या प्रसंगाची हकीगत असल्या अपरात्रीच्या वेळीं

इतक्या थोड्या अवधींत रमाकाकूंना एकाएकी कळावी हें पाहून मात्र त्याला मोठें आश्चर्य वाटलें. तो उसळून म्हणाला, ' काकू, तुला कळलं कां एवढ्यांत सारं !'

रमाकाकूंनीं लागलीच आपलें नेहमीनें मायाळूपणाचें सोंग आणून प्रेमानें विचारपूस करायला आरंभ केला " जाऊं देत रे तुमची हीं भावाभावांचीं भांडणें. सख्खे भाऊ भांडतात मग चुलतभावांच्या रागालोभांत असं काय विशेष आहे ?···तुला फारसं नाहीं ना लागलं ? आतां नीट डोळे लावून स्वस्थपणें पडण्याचा प्रयत्न कर. जास्त बडबड करूं नकोस···विलास आतां पुरें शेकणं. त्याच्या कमरेखालीं ती पिशवी नीट रीतीनं ठेव पाहूं. म्हणजे त्याचा अंमळ डोळा लागेल अन् तूंही जाऊन नीज. मी बसतें हो विजू आतां तुजजवळ " इतकें म्हणून काकू त्याच्या कपाळावरून मोठ्या ममतेनें हात फिरवूं लागल्या. विजयनें थोडा वेळ डोळे लावले आणि काकूला त्रासिक मुद्रेनें सांगितलें " काकू, तूंही आतां झोपायला जा पाहूं. मला या वेळीं मजजवळ कुणिही नको."

आई नसतांनासुद्धां घरांतल्या एकमेव वडील स्त्रीचें सान्निध्य आपणांस नेहमींच कां नकोसें होतें, हें एक विजयला कोडेंच होतें. पण काकूची बोलघेवडी भाषा, तिने एकंदर खोट्या मायेचे हावभाव त्याला कधींच आवडत नसत. आणि आज तर हे विशेष त्रासाचे उद्गार त्याच्या तोंडून निघण्याचें कारण कांहीं वेगळेंच होतें. त्याच्या मनांत सारखा हाच प्रश्न घोळत होता कीं, बाबासाहेब घरांतल्या सर्वच गोष्टी वेळींअवेळीं काकूला सांगतात, ह्यांत कांहीं विशेष अर्थ असावा काय ? आपल्या आवडत्या वडिलांसंबंधींची ही शंका कांहीं काळ त्याच्या मनाचा जाच करण्यास समर्थ झाली खरी, पण लागलीच असल्या वाईट विचाराबद्दल त्यानें स्वतःसच अनेक शिव्याशाप देऊन घेतले.

डोळे लावले म्हणजे झोंप येते असें थोडेंच आहे ? त्याच्यापुढें आतां स्पष्टपणें तें मायलेकींचं कुटुंब दिसूं लागलें, व अनेक तऱ्हेचे प्रश्न त्याच्या पुढें उभे राहिले.

" दोनच व्यक्तींचें असल्या तऱ्हेचे कुटुंब जरासें आश्चर्यकारकच नाहीं कां ? बाई विधवा आहेत आणि तिला शकुंतला एवढी ही एकच मुलगी आहे, यावरून शकूचे वडील ती लहान असतांनाच दिवंगत झाले असतील असा तर्क करावा कां ? कदाचित् तिचीं कांहीं भावंडें जगांतून नाहींशीं झालीं नसतील कशावरून ? बाईला दुसऱ्याकडे स्वैपाकपाणी करण्यापर्यंत वेळ यावी अं ? म्हणजे तिला कुणी तिचा प्रतिपाळ करणारे भाऊबंदही नाहींत कीं काय ? नसावेतच; नाहींतर आपल्याच घरच्या बायामाणसांना असे दुसरीकडे काबाडकष्ट करूं देणाऱ्याची लोकांनीं छीथू नसती कां केली ? वा: ! पण लोकांची पर्वा न करणारीं माणसें जगांत जणुं नसतातच ? दोघींही जराशा टापटिपीनें वागणाऱ्या आणि कांहींशा सुधारकी थाटाच्याच दिसतात नाहींत कां ? आई त्या तसल्या गरिबींतही आपल्या मुलीची चांगलीच हौस पुरवणारी दिसते. एरवी कुड्यांऐवजीं कानांत कुंडलें कशीं येतीं ? पण कुड्या घ्यायला जास्त किंमत लागते म्हणून ह्या कुंडलांच्या योगानें आपली गरिबी झांकण्याचा हा प्रयत्न नसेल कशावरून ? भिंतीवर दोन तीन सुंदर रंगविलेलीं मोठालीं चित्रें

होतीं तीं शकूनें काढलीं असतील कां ? ज्यावेळीं त्या चित्रांकडे आपलें लक्ष गेलें त्याचवेळीं आपण हें तिच्या आईला विचारलें असतें तर ? तेव्हां विचारलें नाहीं तें आतां ८॥ ला सकाळीं नाहीं कां विचारतां येणार ?... ” अशा तऱ्हेचे विचार त्याच्या मनांत चालले असतांना तो अखेरीस पुटपुटला.

“ अरे हो, सकाळींच ८॥ ला चहाला जायचें नाहीं कां ? आतां कसेंही करून झोंपलें पाहिजे. ”

त्याच्या शरीरांत पुनः कळा सुरू झाल्या. जराशा कष्टानेंच उठून त्यानें विजेचें बटन दाबून दिवा लावला आणि पाहतो तों साडेपांच ! ‘आतां पुनः निजणें म्हणजे आपण पडलों सूर्यवंशी. तशांतून आज तर असलें हें जागरण झालेलें. ’

तो आपला आरामखुर्चीवरच बसला, एक सिगारेट पेटविली आणि जवळच पडलेलें कुठलेसें मासिक घेतलें आणि उगाच त्याचीं पानें चाळूं लागला. “ शकुंतलेनें ज्या कपाटांत आपलीं पुस्तकें ठेवलीं होतीं तें लहानसेंच पण मोठें तऱ्हेवाईक होतें नाहीं का ? आपल्या घरच्या या मोठमोठाल्या आलमाऱ्यांतसुद्धां तें सौंदर्य दिसून येत नाहीं. कपाटांतलीं तीं दोनचारच पुस्तकें पण किती व्यवस्थितपणें लावलेलीं ! घरीं बसविलेले पुठ्ठेबिठ्ठे कसे अगदीं नीट होते. खरेंच, मुलींनीं उच्च शिक्षण घेतले तरी त्या आमच्यासारख्या कधीं गबाळ होणार नाहींत...अन् शकूची, समयसूचकता किती, गृहकृत्यांत दक्षता किती, नम्रता किती ! ती स्वतः आपल्या मनानेंच तबकाच्या तयारीला लागली. अंधारांतही कुशलतेनें सुपारी कातरूं शकली, आणि माझ्यापुढें तबक करतांना किती नैसर्गिक अविनम्र उभी होती ?...बाईचा इतका मोकळेपणा कांहीं मोठा चांगला नाहीं ! माझ्यासारख्या अनोळखी माणसाला, पहिल्याच भेटींत, रात्रीं, बेरात्रीं, घरांतला प्रत्येक कानाकोंपरा दाखविण्यानें स्वारस्य ? पण मोकळेपणा म्हणजे देवपणाचाच अंश नव्हे कां ? ”

अशा तऱ्हेची त्याची ती विचाराची साखळी तुटतां तुटत नव्हती. सिगारेटची डबी पूर्ण संपली तेव्हां कुठें स्वारी उठली, दिवा मालवला आणि अंथरुणावर पुनः अंग टाकलं. दुखणारे हातपाय, थकलेलें शरीर, पण झोंप म्हणून कांहीं केल्या येईना. डॉक्टरांच्या औषधानें निद्रासुख लाभतें तर जगांतल्या अर्ध्या विवंचना नाहींशा झाल्या असत्या. त्याचें डोकें सुन्न झालें. कांहीं वेळ चुळबुळ करावी, कांहीं वेळ कुठलाच विचार येऊ नये, तर कांहीं वेळ विचारावर विचार यावेत. बराच वेळ अशी अवस्था झाल्यानंतर विजयची खिडकीच्या तावदानांकडे दृष्टि वळली. तों काय ? बाहेर चांगलें फटफटीत उजाडलेलें !

“ आतां मात्र जर कां झोंप घेतली तर बारा वाजलेच. आतांच उठावं, तोंडबिंड धुवावं, नीट पोशाख करावा अन् तिकडून चहाबिहा घेऊन परत आल्यानंतरच द्यावी झालं तण्णावून ! ” ह्या विचारानें त्यानें उठण्याचा प्रयत्न केला पण त्याचें सर्व शरीर इतकें जड पडलें होतें, कीं त्याला उठवलेच गेलें नाहीं.

—तोंच त्याला असा एकाएकीं कुठून उत्साह आला कोण जाणे ! तो एकदम उठला आणि लागलीच त्यानें मायलेकींच्या घराकडचा रस्ता धरला. शकुंतलेनें त्याचें हंसतमुखानें

स्वागत करून म्हटलें "वा हो विजय तुम्ही बोलावलं त्याच्याही बरंच आधीं आलांत कीं. इतकी कसली घाई झाली होती यायची ?"

"कबूल केलेल्या वेळीं मी जवळ जवळ कधीच जाऊन पोंचत नाहीं" विजयनें सांगितलें, "पण आज म्हटलं अगदीं नक्की वेळेवर जाऊन पोंचलंच पाहिजे; तों अशी उतावीळपणाची चूक झाली आणि इतका आधीं आलों."

यावर बाईनें जे उद्गार काढले ते ऐकून विजयला साश्चर्य गुदगुल्याच झाल्या. बाई म्हणाली "अशी गोड चूक करायला इथें तुम्हांला ओढ लागण्याजोगं कुणी आहे कीं काय?"

त्या उत्तेजनानें विजयही जरासा वाहवला. त्यानें मोकळेपणानें सांगून टाकिलें "हो तर. इथें कुणीतरी माझ्या आवडीचे आहे खरं."

हें ऐकुन शकुंतलेचा चेहरा गोरामोरा झाला. ती रागावून म्हणाली, "म्हणजे! मी आतांपर्यंत तुम्हाला अगदीं निर्मळ देवमाणूस समजत होतें! तुमचीही दृष्टि अशी कावळयासारखी आहे कां? एकूण त्या बदमाषांत आणि तुमच्यांत कांहीं एक फरक नाहीं म्हणावयाचा?"

विजय चपापला खरा, पण त्यानें आतां तत्त्वज्ञान पाजळण्यास सुरवात केली. "शकु, प्रेम करणें हें पाप आहे का ग? तूं मला आवडतेस हें सांगण्यांत मी असा काय गुन्हा केला! ते बदमाष कामुक होते, मी सात्विक नाहीं कां?"

विजयला आशा होती हें त्याचें गोड तत्त्वज्ञान त्या मायलेकीला पटेल. पण केवढें आश्चर्य! शकुंतलेनें एक कसलीशी वस्तू त्याला फेकून मारली आणि आईनेंही त्याच्या पाठींत एक चांगलाच गुद्दा लगावला. एवढा पुरुषासारखा पुरुष, पण विजयचे हातपाय एकाएकी लटलट कांपूं लागले आणि तो तात्काळ खालीं आपटलाच. त्याला चांगलेंच लागलें, तरीही त्याच्या पाठीवर बुक्क्याचा मार चालूच होता आणि त्याच्या कानांत दुष्टाव्याचे स्वर घुमूं लागले कीं 'ए दमाष, चल चालता हो येथून!'

हा सारा गंमतीचा खेळच म्हणावयाचा. कारण तितक्यांतच त्याला पुनः गोड आवाजांत कुणीशी विनंती केली कीं, 'विजू, ऊठ आतां हा चहा आणला आहे!'

विजयला शकूचा असा कांहीं राग आला आणि तो पुनः उठुन बसून म्हणतो, "हा कसला खेळ लावला आहे तुम्ही माझा. हें कसलें चहाचें आमंत्रण." पण शकू लाडिकपणानें जवळ येऊन म्हणाली, 'चहा घे म्हणतें ना मी?' आणि त्याचा रुसवा घालवावा म्हणून तिनें त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला हलवलें. पण त्याचा राग आतां अनावर झाला होता. तो एकदम उसळून ओरडला 'निघ इथून.'

हें म्हणत असतांना त्यानें आपला हात जोरानें झिडकारला, तों नेमका त्याला गरम चहाचा चटकाच लागला.

—आतां मात्र विजयचे डोळे उघडले आणि पाहतों तों पलंगाजवळ लीला उभी! तिच्या हातांतला चहाचा कप खरोखरच खालीं पडला. लीला फणकाऱ्यानें म्हणाली, "हें रे

काय दादा ? झोपेचें सोंग आणून 'चल चालती हो' काय म्हणालास आणि माझ्या हातचा कप तो काय झिडकारलास ! ही बरी तुझी कुंभकर्णाची निद्रा. मी आपली तुला चांगली उठवायला आलें. गरम चहा करून आणला. पहा बरें किती वाजले ते."

विजयच्या आतां पूर्णपणें ध्यानांत आलें कीं, आपण आपल्या अंथरुणांतच चमत्कारिक स्वप्नांत दंग झालों आहों. त्यानें घडाळाकडे पाहिलें तो चांगले सव्वाअकरा झालेले ! त्यानें एकदम लीलेला बाजूस सारलें आणि तो कांहींसा घाईघाईंतच बरळला, 'लिलू, आणखी एक कप चहा कर जा. पण लवकर...अरे बापरे, सव्वाअकरा वाजले. नेहमीप्रमाणेंच पुनः सारा घोंटाळा झाला म्हणायचा ! '...

# ३
# वेल, कळी आणि वारा—

संकटें व अडचणी हीं बहुधा जुळीं भावंडेंच असावींत ! ' छिद्रेष्वनर्थाः बहुली भवंति' हें जसें खरें तसेंच एका अडचणीमागूनही अनेक अडचणींचा वर्षाव होतो हेंही खरें. विजय उठला तो तडक खालीं जाऊन त्यानें घाईघाईंत प्रातःर्विधी आटोपला. आपल्याच गुंगींत स्वारी जिना चढून वर गेली. तेथून कसलीशी आठवण होऊन 'नाम्या' म्हणून तो हांक मारूं लागला. गड्याचा पत्ताच नव्हता. पुनः तडफडत तडफडत खालीं उतरला, गरम पाणी घेतलें, आणि वर येऊन दाढी केली. दिवाळीच्या सुटींत त्याला आजपर्यंत सूट घालण्याचें कामच पडलें नाहीं. म्हणून त्या चांगल्या कपड्याची पेटी पुण्याहून आल्यानंतर जी एकदांची खालीं ठेवण्यांत आली होती, ती तेथेंच होती. पुनः कपड्यासाठीं धडपड करीत खालीं जावें लागलें. वर येऊन सूट घातला. केस नीट केले. क्रीमलेदरच्या शूचा पत्ता नव्हता. वर खालीं सारें घर धुंडाळून काढलें. स्वतःसच चरफडत शिव्या देऊन घेतल्या. अखेरीस कुठें एका आलमारीमागें एकदांचा जोड्याचा शोध लागला. सारी तयारी झाली पण बाबासाहेबांच्या असल्या कामाच्या वेळीं घरीं मोटारीचा कसा पत्ता असणार ! हॅट्स्टँडवरची साहेबी टोपी डोक्यावर घातली, आणि सायकलवरच जायचें ठरविलें. पाहतो तों मागच्या चाकांत पंक्चर. खिसे चाचपलले. नव्या कोटामुळें मनीबॅग वरच राहिली होती. ती घेण्यासाठीं पुनः माडीवर एक फेरी करावी लागली. पाहतां पाहतां साडेबारा झाले आणि तो एकदांचा बंगल्याच्या फाटकाबाहेर पडला.

हातपाय ठणकतच होते. वाटेंत टांगा करून जायचें त्यानें ठरविलें तों पहिल्याच वळणावर घरची मोटार मिळाली. बाबासाहेबांनीं त्याला विचारलें ' काय रे, असा थाटमाट करून आज कुठें चाललास ? आज पूर्ण विश्रांति घ्यायची होतीस !' 'मी आतां एका तासांत परत येतों पापा.' विजयनें उडत उडत उत्तर दिलें.

' कुठें जवळच जातोस कीं काय ?

' नाहीं—जरासा लांबचाच पल्ला आहे. '

' जेवणबिवण आटोपलं. ? '

' उं. मागाहून जेवीन.'

यावर बाबासाहेबांनीं त्याला ' खुळा, हटवादी ' इत्यादि शेलकीं विशेषणें लावून मोटारींतूनच जायचा आग्रह केला; आणि त्यानेंही एका तासाच्या आंत येण्याचें आश्वासन देऊन मोटारींतूनच जायचें ठरविलें. शॉफर गणेशपेठेंत रहात होता त्याला वाटेंत जेवायला सोडून स्वतःच मोटार हांकीत पांचदहा मिनिटांतच त्या मायलेकींचें घर त्यानें गांठलें.

दिंडी दरवाजाच्या आंत पाय ठेवतांच आवारांतल्या उजव्या कोंपऱ्यांत एक लहानशी विहीर होती तीवरच शकुंतलेला पाणी भरत असतांना त्यानें पाहिलें. कांहींवेळ तेथेंच थांबल्यानंतर शकुंतलेचें लक्ष त्याच्याकडे गेले आणि ' चला घरांत, ही आतां आलेंच ' असें तिनें सांगतांच विजय बैठकीच्या खोलींत जाऊन बसला.

कांहीं वेळानें सैपाकघरांत बांगड्यांचा आवाज झाला, पावलें वाजलीं, आणि लागोपाठच घागर खालीं ठेवल्याचा खणकन् आवाजही ऐकूं आला. कमरेवरचा थोडासा भाग ओला झालेली शकुंतला आपले केस नीट सावरीत व खोंचलेला पदर मोकळा करीत तेथें आली व म्हणाली, ' आई कामावर गेली आहे पण आतां येईलच बहुधा एवढ्यांत. आपण अमळ थोडा वेळ वाट पाहतां कां ? ' असें म्हणून तिनें एक कसल्याशा मासिकाचा अंक त्याच्यापुढें ठेवला व ती सैपाकघरांत चालती झाली. विजयनें ' मी थांबतों ' असें बोलून न दाखवितां आपल्या हावभावानींच नकळत तिला तसें सुचविलें. तो मासिकाचा अंक त्याला त्यावेळीं अगदींच निर्जीव वाटला. भिंतीवरील चित्रांचें निरीक्षण करीत असतांना एका चित्राच्या बाजूस त्याला ' श. दे. ' अशीं अक्षरें आढळलीं. त्यावरून तीं कलात्मक चित्रें शकुंतलेनेंच काढलीं होतीं किंवा कसें हें रहस्य त्याला उलगडलें. "एकूण चित्रकलेंतसुद्धां शकुंतला चांगलीच प्रवीण आहे तर. अशा मुलीस मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टससारख्या शिक्षण संस्थेंत जर आणखी योग्य तें वळण लागतें तर किती चांगलं झालं असतं!" त्याचें लक्ष यानंतर फ्रेम करून भिंतीस टांगलेल्या पांच सर्टिफिकिटांकडे गेलें. त्यापैकीं पहिलें प्रशंसापत्र प्रवेशपरीक्षेच्या यशासंबंधीं होतें. शकुंतला सेकंडक्लासांत पास झाली होती. तथापि तिनें संस्कृतांत प्रावीण्य संपादन केलें होतें. तिची जन्म तारीख ५ मे १९१३ होती. एकूण शकुंतला माझ्यापेक्षां नऊ वर्षांनीं लहान असून सुद्धां जेमतेम चारच वर्षांनीं अभ्यासक्रमांत मागें आहे तर... केवळ विलासलाच आतां ठोंब्या म्हणण्याचा आपणास हक्क पोंचत नाहीं. " यापुढें दुसरीं प्रशस्तिपत्रें पाहण्याकडे लक्ष वेधणार इतक्यांतच सैपाकघरांत चाललेल्या कुजबुजीकडे त्यानें कान टवकारले.

' शकू, जानकीबाई अजून नाहीं कां परत आल्या ? '

' नाहीं पर्वतीकाकू. आई येईलच बहुधा एवढ्यांत '

' हेच कां ते कालचे गृहस्थ ? अगदीं वेळेवरच चहाला आले म्हणायचे. '

' हो...पण पार्वतीकाकू, जरा हळू बोला हो. नाहींतर ऐकूं जाईल त्यांना.'

'छ ग, ही कुजबूज कां त्यांना ऐकूं जाईल ? अन् शिवाय जाईना का तुला कां त्याची एवढी काळजी?'

'तसं नव्हें काकू, उगाच कशाला कुणाला नांवं ठेवा ?'

'ए वेडे, त्या वड्या येतील उपयोगाला. पण मघाचे आलुपोहे आतां पुनः गरम करून बेचव नाहीं कां लागणार ? त्यापेक्षां ताजंच करीनास कांहींतरी. किंवा कांहींच नको करूंस. अग, चांगला जेवून आला असेल तो. दोन वड्या नेऊन दे अन् चहा कर.'

तें संभाषण थांबलें. शेजारची पोक्त बाई दारापुढून विजयचे निरीक्षण करीत परत गेलेली त्याला दिसली आणि त्याच वेळीं एका बशींत वड्या घेऊन शकुंतलेने खोलात पाय ठेवला तों विजय चरापलाच.

बैठकीवर बसतांना विजयनें औपचारिक रीतीनें म्हटले, 'कशाला पुनः एवढी तसदी घेतलीत. उशीरा येण्यांत अपराध माझाच. आतां मी चहाला आलों नव्हतों. केवळ आपली क्षमा मागायला आलों होतों.'

'त्यांत एवढें काय आहे ?' बशी खालीं ठेवीत शकुंतलेनें हंसत उत्तर दिलें. 'कधींमधीं असा उशीर होतोच. त्यांतून आपल्याला जाग्रण झालं होतं; शिवाय वर लागलं पण होतं.' इतकें म्हणून शकुंतला चहाच्या तयारीसाठी आंत गेली. विजयला त्या वड्यापेक्षां तिचें भाषणच अधिक गोड वाटलें. आपल्या उशीरा येण्याचीं कारणें तिनेंच आपल्याला किती बरोबर सांगितलीं !

चहा घेत असतांना त्याचें लक्ष त्यानें मघाशीं दूर भिरकावून दिलेल्या मासिकाकडे गेलें. कारण शकुंतला आतां त्याच खोलींत जवळच उभी असल्यामुळें त्याला जरासा संकोच वाटला आणि तो उगाच मासिकाची पानें चाळण्याच्या कार्यात कांहींसा गुंतला. अगदीं शेवटच्या पानावर त्याची साहजिकच नजर गेली तों त्याला आणखी एक गोड धक्का बसला. ती एक चिमुकली एकपानी लघुकथा होती आणि तिच्यावर शकुंतलेचें नांव लेखिका म्हणून छापलेलें होतें. आतां मात्र ती लघुकथा वाचण्यांत तो खरोखरच कांहीं काळ स्वतःस विसरला. गोष्टींत असें कांहीं विशेष नवलाचें होतें असें मुळींच नाहीं. 'एक वेल; तिच्यावर उमललेली एकच चिमुकली कळी. वेलीनें डुलावें, त्याबरोबरच तिनेंही डुलावें, हंसावें, खेळावें. विकास अजून व्हायचा होता. तिला जगाची काय माहिती ! सोसाट्याचा वारा सुटला. कळी गळून पडली. आईची व तिची ताटातूट झाली. रात्र आली. पहाट झाली. त्या कोमेजलेल्या कळीवर लतेनें कांहीं आंसवें ढाळलीं होतीं कां ? त्या वेलीवर पुनः म्हणून कांहीं दुसरी कळी उमलली नाहीं. पडलेल्या कळीची आतां माती माती झाली. पुढें ग्रीष्मांत ती वेलही अगदीं सुकून गेली. बागवान आला. त्यानें ती उपटून टाकली व तिच्याऐवजीं त्याच जागीं दुसरें कसलें तरी बी पेरलें. पण वारा अजून वहातच होता.'

या चिमुकल्या कथेला लेखिकेनें शीर्षक दिलें होतें. 'वेल, कळी आणि वारा'

गोष्ट वाचून होतांच विजय आतां कुठें भानावर आला. त्यानें त्या लहानग्या लेखिके-कडे एकवार मोठ्या आदरानें पाहिलें. तिच्या चेहऱ्यावरहि नवख्या लेखकाचा अभिमान दृग्गोचर होऊं लागला. पण लागलींच ती लाजून खालीं पाहूं लागली.

तो म्हणाला, 'फार छान लिहिलीत हो गोष्ट!' इतक्यांत 'शकू, शकू' म्हणून कुणीशा हांक मारली व विजय एकाएकी म्हणाला, जानकीबाई 'आल्या वाटतं.!' 'आलें हो आई' असें म्हणत शकुंतला घाईघाईनें आंत जाऊं लागली. पण तेवढ्यांतच तिला एका शंकेनें अगदीं भांबावून सोडलें. 'पार्वतीकाकूशीं आपण बोलत होतों तेव्हां त्यांनींच आईचें नांव घेतलें म्हणूनच तें विजयला कळलें असावें. एकूण पार्वतीकाकूच्या टोमणेवजा गोष्टी त्यानीं ऐकल्या तर!' असा विचार करीत ती आंत पाऊल टाकते तोंच आणखी एक लहानसा वज्राघातच झाला. घरांत पाय ठेवतांच जानकीबाई मोठ्यानें व एकाएकी ओरडल्या, "सारा घोंटाळा झाला. नोकरी म्हणजे ही अशी. एखाद् दिवशीं कांहीं कारणानं माणूस उशीरा गेलं म्हणून एवढं काय झालं? एक नोकरी होती तेंही सुख मेल्या देवाला पाहवलं नाहीं."

आपल्या आईच्या तोंडावर हात ठेवून शेजारच्या खोलींत विजय बसला आहे ही सूचना देण्याच्यापूर्वींच त्राग्यांत असलेल्या जानकीबाईच्या मुखांतून एवढे शब्द निघून गेलेसुद्धां. जानकीबाईनीं लागलींच आपल्या भांबावलेल्या मनाला आवरलें, मुखावर लटकें हंसूं आणलें आणि विजयकडे येऊन गोडपणानें प्रश्न केला, "चहा चांगला झाला होता ना? आमची शकू किनई लहरी आहे. मनांत असलें तर सारं चांगलं करते अन् नाहीं तर कांहीं विचारूं नका. म्हणून विचारतें."

यावर उत्तर देण्याच्या मनःस्थितींत विजय कसा असेल.? त्याच्या पूर्णपणें लक्षांत आलं कीं, जानकीबाईची नोकरी सुटण्याला आपण स्वतःच कारण झालों. 'पहा तर. करायची ती गोष्ट आपण वेळेवर कधीं करीत नाहीं आणि त्याचा परिणाम इतरांना कसा भोंवतो तो.' कपांतला चहा अर्धाच संपला होता, पण बराच वेळ एक चकार शब्द न बोलतां त्यानें चहाचा पुनः एक घोटही घेतला नाहीं. जानकीबाई म्हणाल्या, 'पाहिलंस पोरी, कसा दिव्य चहा केलास तो. पाहुणं माणूस चहा वाईट झाला असं स्वतःच कसं सांगेल? जा, पुनः चांगलासा चहा कर पाहूं. एखादा कप् मीही घेईन त्यांतला.'

आतां मात्र विजयच्यानें राहवलें नाहीं. तो म्हणाला, "बाई, तुम्ही चांगुलपणानं मूळ गोष्ट लपवून किती लपवणार? चहा फार चांगला झाला आहे. पण मला आतां तो घेववत नाहीं. तुमची नोकरी माझ्यामुळंच गेली कीं नाहीं सांगा पाहूं?"

यावर जानकीबाईना उत्तरच सुचेनासें झालें. पण शकुंतला सहानुभूतीनें म्हणाली "छे, छे, तुमच्या उशीरा येण्यानं आईची नोकरी गेली असं कसं म्हणतां येईल?"

आणि आतां जानकीबाईलाही थोडीशी वाचा फुटली. त्या म्हणाल्या, "माझी नोकरी गेली ती दैवानं गेली, तुमचा त्यांत काय दोष?"

" मग आजच तुम्ही कां उशीरा गेलांत ? " विजयनें पृच्छा केली.

" उशीरा जाणं दैवानं तिच्या नशीबीं लिहिलं होतं म्हणून ! " शकुंतलेनें कांहीं-तरी उत्तर दिलें.

पण विजयचें समाधान तेवढ्यानें कसें होईल ? तो पुनः म्हणाला, " दैवाच्या गोष्टी तुम्हां दोघींच्या तोंडून यावेळीं निघाव्या हें साहजिकच आहे. पण मी काय विचारतों त्याचं एकवार नीट उत्तर द्या पाहूं. सकाळीं मी चहाला येणार होतों म्हणूनच ना बाई माझी वाट पाहत घरीं राहिल्या ? "

गोष्ट खरी होती पण कबूल करण्यांत सौजन्य नव्हतें. जानकीबाईनीं खोटेंच सांगितलें, " कां बरं, तुमचं स्वागत करायला एकटी शकू पुरेशी नव्हती कां ? मला जायला उशीर झाला तो रात्रींच्या जागरणामुळें. "

" मला नाहीं तसं वाटत ' विजय पुनः निश्चयात्मक स्वरानें म्हणाला. " मला खासच वाटतें कीं, तुमची नोकरी जायला—निमित्तमात्रच का होईना—मीच कारण झालो आहे. असो. आतां झालं तें झालं. यावर मी एवढीच कबुली देतों कीं, मी तुम्हांला पुनः नोकरी लावून देईन आणि मगच येथून पुण्याला जाईन. तसं म्हटलं तर आमची दिवाळीची सुटी परवांलाच संपली. परंतु ह्या जरूरीच्या कामासाठीं आणखी कांहीं दिवस मला नागपूरला थाबावं लागलं तरी माझं मुळींच नुकसान होणार नाहीं. "

यावर शकुंतलेच्या मुखांतून सहजोद्गार निघाले, " आपण कशाला एवढी तसदी घेतां ? " पण जानकीबाईनीं आर्जवानें विनाविलें, ' मुली, तूं चुकतेस. श्रीमंतांच्या सख्यानें आजवर आपला जगांत निभाव लागला. शोधूं दे त्यांना आपल्यासाठीं नोकरी. माझ्याकरितां एवढी तसदी घ्याच आपण. अगदीं सहजासहजीं जमलं तरच पहा मात्र. उगाच व्यर्थ त्रास घेऊं नका. तसं आम्ही आपलं पाहून घेऊंच सावकाश.'

विजयनें पुनः एकवार आश्वासन दिलें, " नाहीं, नाही. आतां तो तुमचाच केवळ प्रश्न नाहीं. माझाही आहेच. एवढेसे कष्ट घ्यावयाचे नाहींत तर मग ओळख तरी कशाला ठेवायची ? " त्याचें लक्ष सहजच हातावरील घड्याळाकडे गेलें. शिलकीचा चहा त्यानें घेतला. तो घाईतच उठला आणि जातांना म्हणाला, "आणखी थांबलों असतों पण आमच्या पापांना मोटारीची कदाचित् जरूरी असेल. आधीच वेळ झाला आहे. आतां गेलं पाहिजे."

त्या दिवशीं शकुंतलेला जगांत कांहीं विशेष राम आहे असें वाटूं लागलें. तिची पक्की खात्री झाली कीं, आतां ती आणि तिची आई कांहीं अगदींच निराधार नाहींत !

---

नाहींत का? वेड्या, किती तुझ्या आशाआकांक्षा. पुढच्या आयुष्याचं आणि आपल्या उच्च ध्येयाचं आपण रात्रीबेरात्रीं अनेक जाग्रणं करून रंगविलेलं तें विराटस्वरूपी चित्र, असं एकाएकीं खळकन् पडून फुटून जाईल?...देवा कांहींही कर. पण माझी आणि माझ्या अरुणची अशी एकाएकीं ताटातूट करूं नकोस रे!" अशा तऱ्हेचे क्षुब्धतेचे विचार त्याच्या मनांत चालू असतांनाच त्याला त्या भरधांव धांवणाऱ्या गाडीच्या संथपणाचा असा कांहीं त्वेष आला, की आपला जखमी हात त्यानें अगदी सहजासहजीं गाडीच्या त्या चोपड्या भागावर जोरानें आपटला, तो दुखावलेला हात आणि ते भणाणलेलें डोकें त्यानें पुनः आंत घेतलं त्याबरोबर तो गृहस्थ पुनः म्हणतो, "अहो तुमची हॅट?"

भांबावलेला विजय उभा राहून बर्थंवर शोधूं लागला. ओणवा होऊन बांकाखालीं पाहूं लागल्या त्यावर तो वयस्क गृहस्थ खो खो हंसून म्हणतो, "अहो, तुम्ही खिडकीबाहेर हात काढलांत त्यावेळीं ती तुमच्या हातींच होती. गबाळपणानं हातची टाकून दिलीत काय?..रामभाऊ पाहिलंत आजकालचीं हीं साहेबी थाटांचीं विसरभोळीं पोरं!"

पण ते रामभाऊच काय—त्या डब्यांतलं तें सर्व इवलें जग यावेळी निद्रासुखांत केवळ दंग झालें होते: आणि कांहीं वेळाने तो गृहस्थही जांभया देत आडवा झाला.

विजयला आजचा प्रवास युगायुगाप्रमाणें कंटाळवाणा गेला. काय करूं नि काय नाहीं असें त्याला होऊन गेलें.

नाशिकच्या स्टेशनवर उतरतांच लहानग्या प्रभाकरानें त्याचें खिन्नमुखानें स्वागत केलें. पट्टेवाल्यानें सामानसुमानाची व्यवस्था केली आणि मोटार झपाट्यानें चालू झाली. विजय प्रभाकडे नुसता टकमक पहात होता. त्यानें त्या मुलाला आपल्याजवळ प्रेमानें ओढून घेतलें.

"विजूदादा" प्रभाकर म्हणाला, "कालपासून किनई भाऊ तुझ्या नांवानें सारखा मोठमोठ्यानें किंकाळ्या फोडतो आहे."

"केव्हांपासून आजारी आहे तो?" विजयनें विचारलें.

"खूप दिवस झाले अन् आतां तर तात्या अगदी घाबरून गेले आहेत."

अरुणच्या अंथरुणावर विजय जेव्हां भीत भीत हलकेच जाऊन बसला, तेव्हां त्यानें किलकिले डोळे करून एकवार त्याच्याकडे केविलवाण्या दृष्टीनें पाहिलें. त्याच्या थकलेल्या रोगग्रस्त परंतु अजूनही गोजिरवाण्या दिसत असलेल्या कोंवळ्या चेहऱ्यावर एकच हास्याची लकेर झळकली. अरुण खोल आवाजांत थांबत थांबत म्हणाला, "ए महात्म्या! आतां कांहीं आय्. सी. एस्. होणं माझ्या नशिबीं नाही. आणखी रामाच्या हातून रावणाला जसं मरण आलं तसा मी कांहीं तुला आतां मुळावर चढविणार नाहीं." अरुणचे हे उद्गार त्यावेळीं सर्वांनाच किती भेसूर स्वरूपाचे वाटले. तात्यांना, माईना, उषेला, प्रभुला, विज-

यला—सर्वांनाच आतां राहवलें नाहीं. मन कितीही घट्ट केलें तरी दुःखातिरेकापुढें संयमाचा कितीसा पाडाव लागणार ? कमी अधिक प्रमाणांत सर्वच रडूं लागले. अरुणनें मिटलेले डोळे पुनः उघडण्याचा प्रयत्न केला; माईंना तात्यांना आणखी जवळ यायला खुणावले व आपल्या जड पडत चाललेल्या हातानें विजयकडे बोट दाखवून सुचविलें कीं, यापुढें माझ्याजागीं तुम्हांला हा विजू आहे.

आणखी आठदहा तासांनीं अरुण इहलोक सोडून चालता झाला.

५

# उषेचा विजय

अरुणाच्या मृत्यूनंतर चारसहा दिवसांनीं विजय आणि उषा पुण्याच्या प्रवासाला लागलीं. आवडत्या माणसाचा अंत झाला म्हणजे आकाश कोसळून पडल्यासारखें वाटत असलें तरी माणसाला आपलें कर्तव्यकर्म निमूटपणें करावें लागतेंच. उषा आणि विजय यांनींही तसेंच झालें.

दुसरी टर्म सुरू होऊन आधींच कांहीं दिवस झाले होते. आतां जास्त दिरंगाई करण्यांत अर्थ नव्हता. व्हायचें तें होऊन गेलेंच होतें.

विजय सीनिअर बी. ए. त होता; उषा प्रीव्हिअसमध्यें होती. अरुणाच्या ह्या धाकट्या बहिणीकडे विजयनेंही आजवर त्याच दृष्टीनें पाहिलें होतें. तें नातें ह्या असल्या दारुण प्रसंगानें आज अधिकच दृढ झालेलें विजयला वाटलें. कॉलेजला जातांना आजवर उषेची सोबत अरुणानें केली होती. ती कामगिरी आज तिच्या ह्या मानलेल्या भावावर आली.

उषेच्या डोळ्यांतलें पाणी अजूनही खळलें नव्हतें. विजयचें अंतरंगही पोखरून निघालेलें असलें, तरी तो पुरुष होता. आगगाडींत त्यानें उषेचें परोपरीनें सांत्वन केलें.

कल्याणवर गाडी बदलतांना उषा त्याला म्हणते, "विजूदादा, माझ्या मनांत किनई एक विचित्रच कल्पना आली बघा–तुम्ही हंसाल. तात्यांनीं आम्हां भावंडाचीं नांवें ठेवतांनाच मोठी चूक केली. तीं गोड आहेत, मोहक आहेत; पण त्या नांवामुळंच असेंही म्हणायला जागा नाहीं का कीं आम्ही सारींच भावंडं अल्पायुषी आहोंत."

त्यावर सामानसुमान व्यवस्थित लावून झाल्यावर तिला चांगलीशी जागा करून देत विजय म्हणाला—"उषे, इथें नीट बैस बघूं. खुळे, तुझें डोकें आज ठिकाणावर नाहीं. अग, नांवांत असें काय विशेष आहे ? तात्यांनीं तुमचीं नांवें हौसेनें नव्या तऱ्हेचीं ठेवलीं त्यावरून ते जरासे रसिक असावेत एवढाच तर्क करायला जागा आहे. अडाणी लोक किडूने,

आपलीं मुलं वांचत नसलीं म्हणजे 'डुकऱ्या' 'उकिरड्या' 'चिंध्या' अशीं त्यांचीं नांवें ठेवतात. कांहीं जाणते बंगाली लोकही अशाच भीतीनं आपल्या मुलांचीं नांवें 'दो कवडी' 'छे कवडी' अशीं ठेवतात. अशाच क्षुद्र नांवांचीं कांहीं माणसं अचानकपणें जिवंत राहिलीं म्हणजे खुळया जनतेला वाटतं कीं, असल्या ह्या वेड्या युक्तीनंच तीं जिवंत राहतात. पण असलीं घाणेरडीं नांवें ठेवूनही जीं मुलें मरतात त्यांची कुणी मोजदाद केली आहे का? ह्या नांवांचा अन् आयुष्याचा कांहीएक संबंध नाहीं असं आपणासारख्या शिकलेल्या माणसांनीं तरी म्हणूं नये का?"

विजयचीं ही तर्कशुद्ध विचारसरणी उषेला समजली पण उमगली नाहीं. त्यावेळीं तिनें आपल्या डाव्या हाताच्या कोंपऱ्याला खिडकीचा आधार घेतला, वाहणा बांकाखालीं भिरकावून देऊन आपले पाय आडवे दुमते घेतले आणि दोन्हीही तळहाताच्या खोवणींत डोकें खुपसून ती ओक्साबोक्शी रडूं लागली. हुंदका देत ती म्हणाली, "होय विजूदादा, मी चुकलेंच. इंग्रजींत कुठंसं मी वाचल्यासारखं आठवतं, कीं देवाला जीं माणसं प्रिय असतात, त्यांनाच तो अल्प वयांत बोलावून घेतो. माझ्यासारख्या मूर्ख मुलीचं तेवढं भाग्य कुठें असेल? मी नांवाची उषा आहे. पण मला देव नको असलं तरी खूप खूप आयुष्य देईल." हें सारें तिचें स्मशानवैराग्य त्या परिस्थितींत साहजिकच होतें. विजयनें म्हणूनच तिच्याशीं कांहीं वेळ बोलण्याचें टाळलें.

मुलींच्या रेसीडेन्सींत उषेला सुखरूपपणें पोंचवून, विजय सीनिअर रेसीडेन्सींतल्या आपल्या १२४ नंबरच्या खोलीसमोर येऊन थबकला. दाराचें कुलुप उघडतांना त्याचें लक्ष अरुणच्या खोलीवरील १२३ या आकड्याकडे गेलें. अरुणानें अभिमानानें नेहमीं म्हणावें, कीं "या आकड्यांत माझ्या आयुष्यांतलं सारसर्वस्व साठवलेलें आहे. मी १, २, ३... अशी एकही पायरी न गाळतांना आपल्या कर्तृत्वशक्तीनेंच असें मोठेपणाचें मंदिर गांठणार." आणि विजयनें त्यावर त्याला दिमाखानें उत्तर द्यावें "अरे, विमानांत बसणाऱ्यांना अशी पायरीपायरीनं जाण्याची गरजच भासत नाहीं. मी एकाएकी आकांक्षाच्या उड्याच घेणार. आतां तर मी १, २, ४ ह्या आकड्यांत केवळ एकच अनुक्रम नंबर गाळला आहे, पण पुढें लेका, मी शेंकडों आंकडे गाळीन."

टांगेवाल्यानें आंत सामान आणून ठेवलें, त्यावेळीं विजयच्या डोक्यांत १२३ या आंकड्यासंबंधीं एक नवीनच कल्पना आली. अरुण आपल्या कॉलेजच्या चिमुकल्या आयुष्यांत केवळ पहिलीं तीन वर्षेंच राहिला आणि चवथ्या वर्षांत जगांतूनच असा एकदम नाहींसा झाला. त्या आकड्यावरून देवाला हेंच भविष्य आधींच सुचवायचें होतें का? इतक्यांत त्याचे चार मित्र भोवतीं जमले आणि नंतर तोही कल्पनासाम्राज्यांत न वावरतां आपल्या खोलीची नीट व्यवस्था लावण्याच्या मागोमाग लागला.

त्याचा रोजचा विद्यालयीन आयुष्यक्रम त्या दुपारपासूनच सुरळीतपणें सुरू झाला. सायंकाळीं मुलींच्या रेसीडेन्सीतील गड्यानें त्याला उषेची एक चिठ्ठी आणून दिली. तिनें

त्याला ताबडतोब बोलावलें होतें. तो तसाच तिच्याकडे गेला. फाटकांतच उषा त्याची वाट पाहात उभी होती. बंद असलेल्या फाटकाच्या आंतील बाजूस ती उभी राहिली व बाहेर विजय उभा होता. उषा खिन्न मुद्रेनें म्हणाली, " विजूदादा, मला इथं आतां मुळींच करमत नाहीं. मी आलेंच कशाला कुणास ठाऊक. तुम्हांला बोलावलं तें एवढंच सांगायला कीं, मी उद्यांला पुनः घरीं परत जातें. " हे तिचे उद्गार ऐकून विजय थक्क झाला. त्यानें तिला कळकळीनें सांगितलें, " उषे, असं एकाएकीं वेड्यासारखं कांहाएक करूं नकोस. अरुणाची रिकामी खोली माझ्या खोलीजवळ आहे. तुला करमत नसलं तर मीही सांगतों, कीं मलाही इथं आतां तिळमात्र बरं वाटत नाहीं. पण आपण सारं हें धीरानं निमूटपणें सहन करायला नको का ? "

उषा पुन्हां रुदन स्वरानें म्हणाली, "तुम्ही आहांत म्हणूनच मला थोडासा तरी धीर येतो. नाहींतर मी इथें पुन्हां आलेंच नसतें." "खरं ना हे!" समाधानानें विजयच्या मुखांतून बोल निघाले, " मग मी काय म्हणतों तें तुला ऐकलंच पाहिजे. तात्यांनीं तुला निघतेवेळीं काय सांगितलें ? अरुणच्याऐवजीं माझ्या सांगण्याप्रमाणें यापुढं वाग असाच ना तुला त्यांनीं उपदेश केला ? मग मीही तुला हक्कानंच आतां आज्ञा करतों. तूं इथं राहिलेंच पाहिजेस. आणि आपल्या अभ्यासाकडे पुनः शक्य तेवढं लक्ष देण्याचा प्रयत्न केला पाहिजेस...शालिनी अन् मालती या दोघींनाही बोलाव पाहूं." उषा मुकाट्यानें आंत गेली आणि थोड्याच वेळा-नंतर त्या दोन मैत्रिणींना बरोबर घेऊन बाहेर आली. त्या दोघींना उषेसमोरच विजयनें कळकळीची विनंती केली कीं, तुमच्या मैत्रीची परीक्षा आतां आहे. उषेच्या मनाला विरंगुळा पडावा म्हणून जें जें कांहीं तुम्हांला शक्य असेल तें तें तुम्ही करा पाहूं.

विजयच्या या सूचनेवरून त्या दोघींनाही कंठ फुटला. प्रत्येकीनें दिवसभर तिच्यासाठीं काय काय केलें तें त्याला मोकळेपणानें आणि विस्तारानें सांगितलें, आणि तीही किती वेड्यासारखी वागली याचीही त्याला नीटशी कल्पना दिली. या सर्व संभाषणाचा उषेवर तात्पुरता बरा परिणाम झाला. ती घाईतच विजयला म्हणाली, "विजूदादा, थांबा थोडं. मी ही आतां आलेंच." असें म्हणत एखाद्या हरिणाच्या पाडसासारख्या उड्या टाकीतच ती आंत गेली. तें पाहून तिच्या अंमळशा दुःखविस्मृतीची कल्पना त्या तिघांनाही आली आणि त्यांना जरा हायसें वाटलें.

मंद पदें टाकीत उषा कांहीं वेळानें परत आली आणि एक नोटांचें पुडकें पुढें करून ती म्हणाली, " दादा, आजवर भाऊकडे पैसे येत आणि त्यानेंच आम्हां दोघांचा खर्च चालवावा. मला नको ही पैशाची भानगड. मी तात्यांना लिहितें, कीं या पुढं काय पाठवायचे ते तुमच्याकडे पाठवा म्हणून. भाऊच्या ऐवजीं तुम्हीच आतां माझं हेंही काम करा. " नोटा मोजून खिशांत ठेवीत विजय समाधानानें म्हणाला, " एवढंच. यांत काय मोठेंसं आहे ? खुळी कुठली ! मी तुझं एवढंही काम करणार नाहीं कीं काय ? " या भाषणाला त्यानें लागलीच हंसत हंसत पुस्ती जोडली, " मुली कितीही मोठ्या झाल्या, कितीही शिकल्यासवरल्या तरी त्यांना साहजिकपणेंच कोणत्या ना कोणत्या तरी पुरुषावर अवलंबून रहावंसं वाटतं. "

या प्रसंगावर तीन दिवस पाहतां पाहतां निघून गेले. चवथ्या दिवशीं सायंकाळीं उषा आणि विजय टेकडीवर फिरायला गेलीं असतांना, आतां किंचित् दुःखाचा विसर पडलेल्या उषेनें या त्याच्या परवांच्या उद्गाराची त्याला आतां आठवण करून दिली. ती स्त्रीजातीची अभिमानानें कड घेत जराशा आवेशानें उद्गारली, "तुम्हां पुरुषांना अभिमानाचा ताठाच फार. भाऊच्या ऐवजीं माझी पैशासंबंधींची कामगिरी मी कांहीशा हळवेपणानं आणि कांहींशा घरोब्यानं तुमच्यावर सोंपवली. तेवढ्यावरून पुरुषजातीवर स्त्रिया नेहमीच अवलंबून असतात, असा जुनापुराणा सिद्धांत तुम्ही बेधडक ठोकून दिलांत. आठवतं तुम्हांला ?"

"होय तर," विजय खेळाडूवृत्तीनें म्हणाला. "क्षणापूर्वींच्या गोष्टी विसरायला माझी स्मरणशक्ति इतकी पंगु आहे, असें तुला म्हणायचं आहे कीं काय ? मला प्रामाणिकपणें अगदी असेंच वाटतं. स्त्रियांनीं, आम्ही पुरुषावर अवलंबून नाहीं, स्वतंत्र आहोत, अशा कितीही दिमाखाच्या बाता मारल्या, तरी त्यांत निदान आज तरी कांहीं एक तथ्य नाहीं." उषेला चिडवायला विजय मुद्दामच ठासून बोलत होता. आपल्या सिद्धांताचें प्रदर्शन त्याला वास्तविक करावयाचें नव्हतें. परंतु या अशा वादविवादानें तरी उषेला दुःखाचा थोडा विसर पडेल, हीच त्याची अंतःकरणांतली खरी भावना होती. उषेच्या वर्तुलाकार चेहऱ्यावरील गोरे गाल एकाएकीं समोरील संध्याकाळच्या छटेप्रमाणें आरक्त झाले. रस्त्यावरचा एक खडा तिनें रागारागानें उचलला व तो घाईघाईत झेलत ती फणकाऱ्यानें म्हणाली, "अगदीं साफ खोटं आहे हें. आणि आज जरी खरं असलं तरी कांहीं काळानें तें अजिबात खोटं होईल."

"मग मी तरी काय म्हणतों आहें ?" विजयने पुनः जोराने प्रश्न केला, "मी आजच्या काळासंबंधींच बोलतों आहें."

त्यावर उषा एकाएकी खुदकुन् हंसली आणि जरासें आठवल्यासारखं करून म्हणते, "विजूदादा, सांपडलास रे सांपडलास. तूंच त्या जानकीबाई अन् शकुंतलेविषयी आम्हांला सांगितलेंस ना. त्या कर्तबगार बायांचा विचार कर पाहूं. आईनं स्वयंपाकपाण्याचा धंदा करून आपली मुलगी वाढवली अन् तिला इतकं शिकवलं. मग आतां सांग स्त्रियाही कर्तबगार होऊं शकतात की नाहीं तें ?"

विजय एवढ्यानेंच कांहीं हार खाणारा नव्हता. त्यानेंही सांगितलं कीं, अखेर नोकरी सुटल्यानंतर जानकीबाईनें मदतीसाठीं विनंति केली ती एका पुरुषालाच ना ! आणि उषेनें खोचक स्वरांत उत्तर दिलें, "पण ती नोकरी सोडायला कारणही अखेर पुरुषच झाला ना ! तुम्ही पुरुष स्त्रियांच्या आयुष्यांत असेच घोंटाळे माजवितां, त्यांच्यावर संकटें आणून त्यांना मुष्कीलसं करून सोडतां अन् नंतर त्यांच्या परिस्थितीचा फायदा घेऊन मोठ्या दिमाखानें मदतीला धांवता. शिवाय शेवटीं 'अबला' हा शेलका शिक्का आमच्यावर आहेच."

विजयला उषेच्या वादविवादकौशल्याचें कौतुक वाटलें. तिला अधिक चिडवणें योग्य नाहीं असें वाटून तो कांहींशा हलक्या स्वरांत पुढें म्हणतो, "हें पहा, किल्लई हा सारा वितंडवाद व्यर्थ आहे. स्त्रिया आणि पुरुष या दोघांत मग दुजाभाव कधींही निर्माण व्हायचा

नाहीं. हाडवैराच्या अहिनकुलाचा का हा तंटा आहे ? आई, बाप, भाऊ, बहीण, नवरा, बायको, हीं नातीं परास्पराशीं इतकीं निगडित झालीं आहेत, कीं तीं जगाच्या अंतापर्यंत तुटतां तुटायचीं नाहींत. आपण उगाच मौजेखातर वरपांगी भांडावं एवढंच."

दोघेही बरीच लांब चालून आलीं होतीं. दुसऱ्या टेकडीचा त्यांनी जवळजवळ पायथा गांठला. सूर्यास्त होऊन बराच वेळ झाला होता. विजयनें 'आतां परतावें' असें सुचवलें. त्यावर खाली बसत उषा म्हणाली, "विजूदादा, आजकाल तुझ्या संगतींतच काय तें मला बरं वाटतं...आणखी सारी पुरुषजात किती बेजबाबदार ! तुमचेंच पहाना ? तुम्ही त्या मायलेकींना केवढं आश्वासन दिलंत, गोड थाप दिलीत, आशा लावलीत, आणि त्याचा जीव नुसता आशेवर टांगत ठेवलांत. त्यांच्या आतांच्या हालअपेष्टांचा तुमच्या मनांत आत नुसता विचार तरी येतो कीं नाहीं कुणास ठाऊक! पुरुष नुसते भ्रमरासारख्या स्वैरवृत्तीचे...'

ते टोमणे अखेरीस विजयच्या मर्मस्थानीं झोंबले. तो तडक उठला आणि म्हणाला, "उषे, बरी आठवण केलीस. पापांना मला आजच एक निकडीचें पत्र लिहिलं पाहिजे. कांहींही झालं तरी जानकीबाईसाठीं आतां इथून शक्य ती खटपट केलीच पाहिजे."

झपाझप पावलें टाकीत परत येत असतांना उषा अभिमानानें म्हणाली, "अखेरीस उषेचाच विजय झाला म्हणायचा ! वादविवादांत शेवटीं तुम्हीच हारलांत.

इकडे आपल्या खोलींत विजय बाबासाहेबांना पत्र लिहिण्यांत गुंतला होता तर तिकडे उषा आपल्या पलंगावर 'उषेचाच विजय' ह्या शब्दद्वयांतून कांहीं निराळाच गोड अर्थ शोधून काढीत होती.

## ६

# शकुंतलेचें जन्मरहस्य.

**नागपूर ९ नोव्हेंबर १९२९,**

चि. विजयकुमार यास अनेक आशीर्वाद. तुझें पत्र पोहोंचतांच बाईसाठीं नोकरी-संबंधी चारचौघास कळविले. जोशी वकीलांकडे अशा एका बाईची गरज आहे असें कळल्यावरून तें सांगण्यासाठी जानकीबाईचें घरीं स्वतःच गेलों. बाई आजारी दिसली व शकुन्तला घाबरून गेलेली होती. तपासून पाहातां विषमज्वराचा संशय आला आणि तिथें औषधपाण्याची, नर्सिंगची वगैरे योग्य व्यवस्था होणार नाहीं म्हणून अखेरीस नाहीं हो करतां करतां बाईस व तिच्या मुलीस सामानासुद्धां कालपासून आपल्या घरींच आणलें आहे. तूं आतां कशाचीही काळजी न करता नीट अभ्यास कर.

अरुणच्या मृत्यूबद्दल फारच हळहळ वाटली. शंभर रुपयांची मनिआर्डर आजच रवाना केली आहे. तुझ्या हाताची जखम आतां कशी आहे ?

तुझा पापा.

— + —

**नागपूर.**

ता. १७ डिसेंबर १९२९

प्रिय विजू,

तुझें माझें नातें पितापुत्राचें असलें तरी आजवर मीं तुझ्याशीं मित्रत्वाच्या मोकळे-पणानेंच वागत आलों आहे. जानकीबाई आतां आपल्या कांहीं जुन्या शेजाऱ्यापाजाऱ्यां बरोबर यात्रेसाठीं नागपूर सोडून चालत्या झाल्या. त्या बऱ्याच अशक्त होत्या. परंतु अशा स्थितींतही त्यांनीं हट्ट धरला आणि त्या निघून गेल्या.

मुलगी आपल्या घरीच आहे. सुखांत आहे. असो. तिजविषयीं पत्रांत पुढें ओघानेंच

लिहीन. तुला आज त्या बाईसंबंधीं कांहीं नाजूक गोष्टी कळवाव्याशा वाटतात. आणि म्हणूनच मीं पत्राच्या आरंभीं मोकळेपणासंबंधींचें वाक्य लिहिलें. एक दिवस बाई किंचित्शी जास्त आजारी असतांना तिनें धीर सोडला व आपली पूर्व कथा सांगितली. सुमारें सोळा सतरा वर्षांपूर्वीं बाई पुण्यास एका ब्राह्मण असिस्टंट कलेक्टरकडे स्वैपाकीणी करीत होती. साहेब तरुण होता आणि बाईचें तर त्यावेळीं पोरवयच होतें. घरात मोठीं माणसें तीनच. साहेब त्याची बायको व त्याची जख्खड म्हातारी आई. मालकीण बाळंतपणाला माहेरीं गेली, तेव्हां बाईनें आपणांस एकटेच रहाणें चमत्कारिक वाटेल असें सुचविलें. पण आपल्या म्हाताऱ्या सासूचा आधार देऊन विशेष विचार न करितां ती साधीभोळी मालकीण माहेरीं निघून गेली. साहेब कांहीं दिवस देवासारखा वागला, पण पुढें मोहांत सांपडून बाईच्या नादीं लागला. बाईनेंही न कळत चूक केली. आणि शेवट गोष्ट भलत्याच थराम गेली. बिचाऱ्या जाळयात सांपडलेल्या हरिणीचा जीव कांसावीस झाला. तिनें ती गोष्ट साहेबास कळविली. त्यावर त्यानें चांगुलपणानें आश्वासन दिलें कीं ' मी तुझ्याशीं लग्न करीन. '

माहेराहून मालकीण परत आली तेव्हां आपली सालस बायको आपलें ऐकेलच ह्या विश्वासानें ही गोष्ट साहेबानें तिला कळविली; पण त्या बाईनें साहजिकच आकांततांडव करून, असल्या लग्नास संमति तर दिलीच नाहीं, उलट नवऱ्यास व स्वयंपाकिणीस यथेच्छ शिव्या दिल्या.

साहेबाचा नागपूरास कोणीएक मित्र होता, त्यास त्यानें कळविलें कीं, त्या बाईचा नवरा नुकतांच वारला. ती गरोदर आहे. पुण्यास राहिली तर तिचा दीर तिला अमानुषपणानें छळतो, म्हणून तिची बाळंतपणाची सोय आपण करावी. पुढें ती आपल्या पोटापाण्याची स्वतःच काळजी वाहील.

त्यावेळी बाईस जे मूल झालें तीच ही शकुन्तला. पुढें दहा वर्षेपर्यंत साहेबांनीं तिच्याकडे बिनचूक पन्नास रुपये महिना पाठविला. ते सर्व पैसे, एकूण रुपये सहा हजार, बाईनें शकुंतलेच्या नांवानें पोस्टांत ठेविलेले आहेत. त्यापैकीं एका पैसही हात न लावता स्वयंपाकिणीची नोकरी करून बाईनें आपली कशीबशी गुजराण केली. तें पासबुक तिनें माझ्याजवळ ठेविलें आहे. आणि तो पैसा शकुंतलेच्या लग्नादिकांसाठीं तिनें राखून ठेविला आहे. यात्रेस निघतांना ती आपला त्या पैशास न शिवण्याचा पण नाइलाजानें मोडणार होती पण मीं जानकीबाईस त्या पैशास हात लावूं दिला नाहीं व आपल्या घरचें चारशें रुपये जातांना तिला आग्रहानें घ्यावयास लाविले. अशी ही शकुंतलेच्या कामाची हकीकत आहे. अशा कुटुंबास आपल्या सारख्या थोरामोठ्यांच्या घरांत राहूं देणें बदनामीस कारण होईल. पण आतां जानकीबाई परत येतपर्यंत मुलीस घराबाहेर काढणें शक्य नाहीं. तशी मुलीची वागणूक फार चांगली आहे. तूं ह्या गोष्टी संबंधीचें एक अक्षरही कुणास सांगूं नकोस. जानकीबाईस मीं तसें आश्वासन दिलें आहे. मात्र केवळ तुला एकट्यालाच त्या गोष्टी लिहिल्यावांचून मला राहवलें नाहीं.

तूं नाताळचे सुट्टीसाठीं इकडे येण्यास कधीं निघणार ? मागें पाऊणशे रुपयाची मनिऑर्डर पाठविली होती ती पोहोंचलीच असेल. बाकी सर्व कुशल आहे.

—तुझा पापा.

—: ० :—

वरील दोन पत्रें कुणी कुणाला पाठविलीं होतीं हें सांगण्याचें कारणच नाहीं. बाबासाहेबांचें पहिले पत्र आलें तेव्हां विजयला किती आनंद झाला ! ते पत्र वाचतांच त्यासंबंधीचा वृत्तांत त्यानें उषेला जाऊन सांगितला व म्हटलें का " आतां विजय विजयजवळच राहिला. तूं अखेरीला हरलीसच. माझ्यावर जो निंद्यपणाचा आरोप तूं केला होतास तो परमेश्वराच्या कृपेनें आज स्वच्छ धुवून निघाला. खरं की नाहीं ?" उषा नम्रपणानें म्हणाली, " त्या दिवशीं मीं सहज गंमतीनं म्हणालें हो. तुमच्या मनाला माझं बोलणं लागलेलं दिसतं. तसं असलं तर क्षमेची याचना करते. " विजयच्या चाणाक्ष बुद्धीला आज उषेच्या बोलण्याचालण्यांत, वागणुकींत नेहमींपेक्षां जमीनअस्मानचें अंतर वाटलें. तो म्हणाला, " अरेच्या, आज तूं हा नाटकी आविर्भाव आणला आहेस कीं काय ? ही कांहीं तुझी नेहमींची वागण्याची पद्धत नव्हे. तुळे, तुझे अजाणतणाचे शब्द अन् ते माझ्या मनाला लागतील ? आपला एवढा प्रभाव आहे असं तुला वाटतं कीं काय ? "

विजय निघून गेल्यावर उषेनें आपल्या मनाला कांहीं खोदखोदून प्रश्न विचारले. परवांपर्यंत विजयशी तूं खेळाडू वृत्तीनें वागत होतीस. मग त्याच्याशीं बोलण्याचालण्यांत आतांच ग तुझा अल्लडपणा असा एकाएकी कुठें गेला ? आज बराच वेळ बोलणं झालं, पण एकदांही तुझ्या तोंडातून विजूदादा असें पूर्वीसारखं संबोधन कां निघालं नाहीं. " हा उतावळेपणा, हा वागणुकींतला बदल तुला शोभतो कां ? विजय तुझ्याशीं कोणत्या नात्यानं वागतो ? आणि तूं मात्र मनांत कसले हे थिल्लर चाळे आरंभले आहेस. नाहीं काय ? मग ' विजय विजय जवळच राहिला ' ह्या वाक्यांतून उगाच वेड्यासारखा दुसरा कांहींतरी अर्थ काढीत तूं आपल्या मनाला वाईट कां वाटून घेतलंस ? यापुढें आतां नेहमी लक्षांत ठेव कीं अरुणभाऊ ऐवजीं तुला देवानं विजयदादा दिला आहे.

बाबासाहेबांचें दुसरें पत्र ज्या दिवशीं आलें त्या दिवशीं मात्र विजयची मनःस्थिती मोठी चमत्कारिक झाली. जगांत पाप करणाऱ्या व्यक्ती कमी का आहेत ? विजयनें असल्या निंद्य संबंधाच्या गोष्टी काय आजवर ऐकल्या नव्हत्या ? पण जानकीबाईसुद्धां त्याच कोटींतल्या असाव्या हें समजतांच त्याच्या मनाला धक्काच बसला.

" एकूण काय तर जें सारें चकाकतें तें सोनं नसतें म्हणायचं ! जानकीबाई आपल्याला सालस वाटल्या. शकुंतला मोठी निर्मल वाटली; पण एकंदरींत त्या मायलेकींचा हा सारा दिखाऊपणाच असावा. शकुंतलेच्या नागिणीच्या शेपट्याचा, कानांतल्या ईअररिंगचा, कासोटीपीच्या नेसण्याच्या पद्धतीचा, चित्रकलेचा, लेख लिहिण्याचा त्यानें आतां अगदा निराळाच अर्थ घेतला. नायकिणी गाण्याबजावण्यांत प्रवीण नसतात काय ? त्या नीटनेटक्या

नसतात काय ? त्यांचे चेहरे दिसायला सुंदर नसतात काय ? बोलताचालताना मोठा गंभीर-पणाचा आव आणि मोठ्या संभावितपणाचा हावभाव त्या दाखवीत नाहीत काय ? सहा हजार रुपये म्हणे तिच्या त्या मानलेल्या नवऱ्यानें पाठविले. सत्ययुगच लागून गेलं किनई हें ! अन् मग एवढा जर तो परमेश्वराचा अवतारच होता तर दहा वर्षांच्या नंतरच ते पन्नास रुपये पाठविण्याचे त्यानें कां बंद केलें? म्हणे, त्या पैशाला मला शिवायचं नाही. केवढा पण! आणि पापाचे चारशे रुपये मात्र थोड्याशा आग्रहानं बाईला घ्यावेसे वाटले! चांगलाच स्वार्थ-त्यागाची देवता आहे म्हणायची. आतां यात्रेचं निमित्त काढून बाई पसार झाली. असतील आणखी तिची कुठं गिऱ्हाइकं. ह्या तिच्या मोठ्या सालस मुलीला आमच्या इथं विशेष ओळख पाळख नसतांना तिनं एकटंदुकटं सोडून जाण्याचं कारण ? आमच्या घरची संपत्ति अड कवण्यासाठी पसरलेलं हे एक गोडसं जाळं आहे दुसरं काय ? पापा बिचारे भोळे! माझ्या-साठी मी त्यांना केवढा त्रास दिला. कसल्या ह्या घाणेरड्या माणसांना आपल्या घरांत थारा दिला...अन् त्या वैकुंठचतुर्दशीच्या रात्री त्या शिपायांना ह्याच मलीला पकडून तिची विशेष मलगी करण्याचं कारण ? त्याबाजूस हे कुटुंब एकंदरीत चांगलंच विख्यात होतं म्हणावयाचं ? माझ्याकडे भाबावलेपणाचें नाटक करून तिनें जो नेत्रकटाक्ष फेकला, तोही सारं तिच्या हाडीमासी खिळलेली नटीची बतावणीच होती तर ? एरवी रात्रीबेरात्रीं का त्या बाईनं माझ्यासारख्या नवख्या तरुणाला आपलं सारं घर दाखविलं असतं अन् लागलीच दुसरे दिवशीं लाघवीपणानं माझ्या चांगुलपणाचा फायदा घेऊन चहाला बोलावलं असतं ? आता स्वैंपाकिणीची नोकरी, ती सुटण्याचे नाटक, साऱ्या खोट्या गोष्टींचा मला चांगलाच उलगडा झाला म्हणायचा ! अरे बापरे, जग किती चमत्कारिक आहे ? सहा हजार रुपये जवळ असून बाईला आपल्या आजारपणांत औषधापाण्याची जणूं व्यवस्था करतां येत नव्हती. सारा खोट्यांचा बाजार! अलीकडं गिऱ्हाइकं तुटली असतील म्हणून आमचं भोळंभाबडं कुटुंब आसऱ्यासाठीं एकूण बाईला चांगलंच सापडलं म्हणायचं ! ”

हे सर्व विचार विजयच्या मनांत एकाएकी येऊं लागले. मात्र ती गोष्ट आणि ते आपले तर्ककुतर्क त्यानें आणखी दोन दिवस उतावीळपणानें उघेस सांगितले नाहींत. ह्या पत्राचें त्यानें बाबासाहेबांना जें उत्तर लिहिलें तें असें:—

ता. १९ डिसेंबर १९२९

ती. पापांचे चरणी शि. सा. न. वि. वि.

आपलें पत्र पोचलें. जानकीबाईशीं व शकुंतलेशीं असा अचानकपणें आपला संबंध आला हें एकपरीनें वाईटच झालें. बाईची कुलकथा आपणांला खरी वाटलेली दिसते. पण मला आतां त्या दोघींहीविषयीं कांहीं विशेषच संशय येतो. ह्या दोघीही अगदी निंद्य वृत्तीनें आपली उपजीविका करीत असाव्यात इतपर्यंत माझा तर्क धावतो. शकुंतला, बाईस-चुकीनें पाऊल वाकडें पडल्यामुळें एका अधिकारी सभ्य गृहस्थाकडून झाली ही तिची गोष्ट निरलस बनावट असावी. सहा हजार रुपये शकुंतलेच्या नांवानें तिनें जमविले आहेत व ते पासबुक

तूर्त तुमच्याजवळ आहे. हा सारा प्रकार तिनें कां करावा हे कळत नाहीं. पापा, तुम्ही आता मला कांहींही म्हणा, पण हे सहा हजार रुपये बाईनें कोणत्या आधारावर मिळविले आहेत हें मला मात्र अगदीं उघड आहे. अशा बायांना सहा हजारच काय, मूर्ख श्रीमंत लोक सहालक्ष रुपयेसुद्धां देतील.

पण ध्यानांत ठेवा म्हणावं, आमचं कूळ कांहीं अशापैकीं भोळं नाहीं. पापा, आता ह्यावर एक उपाय आपण केलाच पाहिजे. त्या मुलीला तें पासबुक देऊन तिचें सामान-सुमान तिच्या स्वाधीन करा आणि मुकाट्यानें घर सोडायला लावा.

ती कांहीं आतां कुक्कूबाळ नाहीं. चिटणीसपुऱ्यांतील ज्या घरांत ती राहत होती तिथले तिचे शेजारीपाजारी असतीलच किनाई? तेथें ती परत जाईल नाहींतर आणखी कुणाच्या घरात गोंधळ घालील- आपणांला त्याच्याशीं काय करावयचं आहे? आणखी ती कावेबाज जानकीबाईही नागपुरांतच कुठल्या तरी देवांच्या आवतीभोवतीं असावी. तीच तिची यात्रा, दुसरं काय? शकुंतलेला घरांतून काढा पाहूं म्हणजे पहा—ती देवता नागपुरांत पुनः एकाएकीं प्रगट होते किनाई ते.

मी उषेला घेऊन आज दुपारच्या गाडीनें येथून निघतो. तात्यासाहेबांनीं नाशिकला आग्रहानें एखादा दिवस तरी मुक्काम करायची इच्छा प्रदर्शित केली आहे. मीच आतां त्यांना त्यांच्या अरुणाच्या जागीं आहे हें तुम्हालाही माहितच आहे. तेव्हां तात्या-माईंची इच्छा मला मोडवत नाहीं. नाशकाहून मी बहुधा २१ तारखेच्या मेलनें निघेन. त्याप्रमाणें स्टेशनवर मोटार ठेवावी. रमाकाकूला सा. न. विलासला व लीलेला अनेक आशीर्वाद.

आपला

विजय.

७

# न्यायाधिशाचा निर्णय

विजयनें ही सर्व हकीकत दोन दिवस उषेपासून मुद्दामच लपवून ठेवली होती, पण आगगाडींतल्या त्या लांबच्या प्रवासांत त्यानं उषेजवळ ह्या साऱ्या गोष्टी भडभड ओकून टाकल्या. त्यावर उषा त्याला म्हणाली, " तुमच्या हातून जरासा उतावीळपणा आणि बराचसा निर्दयपणा ह्या प्रकारांत न कळत घडला असें आपलं मला वाटतं. आपले तर्क अगदीं बरोबरच आहेत, चुकीचे नाहीतच, ह्या विश्वासानेंच तुम्ही वागलांत. तुम्ही केलेले तर्क अगदी तंतोतंत खरे असतीलही. त्यासंबंधीं मी आजच कांहीं एक ठरवूं शकत नाहीं. पण समजा जानकीबाईची व शकुंतलेची हकीकत बाबासाहेबांना जशी कळविण्यांत आली तशी जर यदाकदाचित खरी असेल तर —"

" माझे तर्क सहसा कधी चुकत नाहींत " विजय जराशा अभिमानानें म्हणाला.

" मला चांगलं ठाऊक आहे, " उषेनें नम्रपणे उत्तर केलें. " पण आपली कल्पनाच करायची म्हणून कांहीं काळ आपण दुसऱ्या बाजूचा विचार करूं या. समजा जर जानकीबाईची गोष्ट तंतोतंत खरी असली आणि तुमच्या निष्ठुरपणाच्या पत्रावरून बाबासाहेबांनी जर त्या निरपराधी शकुंतलेला घराबाहेर एकाएकीं काढून दिलं, तर काय होईल ? बरं आतां बाबासाहेब जे तिला हाकून लावतील ते ते कांहीं कदाचित् निमूटपणें करणार नाहींत. त्या वाईट चालीच्याच बाया आहेत असा गवगवा स्वतःच्या कृतींचें समर्थन करण्यासाठीं बाबासाहेब बहुधा करतीलच. आणि असं झालं तर शकुंतलेला जगांत राहणंच कठिण होऊन बसेल. तुम्ही तिला आधींच आसरा दिला नसता तर एक गोष्ट वेगळी होती. कारण त्यावेळीं समाजांत ह्या बायांची पत तरी गेली नव्हती. त्यांतून तिची आई सध्यां तीर्थयात्रेला गेली आहे—"

" अग, पण हेंही मला खोटं वाटतं हे नाहीं कां मी सांगितलं ? " विजयनें मध्येंच प्रश्न केला.

" होय " उषा पुढे म्हणाली " तेंही माझ्या चांगलेंच ध्यानांत आहे. पण मी म्हणतें ना कीं तिच्याच साऱ्या गोष्टी कांहीं वेळ खऱ्या मानायच्या म्हणून. तुमच्या तर्काकडे कांहीं

काळ लक्षच द्यावयाचं नाहीं. नि आतां पहा कीं आतांपावेतो आईच्या आसऱ्यानं असलेल्या त्या लहान मुलीला तुमच्या घरांतून हाकून लावतांच तिला अगदीं आकाश कोसळल्यासारखं वाटेल. नाहीं कां? अशा परिस्थितीत मी जर शकुंतलेच्या जागी असते तर मला आत्महत्याच करावसं वाटलं असतं."

विजयला उषेची विचारसरणी विचारार्ह वाटली—पण पटली नाहीं. आणि जणुं ह्या पोरीच्या सल्ल्याकडे काय लक्ष द्यावयाचें आहे ह्या अभिनिवेशानें तो थट्टेचें पांघरूण घेऊन म्हणाला, " वा रे वा, स्त्रियांचें पुढारीपण चांगल्याच नेभळ्या बाइकडं आलं आहे म्हणायचं. म्हणे आत्महत्या केली असती! अग, स्त्रिया पुरुषांची बरोबरी करणार ना आतां? पुरुष कांहीं असे उठल्यासुटल्या आपला जीव देत बसत नाहींत. आणखी त्या पोरीजवळ सहा हजार रुपये आहेत हें तूं विसरलीस? तिला कांहीं कुणाच्या तोंडाकडे पहायला नको."

उषेने लागलीच त्याला टोमणा दिला, " त्या हकीकतींतली एवढी गोष्ट तरी आपल्या तर्कट बुद्धीला खरी वाटली हे बिचाऱ्या जानकीबाईंचं नशीब म्हणायचं. अहो, केवळ पैशानंच कांहीं जगांत सर्वांचा निभाव लागत नाहीं."

यानंतर त्या दोघांच्या बोलण्यांतला मूळ मुद्दा सुटला आणि पैशाच्या महतीसंबंधींच यापुढें दोघांतही कडाक्याचा वाद सुरू झाला.

तात्यासाहेबांच्या बंगल्यासमोर मोटारींतून उतरतांना विजय उषेला म्हणाला, "उषे, तुझ्या पोरकट सल्ल्यानें माझ्या मनाचं समाधान झालं नाहीं. जेवणंबिवणं झाल्यावर तात्यानाच निवांतपणीं मी एकांतांत गांठतों आणि ह्या संबंधीं त्यांनाच काय विचारायचं तें विचारतों. त्यांच्यासारख्या सबज्ञांचा सल्लाच मला विशेष महत्त्वाचा वाटेल."

" आणखी त्यांनीही माझ्यासारखंच तुम्हांला सांगितलं तर?" उषेनें मिस्किल-पणानं विचारलें.

" तर मग उषेचा विजय आहेच पुन्हा "

रात्रीं दहाचे सुमारास ऑफिसचे खोलींत तात्या, विजय आणि उषा सावकाश बोलत बसलीं होतीं. विजय उषा या दोघांनींही मिळून जानकीबाई व शकुंतला यांच्या संबंधींची सर्व हकीकत तात्यांना सांगितली. तात्या डोळे मिटून कपाळावर हात ठेवून निर्विकार चेहऱ्यानें सर्व गोष्टी ऐकत होते. त्या दोघाही सुशिक्षित व्यक्तींनीं नंतर आपापली बाजू पुढें मांडली. आतां तात्यांच्या निर्णयासाठीं दोघेही अधीर झाले होते. आपली पाहण्याची आरशी स्वच्छ करून संथपणें तात्यांनीं डोळ्याला लावली व उषेकडे वळून ते कांहींसे विनंतीरूपानें म्हणाले, " बाळ, तुझ्यासमोर मला ह्या प्रश्नाचा निकाल देतां येत नाहीं. तूं इथून जाशील तरच विजयला मी काय सांगायचं तें सांगतों." उषेला वाटलें कीं " आतां आणखी जास्त स्पष्ट शब्दांत तात्या काय निकाल सांगणार? 'आपला पक्ष' अगदीं चुकीचा आहे

म्हणूनच तात्या आपणासमोर आपल्या विरुद्ध निकाल देणं चाहत नाहात." अशा तऱ्हेचा आपल्या मनाचा ग्रह करून घेऊन ती एकाएकी उठली आणि—

"तात्या म्हणजे कांही देव नाहीत" अशी हरलेल्या खेळाडूप्रमाणे चरफडत नांवे ठेवीत तेथून फणकाऱ्याने निघून गेली.

आणि विजय? त्याचा विजयोन्माद यावेळीं काय वर्णावा!

तात्या सांगूं लागले, "विजय, तूं चुकलास. नकळत तुझ्या हातून कांहीतरी राक्षसी कृत्य घडत आहे. तरी तुला ह्या बाबतीत कांहीच नक्की माहिती नसल्यामुळे मी दोष देऊं शकत नाही."

तात्यांची ही प्रस्तावना ऐकून विजयला धक्काच बसला. तो उसळून म्हणतो, "तात्या, मी त्या बायांना प्रत्यक्ष पाहिलं आहे. तुम्ही त्यांच्या संबंधी केवळ दोन गोष्टी ऐकल्या आहेत. माझी माहिती 'चक्षुर्वैसत्यं' आहे अन् तुम्ही आतांकां हींही सांगितलंत तरी मीच बरोबर केलं असं मी शेवटपर्यंत म्हणणार."

तात्या पुन्हां तितक्याच शांतपणाने पुढे म्हणाले, "ऐक; मी त्या मुलीला नसलं तरी तिच्या आईला चांगलंच ओळखतों."

यावर विजयला हंसूच आले आणि न्यायाधिशाने कांही वकिली डावपेंच सुरू केले कीं काय अशी शंका त्याच्या मनास वाटून गेली. किंचित्सें आश्चर्यही त्याला वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

"माझ्या बोलण्यावर तुझा एकाएकी विश्वास न बसणं साहजिक आहे." तात्यांनीं जरासे घाईचे बोलणे सुरू केलें. "दोन शब्दांत मी तुला सर्व गोष्टींचा उलगडा करून देतों. त्या अभागिनी बाईच्या आयुष्याचा ज्या अधिकारी पुरुषाशीं अचानकपणें संबंध आला तो मीच. ज्या मालकिणीनं मला आणि तिला चूक झाल्यानंतर लग्न करूं दिलं नाहीं, ती तुझी माई. अरुण त्यावेळीं तीन चार वर्षांचा असेल. उषेच्या वेळीं ही माहेरीं बाळंतपणास गेली. ह्यापेक्षा जास्त तुला सांगण्याचं कारण नाही."

विजय यानंतर कांही काळ अगदीं स्तब्ध होता. आपली शून्य दृष्टि त्यानें भिंतीवरच्या उषेच्या लहानपणाच्या छायाचित्राकडे लावली होती. तितक्यांत कामधंदा आटपून, प्रभाला निजवून, उषेशी गोष्टी करून माई तेथें आल्या अन् म्हणाल्या, "कोर्टांत मला तरी यायची परवानगी आहे की नाहीं...उषेला काय झालं असं एकाएकीं रागवायला? आजच पोर घरीं आली, तेव्हां म्हटलं आपली तीं मतंबितं बाजूला ठेवून तिच्याशीं गोडपणानं वागायचं होतं."

"बरं झालं तूं आलीस," तात्यासाहेब म्हणाले, आणि त्यांनीं माईंना सर्व हकीगत थोडक्यांत सांगितली.

"योगायोगच म्हणायचा," माई म्हणाल्या, एरवी एवढ्या मोठ्या नागपुरांत बाईची

आणि आपल्या शकूची विजयरावांशी आणि बाबासाहेबांशी ओळख करून आली असती."

कांही वेळ थोड्याशा इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्या आणि नंतर विजयनें साहजिकपणेच पुन्हां एक शंका काढली. त्यानें विचारलें, "तात्या, माईंना तुम्ही दर महिन्याला ५० रुपये दहा वर्षं पाठवीत होता, मग पुढेच पैसे पाठविणं का बंद केलं?"

"तसं मला शकूच्या आईनेंच कळविलं. तिनं पत्रात असं लिहिलं होतं की 'शकू आता मोठी झाली असल्यामुळं ह्या आपल्या पैसे पाठविण्यानं आणि पत्रव्यवहारानं तिला काहीं कळूं नये त्या गोष्टी कळायच्या. म्हणून सारं सारं आतां बंद करा.' मलाही तिच्या इच्छेप्रमाणं वागणं भागच होतं. पण मनाला कांही केल्या बरं वाटेना. शंका येत की आता तिचं नि मुलीचं कसं होणार? म्हणून मी त्यानंतरच्या उन्हाळयाच्या सुटींत हिला बरोबर घेऊन नागपूरला गेलों. शकूची आई तिच्या जन्माच्या घरीच म्हणजे माझ्या मित्राच्या इथं मला भेटली. तेव्हां मला प्रथमच कळलं की, ती माझ्या पैशाला शिवलीही नाही. स्वतंत्र उद्योग करूनच तिनं आपला खर्च भागवला. ते सहा हजार रुपये मुलीच्यासाठीच ठेवण्यांत आले आहेत हेंही तिनं सांगितलं. शकूला त्यावेळीं पाहण्याची मला फार इच्छा होती, पण ती भेट झाली नाही. तरी कांही प्रमाणांत माझ्या मनाचं समाधान झालं. तिच्या आईनं तिचा त्यावेळचा एक परकरा फोटो मला दिला. हा बघ, तुला पहायचा असेल तर!"

भिंतीवरचा जो फोटो विजय मघापासून पाहत होता, तो उषेचा नसून शकुंतलेचा होता, हे विजयला आतां समजलें.

विजयनें आणखी एक शंका काढली, "तात्या, तुम्ही आता सबजज्ज असून त्यावेळा पुण्याला असिस्टंट कलेक्टर कसे होतां?"

"चांगलं विचारलंस," तात्या म्हणाले, "हे पहा, एक्झिक्यूटिव्ह खात्यांत सरकारला ज्या काहीं मनोवृत्तीची माणसं लागतात, तसा मी नव्हतो असं सरकारला वाटलं. आणि म्हणून मला दिवाणी खात्यांत ढकलण्यात आलं."

यानंतर माईंना उर भरून आलेला दिसला. त्या गद्गद स्वरात म्हणाल्या, "बाईंचा देवावरचा विश्वास अखेरीस खरा ठरला. 'देवाच्या मनांत असलं तर पुनः आपल्या भेटीगोष्टी होतीलच' हे त्यांचे शेवटल्या भेटीतले शब्द मला आतां एकाएकी आठवले."

यावर तात्यासाहेब खिन्नपणानें हंसून म्हणाले, "म्हणजे! तुझा बेत आतां बदलला का काय? शकूला अन् तिच्या आईला आतां इथं आणलेलं तुला खपेल?"

"इथंच आणलं म्हणजेच भेटीगोष्टी होऊं शकतात असं थोडंच आहे?" माईंनीं खुलासा केला, "आतां शोधून लागला आहे तेव्हां भेटीगोष्टी व्हायच्याच."

सकाळीं उठतांक्षणीच नागपूरकडची पहिलीच गाडी गांठण्याची परवानगी विजयनें तात्याकडून घेतली. जातांना उषा पुन्हां त्याला गमतीनें म्हणाली, "ह्या सुटींत आतां मी

आणखी जय्यत तयारी करतें. कालच्या वादविवादांत हरलें तर हरले. मी माघार घेतली ह्याची फुशारकी वाटूं देऊं नका. तो मराठ्यांना गनीमी कावा होता. पुन्हां पुण्याला गेल्यानंतर प्रत्यके वादविवादांत मी तुम्हांला हार खायला लावते की नाहीं तें बघा."

विजयने त्याच वेळीं हार खाल्ली!

तो म्हणाला, "अग, मी करतों कबूल. आतां उषेचा विजय नेहमीचाच आहे!"

गाडी सुटल्यानंतर उषेची पूर्ण खात्री झाली. तिला कालच्या वादविवादांत विजयचाच पूर्ण पराजय झाला हें अजिबात माहित नव्हतें. म्हणून तिनें त्याच्या शेवटच्या साध्या उद्गारांचा अर्थ आपल्याच मनाप्रमाणें घेतला आणि ती मनाशीच पुटपुटली कीं विजयच्याही मनांत आपणाविषयी कांहीं विशेष नाजूक भावना आहेत कीं काय?

---

८

# गोंधळ !

विजय २२ तारखेच्या मेलनें कळविल्याप्रमाणें वास्तविक यायचा, पण तो असा अनपेक्षितपणानें एक दिवस आधींच आलेला पाहून बाबासाहेब म्हणाले, "विजू, नाशिकला उतरला नाहींस कीं काय?"

विजय म्हणाला, "नाही पापा, उतरलों होतों, पण माझ्या त्या पत्रासाठीं मला असं तातडीनं यावं लागलं. तुम्ही शकुंतलेला अजून घराबाहेर काढलं नाहींत ना?"

"अरे वेड्या," बाबासाहेब हंसत म्हणाले, "तुझा उतावीळपणा, माझ्या काय ओळखीचा नाही? शिवाय असं कीं तुझ्याप्रमाणें मला जानकीबाईची हकीकत खोटी वाटत नाहीं. मी मानसशास्त्र–विशारद नसलों तरी डॉक्टर आहे. आपण मरणार आहोंत अशा परिस्थितींत रोगी जें कांहीं सांगतो तें नेहमी खरंच सांगतो असा माझा अनुभव आहे. मी त्या पोरीलासुद्धां अजून काहीं एक सांगितलं नाही. जानकीबाईलाही मी कांहीं आश्वासनं देऊन ठेवली आहेत तीही मला मोडावींशी वाटत नाहींत. आणखी तुलाही मी एवढंच विनवतों कीं डोक्यांत अशी राख घालून तूं असा शकुंतलेशीं तिची आई परत येईपर्यंत तरी निष्ठुरपणानं वागूं नकोस."

यावर विजयला हसूं वाटलें. पण काय असेल तें असो, नाशिकला कळलेली हकीकत त्यानें बाबासाहेबांस सांगितली नाहीं. तो जणुं काय आज्ञाधारकपणानेंच आपल्या पित्याला म्हणाला, "होय पापा, तुम्ही म्हणतां त्याप्रमाणेंच वागेन." आपल्या हेकेखोर मुलानें आपली ही गोष्ट तरी एकाएकीं मान्य केली हें पाहून बाबासाहेबांनाही बरें वाटलें.

जेवीत असतांना विजयला लीलेकडून कळलें कीं, शकुंतला आज जेवली नाहीं आणि गाडीखान्यांतल्या एका अडगळीच्या खोलींत बसून मधून मधून हुंदके देत आहे. हें ऐकतांच विजयनें तिला बोलावून आणण्यासाठीं लीलेला पाठविलें. शकुंतला आल्यानंतर

विजयनें तिला खोदखोदून तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न केले पण ती नुसती खिन्नपणानें खालीं पाहात होती. अखेरीस रमाकाकूंनीं थोडासा खुलासा केला. त्या म्हणाल्या, " ही दवाखान्यांतल्या टेबलावरचे काही कागदपत्र चाळून असलेली मला मघांशी दिसली म्हणून मी तिला येवढेंच म्हणालें की, ' बाबासाहेबांना कांहीं असल्या गोष्टी आवडत नाहीत. ' तों माझ्या एवढ्याशा बोलण्याचा असा हा हिनं पराचा कावळा केला. "

यावर विजयनें शकुंतलेला जेवण्यासंबंधीं कळकळीची विनंति करतांच तिनं निमूटपणें दोन घास गिळले. रात्रीं जेव्हां विजय आपल्या खोलींत गेला तेव्हां त्याला आपल्या टेबलावर पुढीलप्रमाणें पत्र आढळलें.—

" मला आपण ' मी असं कां वागलें ' याचीं कारणें पुनः पुनः विचारलीं त्यावेळीं सर्वांच्या समोर उत्तर देण्याचा धीर मला झाला नाहीं. या बाबतींत मला आपणांशीं प्रत्यक्ष बोलण्याचेंही धैर्य होत नाहीं. म्हणूनच मी ही चिठ्ठी घाईघाईनें लिहून आपल्या टेबलावर ठेवीत आहें.

" काकूंच्या बोलण्याचा मला मुळींच राग आला नाहीं. मीच एक पाप केलें त्याचेंच दिवसभर मला प्रायश्चित मिळालें. दुसऱ्यांचीं पत्रें वाचूं नये हा साधा शिष्टाचार मला कळतो. पण दवाखान्याच्य टेबलावरील आपल्या एका पत्राकडे लक्ष जातांच माझें मन माझ्या ताब्यांत राहिलें नाहीं. मी आपलें पत्र वाचलें—दोन चार वेळां वाचलें.

"अजूनही मला कोणत्याही गोष्टीचा सुगावा लागत नाहीं. आम्हां हतभागी मायलेकीवर आपण इतकें कां रागवावें हेंच कळत नाहीं. माझ्या आईला आणि मला आपण नायकिणींच्या पंक्तीला बसविलें आहे. आईनें जातांना सहा हजार रुपयांचें माझ्या नावाचें " सबुक बाबासाहेबाजवळ देऊन ठेवलें आहे असाही ओझरता उल्लेख आपल्या पत्रांत आहे. हे पैसे आईनें कुठून आणले हे मला माहीत नाहीं. आईनें कांहीं तरी पाप केलें आहे हें मला आपल्या पत्रावरूनच आज प्रथम कळलें. माझा जन्मही असाच पापांत झाला आहे हेंही मला आजच समजलें. ह्यापेक्षां मी जन्मालाच आले नसतें तर किती चांगलें झालें असतें. आम्हां दोघांना तुम्ही जवळ जवळ कुलटा ठरविलें आहे हें मात्र अजिबात खोटें आहे—तुम्हांला खरें न वाटो ! माझ्या आईला मी आपणापेक्षा जास्त चांगल्या रीतीनें ओळखतें. तिचा मला आतां एकाच बाबतींत राग येतो कीं तिनें ह्या साऱ्या गोष्टी माझ्यापासून आजवर लपवून ठेवल्या. तिच्या मोकळेपणाच्या स्वभावाला ह्यामुळें माझ्या मतें मोठाच कालिमा लागला. तिनें हें असें लपवालपवीचें धोरण एवढ्याच बाबतींत कां स्वीकारलें तें माझें मलाच कळत नाहीं.

" आपण मला घरांतून एकाएकीं काढून टाकण्यासंबंधीं बाबासाहेबांना सूचना केली. आपलें म्हणणें बरोबर आहे. मात्र माझी आई यात्रेला गेली नाहीं, तोही तिचा कावाच आहे हें आपलें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. असो. उद्यां सकाळीं मी स्वतः आपलें घर सोडतें. आजपावेतों आपणा सर्वांना आम्हां दोघींमुळें जो कांहीं त्रास सोसावा लागला त्याबद्दल

क्षमची याचना करणें एवढेंच माझ्या हातीं आहे. बाबासाहेबांच्या कडून तेवढें तें पासबुक उद्यांला माझ्या स्वाधीन करा. त्यांतून मी बाबासाहेबांना आईनें नेलेले चारशे रुपये देईन व वर फुल ना फुलाची पाकळी म्हणून आमच्या सर्व खर्चाबाबत आणखी चारशे रुपये देईन. बाबासाहेबांनीं आईला जीवदान दिलें आहे तेव्हां वास्तविक ही मोबदल्याची रकम त्या मानानें अल्पच आहे हें मी जाणतें. पण माझ्या भावी आयुष्याचा विचार करतां आणि निस्सहाय गरीब परिस्थितीकडे लक्ष देतां आपण तूर्त तरी तेवढ्या रकमेवर संतुष्ट व्हाल ही आशा आहे.

आ.

**श. देशपांडे"**

हें शकुंतलेचें पत्र वाचतांच विजय गोंधळून गेला. रात्रीच्या वेळीं ह्या नवख्या तरुण पोरीकडे जर आपण धांव घेतली तर तें रमाकाकू, विलास, लीला ह्यांना चमत्कारिक वाटेल हें लक्षांत येण्याइतकें भान त्याला राहिलें नाहीं. तो तसाच शकुंतलेकडे गेला व 'थोडं बागेंत चला' असें त्यानें म्हणतांच तीही निराधार मुलगी त्याच्या मागोमाग निमूटपणें जाऊं लागली. कारंज्याजवळील बांकावर विजय बसला आणि त्यानें, 'बसा' असें म्हणतांच भांबावलेली शकुंतलाही त्याच बांकाच्या दुसऱ्या टोंकास बसली.

विजयनें तिला इत्थंभूत हकीगत सांगितली. बाबासाहेबांच्या पत्रांतला मजकूर, त्यावरून त्यानें कांहींसें विचार न करतां लिहिलेलें उत्तर, नाशिकला तात्यासाहेबांनीं सांगितलेली पूर्वकथा, त्यांच्या ऑफिसांतल्या भिंतीवर आपण पाहिलेला शकुंतलेचा लहानपणाचा फोटो या सर्व बारीकसारीक गोष्टीसुद्धां त्यानें अगदीं मोकळ्या मनानें शकुंतलेला सांगून टाकल्या आणि शेवट 'मला तूं क्षमा करणार नाहीस का ?' म्हणून जिव्हाळ्याचा प्रश्न केला. शकुंतलेला उत्तर द्यायचें सुचलेंच नाहीं. ती भडभडून रडूं लागली. साहजिकच विजयला शिष्टाचाराची आठवण राहिली नाहीं. त्यानें वडिलकीच्या नात्यानें त्या अजाण बालेच्या पाठीवरून हात फिरविला. शकुंतलेला बरें वाटलें. कांहीं वेळानें विजय म्हणाला, तुम्ही आतां कसलीही काळजी करूं नका. अजाणतेपणानें माझ्या हातून चूक झाली. मी कांहीं राक्षस नाहीं. मला तुमचीं सुखदुःखें कळतात. जानकीबाई आल्यानंतरसुद्धां मी आतां तुम्हांला आमच्या घरून बाहेर जाऊं देणार नाहीं......अरेच्या विसरलोंच, तुमचें लग्न झाल्यावर मात्र माझा नाईलाज होईल नाही कां ?"

विजयला वाटलें कीं ह्या आपल्या विनोदानें शकुंतलेला बरें वाटेल. पण तिच्या मनोवृत्तींत पालट पडला नाहीं. त्या रात्रीं विजय सुखानें झोंपला, परंतु शकुंतलेला झोंप आली कीं नाहा हे त्याला कळलें नाहीं.

सकाळीं उठल्याबरोबर विजयच्या लक्षांत आलें कीं शकुंतला अजूनही अगदीं खिन्न आहे. तिचें विशाल डोळे सुजल्यासारखें दिसत होते. काय करावें म्हणजे तिला बरें वाटेल ह्या विचारांत विजय पडला. अखेर तिच्या जिवाला कांहींसा विरंगुळा पडावा म्हणून त्यानें कॅरम खेळण्याची शक्कल काढली. विलास आणि लीला एका पायावर नेहमीं खेळायला तयार असतच. प्रश्न काय तो शकुंतलेचाच होता. विनंती केल्यानंतर

नकार देणें तिला जड जावें अशा रीतीनेंच विजयनें तिला सूचना केली.

तो म्हणाला, " आज किनई मला कॅरम खेळावंसं वाटतं. आम्ही तिघे जण आहोंतच. आतां चौथा गडी कुठला आणावा ? " विलास व लीला यांना नाटक कसें करायचें हें विजयने आधीच पढवून ठेविलें होतें.

विलास म्हणाला, " मग आपल्या नानाला आणतों बोलावून. "

लीला एकाएकीं उद्गारली, " आतां कशाला नानाची जरुरी ? आपल्या घरीच चवथं माणूस आहे ना खेळायला ! शकुंतले, येईनास तूंच. "

विलास म्हणाला, " होय. खरंच मी तें विसरलोंच. "

आणि विजयनें आग्रह केला " शकुंतलाबाई चला ना तुम्हींच खेळायला. "

ह्या सर्व भडिमारांतून शकुंतलेची सुटका होणेंच शक्य नव्हतें. म्हणून ती नाईला-जानेंच खेळायला तयार झाली.

विलास आणि लीला दोघे एका बाजूस आणि शकुंतला व विजय दुसऱ्या बाजूस, अशी गड्यांची आपोआप वाटणी झाली. लीला आणि विलास ह्यांना रोज तेवढाच उद्योग असल्यामुळें कॅरम खेळायची चांगलीच संवय होती. विजय व शकुंतला यांचा लागो-पाठ पराभव होऊं लागला. अखेर विजय हंसून म्हणाला, " माझ्यासारख्या गब्बू गड्यामुळेंच शकुंतलाबाईंना सारखी हार खावी लागते. अरे विलास, तूं बैस माझ्या जागीं. म्हणजे खेळांत जास्त रंग भरेल."

हें ऐकतांच विलास आपली जागा सोडणारच होता. पण तेवढ्यांतच शकुंतला कांहींशा जड आवाजांतच म्हणाली, " कांही नकोत जागा बदलायला. हारणं काय नि जिंकणं काय ? खेळायचं म्हणून खेळायचं. कसा तरी वेळ गेला म्हणजे झालं. "

वास्तविक शकुंतलेनें हे उद्गार अगदीं साहजिकपणेंच काढले होते, परंतु विजयनें तिच्या ह्या साध्या बोलांतून कांहींसा वेगळाच अर्थ न कळत काढला.

आणखी एक दिवस निघून गेला. दुसरे दिवशीं सायंकाळी लीलेनें विजयला सांगितलें कीं गेल्या दोन्हीही रात्रीं शकुंतला मुळींच झोपली नाहीं. तेव्हां विजयनें तिला सुचविलें कीं, " शकूला घेऊन तूं मोटारींत जाऊन बैस. अंबाझरीला जाऊं. मी हा आत्तां आलोंच. " आंबाझरी तलावाच्या लांब पाळीवर शकुंतलेला फिरायला नेऊन चार सांत्व-नाच्या गोष्टी सांगाव्या असें विजयनें ठरविलें. पाळीचे बाजूच्या मैदानांत मोटार उभी ठेवून विजय उतरला. शकुंतलेच्या मागोमाग लीलाही उतरूं लागली; तेव्हां तिचा विजूदादा तिला आर्जवानें म्हणाला, " लीलू, तूं अंमळ इथंच थांबतेस काय ? मला शकुंतलाबाईंशीं कांहीं महत्त्वाचें बोलायचं आहे. "

त्यावर शकुंतला कांहींशीं लाजून म्हणाली, " लीलाताईही असनात का बरोबर."

पण लीलाच कांहींशीं रागांत म्हणाली, " तूंच जाईनास शकू. दादाला तुलाच कांहीतरी सांगायचें आहे. मी तें ऐकणं त्याला आवडायचं नाही. "

विजय आणि शकुंतला संथपणाने पाळीवरून बोलत बोलत दूरवर जात असतांना, लीला कुतूहलानें सारखी त्यांच्याकडेच पाहत होती.

कांही वेळ दोघांनाही काय बोलावें तें सुचेना. काही वेळानें विजय म्हणाला, " तुमच्या 'वेल, कळी, आणि वारा' ह्या गोष्टीची मला आतां आठवण झाली. "

शकुंतला कांहींच न बोलतां त्याच्या मागोमाग मुग्धपणें चालत होती.

कांही वेळानें तो पुन्हां म्हणाला, " त्या गोष्टींत तुम्ही जणुं तुमच्या आयुष्याचेंच भविष्य वर्तविलें होतें. "

" खरेंच " शकुंतला खिन्नतेनें म्हणाली, " ती गोष्ट लिहायची बुद्धि देवानें मला कां दिली कुणास ठाऊक. मी आपली लेखिका व्हायला गेले, अन् माझ्याच आयुष्याचा नाश करणारी अशी चेटकी झालें अखेर. "

" छेः छेः! तुम्ही आपणाला दोष लावून घ्यायचें कारण नाही. " विजय बरें वाटावें म्हणून म्हणाला, " परिस्थितीनें ह्या साऱ्या गोष्टी घडतात. तुम्ही ती गोष्ट लिहिली नसती, तर व्हायचें तें झालें नसतें, असं थोडेंच आहे ? अन् शिवाय असं पहा, कीं त्या गोष्टीइतकं कांही तुमचं वाईट झालं नाही. "

शकुंतलेनें एक सुस्कारा दिला व म्हटलें, " माझ्या गोष्टींतली कळी ज्यास्त भाग्यवान् आहे. मला एकाएकी जगांतून निघून जाता येत नाहीं, हें माझं दुर्दैव. दुसरं काय ? "

हे ऐकतांच विजय जरासा थबकून म्हणतो, " म्हणजे इतपत का तुमच्या मनांत आतांशा विचार येतात ? " शकुंतलेनें कांहींच उत्तर न देतां, मंद पदें टाकीत खालीं पाहत, चालणें सुरू ठेवलें. आज ती लांब दुखण्यांतून उठलेल्या आजाऱ्यासारखी चैतन्यहीन दिसत होती.

विजयला अगदीच सुचेनासें झालें. पाळीच्या अगदीं दुसऱ्या टोंकाला पोचतांच दोघेंही खालीं बसलीं व मावळतें सूर्यबिंब पाहूं लागलीं.

विजयनें तिला उपोषिपर्यींच्या कांही गोष्टी सांगितल्या, आणि तिनेंही असेच आत्महत्येसंबंधींचे उद्गार काढले होते, त्या विषयींही थोडेसें सांगितलें. शेंवट तो म्हणाला, " तुम्हां आजकालच्या मुलींना नेहमीं आत्महत्येचे कां विचार येतात कुणास ठाऊक. "

हें ऐकून शकुंतलेच्या खिन्न चेहऱ्यावर जरासें स्मित झळकलें, अन् ती म्हणाली, " मला आत्महत्या करावंसं वाटत नाहीं कदापि. माझ्या आईनं तेवढं मला खंबीर मनाचं करून ठेविलें आहे. अहो, आम्ही नायकिणींच्या कोटींतल्या ना ? आम्हाला जगांत काय कमी आहे ? '—

" हें पहा, मी कांहींतरी चुकीचे आरोप केले होते हें नाही का सांगितलं ? " विजय वाईट वाटून म्हणाला, " पुन्हां हवी तर दहा वेळ क्षमा मागतों. "

यावर मुद्दाम विषय बदलायला कीं काय कुणास ठाऊक, शकुन्तला म्हणाली, " लीलाबाई, एकट्याच आहे ना मोटारींत. आंधार पडत चालला आतां. "

दोघेही उठली. तिथून मोटार एखाद्या लहानशा पेटीच्या आकाराएवढी दिसत होती. सायंकालच्या छायेमुळें ती आतां थोडी अंधुकशी दिसूं लागली होती. चोहींकडे सामसूम होतें.

शकुंतला म्हणाली, "लवकर जाऊं या जरा. लीलाताईना भीति वाटायची एखादवेळ."

"छेः!" विजय बेपर्वाईनें म्हणाला, "ती कधीच भ्यायची नाहीं. भय वाटायला सुद्धां अगदीं थोडीशीं अक्कल लागते. ती आहे कुकुबाळ अगदीं. लहान मुलांना तरी ज्यास्त कळतं तिच्यापेक्षां."

"छ हो!" शकुंतला आतां जराशा उंच स्वरांत म्हणाली, "त्यांना सगळं कांही कळतं बरं. थोड्याशा अल्लड आहेत एवढंच."

"कळलं असतं," विजयनें विचारलें, "तर मग ती दोन वर्षं झाली, तरी सासरीं कां नाही जात?"

"खानदेशांत दिलं आहे वाटतं त्यांना?"

"होय."

"घराणं श्रीमंत आहे, पण जांवईबुवा अगदीं जेमतेमच आहेत. हें खरं का?"

"अरे वाः! तुम्हाला येवढ्यांत पुष्कळच गोष्टी कळल्या म्हणायच्या."

"मी आपले लीलाताईच्या बोलण्यावरून हे सारे तर्क केले आहेत."

"हे पहा शकुंतलाबाई," विजय म्हणाला, "मग जरा तिच्या मनांतलं काढा बघूं. तिला सासरीं जावंसं कां नाहीं वाटत तें?"

शकुंतलेनें तेवढी कामगिरी आपल्यावर घेतली, व कांही वेळानें तीं दोघेही त्या मोटारीजवळ आलीं. तों काय! लीलेचा मोटारींत पत्ताच नव्हता.

आतां चोहींकडे अंधार पडला होता. विजयनें इकडे तिकडे जवळपास शोध केला. कांहीवेळ त्यानें ती गोष्ट थट्टेवारी नेऊन 'गंमत करतेस काय?' म्हणून शोधून काढण्याचा आव आणला. पण थोड्याच वेळांत मात्र तो घाबरला. त्यानें मोठमोठ्यानें हाका मारल्या. पण पत्ता नाहीं. तलावाच्या पाण्याकडेही त्यानें एकवार शंकेखोरपणे नजर फेंकली. पण तो मनाशीच पुटपुटला, 'छेः! तें लीलेच्या बाबतींत शक्य नाहीं,' त्याला कांहीं काळ कांहींच सुचेना. अखेरीस तो म्हणाला, "चला, घरच्या रस्त्यानें जाऊं या. वाटेंत चालत जायची ती छांदिष्ट पोर एखादवेळ."

दिव्याच्या भडक प्रकाशांत लांबून एक बाई जातांना त्यांना दिसली. दोघेंही आनंदित झालीं. पण जवळ जातात तों, ती एक अडाणी बाई निघाली.

पुढें कांही खुशालचेंडू मुसलमानांची टोळी लागली. विजयला भलतीच शंका आली. त्यानें मोटार थांबून अदबीनें चौकशी केली. त्यांनी हंसत हंसत सांगितलें की, "आम्ही अशी बाई पाहिलीच नाहीं बाटेत."

पुढें विजयनें सपाटून मोटार चालवून घर गांठलें. मोटारींतच शकुंतलेला बसवून विजय सारें घर घाईतच धुंडाळून आला. रमाकाकूंच्या ' मुली नाहीं का आल्या ? ' ह्या प्रश्नाला कांहीं एक उत्तर न देतां विजयनें पुन्हां जोरांत मोटार हांकली. पुन्हां एकवार अंबाझरीवरील त्याच जागेवर जाऊन, तो वेड्यासारखा मोठमोठ्यानें हांका मारू लागला. आस्मंतांत चहूंदूर शांतीचें भेसूर वातावरण पसरलें होतें. त्या तलावच्या लहरी कांठावर येऊन आदळत त्यावेळीं जो कांहीं सळसळ् आवाज होई तेवढाच. दोघेंही आतां जवळ जवळ वेडीं झालीं. अखेर एकच निराशेचा उपाय होता. सीताबर्डीच्या पोलीस नाक्यावर जाऊन विजयनें लागलीच रिपोर्ट दिला.

सब् इन्स्पेक्टरने त्याला औपचारिकपणें धीर दिला व सांगितलें कीं, " तुम्ही घरीं जा. हा मी आत्तां आलोंच. इकडे आंबाझरी व तेलंखेडीवरही शोधासाठीं लागलीच माणसें पाठवितों. "

विजयच्या तोंडचें पाणीच पळालें !

---

# ९

# विलासची लीला

लीला नाहींशी झाल्याचा वृत्तांत, आणि तिला एकटेंच मोटारींत ठेवून विजय व शकुंतला आंबाझरीवर फिरायला गेले होते, ही हकीकत जेव्हां बाबासाहेबांना कळली, तेव्हां ते आपल्या भांबावलेल्या स्थितीमुळें विजयला खूबच टाकून बोलूं लागले. शेवट तर त्यांनीं त्याला अगदीं खपेनासा टोमणा दिला. ते म्हणाले, "काय रे, मी तुला त्या शकूशीं निष्ठुरपणें वागूं नकोस, असं सांगितलं होतं ह्याचा अर्थ तिच्याशीं असं लघळपणानं वाग असा तूं केलास की काय ?"

बाबासाहेबानें अशा प्रसंगाचे रागावणें हें साहजिक आहे, असें आपल्या क्षुब्ध मनाचें समाधान करीत विजय स्तब्धच राहिला.

"ए घुम्या," बाबासाहेब पुन्हां क्रोधानें म्हणतात, "मी तुला मोठा सत्वशील समजत होतों. पण तूंही अखेर सिंहाचें कातडेंच पांघरलं होतंस तर गाढवा!...आलास त्याच रात्रीं शकुंतलेला बागेंत घेऊन गेलास. तिला अगदीं जवळ घेऊन तिच्याशीं चाळे केलेस. अन् आतां दोन तीन दिवसांतच तिला लांब एकांतवासांत नेतांना, तुला प्रत्यक्ष तुझ्या बहिणीचाही बळी द्यावासा वाटला!..."

ह्यावर "पापा, काय हें? किती रागावलांत तुम्ही..." असें बोलून विजय त्यांचें सांत्वन करण्याचा प्रयत्न करूं लागला.

सर्वांनाच अगदीं सुचेनासें झालें. रमाकाकू तर अगदीं तालसुरांत रडूं लागल्या. पण अखेरीस दोन अडीच तासांनीं हें सर्व चहाच्या पेल्यांतील वादळच ठरलें. सायकल हातांत घेऊन विलास लीलेला घेऊन परत आला.

बाबासाहेबांना वाटलें कीं विलासनें लीलेला शोधूनच आणलं. ते त्याबद्दल त्यास शाबासकी देऊं लागले; त्याचा त्याला कांहीं एक उलघडाच होई ना.

अखेरीस सर्व गोष्टी सर्वांना कळल्या. विलास सायकल घेऊन मुद्दाम आंबाझरिवर

कसा गेला, रागावलेली लीला, त्याला ' चल, जरा गंमतच करूं ' कसें म्हणाली, आणि मुद्दाम श्रद्धानंद अनाथालयाकडच्या लांबच्या रस्त्यानें तीं दोघें कशीं आलीं, हें सर्व ऐकून घरांतील स्मशान-शांतता एकाएकीं नाहींशी झाली.

" लील, " बाबासाहेब म्हणाले, " अजून तुझं हट्टी, अल्लड बाळपण कांहीं जात नाहीं, नाही ? काय नुसता गोंधळ उडवून दिलास ! "

" चांगलं झालं एकदाचं " मानेला हिसका देत, बुबुळें फिरवीत, व दांत दाखवीत लीला विजयकडे पाहून म्हणाली, " माझी तुला अडचण झाली होती नाहीं रे विजुदादा ? "

विजयलाही आतां हायसें वाटलें. तो म्हणाला, " वेडी कुठली ! इतका राग तुला येईल ही नव्हती माझी कल्पना. पापा आतां रागांत आहेत म्हणून. नाहीं तर तुझा राग घालवायला आपण चौघेही गेलो असतों आज सिनेमाला. "

ह्यावर पापा हंसत म्हणाले,

" अरे, उतरला माझा रागाचा पारा आतां. ह्या कार्टीचा आहे सारा पाजीपणा. "

ह्या बाबासाहेबांच्या वाक्याचा अर्थ रमाकाकूंनीं विचित्रच घेतला. त्या म्हणाल्या, " विलासनं काय घोडं मारलं असं ? तो आपल्या बहिणीला घेऊन परत आला. एखाद्या परक्या पोरीशीं कांहीं मिरवीत बसला नाहीं. "

रमाकाकूंच्या कोणत्याही बोलण्याला कितपत किंमत द्यावी, हें बाबासाहेब जाणत होतेच. ते विजयला म्हणाले, " जा तुम्ही चौघेही सिनेमाला. आणखी विजू, लीला सांपडल्याची वर्दीही देऊन दे ठाण्यावर. "

नाताळ निमित्त चित्रपटही चांगला होता. बोलपटांचा शिरकाव अजून कांहीं नाग-पुरांत झाला नव्हता. मूक चित्रपटांची मौज बोलपटांत येणार नाहीं, अशा तऱ्हेची बोलवा मात्र त्यावेळा चहूंकडे होती.

चित्रपटाचें नांव ' मेरी-गो-राउंड ' असें होतें. मुख्य स्त्री-भूमिका मेरी फिल्बिन् नांवाच्या एका त्या वेळच्या सुप्रसिद्ध नटीनें केली होती. नायकाचें काम नॉर्मन् केरीनें नटविलें होतें.

कथानक हृदयाला हलवून सोडणारें होतें. एक सालस पण दरिद्री तरुण मुलगी ' मेरी-गो-राऊंड ' ह्या कंपनींत एका संगीत-वाद्याचा दंडा फिरविण्याचें कामावर नोकरीस होती. कंपनीच्या मालकाची तिजवर विलासी दृष्टि होती. एका उदारधी कौंउंटनें तिला ह्या संकटांतून सोडविलें, नाहींतर ती शीलभ्रष्टच होत होती. त्या श्रीमंताचें तिजवर प्रेम बसलें. पण तो व्हिएन्नाहून दुसरीकडे निघून गेला. एका कौंउंटेसशीं त्याचें लग्न ठरलें. पण ती वारली. आणि अखेर त्यानें त्या गरीब मुलीचा शोध करून तिच्याशींच समाजाला न जुमानतां लग्न केलें.

मेरी फिल्बन् ही नटी सुंदर होती. डोळयांत आसूं अन् तोंडावर हांसू, हें तिचें वैशिष्ट्य होतें. मधल्या सुट्टींतच विजयच्या लक्षांत आलें कीं शकुंतलासुद्धां डोळयांत अश्रू असतांनाच कधीं कधीं गोड हांसते.

सिनेमाहून परत येतांना ज्या कांहीं थोड्याशा गोष्टी झाल्या, त्यावरून शकुंतलेलाच काय तें थोडेबहुत कथानक समजलें होतें, हें विजयच्या लक्ष्यांत आलें.

विलासला त्या सिनेमापेक्षां इंटरव्हलमधले चहाचे पेले, सारख्या पानपट्यांचा मारा, आणि सिगारेटचे झुरके, इत्यादि गोष्टी, व चित्रपटांतील नाच, चुंबनादि लीलाच विशेष आवडल्या.

विजयनें तें कथानक त्या सर्वांना चांगल्या रीतीनें समजावून सांगितलें. तेव्हां लीला म्हणाली, " दादा, जसं त्या श्रीमंतानं त्या मुलीला सोडविलं, तसंच तूंही ह्या शकुंतलेला सोडविलं होतंस."

" इश्श ! " शकुंतलेनें लाजून तिला चालतांना किंचित् ढकललें.

" पण तुझ्यापेक्षां विलासच दिसतो त्या श्रीमंतासारखा. " लीला म्हणाली.

" अन् मी दिसतो त्या कंपनीच्या मालकासारखा, होय ना ? " विजय हंसून म्हणाला.

" होय रे होय, दादा, " लीला म्हणाली, " कसं बरोबर ओळखलेंस माझ्या मनांतलं......सांभाळ हो, शकुताई, आमचे दादासाहेबही तुझ्य वर मालकी गाजवूं शकतात एखाद्वेळ......"

शकुंतलेने तिला मध्येंच अडवून म्हटले, " लीलाताई हे काय असं ? भलतंच कुणाविषयीं कांहीं बोलूं नये. "

" लीलू, " विजय म्हणाला, " तूं आतां कांहीं केवळ अल्लड नाहीं राहिलीस. तुलाही बऱ्याच गोष्टी कळूं लागल्या कीं ग ! "

" मग तूं काय मला खरंच अजागळ समजंत होतास कीं काय ? " लिला बालिश हावभाव करीत म्हणत होती, " आणखी हें पहा दादा, तूं कीं नाहीं, असं कांहीं वेड्यासारखं करूं लागलास, म्हणजे विलास शकुंतलेची सुटका करील. "

विजयलाही आतां हें लीलेचें बरळणें नकोसें झालें. तो म्हणाला, " पुरे कर आतां आपले अकलेचे तारे. विलास, कांहीं काऊंट नाहीं एखादा. "

फाटकांत आल्यानंतर विजयनें शकुंतलेला विचारलें, " तुम्हाला कसं वाटलं आजचं कथानक ? "

" मला असं काय कळतं म्हणा, " शकुंतला म्हणाली, " पण त्या कौउंटनं एका गरीब मुलीशीं लग्न केलं हें, मला कांहीं शक्य नाहीं वाटत. "

शकुंतलेनें हे उद्गार अगदीं साध्या अर्थानें काढले होते, पण लीला लागलीच म्हणते, " मग आमचा श्रीमंत दादा तुझ्यासारख्या गरीब मुलीशीं लग्न करून हें शक्य करून दाखवील बघ."

आतां मात्र विजयला लीलेचा राग आला. तो तिला खूब बोलला, आणखी 'पुन्हां असें कधीं म्हणालीस तर पहा' अशी ताकीद देऊन रागारागांतच माडीवर निघून गेला.

वास्तविक विजयला लीलेचा राग आला नव्हता. परंतु, बाबासाहेबांच्या मघाच्या उद्गारावरून कुणीतरी असल्या ह्या संशयाची पेरणी त्या घरांत करीत आहे, हें त्याला कळून चुकले होते. एरव्ही आपण शकुंतलेला बागेत अगदीं आपल्या जवळ ओढून घेतलें होतें ही सुट्टीतल्या पहिल्या रात्रीची गोष्ट बाबासाहेबांना कशी कळती. " वा रे! जगाचा व्यवहार. एकदम कुणालाही पाप चिकटवायला कुणाला कांहीच वाटत नाही. आपल्यावर इतकी बारीक नजर कुणाची असेल? विलासची? लीलूची? रमाकाकूंची?—"

इतक्यांत त्याला खाली कसली तरी गडबड ऐकूं आली. तो जाऊं लागला, तों अर्ध्या जिन्यांतच रमाकाकूंचे शब्द त्याच्या कानी पडले, " विजयच तो. दुसरं कोण लागेल आपल्या घरीं ह्या पोरीच्या नादा?"

" विजय! छेः छेः, तो ह्या थराला नाहीं जायचा. पण काय सांगावं?" बाबासाहेबांचें बोलणें ऐकूं आलें.

विजय धाड्धाड् जिना उतरून खालीं गेला व घाईघाईत म्हणाला—" काय झालं पापा?"

ह्यावर बाबासाहेब कांहींच बोलले नाहींत. विजयनें आपली दृष्टि त्या खोलींत चोहीकडे फिरवली. त्या खोलींत त्या दोन मुलींची दोन पलंगावर निजायची व्यवस्था केली होती. ह्या वेळीं लीला झोपेंत होती व शकुंतला गुडघ्यात मान घालून रडत होती. काकू मिस्कीलपणानें गालांतल्या गालांतल्या हंसत होत्या. विजयला कांही केल्या बोध होईना.

रमाकाकूंनी आगींत तेल ओतलें, " अगदीं नाटक तर दोघांनीं खूबच रंगवलें आहे. पण आम्ही वडील माणसं बोळ्यानं का दूध पितो आहोंत? ह्यांचं कांहींतरी आधीच ठरलं असेल आज. नाहींतर ह्या शकूनं अशी पलंगाची अदलाबदल आजच कशाला केली असती? दाराच्या अगदीं जवळ हिला आजच कां निजावंसं वाटतं? रोज बिचारी लीला इथं झोपते तर कांहीं एक भानगड होत नाहीं."

हें तापलेलें तेल कानांत पडतांच शकुंतलेचे हुंदके वाढले व ती ओक्साबोक्सी रडूं लागली. विजय आश्चर्यानें चकितच झाला!

" मग ओरडली तरी कशाला पोर? चालू व्हायचा होता सावळा गोंधळ" बाबासाहेब रागाचे स्वरांत म्हणाले. " लीला जागी असेल म्हणून." काकूनें खुलासा केला.

विजयच्या लक्षांत आतां सर्व कांहीं आलें. तो त्वेषानें म्हणाला, " काकू, तूं चूप रहा. अवदसा कुठली. माझ्यावर आणि ह्या गरीब पोरीवर नाहीं नाहीं ते आळ आणतेस ? लाज नाहीं वाटत कांहीं ? "

हें त्याचें शिवराळपणाचें भाषण ऐकून बाबासाहेबच त्याचें अंगावर चवताळून गेले व म्हणाले, " बेशरम, पाजी. लेका स्वतःच अशा लीला करतोस अन् वडील ऱ्या माणसास शिव्या देतोस. तूं बेव्या गद्धेपंचविशींत आला आहेस. म्हणून तुझी अक्कल—"

विजय वडिलांकडून भलतेंच ऐकून घेणारा नव्हता. तो ओरडला " पापा. तुम्ही शांत व्हा अगोदर. मी तुम्हाला आजच्यासारखं कधींच पाहिलं नव्हतं. "

" अन् तूंही असा कुलांगार निपजशील ही मलाही कल्पना नव्हती. " बाबासाहेबही खेकसले.

" थांबा थोडं पापा " विजय घाईत म्हणाला, " मला येऊं नये ती शंका आली दुसरा कांहीं माझा तर्कच धांवत नाहीं. पण खात्री होतपर्यंत मी कुणालाच गुन्हेगार ठरविणार नाहीं ! " तो धूम ठोकीत विलासचे खोलींत गेला. तो त्याच्या अंथरुणावरच पांघरूण घेऊन झोंपला होता. विजयचा तर्क चुकला पण त्याला शंका आली. त्याच्या खोलीचें दार उघडें कां ? विलासला उठवून विचारावेंच म्हणून त्यानें एकदम त्यांच्या अंगावरचें पांघरून बाजूस सारलें. तों काय ? विलास नव्हताच तिथें. त्यानें आपल्या उशा आडव्या ठेऊन त्यांच्यावर पांघरून घातलें होतें.

एकदम धांवतच पुन्हां परत येऊन त्यानें सांगितलें कीं विलास खोलींत नाहीं.

" मग त्याला रात्री फिरायला जायची संवय आहेच मुळा. " काकूंनी वकीली केली.

विजयनें तिच्या बोलण्याकडे लक्षच दिलें नाहीं. कारण, त्याच वेळीं ओणवें होतांच लीलेच्या पलंगाखाली त्याला विलास दिसलाच.

विजयनें त्वेषाचे भरांत त्याला फरफटत ओढूनच बाहेर काढले. बाबासाहेब, काकू, विलास, विजय, ह्या सर्वांचीच तोंडें पाहण्यासारखीं झाली होतीं

परंतु, आणखी एका गोष्टीवरून विजयला भलतीच शंका आली. इतकी गडबड झाली तरी लीलेला अजून जाग आली नव्हती. आजच मुलींनीं आपल्या ठराविक जागांची अदलाबदल केली होती, हेंही काकूंनी आतांच सांगितलें होतें. त्यानें जवळ जाऊन लीलेचा चेहरा न्याहाळला. तिच्या पापण्या थरथरत होत्या. एकूण तिनें झोंपेचें सोंग घेतलें होतें तर !

त्याचा संशय एकाएकी बळावला. त्यानें तसा स्पष्टपणें विलासलाच प्रश्न केला.

तो घाबरत म्हणाला, " पण अपराध माझा नाहीं. लीलेनेंच मला......" त्याचें वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच विजयनें त्याच्या गालावर आपली पांचीं बोटें उमटविलीं व म्हटले, " मूर्खा, आलं ध्यानांत. ती एक बेजबाबदार पोर आहे. लहान आहे पण तुला कांहीं अक्कल नको होती का ? "

बाबासाहेबांनीं विजयचा हात धरून त्याला दिवाणखान्यांत नेलें. ते म्हणाले, "विजय, तुझ्यापेक्षां यावेळीं माझी स्थिती चमत्कारिक झाली आहे. पोरीला कांहीं कळत नाहीं, असं मला वाटत होतं. विलास बेटा गुराढोरांच्या माळेंतला. बहीणभाऊ हें नातेंही त्याच्या स्मरणांत राहिलं नाहीं. कलियुगाचा महिमा सारा."

"पापा, माझं डोकं सुन्नंच झालं आज." विजय म्हणाला.

"हें पहा." बाबासाहेब म्हणाले, "आपल्या मालगुजारी गांवावर ह्याची उद्याच सकाळीं करितों रवानगी."

"आत्तांच द्या हांकून लेकाला पापा" विजय क्रोधातिरेकानें म्हणाला.

"नको उगाच" बाबासाहेब म्हणाले, "त्यानें व्यर्थच ह्या गोष्टीचा गवगवा होईल......आणखी तूं परत जाशील, तेव्हां लीलेलाही तिच्या घरीं पोंचती कर."

दुसरेच दिवशीं विलासची रवानगी बाबासाहेबांच्या खेडेगांवीं झाली! पण ह्या विक्षिप्त प्रसंगामुळें कुणालाच बरें वाटलें नाहीं. विषयांध विलास! बेजबाबदार लीला! विलासची लीला त्याला भोंवलीच, पण विजयचें सुखही किंचित् काळ पूर्णपणें हिरावून घेण्याचें सामर्थ्य त्याच्या माकडचेष्टांत होतें!

१०

# त्रस्त जीवनांतलें समाधान

त्या अनपेक्षित प्रकारानंतर विजयला त्या रात्रीं झोंप येणें शक्य नव्हतें. ज्या जगांत आणि ज्या युगांत तो वावरत होता, त्यांतील नीतिकल्पनांचाच पगडा त्याच्या मनावर बसणें साहजिक होतें. म्हणून त्या अत्यंत निंद्य प्रकारानें त्याच्या मनास मोठाच धक्का बसला. रात्र विषण्ण मनःस्थितींतच कशी बशी निघून गेली खरी. पण उगवलेला दिवस कसा जाणार हा त्याच्यापुढें मोठाच प्रश्न पडला. सकाळीं तो चहासाठीं स्वतः तर खालीं उतरला नाहींच पण वर गड्यानें आणलेला चहाहि त्यानें तिरस्कारानें परत केला. अशा विमनस्क परिस्थितींतच त्याचें लक्ष कॅलेंडरकडे गेलें. आजची २५ तारीख. ख्रिश्चन लोकांचा २५ डिसेंबर हा भेटीचा महत्त्वाचा दिवस. मनाला विरंगुळा पडण्यासाठीं त्यास एकाएकीं आपल्या एका पूर्वकालच्या ख्रिस्ती मित्राची आठवण झाली. टिमथी सायमन हा त्याचा हायस्कुलांतील वर्गबंधु. त्याची आणि त्याच्या सर्व कुटुंबीयांची चांगलीच ओळख होती. त्यानें इंग्रजी पोशाख केला, सायकल घेतली आणि सदरकडे असलेल्या टिमथीच्या घराकडे जाण्यासाठीं तो फाटकाबाहेर पडला. जवळ जवळ तीन मैलांचा तो पल्ला. पण आपल्या घरापासून शक्य तितके लांब जाण्याची ही संधि त्यानें आपल्या मनःस्वास्थ्यासाठीं मोठ्या उत्साहानें आणली.

टिमथीच्या घरच्या पडवींत पाय ठेवतांच दाराच्या जाळीदार पडद्यांतून बरीच मंडळी आंत बसलेली त्याला दिसली. त्याच्या बुटाचा आवाज होतांच लागलींच दाराबाहेर एकदोन व्यक्ति आल्या व त्यांनीं त्याचें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. "Halo Vijoy"- टिमथी त्याच्या दंडावर थाप मारीत हंसत म्हणाला, "How do you do ?"

उत्तरादाखल विजयनें संकोचयुक्त स्मित केलें व दारांत पाय ठेवला. आंतील शृंगारलेल्या हॉलमध्यें बसलेल्या मंडळींत विजयला दोनच चेहरे काय ते अपरिचित होते. त्यानें ख्रिस्ती पद्धतीनें सर्वांशीं हस्तांदोलन करून शुभेच्छा प्रगट केली आणि त्या अपरि-

चित व्यक्तीपुढें येतांच तो जरासा थबकला. टिमथीनें त्यांचा औपचारिक परिचय करून देतांच तोही ठराविक औपचारिक शब्द बोलला. येवढ्यांतच त्या दोन नवख्या व्यक्ति उठल्या व त्यांनीं मंडळींची रजा घेतली.

त्यांच्या गमनास अनुलक्षून विजय कृत्रिमतेनें स्मित करीत म्हणाला, "माझें येणें गेलेल्या मंडळीस रुचलें नाहीं कीं काय?"

टिमथीनें उत्तर केलें, "हो. तुझा आजचा दुर्मुखलेला चेहरा जरासा विरस करणाराच आहे. कांहीं आजारी बिजारी होतास कीं काय?"

यावर टिमथीचे वयोवृद्ध वडील शांतपणें इंग्रजींत म्हणाल, "अरे, कोणासही नेहमीं हुरुप येइल असेंच बोलावें. आणखी सर्वांच्या सोयीसाठीं तुम्हा मित्रांना सुचवितों कीं, आतां इंग्रजींतूनच बोला."

यापुढील सर्व संभाषण इंग्रजींतून सुरू झालें. कारण टिमथीचे आईवडील मराठी जाणत असले, तरी त्यांच्या एलिझाबेथ, होप, मार्गारेट, मेरी, विटी, सबी, या सहा बहिणी व जॉन हा लहानगा भाऊ हीं सर्व तरुण मंडळी मराठी जाणत नव्हती.

होप मिस्किलपणानें हांसत म्हणाली, "विजय, आतांच जी रूथ इथून गेली तिच्यासंबधीं तुम्ही आणखी थोडं जास्त विचारलंत तर फार चांगलं होईल."

"असं काय आहे बुवा विचारण्यासारखं?" टिमथीकडे पहात विजयनें पृच्छा केली.

टिमथी ओशाळून खालीं पाहू लागला. तेव्हां मेरी त्याला टोमणा देत म्हणते, "असा मुलींसारखा काय लाजतोस?..."

विटीनें मधेंच तोंड घातलें. "मुली आतांशा लाजतात कां ग कधीं?" हा तिचा अनाहूत प्रश्न होता.

सबी म्हणाली, "मग आतां मुलांनीं लाजावं असा नवा रिवाज निघाला आहे कीं काय?"

विजय मधेंच म्हणाला, "मला उगाच जास्त गोंधळांत टाकूं नका बुवा अशा. रूथसंबंधीं काय सांगावयाचें तें सांगून टाकाना एकदां."

"तो काय सांगणार कपाळ?" एलिझाबेथ म्हणाली. मीच सांगतें सारं. "बरं का विजय, ही रूथ आमच्या टिमथीची लौकरच 'मडम' होणार."

यावर विजय जराशा घाईंत आश्चर्यानें म्हणतो, "आतांच ना सांगितलंत, कीं रूथ ही तुम्हा सर्वांची बहीण म्हणून. मग बहिणीशींच करणार काय हे राजेश्री लग्न!"

हें ऐकतांच मुलींना किंचितसं हंसू आलं व खुलासा करण्यासाठीं होप म्हणाली, "तुम्ही हिंदू लोक अशाच नेहमीं चुका करतां. रूथ आमची 'कझिन' आहे, 'सिस्टर' नाहीं. आमच्या थोरल्या काकांची ती मुलगी. ती आमची बहीण कशी होईल?"

विजय आठवल्यासारखें करून मधेंच म्हणाला, " कायरे टिमथी, ह्या रूथचं लग्न डेहराडूनच्या एका मिलिटरी ऑफीसरशीं झाल्याचं तूं मागें सांगितलं होतंस ? "

एलिझाबेथ म्हणाली, " होय. होय. तीच ती. पण पुढें तिचा नवरा दारुबाज निघाला आणि कांहीं नेटिव्ह बायकाही त्यानें घरांत नाचवायला आरंभ केला. म्हणून रूथनें त्याच्याशीं ' डायव्होर्स ' मागितला असून ती 'केस' तर्त कोर्टांत चालू आहे. तिचा निकाल होतपर्यंत आमचे दादासाहेब नाटकळत राहणार ! "

यावर विजय टिमथीकडे वळून तिरस्कारमिश्रित थट्टेनें उद्गारला, " कायरे लेका, आधीं लग्नच करायचं नाहीं म्हणत होतास आणि आतां बायको पाहिलीस ती ही अशी ! एकतर ती काडीमोड करणारी आणि पुन्हां त्यांतल्याच्यांत ती तुझी बहीण ! "

मेरी मध्येंच म्हणाली, " अहो, हें बहिणीचं काय घेऊन बसलांत. विचित्रच दिसतात तुमच्या लग्नासंबंधी नीतिच्या कल्पना ! "

एवढा वेळ कोंपरांत बसलेली गोंडस मार्गारेट अगदीं स्तब्ध होती. पण आतां एखाद्या तत्वज्ञानाच्या अभिनिवेशानें ती सावकाश म्हणते, " माझीं मतं विजयसारखाच आहेत. काकाच्या मुलीशीं लग्न करण्याची काय गरज म्हणतें मी ? त्यांतून रूथ तर अशी थिल्लर वृत्तीची. टिमथीला दुसऱ्या मुलीच मिळत नव्हत्या जशा कांहीं ! "

आतां टिमथीनेंही आपली स्तब्धता सोडली व तो कांहींशा रागांत म्हणाला, " मार्गारेट, रूथला तूं नेहमींच थिल्लर म्हणून नांवें ठेवतेस. तिनें असा काय केला ग थिल्लरपणा ? "

" आपल्या नवऱ्याला टाकून दिलं दुसरं काय ! " मार्गारेट फणकाऱ्यानें उत्तरली.

त्यावर चिडून टिमथी म्हणाला, " पण तो दारुडा आहे. बाहेरख्याली आहे. हें तूं विसरतेंस. "

" ते माझ्या चांगलें ध्यानांत आहे, " मार्गारेटनें पुस्ती जोडली. " पण कायरे दादा, तूं काय दारू पीत नाहींस ? का दुसऱ्या तरुण मुलींबरोबर नाचत वागडत नाहींस ? "

होप मधेंच म्हणाली, " वाग वा मार्गारेट. सर्वचजण दारू पितात. ' बॉल 'मध्यें नाचतात. म्हणून सर्वांनाच कांहीं दारुडे अगर वाईट चालीचे म्हणत नाहींत ? "

यावर विजयनें मधेंच पृच्छा केली, " मार्गारेट पण दारू पीत असतील आणि नाचतही असतील. "

ह्या प्रश्नाचें उत्तर एलिझाबेथनें एकाएकी दिलें. ती म्हणाली, "विजय तुम्ही विसरलांत कीं काय. आज जवळ जवळ आठ वर्षे झालीं ती यापैकीं कांहींही करीत नाहीं. "

" असं काय ? " असें म्हणून विजयनें अत्यंत आश्चर्य प्रगट केलें.

"म्हणजे" मेरी आश्चर्यानें म्हणाली, "तुम्ही मागच्या सर्व गोष्टी विसरलांत की काय विजय ! तुम्हीच म्हणें एकदां तिला उपदेश केला आणि तेव्हांपासूनच तिनें हें सारं सोडून दिलं.

आम्ही तिला नेहमीं सोवळी म्हणून चिडवितों. पण तुमच्या उपदेशाविरुद्ध कधींच वागणार नाहीं असं ती आम्हला निक्षून सांगते अन् तुम्ही मात्र हें सारं विसरून गेलांत ! "

मेरीचें हें भाषण चालू असतांना मार्गारेट समाधानानें अधोमुख झाली होती. विजय म्हणाला, " मी विसरलों बुवा सारं तें. "

यावर विटी म्हणाली, " मग आज आतां याविषयीं पुन्हां वादविवाद करूं या. म्हणजे तुम्हा दोघांच्या विक्षिप्त सोवळ्या मनोवृत्तीवर चांगलाच हल्ला चढवितां येईल. माझा पहिला प्रश्न असा, कीं चुलत भावाबहिणींचं लग्न झाल्यास कुठं बिघडतं ? आणि दुसरा असा कीं, दारु प्याल्यानें व स्त्रीपुरुषानें एकत्र नाचल्यानें नीतिमत्तेस कसा धक्का पोंचतो ? "

या प्रश्नांचें उत्तर विजयनें देण्यापूर्वीच टिमथीच्या वडिलांनीं बोलण्यास सुरुवात केली. ते शांतपणें म्हणाले, " विटी, यांत वादविवाद करण्यासारखं काय आहे ? प्रत्येक समाजांतल्या नीतिकल्पना निराळ्या. कझीनशीं लग्न करणें हिंदूंना चमत्कारिक वाटतं. आम्हाला तसं वाटत नाहीं. त्याचप्रमाणं मद्याचं नित्सेवन व स्त्रीपुरुषांचा एकत्र नाच, या आमच्यांतील सर्वसंमत चालीरीति आहेत. म्हणून आम्हाला यांत कांहींच वावगं वाटत नाही. मानवनिर्मित्त गोष्टींत नेहमींच भेदाभेद असावयाचे. त्यांत चांगलं कोणतं व वाईट कोणतं हें ठरवण कठीणच. आपल्यापुरतं प्रत्येक समाजानें पाहावं, आणि त्यांत कमीजास्त फेरबदल करावेत. उगाच दुसऱ्याचे दोष काढण्यांत काय अर्थ ? काय विजय, तुम्हाला आमच्या चालीरीति आवडत नसल्या तरी मी म्हणतों तें पटलं कीं नाहीं ? "

हें आपल्या मित्राच्या पूज्य वडिलाचं भाषण ऐकतांच विजयला उपमर्द करणारे शब्द तोंडांतून काढणें शक्यच नव्हते. तेव्हां तो त्यांच्या शब्दांना मान देण्यासाठीं म्हणाला, " पापा, आपण म्हणतां त्याप्रमाणं मला आपल्या समाजांतील चालीरीति अगदींच कांहीं वाईट वाटत नाहीत. चुलतबहिणीशीं लग्न केलं तर हरकत नाहीं असंच मला वाटतं. माझ्याहि पापपुण्यांच्या कल्पना थोड्याबहुत लवचिकच होत चालल्या आहेत. "

पण हें बोलत असतानांच त्याच्या मनांत विचारांचं नुसतं थैमान चाललं होतं. –लिलेचा नवरा तिला आवडत नव्हता म्हणून ती माहेरीं राहिली होती. विलास तिचा चुलतभाऊ. आपणांत काडीमोड नाहीं व चुलतभावाशीं लग्न करतां येत नाहीं, म्हणून कालचा प्रकार आपणांस अत्यंत निंद्य वाटला, पण ऱ्रोखेरचं दोष द्यावयाचचा झाला तर—

ही त्याच्या विलक्षण विचारांची सांखळी होपच्या उत्साही उद्गारानें एकाएकी तोडली. ती आनंदानें म्हणाली, " विजय, खरंच कीं उगाच पापांना बरं वाटावं म्हणून वरवर कांहींतरी बोलतां ? "

सबी म्हणाली, " अशी नुसती तोंडीं खात्री नको आम्हाला. प्रचीति पाहिजे. तुम्हाला आमच्या चालीरीति सुद्धां बऱ्या वाटतात ना ? मग आतांच आमच्याबरोबर मद्य

सेवन केलं पाहिजे, आणि उद्या रात्रीं नाचांत भाग घ्यावयालाहि आमच्याबरोबर आलं पाहिजे."

यावर मार्गारेट मधेंच म्हणाली, "हे काय ? कांहींतरीच ? विजयला असले विचार मुळींच खपायचे नाहींत."

पण मार्गारेटला ज्याचा एवढा भरवसा होता तो विजयच एकाएकीं उद्गारला, "छे, छे, मी इतका आतां सोंवळा राहिलों नाहीं. तुम्ही जें म्हणाल, त्याला माझी तयारी आहे. खोटं वाटत असेल तर मी उद्यांच रात्रीं 'बॉल' ला येतों कीं नाहीं पहा."

हा त्याचा आश्चर्यकारक कबूलीजबाब ऐकून मुली मनःपूर्वक हंसल्या. विजयलाही आपण काय बोललों व काय करणार आहोंत, याचें कुठं भान होतं ? तें त्याचें त्रस्त जीवनांतील समाधान होतें येवढेंच.

११

# प्रेमवेडी मार्गारेट्

आतां नाचायला जायचेंच होतें, तेव्हां रात्रीं तसेंच कांहीं न येतां जाण्यापेक्षां, दुपारा कांहीं नाचाचे धडे घ्यावें म्हणून, विजय दुसरे दिवशीं सबंध दिवस-भर सायमन् कुटुंबाकडेच राहिला. दोन्ही वेळां जेवायला येणार नाहीं, असा त्यानें आधीं-पासूनच निरोप देऊन ठेविला होता.

जेवतांना त्याला फर्मविण्यांत येऊन त्याला मांसभक्षण करविण्यांत आलें. मागाहून तसें कळतांच तो बेफिकिरीनें म्हणाला, " कुच्छ् पर्वाह नहीं. "

विजयमध्यें झालेल्या ह्या बदलामुळें त्या सर्वांना खूब आनंद झाला.

फोनोग्राफ्च्या नाचाच्या संगीताच्या तालावर तो प्रत्येक मुलीशीं आळीपाळीनें नाचायला शिकला. त्या गौरकाय तरुणींच्या लुसलुशीत अंगाचा आपल्या संपूर्ण देहास स्पर्श होतांच त्याच्या सर्वांगांतून कांहीं चमत्कारिक लहरी उसळूं लागल्या. अगदीं प्रथम तर संकोचानें त्याचा जीव अर्धमेलाच होऊन गेला. परंतु त्या धीट मुलींनीं त्याचा हा लाजाळूपणा पाहतां पाहतां घालविला. दोनेक तासाच्या शिक्षणानंतर त्या सर्वांनीं विजयच्या नृत्यशैलीची स्तुती करण्यास आरंभ केला. बॉलमध्यें नाचणें अगदीं सोपें असतें असें विज-यलाही वाटूं लागलें.

त्या रात्रीं विजयला वाटलें कीं, आपण स्वर्गसुखच भोगीत आहोंत. साधारणतः दोन वाजेपर्यंत तो ह्या सायमन् कुटुंबांतील मुलींबरोबरच पाळीपाळीनें नाचला. पण पुढें त्याचा आत्मविश्वास इतका वाढला कीं, आणखीही पंधरावीस गौरकाय तरुणींबरोबर त्यानें ऐटींत नृत्यक्रीडा केली. त्याच्या देहाला स्त्रीस्पर्शानें जें सुख सुरुवातीस झाल्यासारखें त्याला वाटलें, ती मौजेची धुंदि उतरून, त्याला उत्तरोत्तर नृत्यकलेंतच निर्हेतुक समाधान वाटूं लागलें. विजय कृश होता, तरी वर्णानें गोरा असून, ऐटबाज व तरतरीत होता. त्याला सायमन् कुटुंब त्या रात्रीं गंमतीनें 'Victor' ह्या नांवानें संबोधूं लागलें. बहुतेक लोक

त्याला ख्रिस्तीच समजले. आणि विजयलाही जातगोत लपविण्याची इच्छा होऊन, त्यानें त्या रात्रीं थोडेंबहुत मद्यपानही स्वखुषीनें केलें.

हें पाहून सबी व बिटी मार्गारेटला चिथवूं लागल्या. तिनें जन्मांत मद्याला स्पर्श केला नव्हता. पण ह्या विजयच्या स्खलनानेंही त्याच्याविषयीं तिला राग आला नाहीं. उलट ती म्हणाली, "विजय चांगला आहे. पण तो आज तुम्हां सर्वांच्या संगतींत वाहवला आहे."

मार्गारेटला नाचणेंही आवडत नसे. ती बहुतेक सर्वांनाच नकार देत असे. परंतु, आज विजयनें जेव्हां तिला विनंति केली, तेव्हां ती आनंदानें त्याच्याबरोबर नाचली.

तिच्या बहिणी आतांपर्यंत केवळ तिची वरपांगी थट्टाच करीत होत्या.पण आतां मात्र तीं दोघेंही नाचत असतां, त्यांना तिच्याविषयीं कांहींतरी विशेषच कल्पना आली. आणि ह्या शंकेला आणखी एका प्रकारानें दुजोराच मिळाला.

नाचतां नाचतां विजयच्या कानांत मार्गारेट कांहींशी कुजबुजली व तीं दोघेंही नाचतच पलीकडच्या दारानें बाहेर पडलीं.

तिकडे एक लांब व्हरांडा होता, आणि पलीकडे एक बाग होती. त्या बागेंत मार्गारेटनें विजयला नेलें. तो त्या रात्रीं भानावर कुठें होता! जणुं अप्सरांनीं गजबजलेल्या स्वर्गांतच आपण आहोंत असें त्याला वाटलें.

कांहींसें लांब गेल्यावर दोघेंही गवताच्या गालिच्यावर बसलीं. विजय म्हणाला,

"मार्गारेट, तूं तर छान नाचतेस. मग तुला नेहमींच कां नाचावेसें वाटत नाहीं?."

अशा सलोख्याच्या नांवानें विजयनें तिला संबोधतांच ती मोकळेपणानें म्हणाली, "विजय, तूं मला माझ्या ख्रिश्चन नांवानें संबोधलंस, मला आनंद झाला. दुसऱ्यानं जर असा उतावीळपणा केला असता, तर मी त्याच्या थोबाडींतच दिली असती!"

विजयला त्यानें केलेली चूक आतां उमगली. तो हंसत म्हणाला, "अग, विशेष अर्थानें कांहीं माझ्या हातून हा प्रकार घडला नाहीं. चालीरीतींचा विसर पडूनच केवळ माझ्या हातून ही चूक झाली."

मार्गारेटचा हांसरा चेहरा खरकन् उतरला. ती बोललीच नाहीं. विजय धुंदीमुळें त्या रात्रीं कांहीही बरळत होता. तो म्हणाला, "म्हणजे मिस् सायमन्, तुझं माझ्यावर असं एकाएकी प्रेम जडलं कीं काय?"

ती त्रागयानें म्हणाली, "मला असं परकेपणानं संबोधायचं असेल तर मी इथून उठून जातें."

विजय म्हणाला, "बरं बुवा म्हणतों तुला मार्गारेट. आतां सांग तूं प्रेमबीम करतेस कीं काय माझ्यावर?"

"होय विजय" मार्गारेट म्हणाली, "पण माझं तुझ्यावरचं प्रेम कांहीं आजकालचं नाहीं. टिमथीबरोबर तूं इंग्रजी सहावींत असतांनाच जेव्हां आमच्या घरीं येऊं लागलास,

तेव्हांपासूनच तूं मला आवडतोस. पण तुझ्या तें लक्षांतहि आलं नाही. म्हणून मला आज असं निर्लज्जपणें सांगावं लागलं."

विजय आश्चर्यानें तिच्याकडे नुसता टकमक पाहूं लागला. मार्गारेटचा वर्ण फारच चांगला होता. ती नाकींडोळींही नीटस होती. आणि नाचाच्या पोषाखांत तिचें बरेंचसें अंग यावेळीं उघडें असल्यामुळें ती विजयला फारच मोहक वाटली.

ती प्रेमदृष्टीनें कटाक्ष फेंकीत त्याला लडिवाळपणें म्हणाली, "खोटं वाटतं हें तुला विजय ?"

विजय गंभीर झाला. तिचा एक गालगुच्चा घेऊन त्यानें तिला सांगितलें, "मार्गारेट्, तूं वेडी आहेस."

"होय, तुझ्यामुळं झालें आहे खरी." मार्गारेटनें कबूली दिली.

विजयनें खिन्नतेनें विचारलें, "पण वेडे, आपला विवाह शक्य तरी आहे काय ?"

"कां नाहीं ?" ती आतुरतेनें विचारूं लागली.

"मला आपला धर्म सोडायचा नाहीं." विजयनें कारण दिलें.

त्यावर मार्गारेट हंसली. ती म्हणाली, "मी हिंदु होतें. मग तरी मला पत्करशील ? नाहीं तरी ह्या सोल्जरासारख्या हलक्या लोकांनीं भ्रष्टविलेल्या आमच्या पापी समाजांत मला कसला आनंद आहे ?...मला तूं हवा आहेस. धर्माबिर्माची पर्वा नाहीं मला."

विजयला वाटलें कीं, तिच्या ह्या भावनाप्रधान अवस्थेंत तिच्याशीं जास्त बोलण्यांत अर्थ नाहीं. नाहीं तर गोष्टी भलत्याच थरास जायच्या. तो म्हणाला, "चल मार्गारेट, सर्व जण आपला भलताच संशय घेतील."

मार्गारेटनें 'मला लोकांची पर्वाच नाहीं.' असे सांगितलें, आणि तीं दोघंही पुन्हां हॉलमध्यें येऊन नाचांत सामील झालीं.

३१ डिसेंबर रोजीं रात्रीं नूतन वर्षारंभानिमित्त फॅन्सी ड्रेस बॉल होता. प्रत्येकानें कांहीं तरी असा पोषाख करून यायचें ठरलें कीं, पाहतांक्षणींच एकमेकास ओळखी पटूं नये. आणि असेंही ठरलें, कीं विजयनें सायमनच्या घरीं न येतां परभारें नृत्यगृहाकडेच येऊन सर्वांना ओळखून काढावें.

नाच नऊ वाजतांपासून सुरू झाला. अकरावाजेपर्यंत नाचाचे कितीतरी फेर झाले. परंतु सायमन कुटुंबाची चांगलीच निराशा होत चालली. विजयचा त्या रात्रीं पत्ताच नव्हता. प्रत्येकानें तऱ्हेतऱ्हेचे पोषाख शितापीनें केले होते. मार्गारेट पार्शी पद्धतीची साडी नेसली होती व तिनें कपाळीं कुंकू लावलें होतें.

तिलाच सर्वजण चिडवूं लागले, 'तुझं आजचं हें साडींतलं सौंदर्य पहायला विजय इथं नाही' असाच त्या सर्वं थट्टेचा आशय होता.

ती विश्वासानें म्हणाली, " विजय येईलच. त्यानें मला तशी कबूली दिली आहे." तिच्या त्या खुळेपणाला सर्व बहिणी हंसूं लागल्या. इतक्यांत एक मुद्दाम हिंदुस्थानी पद्धतीनें नेसलेली घुंगुरटें घेतलेली मुलगी त्या घोळक्यांत शिरली व म्हणाली " मला माहीत आहे Victor कुठं लपला आहे तो. "

सर्वांनीच विजयचा आवाज ओळखला. टिमथीनें त्याच्या तोंडावरचं घुंगुरटें काढले व सर्वजणी पोट धरधरून हसूं लागल्या. टिमथी म्हणाला, " हात लेका, अखेरीस पडदानशीन बाई बनलास अन् मिशांनाही तिलांजलि दिलीस होय ? "

मेरी म्हणाली, " शाबास विजय. तूंच जिंकलास. आम्हां दहा जणांच्या डोळ्यांत एकट्यानें धूळ फेंकलीस. "

मार्गारेटला त्याचें हें नवें स्वरूप आवडलें नाहीं. तिनें दुसरीकडे तोंड फिरवलें !

" एका मुलीवर कर प्रेम आतां " सबीनें तिला टोमणा दिला.

टिमथीनें विजयची पाठ थोपटली. तो म्हणाला, " शाबास तुझी. अरे तूं तीन चार वेळां माझ्या बरोबर नाचलास, तेव्हांही मला वाटलं कीं, आपण एखाद्या मुलीशींच नाचतों आहोंत म्हणून...काय ग, आतां ह्याच्या शिताफीमुळें ह्याला बक्षीस काय द्यावं ? "

" मार्गारेट ! " विटी म्हणाली. आणि पुन्हां सर्व मंडळी हंसूं लागली.

ती थट्टा विजयला आवडली नाहीं. आणखी आतां आपल्या स्त्रीवेषांत तो ओशाळायलाही लागला. तो सर्वांना म्हणाला, " आतां मी जातों. मला माफ करा." सर्वांनीं त्याला नवें वर्ष लागतपर्यंत थांबण्याचा आग्रह केला, व त्याला थांबावेंच लागलें.

बारा वाजायला पांच मिनिटें असतांना सर्वांनी एक मोठा गोल फेर धरून गाणी म्हणायला आरंभ केला. बाराचा ठोका होतांच, परस्परांनीं एकमेकावर कागदी हारांचा व चुंबनांचा वर्षाव केला, व Happy New year to you हें पालुपद जिकडे तिकडे ऐकूं येऊं लागलें. विजय स्त्रीवेषांत होता म्हणून कीं काय, सर्व सायमन् भगिनींनीं त्याची पाळीपाळीनें कडकडून चुंबनें घेतलीं. मार्गारेटच काय ती ह्याला अपवाद होती. टिमथी विजयचें चुंबन घेत असतांना, होप ओरडली, " अरे टिमथी, सांभाळ जरा. ती पडदानशीन स्त्री आहे ! "

विजयनें एक वाजतां सर्वांचा निरोप घेतला. बाहेर येऊन पाहतो तों त्याची नवी सायकल कोणीतरी लांबविली होती. पोलीस शिपायाकडून कळलें, कीं ती एका सोल्जरनें नेली. एका सोल्जर G. M. ला वर्दी दिली. त्यानें शोध केला. फोर्टवर तो जाऊन आला व त्यानें सांगितलें की, " ती फोर्टमध्ये आहे. तुमच्याकडे पाठविण्यांत येईल. "

मार्गारेट म्हणाली, " विजय आतां तुम्ही घरीं चला. मी माझी सायकल तुम्हांला देतें."

एलिझाबेथ म्हणाली, "आज नाहीं तरी लेडीज सायकलच हवी विजयला" रस्त्यांतून जातांना मार्गारेटनें विजयच्या ह्या पोषाकाबद्दल नापसंति दर्शविली, तर विजयनें तिच्या साडीच्या पोषाकांत ती फारच छान दिसते, अशी तिची स्तुती केली !

ती त्याला लागलीच गांभीर्यानें म्हणाली, "विजय, मग तूं माझ्याशीं लग्न नाहीं कां करणार ?"

विजयला आतां वाटूं लागलें, कीं मार्गारेटचें आपणावर निरतिशय प्रेम आहे. तो म्हणाला, "मार्गारेट, या बाबतींत तुझी निराशा होईल कीं काय, कुणास ठाऊक. इतकं धैर्य मला व्हायचं नाहीं."

तिच्या डोळयांत चटकन् पाणी आलें. तिनें रस्त्यावरच त्याचें चुंबन घेऊन प्रतिज्ञा केली कीं, "तूं जर माझी निराशा केलीस, तर मी आजन्म अविवाहित राहीन."

विजयला तें ऐकून धक्काच बसला. त्या तिच्या नाजूकशा लेडीज सायकलवरून घरीं परत येत असतांना त्याच्या मनाला कसेंसेंच वाटत होतें ! तो मानशीं म्हणाला, 'हे काय नवेच खेळ आतां दैवानें सुरू केले आहेत ?' त्याच्या मनांत प्रथमच दैवाची कल्पना आली म्हणून त्याचें त्याला हंसूं आलें. तो पुटपुटला, 'मार्गारेट आपल्यासाठीं प्रेमानें किती वेडी झाली आहे. कुणाला हें सांगितलं तर खरं सुद्धां वाटायचं नाहीं !'

१२

# वादळ !

विजय वास्तविक अत्यंत मोकळया मनाचा, कधींही कोणतीही गोष्ट लपवून ठेवण्याचा त्याचा आजवरचा स्वभावच नव्हता. कारण विशेष वाईट असें त्याच्या हातून कधीं घडलेंच नव्हतें परंतु गेल्या पांच सहा दिवसांत जणुं नवाच विजय जन्माला आला. ह्या नव्या मौजेच्या आयुष्याबरोबरच त्याची नेहमींची मनोवृत्तीही पालटली. आपण काय करितों आहोंत हें होतांहोईल तों कुणालाच कळूं नये, अशा रीतीनें त्यानें आपल्या घरांतील वागणूक ठेविली.

बाबासाहेब व रमाकाकू ह्या दोघांचें मन तरी कुठें ठिकाणावर होतें ! लीला तर आपलें तोंडच दाखवेनाशी झाली होती. शकुंतला भांबावेलली असली, तरी तिचेंच एकटीचें लक्ष विजयच्या हालचालीवर विशेष होतें. आपणामुळेंच ह्या कुटुंबावर आपण अशी औदासीन्याची छाया आणली आहे, ह्याचेंच तिला सारखें वाईट वाटत होतें. परंतु, तिला तरी अशा तऱ्हेची परिस्थिति आपणामुळें निर्माण होईल ही काय कल्पना होती ? विलास जेव्हां त्या रात्रीं तिच्याकडे येऊन अंधारांत माकडचेष्टा करूं लागला, तेव्हां त्या सात्विक, निर्मल बालिकेचें एकाएकी ओरडणें साहाजिकच होतें ! सर्व गोष्टी पुढें आपोआप व्हायच्या तशा घडत गेल्या. पण आपणामुळेंच जरी हा चमत्कारिक प्रसंग ह्या कुटुंबावर आला असला, तरी तिला मूग गिळून स्वस्थ बसण्याखेरीज गत्यंतरच नव्हतें. लीला व रमाकाकू दोघीही आतां तिला पाण्यांत पाहताहेत हें तिच्या लक्षांत आलें. तथापि त्याची तिला पर्वा नव्हती. तिला थोडेसें वाईट वाटत होतें बाबासाहेबाचें मनस्वास्थ्य घालवलें म्हणून, व विशेषच दुःख होत होतें विजयला वेड लागण्याइतकी चमत्कारिक परिस्थिती निर्माण झाली म्हणून.

' होय, हें वेडच नव्हे तर काय ? ' ती आपल्या मनाशीं विचार करूं लागली

' ते जेवीत नाहींत नीट, घरीं राहत नाहींत, रात्री बेरात्रीं भटकतात, कुणाशीं बोलत नाहींत. गड्याला मारख्या शिव्या देतात. माडीवरून खालीही उतरत नाहींत, अन्

उतरले कीं बाहेरचाच रस्ता धरतात ! '

त्या २४ तारखेच्या रात्रीपासून ३१ तारखेच्या सायंकाळपर्यंत विजय शकुंतलेशीं एक शब्दही बोलला नाहीं कीं त्यानें तिच्याकडे ढुंकूनही पाहिलें नाहीं ! ३१ तारखेस संध्याकाळीं नाम्यानें शकुंतलेला कळविलें की, 'विजयराव तुम्हाला गुपचुप वर बोलावताहेत' नाम्यानें हा निरोप दिला तेव्हां तो असा खट्याळपणानें हंसला कीं शकुंतलेला तो निरोपच खोटा वाटला. ती माडीवर गेलीच नाहीं. पुढें रात्रीं आठनंतर जेव्हां नाम्या विजयचें ताट घेऊन खालीं आला तेव्हां कांहींसा घाबरत म्हणतो, ' बाइसाहेब, मालक मला रागावले. तुम्हाला वर घेऊनच या म्हणताहेत.' हा निरोप दिला तेव्हां रमाकाकू जवळच होत्या. त्यांना कसला प्रेमाचा उमाळा आला कुणास ठाऊक ! त्या म्हणाल्या, " पोरी, तो बोलावतो आहे तेव्हां जाईनास. आधींच त्यानं घर डोक्यावर घेतलं आहे. आपण सारे आश्रित आहोंत. श्रीमंतांच्या लहरीप्रमाणं ऐकलं नाहीं तर उद्यां रस्त्यांत भीकच मागावी लागेल. "

शकुंतलेला रमाकाकूंचें बोलणें आवडलें नाहीं, पण ती निमूटपणें जिना चढून माडीवर मात्र गेली.

विजय हलक्या आवजांत म्हणाला, " तुमचं एखादं चांगलंसं पातळ अन् छानशी चोळी मला देतां का आणून आतां ? मात्र रमाकाकूंना किंवा कुणालाच ह्यापैकीं कांहींएक कळतां कामा नये. "

शकुंतला आश्चर्यानें गर्भगळितच झाली. पण विजयला ह्या प्रकारासंबंधींचा उलगडा करावयाला सांगायचें तिला धैर्य कसें होणार ? ती म्हणाली, " आणतें. पण नवं काढायला गेलें तर काकूंच्या लक्षांत येईल. रोजच्या नेसणींतलं म्हणाल तर काकूंचा डोळा चुकवून आणून देतें कांहीं वेळानं. "

" चालेल. " विजयनें सांगितलें.

कांहीं वेळानें लुगडें व चोळी शिताफीनें लपवून शकुंतलेनें वर आणून दिली व ती जाऊं लागली.

विजय म्हणाला, " थोडं थांबा. मी पलीकडच्या खोलीतनं नेसून येतों, आणि तुम्ही कांहीं कुठं बिघडलं असल्यास नीट करा. "

शकुंतला भीत भीत म्हणाली, " काकूंनीं वर येतांना मला पाहिलं आहे. आणखी त्यांना मी कशाकरितां आपणाकडे येते आहे, हेंही माहीत नाहीं. म्हणून म्हणतें... "

विजय एकदम म्हणाला, " हें पहा, तुम्हाला माहीत आहे ना, मी कांहीं एक पाप करीत नाहीं म्हणून. मग त्या पाप्यांच्या पितरांची कां करितां पर्वा ? "

बऱ्याच वेळानें विजय लुगडें नेसून आला. त्यानें रेशमाचा सदराच लुगड्याखालीं दाबला होता. तिची चोळी परत करीत तो म्हणाला,

" ही मला होत नाहीं. परत न्या आतांच, कसं जमलं आहे लुगडं ? "

" ठीक आहे. " असें म्हणत शकुंतलेनें लाजत लाजत त्याचें लुगडें थोडें आणखी नीट करून दिलें. एरव्हींच्या प्रसंगीं तिला विजयच्या ह्या सोंगाचें हंसूच आलें असतें. पण त्यावेळां तिला त्याची उलट कीव आली. त्यानें आपल्या लहानग्या मिशानाही रजा दिली होती हेंही तिच्या ध्यानांत आलें.

ती खालीं येतांच रमाकाकूंनीं तिला हडसून खडसून प्रश्न विचारले. त्यांना तिनें येवढेंच सांगितलें कीं, विजयराव वेड्यासारखेच झाले आहेत. पण कोणत्याही गोष्टीचा विशेष मागमूस तिनें त्यांना लागू दिला नाही.

त्या रात्रीं विजयच्या ह्या कृतींचा तिला कांहीं केल्या अर्थबोध होईना. या संबंधाच्या अनेक तर्ककुतर्कांमुळें तिला मुळींच झोंप आली नाहीं !

त्या घरांतील आणखी एक गोष्ट तिला ह्याच रात्रीं लक्षांत आली. रमाकाकू बाबासाहेबांकडे रात्री १२ वाजण्याच्या सुमारास गेल्या त्या चांगल्या अगदीं पाहटे पाहटेच परत आल्या. बिचाऱ्या अजाण शकुंतलेला त्या सर्व घराचा असा कांहीं राग आला ! पण ती आतां काय करणार ? आई परत येतपर्यंत कुठें जाणार ? आणि शिवाय विजय चांगला होता. त्याची अशी चमत्कारीक अवस्था झाली असतांना, त्याचें पुढे काय होईल, हें पाहण्याकडे तिचा जीव साहजिकच टांगला गेला. नाहीं तर सकाळीं उठूनच पार्वतीकाकूकडे निघून जावें असाही ओझरता विचार तिचें मनांत आला होता. पण येवढ्याच एका कारणासाठीं तिनें तो कष्टानें दूर सारला.

ती सकाळीं अंथरुणांतून उठल्याबरोबरच घरांत वादळ उठलें ! बाबासाहेब व रमाकाकू दोघेंही तिच्याकडे आलीं. बाबासाहेबांनीं तिच्या चेहऱ्याकडे न्याहाळून पाहिले. तिचे विशाल डोळे तांबूस झाले होते व तिचा चेहरा फिक्कट काळवंडलेला होता. तिला जाग्रण झालें होतें हे स्पष्टच दिसत होतें. बाबासाहेबांनीं तिला चमत्कारिक प्रश्न केला,

" ए पोरी, तुझी आई गेली तेव्हां तुझी काळजी घेण्याची व तुझ्यावर शिस्तीची करडी नजर ठेवण्याची मी तिला कबूली दिली आहे. तूं आजपर्यंत नीट वागलीस. पण आतां मला तुझे कान धरलेच पाहिजेत. "

शकुंतला गोंधळून नुसती उभीच राहिली ! तों बाबासाहेबांनीं त्या तिच्या मूकतेचा अर्थ भलताच घेतला. ते म्हणाले, " तुला बोलण्यांत अर्थ नाहीं. तुला असल्या घाणेरड्या मार्गावर नेणाऱ्या माझ्या चांडाळ पोरालाच वळणावर आणलें पाहिजे. "

बाबासाहेब व काकू वर गेल्या व शकुंतलाही घाबरून हळूंच जिना चढली. बाबासाहेबांनीं खूब दार ठोठावलें तेव्हां कुठें विजयनें डोळे चोळत आंतून कडी काढली. बाबासाहेब त्याच्यावर गरजले, " आतां लेका तुझी शर्थ झाली. ह्या पोरीला काल अखेर तूं आपल्या नादीं लावून भ्रष्टवलेंस ! "

विजयलाही जाग्रण झालें होतें. त्याला ह्या बाबासाहेबांच्या उद्गारांचा अर्थ एका-एकी कळलाच नाहीं. तो आश्चर्यानें नुसता उभाच राहिला ! " बेट्या " बाबासाहेब म्हणाले, " अखेरीस माझ्या तोंडास काळिमा लावलास अन् ह्या पोरीच्या गालाला बांचण्याचा त्रास होऊं नये म्हणून माझी उत्तरक्रिया केलीस कीं काय? "

विजयला आतां हंसूंच आलें. तो म्हणाला, " पापा, तुम्ही आजकाल किती संशय-खोर झालां आहांत "

" चूप हरामखोर. " बाबासाहेब ओरडले. त्याच वेळीं पाहतात तों खुंटीवर शकुंत-लेचे लुगडें ! " अरे गाढवा, हें पाप आतां तूं लपवून कसं लपविणार ? "

पुन्हां विजय हंसला. तो शांतपणें म्हणाला, " पापा, पापा ! थोडं थांबा. मी सारं कांहीं सांगतों. "

" काय सांगतोस कपाळ माझें? " बाबासाहेबांनीं रागानें त्याला एक चापटही लगा-वली, " अरे ह्या बाहेरच्या जिन्यानें ह्या पोरीला चढतांना आम्ही दोघांनींही चांगलें दोन वाजतां रात्रीं पाहिलें. आतां काय सांगायचं शिल्लक राहिलं आहे बदमाशा ? "

तरी विजय हंसतच होता. शकुंतलेला वाटलें कीं, ह्या वेड्याच्या लहरींत विजय कांहीं एक नीटपणें सांगूं शकणार नाहीं. म्हणून धीटपणें पुढें येऊन तिनें तिला माहित होती तेवढी सर्व हकीकत त्यांना सांगितली. त्यावर बाबासाहेब किंचितशा कमी आवाजांत पण संतापानेंच म्हणाले, "पोरी, तूंही बिलंदरच आहेस कीं ग. मूर्ख कुठली. अग बायकांना पापें झांकतां येत नाहींत. भलतंच कांहीं झालं तर दुर्दैव तुझ्या हात धुवून पाठीस लागेल. "

शकुंतलेनें पाप केलेंच नव्हतें. तीही पुन्हां धिटाईनें म्हणाली, " बाबासाहेब माझ्या हातून कांहींच झालं नाहीं. मला हा उपदेश कशाला ? "

" अवदसे !—" असें म्हणून बाबासाहेब पुढें कांहीं तरी बोलणार, इतक्यांत विजय ओरडला,

" खबरदार, पापा. एक शब्द तिला बोलूं नका. शांतपणें मी काय सांगतों तें ऐकून घेणार असलांत तर इथं उभे रहा, नाहीं तर व्हा खालीं चालते इथून. "

"माझ्याच घरांतून मला हाकतोस काय रे निमकहरामा, " असें म्हणत बाबासाहेब पटकन् आरामखुर्चीवर बसले व आपल्या तापलेल्या डोक्याला हातांचा आधार देत त्रस्तपणें म्हणाले, " हं काय सांगतोस आपलं पापमहात्म्य तें सांग बाबा एकदां. "

विजयने आतां आपल्या नेहमीच्या मोकळेपणानें त्यांचा वृथा संशय घालवायला ज्या गोष्टी सांगणें आवश्यक होतें, त्या सर्व कांहीं सांगितल्या. सायकल हरविल्याचा वृत्तांत सांगून तो म्हणाला,

" चला आतां मार्गारेट्ची लेडीज् सायकलच तुम्हाला दाखवितों म्हणजे माझ्या खरेपणासंबंधीं तुमची खात्री होईल."

ती सायकल पाहिल्यानंतर बाबासाहेबही शांत झाले. ते कांहींसे रागाच्या स्वरांत रमाकाकूला म्हणाले, " तूं नेहमीं असंच कांहीं माझ्या मनांत भरवून देतेस. आणखी त्यानं असा हा घोंटाळा होतो. "

ह्या त्यांच्या सहजोद्गारावरून विजयच्या आणि शकुंतलेच्या लक्षांत आलें कीं बाबासाहेबांच्या संशयाचें मूळ काकूंच्या कारवाईत होतें !

त्या दिवसापुरतें तरी तें वादळ आतां शांत झालें !

---

# १३

# रोजनिशींतील पहिलीं तीन पानें

विजय सत्यवक्ता होता—मोकळ्या स्वभावाचा होता, स्त्रीपुरुषांचे थिल्लर खेळ त्याला खपणारे नव्हते, अशा तऱ्हेचें बाबासाहेबांचें त्याच्याविषयींचें मत होतें, तें आतां बदललें तें मात्र कायमचेंच बदललें. आपला मुलगा चारचौघासारखाच आहे, असें याउपर त्याचेंविषयीं त्याचें मत झालें. सागराला गंभीर म्हणतात, यानें तुफानांत सांपडणाऱ्याला आश्चर्य वाटतें. पण त्याचा पृष्ठभाग थोडासा उच्छृंखल झाला, म्हणून अथांग दरिया थेट तळापर्यंत ढहुळला जातो असें थोडेंच आहे? समुद्राला भरती आली म्हणून तो कधीं आपली सीमा ओलांडत नाहीं. विजयसंबंधाही बाबासाहेबांचा ग्रह झाला होता, तोही असाच चुकीचा होता काय?

एक तारखेस दुपारीं विजयनें एक नवी रोजनिशी विकत घेतली. त्याच्या पहिल्या तीन दिवसांत त्यानें पुढीलप्रमाणें लिहून ठेविलें होतें:—

**ता० १ जानेवारी १९३०**

"माझ्या या नूतन वर्षाचा आरंभ मोठा अभूतपूर्व झाला. माझ्यावर स्त्रियांच्या चुंबनांचा वर्षाव होऊन, 'Happy new year to you!' अशी शुभेच्छा अनेकांनीं व्यक्त केली. मार्गारेट्संबंधीं एक नवीच भानगड उपस्थित झाली म्हणावयाची! ती मुलगी जर माझ्यासाठीं खरोखरच अविवाहित राहिली तर?—छेः आतां म्हणून ह्या ख्रिस्ती लोकांच्या उच्छृंखल समाजांत पुन्हां मिसळायचें नाहीं!

गेल्या आठवड्यांत माझें सारखें अधःपतन होत होतें! पण प्रथम त्यांचें जीवन किती मोहक वाटतें! आतां माझ्या वागणुकीचें मलाच आश्चर्य वाटतें. गेणिकडे सारे. तसलें आयुष्य जर मी आणखी महिनाभरच घालविलें असतें तर मला जगाचीच शिसारी येती!

सकाळच्या संशयाच्या वादळानें एक गोष्ट चांगली झाली. शकुंतलेपुढें विशेष खुलासा करण्याचें मला कारणच पडलें नाहीं.

सायंकाळीं त्या सोल्जरनें माझी सायकल आणून दिली. म्हणतो काय चोर कीं ' मला क्षमा करा. मी त्यावेळीं दारूच्या नशेंत होतों. ' ही ह्या गोऱ्या कातडीची संस्कृती !

मार्गारेटची सायकल मी मोटारींतून पोंचवून दिली व तिचे आभार मानले. सर्वां-चाच मी तीन चार महिन्यासाठीं निरोप घेऊन परत आलों.

संध्याकाळीं शकुंतला माझ्याशीं किती मोकळेपणानें बोलली ! एकंदरींत माझा पापा व काकूसंबंधीचा संशय खरा होता तर ? अरेरे, जग सारें असेंच का आहे ? पण आतां मीच भ्रष्ट झालों असतांना इतरांस कोणत्या तोंडानें दोष देऊं ? शकुंतलेला मी उपदेश केला कीं, तूं जपून रहा. तिचे डोळे आज पुन्हां पाण्यानें भरून आले होते.

माझ्या गेल्या आठवड्यांतील पापाचें प्रायश्चित्त म्हणून मी आजपासून सिगारेट ओढणें सोडून देत आहे. परमेश्वरा, मला येवढें तरी धैर्य दे. "

**ता० २ जानेवारी १९३०**

"आज सर्वांचा निरोप घेऊन नागपूर सोडलें. लीला माझ्याबरोबर येण्यास कां कूं करूं लागली. जळगावांस तिचे घरीं तिला सुखरूप पोंचविलें.

आगगाडींत मी गांधींच्या ' My experiments with truth ' मधील कांहीं प्रकरणें पुन्हां वांचून काढलीं. यंग इंडियाचे सर्व अंक सांपडले असते, तर बहार झाली असती. माझ्या आयुष्याचें ध्येय आतां अगदीं निश्चित झालें आहे. मलाही कांहीं तरी उदात्त कार्य केलें पाहिजे. निदान देवा, माझ्याहातून कांहीं अघोर पातक तरी घडूं देऊं नकोस.

शकुंतलेचा चेहेरा स्टेशनवर किती केंविलवाणा दिसत होता ! बिचारीच्या भवि-तव्यांत काय आहे कुणास ठाऊक ? "

**ता० ३ जानेवारी १९३०**

"आज पुण्याच्या वाटेला लागलों. लीला बिचारी ओक्साबोक्सी रडली. तिचा स्वभा-वच मला अजून कळला नाहीं.

उद्यां पुण्याला पोंचतांच एकदम अभ्यासाला लागायचें. परीक्षा जवळ आली आहे. चांगला क्लास राहो, निदान पास तरी झालेंच पाहिजे.

आतां उषेबरोबर हिंडणें फिरणें, मित्रांबरोबर गप्पागोष्टी सर्व कांहीं सोडून दिलें पाहिजे. खेळणें बस्स झालें. रात्रंदिवस आतां अभ्यास करायचा. देवा, मला सद्बुद्धि दे. "

१४

# पांच प्रमुख पत्रें

१. नाशिक

२५ जानेवारी १९३०.

चि. विजय यांस अनेक आशीर्वाद,

माझ्या मागच्या पत्राचा तुला राग आला नाहीं, उलट तुझ्याही लक्षांत ह्या गोष्टी पुण्यास पोंचतांच आल्या होत्या, हें तुझ्या उत्तरावरून कळलें, व मनाला समाधान वाटलें. तूं उषेशीं होतां होईल तों शिताफीनें विशेष संबंध येऊं देत नाहींस, हें योग्यच केलेंस. परंतु त्या मुलीला ह्यापैकीं कांहीं एक भासवूं नकोस. तूं तिला मुद्दामच टाळतोस असें मुळींसुद्धां वाटूं देतां उपयोगी नाहीं. पूर्वीप्रमाणेंच पैसे वगैरे मी तुझ्याकडेच पाठवीत जाईन. फक्त फिरायला एकत्र जाणें सोडून दे. मुलें फारच चमत्कारिक आहेत म्हणावयाचीं! जिकडे तिकडे तुम्हां दोघांच्या नांवाचीं वाटेल तीं अश्लील वाक्यें लिहिण्यापर्यंत ह्या सुशिक्षितांची मजल गेली अं? कॉलेज मॅगझिनमधील ती गोष्ट तुमच्यावरच आहे असें मलाही वाटतें. ह्या टवाळांना दुसरा उद्योगच नाहीं कीं काय?

मला तुझ्याविषयीं कधीं तरी संशय येईल का वेड्या? हा विचार तरी तुझ्या मनांत कां आला? अरुणाच्या जागी त्यानेंच आम्हाला तूं दिला आहेस. असें भलतेंच तिळमात्रही मनांत येऊं देऊं नकोस.

लोकांना भ्यायलाच पाहिजे. अरे, त्या पोरीचें नांव वाईट झालें तर तिच्या लग्नासंबंधीं जुळविणें मोठें कठीण होऊन बसेल. व्यावहारिक गोष्टीकडे पाहायलाच पाहिजे, नाहीं का?

माझें व शकुंतलेच्या आईचें नातें तूं बाबासाहेबांस, उषेस किंवा इतरांस कळविलें नहींस हें ठीक झालें. पण शकूलासुद्धां ही गोष्ट कळवावयाची नव्हतीस. व्हायचें तें झालें. आतां त्या जुन्या गोष्टीचा गवगवा होतां होईल तों होऊं नये असें वाटतें. तरुणपणीं मला

समाजाची पर्वा वाटत नव्हती. पण आतां चारचौघांत आपल्या नांवास जपावेसें वाटतें. वयाबरोबरच हा साहजिक कमकुवतपणा येतो.

तूं अरुणाच्या मृत्यूनंतर इथें राहिलास तेव्हांच शकूच्या आईचा वृत्तांत आम्हां सर्वांस सांगितलास. पण मी तुला कशाचा सुगावा लागू तरी दिला तेव्हां ? पण नाताळच्या आरंभीं तूं जेव्हां माझ्या शकूचा सूड घेण्याच्या उद्देशानेंच नागपुरास जाणार होतास, तेव्हां मला माझी कर्मकथा माझ्या त्या पोरीच्या संकटनिवारणासाठीं सांगणेंच भाग पडलें !

असो. आतां पुन्हां जेव्हां तुझी व शकूची गांठ पडेल तेव्हां ह्या गोष्टींसंबंधीं कुठेंही 'ब्र' काढूं नकोस, असें तिला बजावून सांग.

मॅट्रिक, इंटर, ह्या परीक्षांत तूं फर्स्ट क्लासमध्यें येऊन नांव कमावलेंस. आतां बी. ए. तही ऑनर्स घेऊन फर्स्टक्लासमध्यें आलास तर तुझ्याविषयीं सर्वांनाच कौतुक वाटेल. म्हणून आतां चांगला अभ्यास कर येवढेंच सांगणें.

तुझा,

तात्या.

२. नागपूर

१६ फेब्रुवारी १९३०

चि. विजय यांस,

शुभाशीर्वाद.

तुझीं चार- पांच पत्रें पोंचलीं, इकडील सर्व कुशल आहे. जानकीबाईची दोन पत्रें आलीं. त्या सध्यां काशीला असून पुढें उन्हाळ्यांत बदरीनारायणाची यात्रा करण्याचा त्यांचा विचार आहे. शकुंतलेला अगदींच करमेनासें झालें होतें. पोर एकलकोंडी असल्यामुळें कुठें शेजारीं पाजारींही ओळखी करीत नाहीं. म्हणून मी तिला इंटरच्या परीक्षेचीं कांहीं पुस्तकें घेऊन दिलीं आहेत. ती आतां अभ्यासांत मग्न असते. हुशार फार आहे. मी तिला रोज एक दोन तास संस्कृत शिकवितों. शिकवितों म्हणण्यापेक्षां तिच्याबरोबर पुन्हां संस्कृताची उजळणी करतोंच म्हणेनास !

तिनें अलीकडे एक चित्र काढलें आहे. किती हुबेहूब प्रसंग दाखविला आहे सारा! अरे, जागोबाच्या देवळांतला मारामारीचा प्रसंगच रंगविला आहे तिनें. तुझा चेहरा तिला इतका साधला आहे कीं तो पाहतांच तो तूं आहेस, म्हणून कुणीही ओळखतो.

मी नाताळचे सुटींत तुम्हां दोघांशीं फार निष्ठुरतेनें वागलों ह्याचा मला सारखा पश्चात्ताप होतो. तूं माझा तो राक्षसी अवतार विसरून जाणार नाहींस काय ?

आतां तूं काढलेल्या शंकेसंबंधीं लिहितों. विजू अशी कबूली बापानें मुलाला कधींच दिली नसेल. मी पाप केलें आहे. तुझ्या काकूनेंही पाप केलें आहे. मात्र हें असें आमच्या हातून–निदान माझ्या हातून तरी कां घडलें ह्याचें कारण तुला सांगतों. मग माझ्याविषयीं

जो काय ग्रह तुला करावयाचा असेल तो कर. पण बाहेर ह्या गोष्टीचा बभ्रा केलास तर आपल्याच घराण्याची अब्रू जाईल, नाहीं बरें ?

तुझी आई जगांतून निघून गेली, तेव्हां तूं सारा चार वर्षांचा व लीला दोन वर्षांची होती. मला पुरतीं तीस वर्षेंसुद्धां भरलीं नव्हतीं तेव्हां. चांगली हुद्याची नोकरी, मला अनेक मुली पुन्हां सांगून आल्या. पण मी लग्न केलें नाहीं. ह्याला कारणें दोन. एक तर तुझ्या आईवर माझें निस्सीम प्रेम व दुसरें तुम्हां लहान मुलांना आजन्म सुखांत ठेवावें हा निर्धार. म्हणून मी ऐन तारुण्यांतच विधुरावस्था स्वखुशीनें स्वीकारली. पुढें दहा वर्षेंपर्यंत मी पवित्र राहिलो. त्यानंतर दादांनीं वहिनीला व विलासला आमरण सांभाळायची इच्छा मरतांना प्रदर्शित केली. मीही तें मान्य केलें. तुझी काकू आपल्या घरीं आल्यानंतरही जवळ जवळ पांच वर्षे मी देवासारखाच वागलों. पण वयाला ४५ वें वर्ष उलटून गेल्यानंतर माझी बुद्धि चळली अणि गेलीं सात आठ वर्षें आम्ही अशा चोरट्या संबंधांत घालविलीं आहेत. काकूवर दोन तीन वेळां चमत्कारिक प्रसंग आला असता, पण माझ्या डॉक्टरी पेशामुळें मला तो टाळतां आला. गेल्या तीन चार महिन्यापासून मात्र मी पुन्हा पावित्र्यानें राहूं लागलों आहे. परंतु परमेश्वर पुढें काय बुद्धि देईल ती देवो.

मला प्रत्यक्ष तुझे समोर ह्या गोष्टी कदापि सांगतां आल्या नसत्या. हें पत्र वाचून होतांच तूं जाळून टाकावेंस येवढीच इच्छा आहे. आपण सर्व मनुष्यप्राणी आहोंत.चुका सर्वा-कडूनच होतात. म्हणून माझा राग मानूं नकोस.

अभ्यास करून, यंदाही चांगले यश मिळव.

तुझा—

पापी पापा

३.

पिंपरी.

२ मार्च १९३०

विजयदादास नमस्कार वि. वि.

मी ह्या खेड्यांत सुखरूप आहे. माझ्यावरचा तुमचा राग कधींच जाऊं नये. कारण मी अघोर पातकी आहे.

तुम्हींच माझा उद्धार केलात. तेव्हां मी तुम्हाला माझा देव समजतों.

वयाला २२ वर्षें झालीं तरी मला इंग्रजी वर्गाचेही पलीकडे जातां आलें नाहीं. म्हणून मला माझ्या मंद बुद्धीचा खूबच राग येतो. पण आतां तितकेसें वाईट वाटत नाहीं.

ह्या खेड्यांतील सर्व कामांत मला मोठा जिव्हाळा वाटतो. आपल्या गांवची बरीच सुधारणा मला आतांपर्यंत करितां आली. अजून पुष्कळ पुष्कळ करतां येण्यासारखें आहे.

एक मराठी शाळा काढली आहे. ती रात्रीला चालवितों. मीच मुलांना शिकवितों. असा ढब्बू मास्तरच त्यांच्या नशीबीं होता असें वाटतें.

होमियोपाथीची एक औषधाची पेटी जवळ बाळगली आहे. तिचा गांवकऱ्यांस फारच उपयोग होतो.

इथेंही पाप आहेच. ते प्रकार पाहिले कीं आतां संताप येतो. माझें पाप ह्या लोकांच्या पापापुढें पुष्कळच कमी प्रतीचें होतें, असें आतां वांटूं लागलें आहे. पण मी तरी ह्या लोकांना कोणत्या तोंडानें उपदेश करूं ?

माझ्या आईचा मात्र मला एकदां खूब संताप आला. माझ्या पापाला जबाबदार तीच. तिनेंच मला कळत नसतांना नाहीं नाहीं ते धडे दिले.

मागे ती तीन चार दिवस येथें येऊन राहिली. मी तिला खूब बोललों. ती आपलें पाप कांहीं केल्या कबूल करीना. अखेर रडत रडत तिनें सर्व हकीकत सांगितली. ति. स्व. बाबासाहेबच तिच्या अधःपाताला कारण आहेत, हे वाचून तुम्हाला दुःख होईल. तिनें सांगितलें कीं पोटापाण्याच्या व्यवस्थेसाठीं आणि विशेषतः माझ्या सुखासाठीं ती त्यांच्या इच्छेप्रमाणें वागली.

तुम्ही बाबासाहेबांना ताळयावर आणूं शकत नाही का ? आई पुरी निढावली आहे. ती आतां सुधारण्याची आशाच दिसत नाहीं.

वडीलधारी माणसेंच जर अशी वागतात, तर आम्हां मुलांच्या हातून चुका का होणार नाहींत ?

दादा, मला तुमच्या सारखा निर्मल मनुष्य माझ्या ओळखीपैकीं एकही दिसत नाहीं. म्हणून तुम्हाला एक तरी पत्र पाठवून आपलें मन मोकळें करावें अशी इच्छा झाली. हें धैर्य येण्यास मला महिनाभर विचार करावा लागला.

तुमचा,

चुकलेला बंधु,

विलास.

४

नागपूर

ता. ३ मार्च १९३०

प्रिय विजय,

माझें हें पत्र तूं शांतपणें वाच.तुझ्या माझ्या प्रेमाचा नाताळनंतर घरांत बराच गवगवा झाला. मूर्खपणा सारा माझाच.

. ममाला माझी ही कल्पना मुळांच आवडली नाहीं. ती किती धार्मिक वृत्तीची आहे, तुला ठाऊकच आहे.

तिनें जबरदस्तीनें फेब्रुवारीच्या दोन तारखेस माझें लग्न लावलें. मी तुझ्या आठवणीनें त्यावेळीं रडलें.

जॉन् टिमथीच्याच ऑफिसांत नोकरीस आहे. माझ्या लागलीच लक्ष्यांत आलें कीं, त्यांचाही स्वभाव तुझ्यासारखाच चांगला आहे. तुझी त्यांची २५ डिसेंबरला आमचें घरीं ओळख करून दिली होती, आठवतें तुला ?

मी आतां पूर्ण सुखांत आहे. तुझ्याशीं वागतांना मी जरा उतावीळच झालें होतें, असें आतां वाटतें.

जान्मध्यें एकच दोष आहे. तो मोठा संशयी आहे. म्हणून तुला हें पत्र मुद्दाम लिहावें लागलें. मी तुझ्याशीं जें कांहीं बोललें तें विसरून जा. टिमथीची मी बहीण, तेव्हां तुझीही मी बहीणच आहे असें मान. कुणाजवळही मागच्या गोष्टी बोलू नकोस.

ह्या पत्राचें उत्तर देण्याचें कारण नाही. तुझीं टिमथीला पत्रें येतात तीं तो मला दाखवितो.

पुन्हां एकदां विनंति करतें कीं सारें सारें विसरून जा. तझ्या चांगुलपणावर माझा विश्वास आहे. म्हणूनच माझ्या संसारांत माती कालवूं नकोस, ही जिव्हाळयाची विनंति करीत आहे.

तुझी प्रेमाची बहीण,

**मार्गारेट् सायमन.**

५ **नागपूर**

**१५ मार्च १९३०**

श्री. विजय कुमारांचे चरणी,

सा. नमस्कार, वि. वि.

आपलीं सर्व पत्रें मला वेळचे वेळीच पोंचलीं. पण मी मुद्दामच उत्तरें पाठविलीं नाहीत. ति. स्व. बाबासाहेबांचा अलीकडे मजवर खूब लोभ आहे. तेव्हां त्यांना पुन्हां आपणाविषयीं संशयास कांहीं एक वाव द्यावयाचा नाहीं म्हणूनच मीं आपणांस स्वतःच पत्रें लिहिण्याचें टाळलें. राग नसावा. ह्या महिन्याच्या अखेरीस बहुधा आपण घरीं याल. तेव्हां मजवर विनाकारण रागावूं नये, यासाठींच हें एक पत्र नाइलाजानें पाठवावें लागलें.

ति. स्व. बाबांचें संबंधीं मीं आपणांस जें कळविलें तें आजिबात खोटें होतें. त्यांचें आयुष्य अगदीं निर्मल आहे, हें आतां मी सांगू शकतें. काकू त्यांच्याकडे जातात, त्या चुगल्या सांगण्यासाठीं. कांहीं वाईट हेतू दोघांच्याही मनांत मला कांहीं आढळला नाहीं. पापी माणसांना सर्वच पापी दिसतात.

मी पापाचरणांत जन्मलें आहे, म्हणून मला चोंहीकडे पाप दिसलें. ती माझी काळीज झालेली दृष्टि होती. विलासही इथें दोन दिवस राहून परत गेले. त्यांच्या हातून त्या रात्रीं कशी चूक झाली कुणास ठाऊक! तें फार सज्जन आहेत, असें मी आतां नक्की सांगूं शकतें.

माझी बाबा इतकी कां स्तुती करतात कुणास ठाऊक! तें चित्र कांहीं मोठं चांगले साधलेलें नाहीं. मात्र तुमचा चेहरा हुबेहूब जमला आहे खरा. तो एकाएकी प्रयास न करतांच जमला. माझें मलाच आश्चर्य वाटतें.

बाबा डॉक्टर आहेत, तरी त्यांचें संस्कृताचें ज्ञान खूब आहे हो. मला आश्चर्य वाटतें त्यांच्या संस्कृत व्यासंगाचें.

आई मध्यां बदरीनारायणाच्या वाटेला लागली आहे. मागच्या गोष्टी समजल्या तेव्हां मला तिचा खूब खूब राग आला होता. बरें झालें त्यावेळीं ती इथें नव्हती. नाहीं तर मी तिचें काय केलें असतें कुणास ठाऊक.

आतां मात्र मला तिची कींव येते. उलट एका दृष्टीनें ती पवित्रच नाही का? तात्यांच्या नांवानें तिनें कुंकू लावलें नाहीं इतकेंच. पण ती जन्मभर कष्टांत पवित्र राहिली, अन तिनें मला निर्मल वातावरणांत लहानाचें मोठें केलें.

तात्या माईसंबंधीं लिहिलेंत ते बरें केलेंत. मी आजवर कुणालाही कांही सांगितलें नाहीं. सांगणार कुणाला? पण आतां पुढें प्राण गेला तरी ही गोष्ट मजकडून कुणालाही कळणार नाहीं, येवढें तुम्हांला आश्वासन देतें.

काकू माझा अजूनही बराच राग करतात. पण त्यांना मी दोष देत नाहीं. त्यांना माझा राग येणें साहजिकच नाहीं का?

इथें आलात म्हणजे माझी अभ्यासाची सोय होईल. कांहीं difficulties मीं तुमच्यासाठीं राखून ठेविल्या आहेत.

तुम्हांला माझ्या भवितव्यासंबंधीं व्यर्थच कां काळजी वाटते? मी आतां एम्. ए. व्हायचें अन् शिक्षकिणीचा पेशा स्वीकारण्याचें ध्येय आपल्यापुढें ठेविलें आहे.

माझ्याशीं जाणतेपणानें कोणता कुलवान् पुरुष लग्न करील? मला कुणाला फसवून विवाह करायचाच नाहीं. त्यापेक्षां मी आजन्म अविवाहितच राहीन.

तुमच्या येत्या परीक्षेंत सुयश चिंतितें. बाबांची प्रकृति चांगली आहे. ते तुमची सारखी आठवण करितात.

लीलाताई पुन्हां हट्टानें कालच इथें परत आल्या.

आ०

**श० देशपांडे.**

—

१५

# कलियुगांतील चंद्रसेना

लेखी परीक्षेच्या जंजाळांतून विजय एकदांचा मोकळा झाला. तो अखेर ऑनर्सच्या परीक्षेला बसलाच नाही. माणसाचा मेंदू हा निर्जीव यंत्रासारखा हुकुमी का आहे ? त्याचें मनच ह्या वर्षी प्रसन्न नव्हतें, तर मंडपांत त्याची लेखणी ती काय चालणार ?

मराठीच्या तोंडी परीक्षेसाठीं त्याला मुंबईला जावें लागलें. काय ते प्रश्न अन् काय तो खेळ ? ती मुंबईची तोंडी परीक्षा आटोपल्यानंतरही त्यानें तिथें दोन तीन दिवस रहायचें ठरविलें.

एम्पायर हॉटेलच्या त्याच्या खोलींतल्या खिडकींतून तो एका दुपारीं सारखा खालीं दृष्टि लावून बसला होता. तिथून दिसणारें तें दृश्य डोळे भरून पाहिलें म्हणजे साऱ्या मुंबईच्या वैचित्र्यपूर्ण धांवपळीच्या आयुष्याची पूर्ण कल्पना होते. घाणेरड्या जागेवरही दिखाऊ साज चढवावा मुंबईनेंच, असें विजयला त्या वरून दिसणाऱ्या मोहक बांधकामाच्या संडासांकडे पाहून वाटलें. व्हिक्टोरिया टर्मिनस व इतर इमारतीचे बांधकामाचे नमुने फार प्रेक्षणीय आहेत, असें निवांतपणें त्यांचे निरीक्षण केल्यावर अधिकच वाटूं लागतें. ट्राम-स्टेशनवर किती मजेदार दृश्य दिसतें. कोण म्हणतो हिंदुस्थानांत एकी नाहीं म्हणून ? भिन्न भिन्न धर्मांचे, जातीचे, पोषाकाचे, चालीरीतीचें, परिस्थितीचे लोक खेळीमेळीनें आपला घाईचा व्यवहार एकत्र करतांना पाहिलें म्हणजे मुम्बापुरी विषयीं आदरच वाटतो. ट्राम गाड्यांचा तिथें त्रिवेणी संगमच झाला आहे. मायापुरी गरीब श्रीमंत सर्वानाच पूर्ण वाव देते. ट्रामचे घंटानाद, घोडागाडीच्या टापांचा ठेकेबाज आवाज, मोटारचे किरकिर, पों पों ध्वनि, बसचा घरघर नाद, खटाऱ्यांचा खडखडाट, ही असली आरती चांगली बारा तास मुंबादेवीला चाललेली असते. त्या तिथून दिसणाऱ्या वीथिका किती विशाल व सुंदर आहेत.

विजय हें सारें दृश्य आपल्या थकलेल्या मनाला निरंगुळा मिळावा म्हणूनच पाहत

होता. त्याच्या खोलींतच एक रंगेल गृहस्थ उतरले होते, ते याच वेळीं दुर्बिणींतून तेंच दृश्य त्याच खिडकींतून पाहत होते.

" अहो, काय छान फटाकड्या चालल्या आहेत त्या. " गृहस्थ आनंदानें बेहोष होऊन ओरडला. आणि ती दुर्बीण त्यानें विजयच्या हातीं देत म्हटलें, " पहा तरी जरा डोळे भरून मुंबईचें खरें सौंदर्य ! त्या फुटपाथवरील चिमुकल्या पुस्तकविक्यापुढून जात आहेत. "

विजयनें मंत्रमूढाप्रमाणें त्या दुर्बिणींतून एकवार त्या स्त्रियांकडे नजर फेंकिली. तो एकाएकीं उद्गारला, " अरेच्चा, शालिनी इथं कशी ? अन उषा मग कुणाबरोबर जाणार नाशिकला ? " [redacted]

त्यानें घाईतच कोटटोपी घातली व तो विद्युत् पाळण्यांतून झरकन् खालीं आला. धांवपळ करीतच त्यानें शालिनीला गांठलें. तो आश्चर्यानें तिला म्हणाला, " वाः ! शालीनूताई, नाशिकला नाहीं का गेलांत तुम्ही ? "

त्या दोघीही थबकल्या. शालिनी मागे वळून पाहत म्हणते " कोण विजयराव का ? बरी भेट झाली म्हणायची इथं···अखेर मी नाहींच गेलें बाई नाशिकाला. उषेला ह्यावेळीं एक्टाच प्रवास करायची फार इच्छा होती. नाताळच्या सुटीनंतर तात्यासाहेब तिला पोचवीला आले होते ह्याचा तिला कोण राग आला ? म्हटलें फेड आपली हौस एकदाची. "

"तात्या मजवरच्च रागावतीलना आतां, " विजय म्हणाला.

"ही माझी मावशी रेवती" शालिनीनें त्या अनोळखी बाईची त्याला ओळख करून दिली. तिनें त्याला नम्रपणें पुरुषी पद्धतीचा नमस्कार केला. रेवतीबाई पोक्त होत्या, पण त्यांचा गौरवर्ण अगदीं सुवर्णासारखा होता. रंबीबेरंगी चौकड्याचें झिराझिरीत पातळ त्या नेसल्या असून त्यांनीं आपला ओचा सोडला होता. त्यांच्या पायांत मखमलच्या चपला होत्या. त्यांच्या डोक्यावर गजरा व नाकांत चमकी होती. त्यांच्या तोंडावर खूबच कांति झळकत होती. त्याचें शरीर प्रमाणबद्ध असून, दंतपक्ति मोत्यांसारखी चकाकत होती. ओंठ व गाल तांबूस होते. त्या विडा चघळत असल्यामुळें विजयला मोठ्या रंगेल वाटल्या.

शालिनीची आई गोवेकरीण वेश्या होती, हें विजयला माहीत होतें. तेव्हां ह्या तिच्या मावशीसंबंधींही त्यानें एकाएकी तोच तर्क केला.

रेवतीबाई म्हणाल्या, " कुठं उतरलांत आपण ? "

" एम्पायर हॉटेलमध्यें. "

" म्हणजे कुणी इथं ओळखीचं नाहीं कीं काय ? "

" उतरण्यासारखं घर नाहीं कोणतेंच. "

" मग आमच्या घरीं चला ना राहायला. " त्या अनपेक्षित आमंत्रणाचें विजयला नवलच वाटलें. शालिनी म्हणाली, " अग, आपणा गोवेकरणींच्या का इथं उतरतील हीं घरंदाज माणसें ! "

"म्हणजे ? माझ्यासंबंधी त्यांना तूं कांहींच कळविलं नाहींस वाटतं ?" रेवतीबाईंनीं आपल्या भाचीला विचारलें.

"अग मावशी," शालिनी हंसून म्हणाली, "त्या भटजी कॉलेजला तूं मुंबई का समजलीस ? आमच्या कॉलेजबंधूबरोबर अघळपघळ बोलायला तिथं येते कुठं संधि ?" इतकें सांगून तिनें विजय उषेसंबंधीं पुण्यास झालेल्या गवगव्याची तिला हकीकत सांगितली. शेवट ती म्हणाली, "तिथल्या मुलांचा प्रभाव असा कांहीं विलक्षण आहे, कीं उषेसारख्या अगदीं घरोब्याच्या मुलीशींही विजयराव बोलेनासे झाले अखेर."

"शालिन्ताई" विजय आश्चर्यानें विचारूं लागला, "माझ्या तुटकपणाचं कारण तुम्हां मुलींना अन् उषेला कसं कळलं हो ?"

"तें कळवावं का लागतं ?" शालिनी मानेला किंचित्सा झटका देऊन म्हणाली, "पण विजयराव, उषा तुमच्यावर खूब रागावली आहे हो."

यावर रेवतीबाईनें विजयला पुन्हां आपल्या येथेंच येऊन राहण्याची विनंति केली व आम्ही तुमच्या हॉटेलात पांच वाजतां येतों तुम्हाला न्यायला, असें सांगून त्या दोघीही निघून गेल्या.

शालिनी चांगली सुशिक्षित ओळखीची मुलगी म्हणूनच विजय तिच्या मावशीच्या घरीं नाखुषीनें जाऊन राहिला. पण तिथें गेल्यानंतर एक तासाचें आंतच त्यानें केलेली घोडचूक त्याच्या लक्षांत आली. मुगभाट नाक्यावर असलेल्या त्या इमारतींत सर्व धंदेवाईक नायकिणीच राहत होत्या. आणि त्याच इमारतीचा एक मजला रेवतीबाईच्या ताब्यांत होता.

अशा वेश्यागारांत उतरण्याचा विजयचा पहिलाच प्रसंग. त्यांतल्या त्यांत समाधानाला इतकीच जागा होती कीं त्याला एक स्वतंत्र खोली देण्यांत आली होती आणि रेवतीबाई एका दृष्टीनें आदर्श नायकीण होत्या. त्यांनीं आपलें संपूर्ण घर विजयला दाखविलें, तेव्हां त्याला कळलें कीं, रेवतीबाईनीं एक अनाथालयच स्थापलें होतें. त्यांत गरीब वेश्यांचीं बाळंतपणें होत आणि म्हाताऱ्या निराधार वेश्या व नायकिणींना नको असलेले मुलगे त्या तेथें पाळीत असत.

रात्रीच्या जेवण्याची व्यवस्था विजयच्या खोलींतल्या टेबलावर करण्यांत आली. एका कुणबिणीनें दोन ताटें वाढून आणून ठेविलीं व शालिनी तिच्या पाठोपाठच खोलींत शिरली.

ती खुर्चीवर बसतांच म्हणते, "सारा ब्राह्मणी थाट आहे बरं कां. कसलीही शंका येऊं देण्याचं कारणच नाहीं."

"हं. सारं ठीक आहे." असें म्हणून विजयनें एक दोन घांस कसेबसे गिळले व तो हात धुऊन पुन्हां आंत येऊन बसला.

शालिनी हंसत म्हणाली, "मला वाटलंच होतं तुम्हाला जेवणसुद्धां जायचं नाहीं म्हणून. पहिल्या दिवशीं कुठल्याही संभावित पाहुण्याची इथं अशीच स्थिती व्हायची."

कांहीं वेळ विजय स्तब्धच बसला. पण पुढें त्यानें तिच्यावर प्रश्नांचा सारखा भडिमार सुरू केला, व तिनेंही त्याचीं लागोपाठ उत्तरें दिलीं.

"शालिन्ताई, तुला इथं राहणं बरं वाटतं ?"

"म्हणजे ? अहो हेंच माझं घर आहे विजयराव."

"पण ह्या नायकिणींच्या गोतावळ्यांत तूं कशी राहतेस ?"

"मी नायकिणीचीच मुळीं मुलगी आहे."

"मग कॉलेजांत कशाला शिकतेस ?"

"कां बरं ? नायकिणीनं शिकूं नये की काय ?"

"तसं नव्हे शालीन्ताई. पण मला वाटलं कीं तुझं शिक्षण हें उपरतीचं लक्षण असावं."

"मग मी कांहीं वेश्येचा धंदा नाहीं करीत !"

"पण ह्या पापाचारांत तुला राहवतं तरी कसं ?"

"हें पहा विजयराव, हा संवयीचा प्रश्न आहे असं नाहीं तुम्हांला वाटत ?"

"तूं मग इथंच का नाहीं शिकत ?"

"ह्या बाजारांत अभ्यास नाहीं होऊं शकत म्हणून."

"पण तूं शिकून तरी काय करणार ?"

"इंटर सायन्स पास झाल्यावर मी मेडिकल कॉलेजांत जाईन. मावशीच्या मॅटरनिटी होमसाठीं तिला एका डाक्टरिणीची जरूर आहे."

"ह्या होमचा खर्च कोण चालवितो ?"

"मावशीच चालविते. दुसरें कोण ?"

"अन् इतका कां पैसा आहे तिच्याजवळ ?"

"विजयराव, ती आपलें धंद्याचें सर्व उत्पन्न ह्यासाठींच खर्च करिते बघा. अन् तिचं हें उदात्त उदाहरण पाहून खालच्याही कांहीं नायकिणी महिन्याकांठीं जवळ जवळ ४०० रुपये तिला ह्या कामासाठीं देतात." ही सर्व माहिती मिळाल्यानंतर विजयला तिला आणखी विचारावेंसें वाटलें.

"काय ग तुझ्या मावशीला हा निंद्य धंदा अजून कसा करावासा वाटतो ?

"पण तिनं पैसा कुठून आणावा विजयराव ?"

"तुझ्यासारख्या वेश्येच्या पोरीला कॉलेजांत तरी कसें घेतात कुणास ठाऊक !"

"म्हणजे ? विजयराव, मी वेश्येची मुलगी आहे हें सांगितलं कुणाला असं कां वाटतं तुम्हांला ?"

तो विषादानें म्हणाला, " अरेरे, शालीनूताई, मी तुम्हाला आजवर किती चांगले समजत होतों. "

" ताई म्हणालांतच आतांही, " ती लडिवाळपणें म्हणाली, "इतक्या योग्यतेची मी तुम्हाला अजूनही वाटते तर...पुरुषावर असले बळजबरीचे प्रसंग तुम्ही आजवर कधीं ऐकले होते का ? "

विजय तिच्याकडे न पाहतां आतां खोलींत चोंहीकडे नजर फेकूं लागला. तो शृंगारलेला पलंग, ती मेनका, उर्वशी, गोपी ह्यांचीं नग्न चित्रें, ते विशाल आरसे, तें सुंदर चांदीचें तबक, ते फुलांचे हार, ह्याचा खरा अर्थ आतां त्याला कळला.

तो तिला आळवूं लागला,

" बऱ्या बोलानं दार उघडा नि मला जाऊं द्या. "

" मला तुमची आतां विशेषच काळजी वाटते. " शालिनी जणुं निरुपायानें म्हणाली, " मघाशीं तुम्हांला मी जो विडा दिला, त्यांत धुंदीनें बेहोष होण्याचें औषध घातलें आहे. आता जर इथून गेलांत तर रस्त्यांतच तुम्हांला गुंगी येईल. त्यावर एकच उतार आहे. हें औषध घ्या नि मग जा. "

तो मद्याचा पेला होता. विजय रागानें म्हणाला, " रस्त्यांत मेलों तरी बेहेत्तर. " असें म्हणून त्यानें पायातला जोडाच त्या कुलुपावर आपटण्यास सुरुवात केली.

शालिनी खुदूकन् हंसून म्हणाली, " बाहेरूनही कुलूप लावायला सांगितलें आहे त्याचं कसं ? व्हिक्टोरिया पण परत करायला आधींच सूचना देऊन ठेविली होती. पुन्हां गाडीसाठींही हिंडणार काय ? "

विजय तें ऐकून हवालदील झाला. त्याला खरोखरच डोकेंही थोडेंसें जड पडल्यासारखें आतां वाटूं लागलें. त्या विड्याचाच हा परिणाम असावा असा त्याचा ग्रह झाला. तो खुर्चीवर गपकन् बसला व कपाळाला त्यानें हात लावला.

शालिनीनें आतां आपले मोहिनी मंत्र सुरू केले. त्याच्या पाठीमागे टेकून उभे राहून आपल्या लुशलुशीत तळहातांचा त्याच्या दोन्ही गालांना आधार देत ती म्हणाली,

" डोकं चेपून देऊं का ? म्हणजे अंमळ बरं वाटेल. " तिचे हात त्यानें दूर सारले व म्हटलें, " दूर उभी रहा. पापी, कुल्टा, वेश्या कुठली. "

" अहो ह्या मला शिव्याच वाटत नाहींत " त्याच्यासमोर जाऊन गुडघे टेकवीत बसत ती म्हणाली, " कुलीन स्त्रियांना ह्या शिव्या वाटतात. "

तिचें सर्वांग जणुं त्याच्यासाठीं स्फुरण पावलें होतें. तो अधोमुख होता. त्याची दृष्टि तिच्या उरोभागाकडे चुकून गेली. तो केंविलवाण्या दृष्टीनें तिच्याकडे पाहूं लागला.

" तूंही वेश्येचा धंदा करतेस का ग ? " विजयनें तिला विचारलें.

ती गोड गोड हंसली व मधुर आवाजांत म्हणाली, " चांगलं! असा बरा फुकटाचा धंदा. मी तुम्हाला पैसे का मागितले ?"

" मग तूं पापी, विलासी आहेस. " विजयनें तिची निर्भत्सना करीत म्हटलें.

तिचे खोटे आविर्भाव आतां थांबले. ती कळकळीनें सांगूं लागली, " विजयराव, तुम्हाला तसं वाटणं साहजिक आहे. पण मला आजपर्यंत कोणाही पुरुषाचा स्पर्श झाला नाहीं...अन् तुमच्यासारखा चांगला पुरुष मला आजही भेटला नसता तर ह्या प्रसंगासाठीं मी आणखीही बराच काळ थांबलें असते. पण आतां माझ्यानं रहावत नाहीं."

तिच्या त्या स्पष्टोक्तीचा विजयवर एकाएकी परिणाम झाला. तो म्हणाला, "शालिनी हेंही पापच नाहीं का होणार ?"

" होय होईल. " तिनें कबूल केलें, " पण माझ्यासारख्या मुलीला दुसरा उपाय सांगा."

" तूं लग्न कां नाहीं करीत ?"

"वेश्येच्या मुलीशीं कोण करणार लग्न ?"

"आजकाल होईल कुणीतरी तयार."

" ह्या सांगायच्या गोष्टी नुसत्या. कुणी चांगला पुरुष तयार होणार नाहीं. वेश्या ह्या नात्यानें माझ्याशीं चोरून विलास करावयाला मात्र आज अनेक तयार आहेत."

" तूं नीट शोध कर. वाट पहा. कुणीतरी तुला असा उदात्त पुरुष भेटेल.

" पुष्कळ वाट पाहिली. तुम्हीच आज भेटलांत. तुम्ही होता माझ्याशीं लग्न करायला तयार ?" विजयची ह्या तिच्या प्रश्नानें गाळणच उडाली. तो म्हणाला, " नाहीं शालिनी, मला नाहीं हें शक्य होणार ? मी अजून स्वतंत्र नाहीं."

" मी घाई का करते आहे कसलीही? स्वतंत्र झालांत म्हणजे घ्याल मला पदरांत? तोंवर मी पाहतें वाट."

विजयला आतां तिची कींव आली. तो तिला उपदेशाच्या स्वरूपांत म्हणाला, " शालिनी, तुझे विचार जर इतके चांगले होते, तर तूं आज असं वेश्येसारखं वर्तन माझ्याशीं करायला नको होतंस! वेडी कुठली. माझं मन तुझ्याविषयीं या तुझ्या वागण्यानं किती कलुषित झालं ?"

शालिनी आतां खऱ्याखुऱ्या लज्जेनें म्हणाली, " हें हावभाव कदाचित् माझ्या इथल्या जन्मामुळंच माझ्या हाडीमासीं खिळले असतील!"

तो तिला चांगला मार्ग सुचवूं लागला, " शालिनी, तूं हें घर सोड. चांगल्या संगतींत रहा. म्हणजे तुला चांगला पति सहज मिळेल."

" पण हें सारं करायला जवळ पैसे नकोत का? मजजवळ तर माझं असं कांहींही नाहीं आज. मी हें घर सोडून कुणाच्या भरवशावर बाहेर पडूं ? "

" काबाडकष्ट कर. नोकरी कर. " विजय म्हणाला.

" उपदेश करणं सोपं आहे विजयराव, पण माझ्यासारख्या नाजुक अन् साधारण सुंदर मुलीनं हलकं कामही करणं शक्य आहे का?... मी पवित्र आयुष्य घालवावं असं तुम्हाला खरोखरच वाटत असलं तर एकच उपाय आहे-सांगूं. "

" सांग पाहूं ? "

" तुम्ही आतांच मला पत्करा...म्हणजे याच वर्षी म्हणतें मी. तोंवर मी वाट पाहतें. "

" मी कसं आजच आश्वासन देऊं ? " त्यानें तिला निरुपायाचा प्रश्न टाकला, " मीच स्वतः आज माझ्या वडिलावर अवलंबून नाहीं का ? "

शालिनी म्हणाली, " पण मला आश्वासन तरी द्या. म्हणाल तितके दिवस मी वाट पहातें. "

विजय आतां उतावीळपणानें म्हणाला, " मग इतकी जर तुझी तयारी आहे वेडे, तर आजन्म कुंवारच राहायला कां तयार नाहींस? संयम करणाऱ्या स्त्रिया कितीतरी आहेत. "

" विजयराव, नेहमीं चांगल्या वातावरणांत राहण्याचें भाग्य मला लाभतें तर तें एकपरी शक्य झालं असतं. इथं तें नाहीं शक्य होणार. माझ्या मनाला तसं राहावयाचंच नाहीं. इतके दिवस मी निर्मल राहिलें तें किती कठणाईनं. " विजय इतका वेळ सारखा तिच्याशीं चांगुलपणानेंच बोलत होता. त्याच्या मनाला विकाराचा स्पर्शही शिवला नाहीं. पण ती तसली मोहक तरुणी रात्रींच्या एकातांत त्याच्याही संयमशील मनावर विजय मिळवूं लागली.

तो कांहींशा प्रेमदृष्टीनें तिला म्हणाला, " वेडे, समज आज तूं माझ्याबरोबर पत्नि-त्वाच्या नात्यानं वागलीस तर मग तुझा जन्माचा प्रश्न कसा सुटेल ग ? "

" मी आपला देह विकणार नाहीं येवढंच. पण तुमच्यासारख्या चांगल्या पुरुषाशीं जेव्हां संधि येईल तेव्हां-तेव्हां—" इतकें म्हणतांच ती मोहकपणानें ओशाळलीच. तिचा उरोभाग थरथरत होता. तिचे ओंठ चुंबनासाठीं आतुर झाले होते.

## १६

# त्रिवेणी-संगम

विजय त्या खुर्चीवरून एकाएकी उठला, व खोलींत येरझारा घालतांना विचारांत कांहींसा मग्न झाला. कसल्या तरी निर्धाराचें तेज त्याच्या चेहऱ्यावर दिसूं लागलें. तो शालिनीला तिनें योजलेल्या तिच्या आयुष्याचें भेसूर दृश्य दाखवूं लागला. अनेक तऱ्हेनें उपदेश केल्यानंतर त्यानें तिला शेवट अधिकारवाणीनें चार हिताचे शब्द सांगितले.

" शालिनी, तूं जर आजवर खरोखरच पवित्र असशील तर आणखी कांहीं काळ असाच संयम करायला पाहिजेस. इथं होतांहोईल तों कमी दिवस रहा. माझ्याबरोबर चल नागपूरला. नंतर उषेकडे नाशिकला रहा. कॉलेज सुरू झालें म्हणजे पुन्हां तुझें जीवन सुखाचें जाईल. "

" होय का ? मला आपल्याबरोबर न्यायला तुम्ही तयार आहांत ? " शालिनीनें उत्सुकतेनें विचारलें.

" होय उद्यांच आपण इथून जाऊं या. "

हें विजयचें आमंत्रण तिला फारच आवडलें. ती तत्क्षणीं दरवाजा उघडून निघून गेली, आणि त्याच्याकडे वळून म्हणाली, " रात्रींतून पळून नाहीं जायचं बरं का ! "

" आतां त्याची नको तुला काळजी. "

नागपुरास शालिनीनें पुन्हा आपलें कॉलेजांतलें साधें स्वरूप धारण केलें. तिचा स्वभाव फारच गोड व मनमिळाऊ होता. तिची नेहमीची वागणूक मोठी शालीन होती.

ती फर्ग्युसनमधील एक विद्यार्थिनी आहे आणि तिचें नांव शालिनी निवासकर असून तिच्या मावशीनें मुंबईस एक अनाथालय व सूतिकागृह चालविलें आहे, अशा तऱ्हेचीच तिजसंबंधीं विजयनें सर्वांस माहिती दिली.

सर्व मंडळींच्या भेटी गोष्टी जेवणाच्या वेळींच काय त्या होत. एप्रिलच्या एक तार-खेला विजयची येण्यासंबंधीं तार आली म्हणून स्टेशनवर मोटार पाठविण्यांत आली होती.

दिवसाच्या जेवणांत परीक्षेसंबंधीं, शालिनीसंबंधीं, व इतर अवांतर माहिती बाबासाहेबांनीं विजयला विचारलीच होती.

रात्रीं जेवतांना लीला म्हणाली, " विजूदादा, आम्हाला तुझी तार वांचून वाटलं कीं तूं आम्हाला आज 'एप्रिल फूल' करणार कीं काय कुणास ठाऊक. "

विजय हंसून म्हणाला, " अग, पापांना ना केली होती मी तार? त्यांनाही फूल करीन मी, असं का वाटलं तुला? "

बाबासाहेब लीलेला म्हणाले, " तुला रोजचाच दिवस आजच्यासारखा आहे. तुला आणखी मूर्ख तें काय ठरवायचं? "

जेवण झाल्यानंतर शालिनीनें शकुंतलेला लीलेसंबंधींची कांहीं विशेष माहिती विचारली. तिला विजयकडून घरांतल्या सर्व गोष्टी कळल्या होत्या, पण लीला पुन्हां माहेरीं कां येऊन राहिली, हें घरांतील पुरुष मंडळीला एक गूढच होतें. 'ती अल्लड आहे, सासरीं राहत नाहीं, नवरा गांवढळ असल्यामुळें तिला आवडत नाहीं.' इत्यादि गोष्टी सर्वांनाच माहीत होत्या. पण ह्यापेक्षां कांहींतरी ज्यास्त कारणें असलीं पाहिजेत, असें शालिनीला वाटलें. आणि तिनें बंगल्याच्या एका निवांत खोलीत तिला वरील स्वरूपाचा प्रश्न केला.

शकुंतलेनें जी कांहीं आणखी माहिती दिली, तीही तिला अपुरीच वाटली. सर्वांविषयींच तिला कांहींशा जिज्ञासा उत्पन्न झाल्या होत्या. लहानपणापासून वेश्यागारांत वाढल्यामुळें कुलीन कुटुंबांतील नेहमीचें आयुष्य तिनें विशेषसें पाहिलें नव्हतें. तेव्हां तिची दृष्टि एखाद्या लहानग्या बालकासारखी निरीक्षणांत दंग असल्यास नवल नाहीं!

दोन तीन दिवसांतच त्या तिघीही मैत्रिणी झाल्या. शकुंतला व लिला ह्यांचा सुरुवातीस तिच्यासंबंधीं एक विशिष्ट ग्रह झाला होता. दोघींनींही तर्क केला कीं विजयनें तिच्यावर प्रेम असेल, आणखी त्यांचें बहुधा लग्नाविषयीं ठरलें असेल. एरव्हीं का ती एकटीच त्याच्याबरोबर इथें आली असती?

सलगी झाल्यावरच्या एका बैठकींत लीलेनें मिष्कीलपणानेंच तिला म्हटलें, " शालिनी वहिनी! "

शालिनी अर्थातच चपापली. ती हंसून मोकळेपणाणें उत्तरली, " काय लीलाताई, हें कसलं नवं नातं जोडलंस माझ्याशीं? "

" मी काय बाई अशिक्षित गांवढळ पोर," लीला खोंचकपणें म्हणाली, " चांगली देखणी सुशिक्षित तरुणी दादानं बरोबर आणली म्हणून माझा तसा तर्क झाला. चुकलें का मी?" शालिनीनें हें उत्तर थट्टेवारी नेलें अन् ती शकुंतलेकडे वळून म्हणाली, " तुलाही असंच वाटलं का ग शकूताई? " शकुंतला कांहींतरी उत्तर देणार होती, तोंच पुन्हां लीला

म्हणाली "अग तिलाच काय? पापा अन् काकूलासुद्धां तसाच संशय येतो आहे तुमच्याविषयीं. पण कुणालाच विजूदादाला तसं विचारायचं धैर्य नाहीं होत."

"खरंच का हें?" शालिनी आश्चर्यानें म्हणाली, "मग आतां काय करावं बाई?"

"अग लग्न! दुसरं काय?" असें लीलेनें म्हणतांच तिघीही हंसूं लागल्या.

इतक्यांत विजय तिथें आला आणि सायंकाळचे सर्वजण फिरायला गेले.

रात्रीं तिघीही एकाच खोलींत झोंपत. लीला निजली होती आणि शकुंतला व शालिनी अंथरुणांतल्या अंथरुणांत एकमेकींशीं बोलत होत्या.

शालिनीः— शकूताई, तुझी आई परत आल्यावर तूं पुन्हां वेगळी का राहशील? विजयरावला सारखी तीच चिंता वाटतेसं दिसतं. ते म्हणतात कीं दोघीही इथंच राहिल्या पुढं तर चांगलं होईल.

शकुंतलाः—जन्मभर इथं राहणं कसं शक्य होईल? आई परत आली कीं कांहीं दिवसानं बिऱ्हाड करून राहूं वेगळं.

शालिनीः—तुला वडीलबिडील नाहींत वाटतं?

ह्या तिच्या प्रश्नाला शकुंतलेनें कांहीं एक उत्तर दिलें नाहीं. तिनें बोलण्याचा विषयच बदलला. तिला एका बाबतींत समाधान वाटलें कीं शालिनीला अजून आपणाविषयींच्या कांहीं विशेष गोष्टी कळलेल्या दिसत नाहींत.

शकुंतलाः—शालिनूताई, कॉलेजांत विजयरावांची तुमची ओळख नि मैत्री कशी झाली?

शालिनीः—तिथं किनई उषा नांवाची माझी एक मैत्रीण आहे. तिचा भाऊ अरुण हा विजयरावाचा—

शकुंतलाः—होय उषेसंबंधीं आम्हां सर्वांना आहे सारी माहिती.

शालिनीः—मग झालं तर, तिच्यामुळंच माझी अन् विजयरावांची थोडीबहुत ओळख झाली.

शकुंतलाः—थोडीबहुतच ओळख असती तर तुम्ही त्यांच्याबरोबर सुटींत इथं कशा आलां असता?

शालिनीः—अग, नुसता योगायोग तो. मुंबईला विजयरावांची माझी पुन्हां अचानक गांठ पडली. ते उतरले होते हॉटेलांत. मावशीनें त्यांना आमच्या घरीं येऊन राहायचा आग्रह केला. मला सुटींत आधींच कुठं तरी जायचं होतं. उषेबरोबरच मला जायचं होतं नाशकाला. पण तिला माझी झाली अडचण. विजयरावांनीं इकडे येतांना मला यायचा आग्रह केला. अन् मी कुठं तरी जायचं म्हणून इकडे आलें.

शकुंतलाः—तुम्हाला आईवडील नाहींत वाटतं?

शालिनीः—माझी आई वारली. मावशीच करते माझा आतां प्रतिपाळ.

शकुंतलाः—अन् वडील कधीं वारले ?

आतां शालिनीच्या तोंडांतून उत्तर निघेनासें झालें. दोघींनाही कांहीं गोष्टी एकमेकीस सांगाव्याशा वाटत नाहींत, हें दोघींच्याही चांगलें लक्षांत आलें. असें कठीण प्रसंग त्यांच्या संभाषणांत वरचेवर येऊं लागले.

कांहीं दिवस दोघींनींही एकमेकींपासून कांहीं गोष्टी लपवून ठेविल्या. पण पुढें मात्र हळूं हळूं तें अशक्य होऊं लागलें. एका रात्रीं आपणाविषयींच्या अगदीं सर्व गोष्टी शकुंतलेनें शालिनीला सांगून टाकल्या. तिच्या त्या मोकळ्या स्वभावामुळें नंतर शालिनीचेंही मन लपवालपवीबद्दल स्वतःस खाऊं लागलें. तिनेंही आपली सर्व कर्मकहाणी शकुंतलेला सांगितली. दोघीही आतां अगदीं जिव्हाळ्याच्या मैत्रिणी झाल्या.

ह्या सर्व गोष्टी एकमेकीला जेव्हां कळल्या तेव्हां त्यांना परस्पराविषयीं सारखीच अनुकंपा वाटूं लागली. विजय संबंधींच्या गोष्टी शकुंतलेकडून शालिनीला कळल्या तेव्हां त्याच्याविषयीं तिचें मनांत जो आदरभाव होता तो द्विगुणितच झाला. आणखी विजयनें त्या वेश्यागारांत एका तरुण मुलीच्या वैषयिक विनंतीचा संयमानें अव्हेर केला, ही गोष्ट जेव्हां शालिनीनें शकुंतलेला सांगितली तेव्हां तिला तर तो आतां देवासारखाच वाटूं लागला.

ह्या सर्व गोष्टी त्यांनीं रात्रींच्या कराव्या तेव्हां लीला नेहमीं झोंपलेली असे. दिवसाचे वेळीं मात्र त्या तिघीही हंसत खेळत एकत्र गप्पागोष्टी करीत.

एक दिवस दुपारच्या वेळीं त्या तिघी अशाच बोलतां बोलतां एका महत्त्वाच्या विषयाभोंवतीं घोटाळूं लागल्या.

शालिनीः—लीलाताई, हें काय असं ? सांगा ना सारं आपल्या मनांतलं एकदां. आम्ही कुणाला नाहीं सांगणार हें.

लीलाः—मी सांगितलं ना हजार वेळ कीं माझ्या सासरच्या गोष्टी मला नका विचारूं म्हणून. तेवढ्यावांचूनच काय अडलं आहे तुमचं ?

शकुंतलाः—हें पहा लीलाताई. आम्हांला कांहीं कळलं तर आम्ही कांहीं उपाय सुचवूं तुम्हाला.

लीलाः—तुम्हाला काय कळतं त्यांतलं ? आधीं स्वतःच्याच लग्नाची करा व्यवस्था म्हणजे झालं.

शालिनीः—तुमच्यासारख्यांचे असे संसार डोळ्यापुढं असतांना आम्हाला विचार सुद्धां येणार नाहींत लग्नाचे कधीं.

लीलाः—पण सगळ्यांच्याच नशिबीं कांहीं असं नसतं !

शकुंतलाः—असं म्हणजे कसं लीलाताई ?

शालिनीः—होय. म्हणजे आम्ही तरी आपलं तसं नाहीं होऊं देणार.

लीलाः—माझं लग्न पापांनीं लहानपणीं केलं. तुम्ही आतां जागतेपणीं स्वतः लग्न कराल. तुमचं नाहीं व्हायचं तसं.

शकुंतलाः—विनायकराव विशेष शिकले नाहींत, लहरी स्वभावाचे आहेत, श्रीमंत असल्यामुळं व्यसनी आहेत येवढंच ना ?

लीलाः—मग मी कुठं शिकलें आहे अशी शकुताई ? अन् त्यांना व्यसन म्हणजे कांहीं दारूबिरूचं नाहीं. स्वभावाबद्दलही माझं कांहीं म्हणणं नाहीं. मी सासरीं चांगलीं सहा वर्षे निमूटपणें काढलींच कीं नाहीत ?

शालिनीः—छळ का करतात तुमचा ते ?

लीलाः—नाहीं. छळही करीत नाहींत माझा. माझे सारे लाड पुरवितात उलट.

शकुंतलाः—मग हो कसलं दुःख आहे तुमच्या मनाला ?

लीलाः—ते तुम्हाला सांगण्यासारखं नाहीं.

शालिनीः—माझ्या आलं घ्यानात सारं. मिळमिळीत सौभाग्य आहे तुमचं होय ना ?

लीलाः—मला नाहीं तुमच्या बोलण्याचा अर्थ कळला.

शकुंतलाः—तुमचं दुःख आमच्या आलं आतां ध्यानांत. तुमचें विधवेसारखंच आयुष्य आहे होय ना ?

लीलाः—तशीही मी सुखांत राहिले असते. पण त्यांना कांहीं एक कळत नाहीं. त्यांचे मित्र गांवातले गुंड आहेत. अन् माझ्याशीं ‘ वहिनी ’ ‘ वहिनी ’ म्हणत वाटेल त्या थट्टा करण्यापर्यंत जेव्हां त्यांची मजल गेली, तेव्हां मी त्यांना सारं सांगितलं पण त्यांना माझ्या अब्रूची पर्वाच नाहीं मुळींसुद्धां. मीच मग त्या त्यांच्या मित्रांना निर्लज्जपणें ताकीद दिली एक दिवस. तो ‘ माझ्या मित्रांचा तूं अपमान केलास ’ म्हणून त्यांनीं दोन दिवस जेवण सोडलं माझ्या रागावर. पुढं तर···जाऊं द्या झालं. काय सांगूं कपाळ माझं ?

शकुंतलाः—सांग सांग सारं लीलूताई. ऐकूं दे बाई तुझ्या दुर्भाग्याची कहाणी.

लीलाः—अहो किनई, मला म्हणतात काय कीं, ‘ इस्टेटीला वारस पाहिजे आपल्या. माझी लाज तूं झाकली पाहिजेस. पाप कर, कांहींही कर, पण मूल झालं पाहिजे तुला. अन् माझ्या दुबळेपणाची लाजही झांकली जाईल त्यामुळं’···मी त्याच दिवशीं घर सोडलं.

शकुंतलाः—केव्हांच्या गोष्टी ह्या ?

लीलाः—इथें मागंच आले होतें तेव्हाच्या आहेत साऱ्या···आणखी त्यावेळीं काय झालं शकुताई मी त्यांच्याशी जातां जाऊनच त्यांच्या म्हणण्याप्रमाणं कबूल केलं. त्यांच्या मित्रांपैकी एक जण मला त्यांतल्या त्यांत बरा वाटला. मी त्याची निवड केली. त्यांच्याच संमतीनं सारं कांहीं झालं. चार-पांच रात्री तो आमच्या घरींच येऊन राहिला. पुढं मी त्याला ‘ येऊं नका आतां ’ म्हणून सांगितलं. पण त्यानं माझा चांगलाच पिच्छा पुरवला महिना-दीड महिना.

शकुंतलाः—अरेरे, असं पाप तुम्ही कशाला केलंत लीलाताई ?

लीलाः—आतां सगळंच सांगितलं पाहिजे तुम्हाला. सांगतें बापडी. मी माझ्या ह्या साऱ्या अडचणी एक दिवस काकूला सांगितल्या होत्या. अन् तिनं मला एक असा कांहीं मार्ग सुचविला कां मीं काकूशीं एक महिनाभर बोलणंच सोडून दिलं. ती सारखी माझ्या हात धुवून पाठीसच लागली. तिचं म्हणणं इतकंच कीं ' तूं माहेरींच विलासचा उपयोग करून घ्यावा. पाप होईल हे कबूल, पण तुझं पुढचं आयुष्य सुखांत जाईल.' असं ती म्हणे. ' कांहीं दिवस गेले कीं तूं सासरीं जा, एखाद्या त्यांच्या मित्राबरोबर तसं रहायचं कबूल कर अन् महिना उलटला कीं सांग आतां कांहीं गरज नाहीं म्हणून. ' अशा तऱ्हेनें तिनं मला सारं पटवून दिलं. मी कबूल झालें. त्या रात्रीं विलासनं सारा घोटाळा केला अन् बभ्रा झाला. मी काकूला दुपारींच सांगितलें होतें कीं विजयदादा-बरोबर मी आतां सासरीं जातें म्हणून. आणखी विलासलाही सांगितलं होतं कीं तूं हे सारे चाळे बंद कर म्हणून. त्यासाठींच मी आंबाझरीवरून त्याच्याबरोबर गेलें. मी अंथरुणाची अदलाबदल करितें हेंही सांगितलें होतें त्याला. त्या पिसाळलेल्या ठोंब्याला तें सारं खोटं वाटलं असावं. म्हणून त्यानं रात्रीं अशी भलतीच चूक केली.

शंकुतलाः-लीलूताई, किती अभागी ग तूं. आम्हाला वाटलं की आतां तुला दिवस गेले असूनसुद्धां तिकडचा ळळा कां नाहीं. पण तूं अशी भांडून कां परत आलीस एकाएकी?

लीलाः-अग तो दुष्ट मेला, आतां त्याच्यापुढं तिकडचंही कांही चालेनासं झालं. त्यानं ह्या साऱ्या गोष्टी बाहेर फोडायचा तिकडे धाक घातला. त्यांचा, माझा निरुपाय झाला अगदीं. मी त्यांच्या संमतीनेंच इकडे आलें. पापांना ' तिला परत पाठवा, नाहीं तर आम्ही जबरदस्तीनें ओढून घेऊन जाऊं,' ही जी नोटीस आली आहे, ती त्याच्या हस्ताक्षरांत लिहिली आहे. यांची सहीच आहे तेवढी. जबरदस्तीचा रामराम सारा.

शालिनीः-डिसेंबरांत तुम्ही गेलांत इथनं. पांचवा महिना लागला असेल नुकताच.

लीलाः-नाहीं. नुकतांच आठवा लागला आहे आतां. पांचवा सांगायचा इतकंच, पाप लपवायला. हें कारटं विलासच्या पोटचं आहे.

शालिनीः-तुमचं पुढचं आयुष्यही सुखाचं कसं जाईल कुणास ठाऊक.

शकुंतलाः-हो. आतां हें मूल झाल्यावरही पुन्हां तो चांडाळ तुमच्या पाठीस लागेल जन्मभर.

लीलाः--मलाही तीच काळजी आहे सारखी. सारा जन्म आतां असा पापांतच घालवा लागणार आहे. नाहीं तर घराण्याच्या अब्रूला तरी बळी द्यावं लागेल...दुसरा मार्गच नाहीं सुचत.

शालिनीः--समजा, विनायकरावांना इथं बोलावलं, अन् जन्मभर त्यांना इकडेच राहायला सांगितलं तर ?

लीलाः---श्रीमंत, घरजांवई व्हायला कां म्हणून कबूल करतील? माझ्यापेक्षां त्यांना इस्टेटीची अन् घराण्याच्या अब्रूची ज्यास्त काळजी आहे.

इतकें बोलणें झाल्यावर त्या सर्व कांहीं काळ स्तब्ध राहिल्या. अखेरीस आम्ही कांहीं तरी योजना ठरवूं अन् तुम्हाला पुढच्या भयंकर आयुष्यांतून सोडवूं अशा तऱ्हेचें त्या दोन सुशिक्षित मैत्रिणींनी लीलेला आश्वासन देऊन ठेविलें.

१७

# पत्त्यांचा डोलारा !

लागलीच थोड्या वेळांत एक विचार निश्चित ठरला. सायंकाळीं विजयरावबरोबर फिरायला जातांना ह्या सर्व गोष्टी प्रथम त्यांना सांगून विश्वासांत घ्यायचें असा आपला बेत त्या दोघींनीं लीलेला कळविला. तिनें आढेवेढे घेतले. आपल्या विजु-दादाला ती कुठें पूर्णपणें ओळखत होती ? पण त्या दोघींनीं जेव्हां ह्या गोष्टीचा आग्रहच धरला, तेव्हां ती म्हणाली,

" तुम्हाला योग्य वाटेल तें करा, काय नशिबांत असेल तें आतां भोगलंच पाहिजे. मला नाही दादाचा विश्वास वाटत. तो वाटेल त्याला वाटेल ते सांगतो. सगळा बभ्रा होईल चोहींकडे. निदान मी तरी आज येत नाहीं तुमच्याबरोबर. नाहींतर माझी तो ' कुलटा ' म्हणून रस्त्यांतच शोभा करायचा ! "

लीलेची तिच्या दादासंबंधीची ही कल्पना कांहीं अगदीच निराधार नव्हती. तो सत्यवक्ता आहे, जगाला कांहींही सांगायला भीत नाहीं, आणि त्याला पापाचा संपर्कही खपत नाहीं, असेंच ह्या बोलण्यावरून तिचें त्याच्यासंबंधीं मत असलेलें त्या दोघींच्याही लक्षांत आलें. परंतु त्या दोघींनाही विजयच्या स्वभावाच्या आणखी कांहीं छटा माहीत होत्या. आपल्या जवळच्या माणसांच्या हितासाठी तो त्यांच्या पापावर पांघरूण घालून, कुणालाही त्यापैकीं एक ' ब्र 'ही कळूं देत नाहीं, ह्याचा दोघींनाही अनुभव होता. तो हळवा, उदार-हृदयी व क्षमाशील होता, हेंही त्या जाणत होत्या. लीलेच्या अडचणी दूर करायला त्याचें सहाय्य बिनमोल ठरेल ह्या हेतूनेंच त्याला ह्या गोष्टी सांगणें त्यांना आवश्यक वाटलें. " तूं कांही एक घाबरूं नकोस. पहा पाहिजे तर आम्ही काय म्हणतों त्याची प्रचीति " अशा स्वरूपाचा आग्रह जेव्हां लीलेला त्यांनीं केला, तेव्हां ती निमूटपणे भीत भीतच त्या तिघांच्या मागोमाग चालूं लागली.

शालिनीनें पुढारीपण आपल्याकडे घेतलें आणि शकुंतलेनें तिला ती कटु कथा सांगतांना मधून मधून सहाय्य केले. हें सर्व कथन–श्रवण चाललें असतांना लीला दादाच्या कोपाच्या अपेक्षेनें सारखी भीतिग्रस्त झाली होती. तिला विजयच्या अंतः-करणाची त्या दिवशीं प्रथम ओळख पटली.

तो तिच्याकडे वळून म्हणाला, " लील्, हें तूं मला आधींच का नाहींस सांगि-तलंस ? मी तुला आधीच पापाहून भिन्न आयुष्याचा मार्ग सुचविला असता ग. "

लीलेनें डोळ्याला पदर लावला. तिचा कंठ दाटून आला. तो पुढें म्हणाला, " उगी आतां रडूं नकोस. मला पुरुषाला असल्या गोष्टी सांगणं तुला शक्यच नव्हतं. आतां पुढच्या गोष्टीचाच विचार केला पाहिजे. "

शालिनी म्हणाली, " विजयराव, ह्या प्रकरणांत तुम्ही आपला उतावीळपणा प्रथम सोडायचा अन् आपल्या जिभेवर पूर्ण ताबा ठेवायचा. "

विजय आश्चर्यानें म्हणाला, " म्हणजे उपायाचा विचार लवकर नको का करायला ? अन् मी आत्तांच चूप बसूं म्हणतां कीं काय ? "

शकुंतलेनें थोडेसें स्पष्टीकरण केलें, "तसं नाहीं म्हणायचं आम्हाला. आपणा चौघाखेरीज आणखी कुणाबरोबर ह्या गोष्टीसंबंधीं बोलायचं नाहीं, ही पहिली अट. दुसरं असं कीं काय जें करायचं तें सर्वांनीं एकत्र सल्ला करून करायचं, येवढीच आमची विनंति. होय ना ग शालिनी ? "

विजयनें तें सारें कबूल केलें आणि आपल्या बहिणीला कुतूहलानें एकच प्रश्न केला, " लील्, मला तुझी नेहमीची वागणूक हें एक गूढच आहे. आणखी आतां तर तूं आपल्या मनांतलं सांगितल्याखेरीज तें नेहमीचंच न सुटणारं कोडं होऊन बसेल.तुला इतकं सारं कळत असतांना तूं अल्लडपणानं कां ग वागतेस नेहमीं ? बोलतांना तूं लहान मुलांसारखी अजाण वाटतेस अगदीं, तुला कांहीं बरंवाईट कळत असेल असं वाटतच नाहीं. अशी कां वागतेस? "

लीलेनें उत्तर दिलें नाहीं. तिला गद्गदून रडायलाच आलें. शकुंतला म्हणाली, " मी नव्हतें का सांगत आपणाला नेहमी ? माझ्याशीं त्या समंजसपणानं वागायच्या पण पुरुषांपुढं मात्र बालिशतेनंच वागत. मलाही त्यांचा स्वभाव म्हणजे एक कोडंच होतं. "

" मग आतां झाला का तुम्हाला उलगडा ?" विजयनें आतुरतेनें प्रश्न केला.

लीला जड आवाजांत रुद्ध कंठानें म्हणाली, " दादा, तें सारं सोंग होतं रे. माझ्या मनाला तशा वागण्यानं दुःखाचा विसर पडे. आणखी माझ्या खऱ्या दुःखाची तुम्हाला कल्पना न येऊं दिल्याबद्दल, तुम्हाला तरी सुखांत ठेवल्याचं समाधान मिळे. "

पुढें काय करावें ह्याचा नक्की निश्चय करायला आणखी दोन दिवस लागले. अखेर ठरलें कीं बाबासाहेबांना कोणत्याही गोष्टीचा सुगावा न लागूं देतां, जावईबोवांना एक पत्र घालून इथं कांहीं दिवसांकरितां राहायला आमंत्रण द्यावें. अनायासें पचमढीला जायचेंच होतें.

तेव्हां थंड हवेचेंही निमित्त होतेच. पुढें विनायकरावांचा स्वभाव पाहून, त्यांनाही विश्रा-मांत घ्यावें, आणि चार चांगल्या गोष्टी सांगून, कांहींतरी मार्ग सुचवावा.

योग्य संधी पाहून बाबासाहेबांना विजयनें पत्र पाठविण्यासंबंधीची विनंति केली. त्यांना त्याचा विचार फारच हास्यास्पद वाटला. ते म्हणाले,

" अरे त्यानें नोटीस बजावली आहे. तिला मारहाण करून नेईल म्हणतोय तो. ही त्याची धमकी बेकायदेशीर आहे, म्हणून ठीक. त्याची आज असा प्रकार करायची प्राज्ञा नाहीं. तो दिवाणी दावा करील फार तर. तिकडूनही नांव वाईट व्हायचं आपलं. पोरगीच छांदिष्ट अन् वेडी. काय करावं ? पुन्हां तूं जबरदस्तीनें तिला सासरीं नेऊन घाल एकदाचा. कडेकोट बंदोबस्त ठेऊन कोंडून ठेवा म्हणावं. मेली तरी बेहत्तर. पण आपल्या कुळाला डाग नको उगाच. हा एकच निर्दयपणाचा उपाय आहे. "

" पण पापा " विजय म्हणाला, " तिला जर त्या घरांत राहायचें नसेल तर ? पुन्हां ती निघून येईल. "

बाबासाहेब म्हणाले, " तूं तिला चार समजुतीच्या गोष्टी सांग. ह्या पोरीला सुधा-रलंस तर मी तुझे धन्यवाद गाईन. त्या वेडीला कांहीं एक कळत नाहीं. तिला म्हणावं, ' तो एक गांवढळ असला, तर तूं काय शहाणी आहेस' ?...आतां चांगली गरोदर आहे ती. मूलबाळ होईल. चांगला सुखानं संसार चालू शकतो. पण तिला सद्बुद्धी द्यावी कुणी !

" पापा, " विजयनें पुन्हां एकवार विनंति केली, " त्यांना बोलवा तर इथं. मी त्यांचा सलोखा करून देतों. "

" नको, नको, " बाबासाहेब म्हणाले, " इथं नको आणूस त्याला. तो अशा तिच्या अवस्थेंत तिला मारहाण करील, अन् त्याच्याच मुलाचा सत्यानाश आपण केला म्हणून आपणावर फौजदारी खटलाही करील एखाद वेळ. त्यापेक्षां जें कांहीं तिचं बरं वाईट व्हायचं असेल तें तिच्याच घरीं होऊं दे. तुला त्यांचा सलोखा तिथेंही जाऊन नाहीं का करतां येणार ? "

तऱ्हेतऱ्हेनें विजयनें आपले मुद्दे पुढें मांडले. अगदीं शिकस्त केली. मुली बिचाऱ्या दाराआडून मुकाट्यानें सारें ऐकत होत्या. बाबासाहेबांना विजयचें कांहींच पटेना. त्यांनीं त्याचे सर्व मुद्दे खोडून काढले. तो त्यांचा पुढील बेताचा पत्त्यांचा डोलारा, अशा रीतीनें एकाएकीं ढांसळून पडला !

# १८

## धर्मावतार !

इकडे त्या तीन मुलींचे नेहमीं त्रिकूट जमत असे, त्यावळीं विजय आपला वेळ वाचनांत घालवूं लागला. त्याला मोठमोठ्या लोकांचीं अनेक चरित्रें वाचण्याचा त्या सुटींत नाद लागला. एका पंधरवड्यांतच त्यानें जवळ जवळ २५ इंग्रजींत लिहिलेलीं हिंदुस्थानांतील प्रमुख व्यक्तींचीं चरित्रें वांचून काढली. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, सुरेन्द्रनाथ बॅनर्जी, स्वामी रामकृष्ण परमहंस, नामदार गोखले, आगरकर, चिपळूणकर, लाला हंसराज, उमेशचंद्र चॅटर्जी, दादाभाई नौरोजी, सर दीनशहा वाच्छा, सर फिरोजशहा मेहेता, मोतीलाल नेहरू; पंडित मालवीयजी, रमेशचंद्र दत्त, जस्टिस तय्यबजी, नामदार श्रीनिवास शास्त्री इत्यादि थोर व्यक्तींची चरित्रें त्यानें सारखीं वाचून काढलीं. ह्या चरित्रवाचनाचा त्याच्या मनावर असा कांहीं परिणाम झाला कीं आपणही कांहींतरी जनसेवेचें कार्य शिरावर घ्यावें, आपणालाही कांही करितां येण्यासारखें आहे, असें त्याला वाटूं लागलें.

१५ एप्रिलला तो असाच वाचत असताना त्याच्याकडे टिमथी आला. तो फारच उद्विग्न झाला होता. ह्या जगांतूनच नाहींसें होऊन जावें असें त्याला वाटूं लागलें होत. त्याला कारण रूथ. तिच्यावर त्याचें फार प्रेम होते. आणखी दोनेक महिन्यांनीं त्यांचा विवाह झाला असता. पण ती एकाएकी त्याला सोडून दुसऱ्या गृहस्थाबरोबर आसामात निघून गेली. आणि त्याचेशींच तिनें लग्नही लावून टाकलें. ज्या सायंकाळीं त्याला आपल्या बहिणीसंबंधींची खरी हकीकत कळली, त्याच्या दुसऱ्याच सकाळीं टिमथीचें हें वर्तमान कळलें, त्याच्यावर अशा रीतीनें एकदम मित्रकर्तव्याची अन् भगिनीप्रेमाची दोन्ही जबाबदाऱ्या पडल्या.

१६ आणि १७ हे दोन दिवस त्याला दोन्हीकडे लक्ष पुरवावें लागलें. तिकडे दिवसभर टिमथीकडे राहावयाचें आणि इकडे सायंकाळीं व रात्रीं लीलेसंबंधींची भावी योजना ठरवायची.

बाबासाहेबांचा एक नरसिंगपूरकडील विक्रमसिंग नांवाचा राजगोंड अलीकडे रोगी झाला होता. त्याचा एक विशाल महाल त्यानें पचमढीस बांधला होता, त्यानें २००० रु, महिना देऊन बाबासाहेबांस पचमढीला उन्हाळ्यांत राहावयाची विनंति केली, त्यांनीं ती कबूल करून कुटुंबासमवेत १९ तारखेस पचमढीला जावयानें ठरविलें.

विजयनें टिमथीला आग्रहानें बरोबर घेतलें होतें. शालिनी नागपूरहून नाशिकला जायच्या गोष्टी बोलूं लागली. पण सर्वांनींच तिला पचमढीला यायचा आग्रह केला. तीही ह्या मंडळींच्या आग्रहाला बळी पडली. त्याप्रमाणे तिनें पत्रद्वारें मावशीला तसें कळविलें आणि पचमढीचा पत्ता देऊन ठेवला.

घरच्या मोटारींत ही सारी मंडळी आणि शॉफर व स्वयंपाकी हे दोन गडी, अशीं नऊ माणसें मावणेंच शक्य नव्हतें. प्रवासही चांगला दूरचा होता. घरांतील दोन महि- न्याच्या बेगमीचें सामान आगगाडीनें पाठवून रमाकाकू व आचारी हे दोघे गाडीनेंच गेले विक्रमसिंगांना फुफ्फुसांचा आजार असल्यामुळें बाबासाहेब त्यांच्याच मोटारींतून गेले.

टिमथीनें व विजयनें प्रवासाचा खाकी साहेबी पोषाख–शर्टस्, होजेस, टोप वगैरे परिधान केला होता. टिमथीनें बंदूक, थर्मास् बॉटल इत्यादि शिकारी साहित्यही बाळगलें. घरची मोटार १९ तारखेस पहाटे तीन वाजतां घराबाहेर पडली. मुली मागे बसल्या व समोरचे बाजूस विजय हांकत होता, मध्यभागीं शॉफर होता आणि दरवाज्याजवळ टिमथी बसला. छिंदवाड्याजवळचा डोंगराचा प्रवास सकाळचाच झाला. छिंदवाड्यास बाबा- साहेबांचा एक बंगला होता, तेथें बारा वाजतां मोटार येऊन थडकली. बरोबर आणलेल्या खाद्य साहित्यावरच त्या दिवसापुरती मंडळी संतुष्ट राहिली. रस्त्यांत टिमथीनें एका खबुतराची व हरणाची शिकार केली होती. त्याच्या त्या मनःस्थितींत विजयनें त्याला शिकारीसंबधानें आडकाठी केली नाहीं. त्या रात्रीचा मुक्काम छिंदवाड्यासच करावा असें ठरलें. मुलींनां स्वैपाक केला. शकुंतला व लीला ह्यांनीं सर्व ब्राह्मणी पद्धतीचे पदार्थ सुबकपणें तयार केले. शालिनीनें कबुतर, हरिणाचेही पदार्थ वेगळे केले आणि टिमथी, शॉफर व तिला मोठे चमचमित भोजन मिळालें.

टिमथीला मराठी विशेष येत नव्हतें, तर लीला व शॉफरला इंग्रजीचा गंध नव्हता. त्या मुलींनीं व विजयनें टिमथीलाही आपल्या पूर्ण विश्वासांत घेण्याचें ठरविलें. छिंदवाड्या- नंतरच्या दुसऱ्या दिवशींच्या प्रवासांत बसण्याच्या जागांचीं थोडी अदलाबदल झाली. शॉफर गाडी हांकीत होता, टिमथी समोर त्याच्या शेजारी बसला होता. मागच्या मधल्या जागेंत अंथरुणें टाकून बसण्याची सोयीची जागा केली होती. त्यावर आपले बुटाचे पाय बाहेर सोडून विजय बसला. मागच्या गादीवर एका बाजूस पाय बाहेर लांब करून शालिनी बसली, दुसऱ्या टोकांस थोडेसे पाय मोकळे करून गरोदर लीला बसली आणि मध्यभागीं पाय आवळते घेऊन शकुंतला बसली.

बरेंच संभाषण इंग्रजींतून चाललें होतें. विजयनें तिन्ही मुलींची मोटारींत जास्त ओळख करून दिली, पण त्यांच्याकडे संकोचानेंच एकवार पाहत टिमथीनें औपचारिक समाधान व्यक्त केलें. हिंदु मुलींशीं कसें काय वागावयाचें हेंच त्याला कळत नव्हतें. म्हणून त्याचा हा संकोच नैसर्गिकच होता.

आतांपर्यंत त्याच्याकडे निरखून पाहण्याची मोकळेपणानें त्यास संधींच मिळाली नव्हती. पण त्यांना डोळे भरून एकदां पाहण्याचें त्याला जे सारखे कुतूहल होतें, ती संधी अप्रत्यक्ष रीतीनें त्याला आतां मिळाली. समोरचा मध्यभागीं असलेला चिमुकला आरसा ह्या वेळीं अशा रीतीनें नेमका स्थिर झाला होता कीं त्यानें आपलें डोकें शिताफीनें थोडेसें इकडे तिकडे केलें म्हणजे त्या तिघींचींही प्रतिबिंबें त्यांत त्याला दिसत.

लीला गरोदरपणामुळें थोडी विद्रूप व पिगट दिसत होती. तिचा चेहेराही जरासा कुरूप अन् रंग काळसर होता. तिचा आकारही ओबडधोबड व लठ्ठ होता. तिच्या कानांतल्या कुड्या काळसर अन् केंसाची ठेवणही वाईट होती. तिच्या कुंकवाचा आकारही त्याला फार मोठा व बेढब वाटला.

शकुंतला त्याला लाजाळू व शांतवृत्तीची वाटली. तिच्या ईयररिंग्स व तिनें पुढ्यांत घेतलेला वेणीचा शेंपटा, तिच्या चोळीचा व पातळाचा एकसारखा रंग, सडपातळ बांधा हे विशेष मोहक होते. पण तिचा रंग किंचित् सावळा होता, तिला इंग्रजी नीटसें येत नव्हतें, व ती फारच नाजुक होती, हे टिमथीला तिच्यांतले दोष वाटले.

शालिनी त्या तिघींपेक्षा शरीरानें धडधाकट, उंच, रेखीव नाकाडोळ्याची, गौर रंगाची, साध्या राहणीची वाटली. तिची केंस बांधण्याची तऱ्हा किंवा नेसण्याची तऱ्हा त्याला त्या दोघींपेक्षां निराळी व आकर्षक वाटली. ती रांकट दिसत होती. तिच्या कुड्याऐवजी, जर तिनें ईयररिंग्ज घातले, आणि इंग्रजी पद्धतीचा जर तिनें पोषाक केला तर त्यांच्या गोव्याचे खिश्चनांत ती बेमालूमपणें मिसळूं शकली असती. इंग्रजी ती फारच सफाईनें बोलत होती. आणि तिनें जे मांसाचे पदार्थ केले होते तेही आपल्या पद्धतीचेच केले होते हे पाहून तिच्याविषयीं त्याला जास्त आपलेपणा वाटला.

तामियाचा जेव्हां विशेष चढाव लागला, आणि उन्हाचीही बराच वेळ झळ लागली, तेव्हां लीलेला एकाएकी त्रास होऊं लागला. मोटार थांबविण्यांत आली. तिला सारख्या ओकाऱ्यावर ओकाऱ्या होऊं लागल्या. हळू हळू मोटार चालवावी व पुनःपुन्हां थांबवावी, अशा रीतीनें मार्ग आक्रमावा लागला. शकुंतलेनें सांगितलें कीं तिचें अंगही बरेंच कढत झालें आहे. ती सारखें पाणी पीत होती व ओकत होती.

पांच वाजतां मोटार विक्रमसिंगाच्या 'गरुडध्वज' महालाच्या पोर्चमध्यें येऊन थडकली. हा महाल प्रथम लागतो व नंतर चारपांच मैलावर पचमढीची वस्ती व तेथून दोन तीन मैल पलिकडे सिव्हील स्टेशन अशी पचमढीची साधारणतः रूपरेषा आहे.

बाबासाहेब व श्रीमंत सकाळींच येऊन पोंचले होते असें कळलें. ह्यावेळीं ते व श्रीमंत मोटारींत सहलीला निघून गेले होते. महालांतील पूर्वभागाच्या दहा विशाल खोल्या व एक गॅरेज, दोन नोकरांच्या खोल्या व एक तंबू, अशी बाबासाहेबाच्या कुटुंबासाठीं श्रीमंतांनीं व्यवस्था केली होती. त्यापैकीं स्वयंपाकाची एक, इंग्रजी थाटाच्या जेवणाची दुसरी, दोन स्त्रियांच्या व दोन पुरुषांच्या अशा आठ पलंगाच्या चार खोल्या, एक ऑफिसरूम व एक दिवाणखाणा अशी व्यवस्था होती. तंबूंतही एक सतरंजी, व वेताच्या सात आठ खुर्च्या, एक घडीचा पलंग व एक दोन स्टुलेंही होतीं. याशिवाय दोन स्नानगृहें, एक कमोडची खोली, व औट हाऊसेस जवळ एक टिनाचा घाणेरडा पायखाना, हें सारें बाबासाहेबांच्या कुटुंबाच्याच ताब्यांत होतें.

रमाकाकू व स्वयंपाकी सामान सुमानासुद्धा दोन दिवस आधींच येऊन पोंचले होते. मोटारींतून उतरतांच रमाकाकूंनीं लीलेला तिच्या पलंगावर नेऊन निजविलें व मुली तिच्याजवळ राहिल्या. टिमथी व विजय महालाच्या मॅनेजरच्या भेटीस श्रीमंताच्या व्हराड्यांत गेले.

जवळ जवळ ३० गडी, पांच मोटारी, दोन व्यवस्थापक, सात शिकारी व पहेलवान, आणि दोन लग्नाच्या व एक अंगवस्त्र अशा तीन पट्टराण्या, व चार सहा दासी असा श्रीमंतांचा सजीव सरंजाम होता. परंतु इतकेंही असून त्या महालाच्या बाहेरून तरी नेहमी प्रेतकळाच आलेली दिसे. त्या राण्याचीं तोंडें एकदांच काय तीं आमच्या कुटुंबांतील स्त्रियांस पचमढीचे संपूर्ण मुक्कामात दिसली. अगदीं मोठ्या हुद्यापासून तों थेट दीडदमडीच्या चाकरापर्यंतचे श्रीमंताचे सारे सेवक त्यांच्यासमोर हाजी हांजी करीत धांवपळ करतांना दाखवीत, पण त्यांच्या पश्चात् त्यांची ऐट, कुर्रेबाजी, बेमुर्वत भाषा, हें सारें ऐश्वर्य तिऱ्हाइताच्या कपाळांत तिडिक उत्पन्न करणारें होतें.

ह्या बेपर्वाईचें प्रत्यंतर विजयला त्या दिवशीं पहिल्याच क्षणाला आलें. मॅनेजरानें त्याला कांहीं एक साहाय्य तर केलेंच नाही, उलट बाळंतपण महालांतच झाल्यास श्रीमंतास खपावयाचें नाही अशीही धमकी दिली. आपल्या घरचे थर्मामिटर सांपडत नव्हतें म्हणून महालात निरोप पाठविला, तों आमच्याकडे थर्मामीटर नाहीं असेंच उत्तर आलें. लीलेचें अंग आता खूबच तापलें होतें व ती कण्हू लागली होती. मोटारींतून विजय व टिमथी पचमढीस जाऊन आले, बाबासाहेबाची भेट झाली नाहीं.

ते श्रीमतांबरोबर आठास परत आले. पाहतात तों लीलेचा ताप पांच डिग्रीपर्यंत वाढलेला. अशा स्थितींत गर्भपात होण्याचा संभव होता म्हणून श्रीमंताची, लीलेस महालांतच ठेवण्यासंबंधींची परवानगी घेऊन, पचमढीहून डॉक्टरीणला व एका नर्सेला ताबडतोब आणविलें. तपासणीनंतर डॉक्टरणीनें बाबासाहेबांस सांगितलें,

" बहुधा बाळंतपण आतां होणार. "

" अहो गर्भपात होईल. तिला फार तर पांचवा महिना चालू असेल. "

डॉक्टरीण पुन्हां एकदां तपासून येऊन म्हणाली,

" कमींत कमी सात महिने तरी भरलेले दिसतात. पोटांत मूल जिवंत आहे. अकालीं बाळंतपण होणार हें खरं. "

" छट् "बाबासाहेब म्हणाले, " तुमचें डायग्नोसिस चुकीचें आहे. ती मुळीं जानेवारींतच दोन वर्षांनंतर सासरीं गेली. "

ह्या शंकाकुशंकासंबंधींचें बोलणें नंतर थांबलें. डॉक्टरीण पुन्हां आंत गेली आणि बाबासाहेब धाबरतच दिवाणखान्यांत विजयकडे येऊन सांगू लागले,

" अरे एकदम पचमढीस जाऊन तार करून ये जावईबोवांना. ताबडतोब निघून या म्हणावें. सारं विस्तृत लिही. दोनचार रुपये पडले तरी चालतील. घाई कर जा. "

विजय व टिमथी मोटारवर खूब वेगानें गेले व तार करून परत आले. लीलेविषयींची सर्व आख्यायिका त्याच वेळीं प्रथम टिमथीला कळली. शकुंतला व शालिनीनें त्यासंबंधीं विजयला परवानगी देऊनच ठेविली होती.

टिमथी म्हणाला, " पापांनींच जावयाला बोलावलें हें बरं झालं एकदाचं. औषधावांचून खोकला गेला.

ती रात्र सर्वांच्याच काळजीची गेली. रात्रीं दोन वाजतांच लीलेची परिस्थिति विशेष चिंताजनक आहे, असें सर्वांनाच कळलें. कांहीं अवजारें पचमढीच्या दवाखान्यांतून ताबडतोब आणलीं पाहिजेत असें डॉक्टरीण कावरीबावरी होत्साती बाहेर येऊन म्हणाली. एकदम मोटारीची तयारी झाली. पण डॉक्टरिणीनें सांगितलें कीं " रस्त्यात वाघाबिघांचं भय असल्यामुळं वाड्यांतले एक दोन शिकारी सोबतीस द्या. "

विजय व टिमथी यांनीं जाऊन मॅनेजरला उठविलें. त्यांची डाळ शिजली नाहीं. मग रागानें खुद्द बाबासाहेब त्याच्याकडे जाऊन त्याला रागावले. त्यानीं ' श्रीमंतांना नाहीं तर उठवितों ' असें म्हणताच कसाबसा एक शिकारी बरोबर दिला गेला. टिमथीनेंही बंदूक बरोबर घेतली. समोर तो शिकारी व शॉफर व मागे दोन बाजूस ते दोन मित्र व मध्ये त्या भयभीत डॉक्टरीण बसल्या.

जातांना डॉक्टरीण इंग्रजींत हंसून म्हणाल्या,

"वाघाचा डोळा नेहमी मधल्या माणसावर असतो असं इथले गांवठी लोक म्हणतात. "

टिमथी खूब हंसला. तो म्हणाला, " This is shere superstition. "

" माझा यावर विश्वास का आहे ? अहो गंमत ही. " डॉक्टरीणनें हिंमतीचा आंव आणला.

"आमच्या लीलेकरितां तरी आम्ही तुमचं संरक्षण करूंच कीं नाहीं!" विजयनें दम दिला.

"म्हणजे माझ्या जीवाकरितां नाहीं वाटतं कांहीं करणार?" दवाखान्यांत डॉक्टरीण अवजारें आणायला आंत गेली, तेव्हां त्या शिपायानें सांगितलें कीं खालीं झाडींत एक जनावर होतेंच. म्हणून परत येतांना टिमथीनें शिताफीनें जागांची अदलाबदल केली. येतांना विजय शॉफरच्या मागें बसला होता. त्याच्याजवळ बंदूक नव्हती. त्याला शिकाऱ्याच्या मागें त्यानें बसावयास सांगितलें. उद्देश इतकाच कीं दोन्ही बाजूंनीं शिकाऱ्यानें व त्यानें आपापल्या बंदुकी रोखून ठेवाव्या.

ही अदलाबदल पाहून डॉक्टरणीनें सहज प्रश्न केला, "कां कांहीं विशेष कारण नाहीं ना?"

टिमथी म्हणाला, "छेः आम्हाला एकाच जागेचा कंटाळा आला होता."

पण इतकी सर्व जय्यत तयारी फुकट गेली. वाघोबानें त्यांना आपली भेटच दिली नाहीं!

वाड्यांत पोंचतांच कळलें कीं मोटार निघताच लीला प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. डॉक्टरिणीनें एक तासानंतर सांगितलें कीं आतां कांहीएक भिण्याचें कारण नाहीं तो तिचा ताप दगदगीचा व उन्हाचा आहे. काहीं दिवसांनीं तो नाहींसा होईल.

मूल लहान असलें तरी तरतरीत होतें. दहा दिवस निघून गेले. लीलेचा ताप ज्यास्त प्रमाणांत नेहमी असे. आणखी तिला एक नवीन चिंता लागली. तिला वाटे कीं विनायकराव तिच्यावर रागावले तर नसतील. त्या दहाही दिवसांत शालिनी व लीला ह्या दोघीही नेहमी तिच्या अंथरुणाजवळ बसून मारल्या तिच्या शुश्रूषेंत दंग होत्या. काकू त्यांच्या ओंवळ्याला व विटाळाला नावे ठेवी, पण त्यांना त्यांची पर्वा नसे. लीलेला त्यांनीं नेहमी आशेच्या अन् उमेदीच्या गोष्टी सांगाव्या.

अकरावे दिवशीं आपल्या विश्वास नांवाच्या एका मित्राला घेऊन विनायकराव एकदाचे येऊन थडकले. विश्वासला पाहतांच विजयला त्याला पूर्वी कुठें तरी पाहिल्याचा भास झाला. त्यानें खुलासा केला कीं तो फर्ग्युसनमध्यें प्रीव्हियसचे वर्गांत त्याचा वर्गबंधु होता. कौटुंबिक आपत्तीमुळें त्यानें कॉलेज सोडलें होतें व आज त्याला नोकरी वगैरे कांहीं नसल्यामुळें त्याची अन्नान्नदशा होती. विनायकरावांच्या भरंवशावरच स्वारीची सारी ऐट चाले.

शकुंतला, शालिनी व विजय यांना थोड्याच वेळानंतर हेंही कळलें कीं तिच्याशीं ज्याचा जबरदस्तीचा संबंध आला होता, तोच तो सैतानी विश्वास! त्या सर्वांना त्याचा असा कांहीं राग आला!

बारावें दिवशी नामकरण विधी आटोपला. त्या मुलाचें नांव सर्वानुमतें 'धर्म' असें ठेविलें. ही सूचना विजयची होती.

बाबासाहेब, विनायकराव व विश्वास ह्यांना त्यानें सांगितलें कीं गांधी जवळ जवळ

धर्माचे अवतार आहेत. त्यांचा दांडीचा तूर्त चालू असलेला " मार्च " मला फार महत्त्वाचा वाटतो म्हणून मुलीला धर्म हे नांव द्यावे.

आणि एकीकडे त्याने त्या दोन मुलीना व आपल्या ख्रिस्ती मित्राला सांगितलें कीं, ' कुंतीला धर्मही असाच इतराकडून नवऱ्याच्या कांही व्यंगामुळे जन्मला. म्हणूनच ह्या मुलाचें नांव मी मुद्दामच धर्म ठेविले. '

## चुकीची दुरुस्ती

पान १०४ नंतर--पृष्ठें १०७, १०५, १०६, १०८, १०९, ११०, १११, व ११२ या अनुक्रमे वाचावीत.

वरून झोंक तोलत, धांवपळ केल्यानंतर तुरळक झाडींनें व्यापलेलें व लहानग्या दऱ्या-खोऱ्यांनीं वेष्टिलेलें तें विहारस्थान येई.

एकदां मैदानांतून त्या तीन तरुणी व दोन तरुण एकामागें एक ओळींत चालत असतांना एक वेळ शेवट राहिलेला विजय इंग्रजींत म्हणाला,

" हा गांधींचा दांडी मार्चच वाटतो. "

गेल्या दोन तीन दिवसांत सर्वांच्या तोंडीं गांधी व दांडी ह्या शब्दांचा नुसता पुनरुच्चार चालला होता.

" मग गांधी कां असे मागे राहिले आहेत ? " असें म्हणून टिमथीनें त्याला समोर बोलावलें आणि ते दोघेही मित्र बरोबरीनें चालू लागले.

आतां सर्वांत मागें विश्वास राहिला. त्याच्यासमोर चालत असलेल्या त्या तीन तरुणीकडे त्यानें डोळे भरून आपलें बकध्यान लावलें.

उंच व राकट शालिनी, लाजाळू व सडपातळ शकुंतला, या दोघींपेक्षां ठेंगणी, गुबगुबीत, तांबुस गालाची व फटकळ तोंडाची उषाच त्याला ज्यास्त आवडली. तो मनाशींच मिटक्या मारीत म्हणाला, " काय लुसलुशीत पोर आहे ! "

इतक्यांत एक लांब घसरंड लागली. चौघेही पाहतां पाहतां उताऱ्याच्या पुढील पायथ्याला वेगानें निघून गेले. उषा वहाणा हातांत घ्यायला जराशी थबकली. विश्वास तिला म्हणाला, " हें : ! वाहणा काढायला काय झालं ? येवढ्याशा उतारावर काय पाय घसरतोय् ?" असें म्हणत तो धिप्पाड दांडगा, आपल्या वहाणा पायांत ठेऊन धाड् धाड् पावलें टाकीतच वेगानें खालीं उतरूं लागला. खालच्या चौघांचें लक्ष यावेळीं उषेसाठीं वर लागलें होतें. तीही भीतभीतच विश्वासकडे नजर ठेऊन खालीं जपून उतरत होती. तोंच त्याचा पाय पाहतां पाहतां घसरला. चांगली तीस फूट खालीं स्वारी आडवी तिडवी आदळत आपटत घसरली. खालीं पायथ्याला तो अरुंद रस्ताच काय तो होता. आणि तो तिथून एकाएकी दुसरीकडे वळलेला होता. पलीकडची दरी बरीच खोल होती !

तो बंबासारखा प्राणी एकाएकी आपणावरच येऊन आदळणार कीं काय ह्या भीतीनें शकुंतला व शालिनी एकदम लांब पळाल्या. रस्त्यावर आपटतांच त्याच्या पतनाची गती मंदावली व टिमथीनें त्याला एकदम धरून घेतलें !

सर्व जणांची हांसतां हांसतां मुरकुंडीच वळली. उषा उतरतांना हास्यातिरेकानें गपकन् खालींच बसली. विश्वासची एक वहाण उतारावरच स्थिरावली होती, टोपी लांब फेंकली गेली.

टिमथीनें उषेला आवाज दिला, " ती वहाण अन् टोपी आणा येतांना. "

तशी ती चटोर पोर हंसतां हंसतां उत्तरली, " छत्, मी नाहीं लावत कुणाच्या वस्तूंना हात ! " असें म्हणत ती खालीं उतरून आली. तिनें विश्वासच्या वर काढलेल्या

दिमाखाच्या उद्गारांसंबंधीं जेव्हां आपल्या मैत्रिणींस हंसून सांगितलें, तेव्हां तर आणखी एक हास्यध्वनि त्या तरुणींच्या कंपूंतून उठला. विजयला उषेचा राग आला. त्यानें स्वतः वर चढून ती वहाण व टोपी मुकाट्यानें विश्वासला आणून दिली.

त्याचा पोषाख साफसूफ करण्याला टिमथीनें मदत केली व नंतर तो म्हणाला, " विशेष नाहीं ना मार लागला ? "

तेव्हां विश्वास कोटी करून म्हणाला, " अहो, लिटल् फॉल् आहे हा. "

विश्वासचें डोकें सुपीक आहे, हें त्याच्या बेफिकिरीच्या वरील उद्गारावरून त्या मंडळीच्या लक्षांत आलें.

लिट्ल फॉल हा धबधबा बऱ्याच उंचावरून खालीं पडतो. पाणी पडतें त्याच्यापुढें उभें राहायला थोडीशी जागा आहे.

त्या जागेपुढें एक साधारण विस्तीर्ण गोलाकार तलाव आहे. तो त्या धबधब्याच्या उंचीइतकाच खोल आहे म्हणतात. म्हणजे आंत पाणी अथांगच आहे. धारेखालीं जायला तलाव पोहून जावें लागत. वस्त्रें बदलायला बाजूच्या खडकांमागें आडोशाच्या पुष्कळ जागा आहेत. विजय व टिमथी स्विमिंग सूटस् घालून पाण्यांत पोहूं लागले. त्या तलावाच्या दोन फेऱ्या त्यांनीं खूबच झपाट्यानें केल्या.

मुलींनीं आतां कुठें स्नानाच्या तयारीनें पाण्यांत पाय ठेवला. शालिनी पोहून पली-कडे गेली. उषा जवळपास पोहून पुन्हां पुन्हा काठावर जाऊन थाबे. एका खडकाजवळच्या अगदीं उथळ पाण्यात हातानें अंगावर पाणी घेत शकुंतला स्नान करूं लागली. आणि लाग-ल्याचें निमित्त करून कीं काय कुणास ठाऊक, विश्वास एका मोठ्या दगडावर बसून ती जल-क्रीडा पाहत आपल्या डोळ्यांनाच शांत करीत होता.

शकुंतला प्रथम पाण्यांतून बाहेर पडली. ती आपलें ओलें चिंब अंगाला चिकटलेलें पातळ ओणवें होऊन डाव्या हातानें पुन्हा पुन्हां बाजूस सारी, तों तों तें वाळूसारखें तिला अधि-काधिक चिकटे. तिचा उजवा हात पदर घट्टपणें हृदयाभोंवती गुंडाळण्यांत गुंतला होता. तिच्याकडे अशा स्थितींत न्याहाळून पाहतांच विश्वासच्या प्रथमच लक्षांत आलें कीं ती कृश-शरीरिणी होती, तरी तिचीं स्तनमंडलें पीन व टोंकदार होतीं, व तिचे नितंब भरीव व मांसल होते. आपल्यावर विश्वासची नजर कावळ्यासारखी टपलेली होती हें तिच्या लक्षांत येतांच, ती कावरी बावरी झाली व झरकन् खडकाआड गेली. ती तिची उडालेली त्रेधा पाहून विश्वास गारेगार झाला.

नंतर उषा बाहेर पडली. तिचें शरीर मांसल असून विशेषसें प्रमाणबद्ध नाहीं, हें विश्वासच्या ध्यानांत आलें. तिच्या मांसलतेच्या विशेषत्वामुळें तिच्या अंगांत थोडासा जड-पणा व संथपणा असलेला त्याला आढळून आला. त्यामुळें ती बाहेर निघतांच जी एकदां सरळ ताठ झाली, ती कांहींएक अंगाला बांक न देतां, व विशेष पदराबिदराची पर्वा न

# १९

## " लिटिल् फॉल् ! "

मेच्या तीन तारखेस धर्मांचा नामकरणविधी आटोपला. बाळ बाळंतिणीची सुश्रूशा करण्यांत सर्वांनाच शीण आला होता, म्हणून आणखी तीन दिवस विश्रांतीत गेले.

उषेलाही पचमढीला बोलवावें म्हणून त्या तरुण मंडळींचें नागपुरासच ठरलें होतें. तेव्हांपासून तिला तीन चार पत्रें घातलीं. तरी ती आली नाहीं. अखेरीस एप्रिलच्या ३० तारखेस त्या मंडळींनीं एक माकडचेष्टा करण्याची शक्कल काढली. ती कल्पना शालिनीच्या डोक्यांतून निघाली होती. ती म्हणाली, " मी खूबच आजारी असल्याची तार करूं या. म्हणजेच ती येईल इथं. "

विजयनें ही थट्टा करणें चांगलें नाहीं असें बोलून दाखविलें. पण बहुमतापुढें त्यालाही मान तुकवावीच लागली. अखेर एका पट्टेवाल्याबरोबर उषा तेथें येऊन थडकली. सर्व थट्टा उघडकीस आल्यानंतर तिला आपल्या खाष्ट मैत्रिणीचा संताप आला. पण शालिनीला आपल्या युक्तीला आलेल्या यशाचें उलट समाधानच वाटलें.

आठ तारखेस सकाळीं पहिल्या प्रथम ' लिटल् फॉल ' नांवाच्या धबधब्यावर त्या पांचाचा स्नानाला जायचा बेत ठरला. वस्त्रें मोटारींत नेऊन ठेवतांच मंडळी जायला निघाली. इतक्यांत विश्वासही त्यांच्या मागोमाग निघाला व म्हणाला, "थांबा मी पण येतों स्नानाला. विनायकराव वहिनीजवळ बसणार. मग मीच काय करूं एकटा घरीं ? " हें त्याचें बोलणें संपतांच तो मोटारींत शिरला देखील. त्याला नको म्हणणें कोणासही शक्य नव्हतें, मात्र त्याच्या जबरदस्तीच्या हजेरीनें सर्वांच्याच कपाळावर थोड्याबहुत आंठ्या चढल्या.

गांव ओलांडतांच लष्कर लागलें. तिथेंच रस्त्याच्या बाजूस मोटार ठेऊन, मंडळी पायी चलूं लागली. लष्कराच्या विस्तीर्ण आवारांतून पायरस्त्यानें पलीकडे जावें लागे व तिथून दोनेक फर्लांग खालीं उतरतां उतरतां कांहीं वळणें घेतल्यानंतर, व कांहीं घसरंडी

करितां गजाच्या डौलदार गतीनें, त्या आडोशाच्या जागेला गेली. तिचें झांकलेलें सौंदर्यच तिच्या उघड्या सौंदर्यापेक्षां अधिक मोहक होतें. त्या दोघी वस्त्रांतर करीत बाहेर येऊन गप्पा करीत बसल्या आणि बाकीचे तिघे चांगले अर्धा तास जलकेलि करीत होते.

त्या दोघी नवख्या मैत्रिणी गप्पा गोष्टींत दंग असतांना विश्वास त्यांच्याकडे जाऊन संभवितपणे बोलू लागला. शकुंतला एक चकार शब्द बोलली नाहीं, परंतु उषेला त्याच्याविषयीं कांहीं एक माहीत नसल्यामुळें ती त्याच्याशीं मोकळेपणानें पुष्कळच बोलली.

शालिनी ज्यावेळीं पाण्याबाहेर पडली, त्यावेळीं तिला आणखी पोहावेसें वाटत होतें असें तिच्या चेहऱ्यावरून दिसत होते. ती अजून थकली नव्हती कीं तिचा उत्साह मावळला नव्हता. तिच्या उंच देहाचा प्रत्येक अवयव खेळाडू स्त्रियांसारखा दाणगट व प्रमाणबद्ध होता. पण तिची उभे राहण्याची व चालण्याची– बोलण्याची शैली तशी त्या अर्ध नग्नावस्थेतही सहजरम्य होती. ओशाळण्याचा मागमूसही ह्यावेळीं तिच्याठायीं दिसत नव्हता.

त्याचवेळी पलीकडून विजय ओरडला, " शालिनीताई थांब थोडं. आम्ही येतों तिकडे. एक शर्यत लावूं पोहण्याची."

ती थबकली. आपल्या मैत्रिणींकडे पाहून हंसली. अन् हळूंच म्हणाली, " छे बाई, पुरें झालं आतां. "

शकुंतला तिच्या संकोचाचें कारण उमगली. ती म्हणाली, " संकोच नकोस करूं. तुला पोहायची अजून हौस आहे. आम्हांला येत असतं पोहता तर आम्ही पण आलों असतों रेसमध्यें भाग घ्यायला. "

इतक्यांत ते दोघेही ह्या कांठावर येऊन थडकले. टिमथी म्हणाला, " हें पहा शालिनी, त्या बाजूला जायचं, त्या काळ्यापांढऱ्या खडकाला हात लावायचा, अन् लगेच परतायचं. इकडे जे कोणी प्रथम येईल—"

" त्याला काय देणार बक्षीस ? " उषेनें विचारलें.

टिमथी आतांपावेतों त्या मंडळींत खूब मोकळेपणानें वागायला लागला होता. तो थट्टेनें म्हणाला, " विजय पहिला आला तर त्याला बक्षिस द्यायची शकुंतला... मी पहिला आलों तर मला कांहीं एक नको...अन् शालिनीची इच्छा ती सांगेल. "

" इश्श " शालिनी हंसत म्हणाली, " हीं बरीं बक्षिसं ! "

" ए मूर्खा, त्या हिंदू मुली आहेत हें विसरलास का ? अशी थट्टा करतोस. " विजय खोट्या क्रोधभावानें म्हणाला.

" मग काय झालें ? " विश्वासनें मध्येंच तोंड घातलें, " त्यांनीं लग्नच करायचं नाहीं कीं काय?...अन् गंमत करायला काय झालं थोडा वेळ...मी देतों ठरवून बक्षिसें.

खेळाडू खेळाडू एकमेकाला द्यायचे, टिमथीला शालिनी, अन् शालिनी जिंकली तर त्याला टिमथी."

हें ऐकतांच शालिनी त्याला कांहींसें रागानें टाकून बोलणार, इतक्यांत तिचा निरुपाय झाला. टिमथी खेळाडू वृत्तीनें पुन्हां म्हणाला,

" तर मग तुम्ही व्हा रेफरी विश्वास. त्याबद्दल तुम्हाला बक्षीस शिल्लक राहिलेली उषा."

पण लागलीच उघडाबंब होऊन व धोतर वर खोंचीत विश्वास म्हणतो, "मला असं इथं बसून बक्षिस नको. मीही येतों शर्यतींत भाग घ्यायला. रेफरी करा ह्या मुलींनाच."

विश्वास चांगलाच पोहणारा होता व ह्या वेळीं अगदींच थकलेला नव्हता. तो पहिला, शालिनी दुसरी, टिमथी तिसरा व विजय शेवट असा नंबरवारीनें निकाल लागला. उषा म्हणाली, " एका स्त्रीनें दोन पुरुषांना हरविलें ! "

विजय कांहींसा रागानें म्हणाला, " पण अखेर पहिला आला पुरुषच...विश्वास तुम्हांला ही उषा आतां बक्षीस मिळेल बरं का."

घरीं आल्यानंतर जेवणें वगैरे आटोपलीं, आणि दुपारची वामकुक्षी करायला घरांत मंडळींची पांगापांग झाली. विजय गांधींच्या दांडीच्या कार्यक्रमाची ताजी बातमी वाचण्यात अगदीं गर्क झाला होता. टाईम्स, बॉम्बे क्रॉनिकल व फ्री प्रेस, हीं तिन्हीं वर्तमानपत्रें तो ऑफिसमध्यें वाचत होता. इतक्यांत शालिनी व शकुंतला त्याच्याकडे आल्या.

शालिनी म्हणाली, " विश्वासची नजर फारच वाईट आहे. त्यानें लीलाताईवर व विनायकरावावर कसा प्रसंग आणला आहे, हेंही आपणाला माहीत आहे.आपण लिटल् फॉलवर विश्वाससमोर उषेसंबंधीं थट्टा करायची नव्हती."

शकुंतला म्हणाली, " आम्ही, दोघीही बसलों होतों ना, एकीकडे बोलत, तेव्हां तो मेला आमच्याकडे आला. मी कांहीं बोललें नाहीं. पण उषेला काय माहीत त्याचा दुष्ट स्वभाव ? ती भोळी अन् फटकळ आहे. विश्वासला आतां आपल्याबरोबर बाहेर येऊं देऊं नये. नाहीं तर तो कामांध निलाजरा कांहींतरी प्रसंग आणायचा तिच्यावर ! आजच सकाळीं त्या घसरंडीवर त्याने तिच्याशीं नव्हती का केली थोडी लगट ? "

विजय काही वेळ स्तब्ध राहून म्हणतो, " पहा काय मौज आहे माणसांच्या स्वभावाची. त्या मोकळ्या वातावरणात माझ्याही जिभेनें ताळतंत्र सोडला होता. आणि टिमथीचाही राग आला आहे मला थोडासा."

" ते खिस्ती आहेत. तेव्हां त्यांना नाहीं दोष देत मी." शालिनी म्हणाली. "सहजच त्यांनीं थट्टा केली. अगदी निर्मल आहेत ते असं वाटतं, त्यांच्यावर असं पाप नका लादूं उगाच."

" छेः हो. ते मलाही आहे ठाऊक. तो फारच सत्वशील आहे. एरव्हीं का मी त्याला आपला जिव्हाळ्याचा मित्र केला असतां ? " विजय म्हणाला.

शेंवट असें ठरलें कीं, विश्वासला आमच्याबरोबर तूं येऊं नकोस असें विजयनें स्पष्टपणें सांगावें; उषेला त्याच्यासंबंधीं व लीलेसंबंधीं कांहीं एक गोष्टी कळवूं नयेत, कारण ती निर्मल व अजाण आहे, आणि विजय व टिमथी यानीं स्वतःच विश्वाससमोर थिल्लरपणाच्या थट्टा कधींही चुकून करूं नयेत.

विश्वास तंबूंतल्या पलंगावर जाऊन झोंपला होता. अडीचचे सुमारास चहाचे दोन कप हातीं घेऊन विजय तिथें गेला व त्याला उठवून म्हणतो, " विश्वासराव, उठा आतां चहा घ्या कीं? "

दोघेही चहा घेऊं लागले. कांहींतरी बोलायला सुरुवात करावी म्हणून विजयनें सहज प्रश्न केला, " काय कशी काय वाटतेय् पचमढी ? "

" वाः ! " विश्वास मोठ्यानें हंसून म्हणतो, " स्वर्गच आहे हा. पण तुम्हां सर्व मंडळीमुळें औरच मौज येते बघा. "

त्यावर आतां खऱ्या गोष्टीस आरंभ कसा करावा हा विजयला प्रश्न पडला. पुन्हा विश्वासच म्हणाला, " विनायकरावांच्या मजलशीतसुद्धा नाहीं येत ही मजा. "

" म्हणजे तिथेही कांहींतरी मौज चालते तर रोज ? " विजयनें मुद्यावर गोष्ट आणण्याचा प्रयत्न केला.

" हत् , कसली मौज ती ? विनायकरावच्या भोंवतीं गांवातल्या गुंडाची चांडाळ-चौकडीच जमलेली असते नेहमी...अन् दिवसभर त्यांच्या त्या जुनाट वाड्यात जमतो पत्त्यांचा अड्डा. मला जरा कॉलेजच्या वाऱ्यामुळे त्या टवाळाचा राग येतो. त्याची सावत्र आई माई होती घरांत तेव्हां ह्या साऱ्या भुतांना मज्जाव होता. विनायकला शिकवायला म्हणून तिनें मला मास्तर ठेविलें. पण विनायकरावांनीं लग्न झाल्यावर दिली झालं तिला हांकून. पांचसहा वर्षं लीलावहिनींच जेव्हा घरात असत, तेव्हां मी कॉलेजांत गेलों पुण्याला. अन् इकडे विनायक हा असा बिघडला. "

त्याचे स्वतःविषयीं असलेलें चांगलें मत पाहून विजयला राजेश्रीच्या स्वतःचें पाप लपविण्याचें कौतुक वाटलें. आतां हा विनायकराव व लीलेसंबंधी कसा काय बोलतो हें जाणण्याची इच्छा होऊन, विजय म्हणाला—

" विनायकरावांनी माईना कां काढले ? "

" त्याचीं कारणे सांगण्यासारखीं नाहींत. " असें म्हणून तो गप्प राहिला. पण विजयनें आग्रहच धरला तेव्हां स्वारी खुलली एकदाची. तो सांगू लागला, " माई सर्व गांवांत वाईट चालीची म्हणून प्रसिद्ध. तिनेंच विनायकला कांहीं वाईट वाईट खायला देऊन अगदीं अशक्त करून ठेविलें. आणखी चोंहीकडे तो षंढ आहे अशी अफवा उठवून, दत्तक घेण्याचा बेत रचला ! "

" मग खरोखर विनायकरावांत असा कांहीं दोष नाहींना ? " एकदम विजयनें विचारलें.

" तें मला हो काय माहीत ? " विश्वास खो खो हंसून म्हणाला, " पण हें खरं असतं तर वहिनींना मूल कसं झालं असतं सांगा पाहूं ?"

विजयला त्याचें हें बोलणें ऐकून एका बाबतींत समाधान झालें. तो स्वतः लीलेचें गोप्य फोडूं चाहत नाहीं हें कळलें. विजय अजूनही स्तब्धच होता. पुन्हां विश्वास खिदळत म्हणतो,

" आतां विनायकरावांच्या गुंडांपैकीं कुणाच्या ह्या लीला असतील तर कोण जाणें !"

विजयला जर लीलेच्या दुर्भाग्याची सत्यकथा आधींच माहीत नसती तर ह्या विश्वासच्या बोलण्यानें तो एकाएकी संतापला असता. पण आतां शांतपणें त्यानें वकिली डावपेंच लढवून विश्वासच्या मनाचा ठाव घेण्यासाठीं पृच्छा केली,

" लीलेकडून आम्हाला सारें कळलें आहे तो बदमाष कोण आहे तो. तुमचाच कबूली-जवाब द्यायला आहे तुम्हाला धैर्य ? "

विश्वासची हास्यगर्जना एकाएकी विलीन झाली. तो खजील होऊन अधोमुख झाला !

आतां विजयनें त्याच्यावर प्रश्नांचा भडिमार केला, " झालें तें झालें आतां. पण तुम्ही चांगलेच व्हिलेन आहांत हेंही कळलें. आतां दोघांचाही तुम्ही जन्मभर पिच्छा पुरविण्याचा बेत केला आहे ना ? "

कांहीं वेळ विश्वासच्या तोंडून शब्दच निघेना. विजय दटावून म्हणाला, "विनायक-रावला तुमच्याविरुद्ध फौजदारी काढतां येते व त्यांच्या पत्नीशीं अनीतिकारक संबंध ठेविल्या-मुळें तुम्हाला शिक्षा होऊं शकते. हा कायदा तुम्हाला माहीत असलेला दिसत नाहीं. " पुढें भीतभीतच हलक्या आवाजात तो बोलू लागला, " मी असा धाक त्या दोघांना घातला होता खरा. पण त्यांत मीं विशेषशीं चूक केली नाहीं. मी स्वार्थी होतों. गरिबीमुळें मला लग्न करिता येत नव्हतें. विनायकराव मला पैसे देतो. त्याचीच अशी इच्छा दिसते कीं त्याच्या अब्रूच्या बचावासाठीं व वहिनींच्या—तुम्ही रागावाल तुमच्या भगिनीसंबंधीं मीं कांहीं कटु सत्य सांगितलें तर—"

" बोला मोकळेपणानें. मी रागावणार नाहीं " विजयनें आश्वासन दिलें.

" पहा तुम्हाला वाईट वाटलं माझ्या बोलण्याचं तर मी जबाबदार नाहीं···वहिनी तरुण आहे. ती उगाच बाहेर भलतें सलतें करील अन् बभ्रा होईल, म्हणून माझ्याशीं आतां एकदां तिचं जे कांहीं व्हायचं तें झालंच आहे, मग आता तसेंच आयुष्य तिनं माझ्याशीं काढलं तर बभ्रा तरी होणार नाही उगाच, अशी माझी स्वार्थी अन् व्यावहारिक दृष्टि ! "

विजयला त्याच्या दृष्टींतही कांहीं विचार असलेला पाहून, विश्वासला सन्मार्गाला

लावायची आशा वाटूं लागली. लीलेनें केवळ मुलासाठींच व विनायकरावाच्या मूर्खपणाच्या हट्टासाठींच, एकदांच काय तो तुमच्याशीं असला अनैतिक संबंध केला व पुढें तिला पाप करण्याची आतां इच्छा नाहीं असें विजयनें सांगितलें. त्यावर विश्वास म्हणतो.

"मला ह्या वहिनीच्या सांगण्यांत कांहींच अर्थ दिसत नाहीं. अहो हा गर्भ माझ्या पोटचा कसा असूं शकेल ? तिचें हें पाप माहेरचेंच आहे. तारुण्यांत कुणीही जिथें राहील तिथें शेण खाईल."

विश्वासचा तर्क बरोबर होता, पण त्यानें तेवढ्यावरून ठोकून दिलेलें लीलेविषयींचें मत कसें चुकीचें आहे, हे पटवून देण्यासाठीं विजयला मागच्या सर्व गोष्टींचा त्याच्यापुढें कारुण्यजनक पाढा वाचावाच लागला. ही सर्व हकीकत ऐकतांच विश्वास म्हणतो, "अरेरे, काय बिचाऱ्या वहिनींचें हें आयुष्य ? मला तिची कींव येते. अन् माझाही आतां संताप येतो...पण-पण विजयराव ! माझ्या समजुतीमुळें अन् एकाकी आयुष्यामुळें माझंही स्खलन नैसर्गिकच होतं नाहीं का ?...मला आपण क्षमा करा. मी आतां त्यांना कुणाला त्रास देणार नाहीं. विश्वास वाटेल का तुम्हाला माझ्या ह्या आश्वासनाचा ?"

विश्वासच्या हृदयांतही सात्विकतेचा ओलावा आहे हे लक्षांत येतांच, त्याचेविषयींचें विजयचें मत अजिबात बदललें. त्याच्या मनाला त्यावेळीं लीलेवरील संकट निवारणाचा अननुभूत आनंद होऊन त्यानें त्याची पाठ थोपटली व म्हटलें, "तुमचें नांवच मुळीं विश्वास आहे. तुमच्यावर कोण नाहीं ठेवणार विश्वास ?...थोर थोर माणसांच्या आयुष्यांतही त्यांच्या हातून तुमच्यापेक्षांही वाईट अघोर कृत्यें होतात. त्या मानानें तुमचा अधःपात क्षम्यच वाटतो."

विश्वासला विजयच्या क्षमाशील अंतःकरणाची साक्ष पटून तो किंचितसा हंसून म्हणतो, "माझाही हा Little Fall च झाला होता म्हणतां !"

---

२०

# जटाशंकरापुढील पाणिग्रहण

तंबूत झालेला हा वादविवाद शालिनी व शकुंतला बाहेरून ऐकतच होत्या. तेव्हां अशा रीतीनें त्यांची विश्वाससंबंधीचीं मतें थोडीशीं निवळलीं. टिमथीला लीलेची आख्यायिका अगदीं बेताचीच माहित असल्यामुळें, विश्वासविषयीं त्याचें कांहीं एक वाईट मत असण्याचें कारण नव्हतें. उषेला तर अगदींच कांहीं ठाऊक नव्हतें!

चारचे सुमारास जेव्हां मंडळी जटाशंकरास जाण्यासाठीं मोटारींत बसली, तेव्हां विश्वासला त्यांच्याबरोबर जाण्यास आतां संकोच वाटूं लागला. आणि मंडळीनें जेव्हां आग्रहच केला तेव्हां तो त्यांच्याबरोबर गेला.

एक दीड मैलांतच मोटार थांबविण्यांत आली, कारण रस्त्याचे उजव्या बाजूस जटाशंकराची पाटीच दिसली.

दोन उंच कड्यांतून ती पायवाट गेली होती. शिलाजिताचे ते पांढुरके कडे, त्यानंतर पलीकडच्या डोंगरांतील कप्प्यांत रहात असलेलीं तीं दोनतीन जंगलीं कुटुंबें, उत्तरेकडे पुन्हां रस्त्याचे समांतर रेषेंत गेलेली ती खडकाळ वाट, नंतर लागलेलें लिंबाचें रान, हा निसर्गदेवतेच्या मंदिराचा पहिला टप्पा गांठतांना मंडळीला विशेष बोलणें सुचलेंच नाहीं! इतक्यांत एक शेळी बांधलेली पाहतांच, शकुंतला उद्गारली, " इथं कशाला रानावनांत बांधून ठेविलें आहे बिचारीला?"

टिमथी म्हणाला, " वाघासाठीं ताट वाढून ठेविलें आहे हें!" शकुंतला आश्चर्यानें विचारते, " अगदीं इतक्या वरपर्यंतही का येतो वाघ?"

विजय म्हणाला, " घाबरूं नकोस. रात्रीं येतो तो. अन् आतां आलाच तर हें बघ ही उंच टेकडी चढली कीं आपण रस्त्यालाच लागतों पुन्हां. आणखी ही समोरची चढून उजव्या बाजूस उतरलें कीं थेट ' गरुडध्वज ' महालाजवळच जाऊन पोंचतों."

शालिनी म्हणाली, " मग इतका द्राविडी प्राणायाम कशाला घेतलांत?"

टिमथी म्हणाला, " हे उतार तुम्हा स्त्रियांना नसते उतरतां आले. म्हणून आता परत येतांना जाउं या ह्या जवळच्या वाटांनींच चढून. "

" पण मोटार तिकडे आहे ना लेका." विजयनें आठवण दिली.

आता पश्चिमेकडे ती खडकाळ वाट वळली. सूर्य अजूनही बराच वर होता, पण थोड्याच वेळांत ती मंडळीं इतकी खालीं खालीं उतरत चालली कीं आजूबाजूच्या उत्तुंग कड्यांमुळें, व किर्र झाडीमुळें, एकाएकी सूर्यास्त झाल्यासारखेंच वाटलें. तरी त्या वाटेची चांगली व्यवस्था ठेविलेली असल्यामुळें मुलींनाही उतरतांना विशेषसा त्रास झाला नाहीं. अडचणीच्या जागीं चार दोन पायऱ्याही बांधलेल्या होत्या. गार वारा सुटला होता, व त्या दाट वनराईमुळें शांत सायंकालीन प्रकाशाचा भास होत होता. आजूबाजूच्या उत्तुंग कड्यांवर मोठमोठाले दगडावर दगड निसर्गानें रचून ठेवलेले दिसत होते. इतके तऱ्हेतऱ्हेचे वृक्ष व रंगारंगाचे पक्षी ह्या नागर मंडळींना नेहमी कशाला दिसतात? टिमथी पक्षांवर गोळ्या झाडत चालला, तर इतरांनीं आंब्यांवर दगड मारण्याचा सपाटा सुरू ठेविला. एका कड्याला एक प्रचंड मधाचें पोळें दिसलें.

जटाशंकराचें शीतल स्थान येतांच प्रथम पुजाऱ्याची झोंपडी लागली. तो हिंदींत वाघासंबधींच्या अनेक गोष्टी सांगू लागला. त्याच्या झोंपडीला एक लहानसेंच छिद्र हवा येण्यासाठीं ठेविलेलें होतें हें खरें. पण त्या एकांतवासांत रात्रीचा तो वन्यपशूंच्या सहवासांत राहतो, हें त्याचे धैर्य पाहून मंडळीस फारच कौतुक वाटलें. तिथून खालीं उतरायला एक उंच लांब लोखंडाची शिडी आहे. शिडीखालचा ओटा चांगलाच विस्तीर्ण आहे. ओट्यावरून उतरून पुन्हां शिडीखालून एक प्रचंड गुहा लागते. त्याच्या आंत अंधार असून नदीचें खोल खोल पाणी आहे म्हणतात. ह्याच गुहेंतला प्रवाह जटाशंकराच्या लगतच्याच गुहेंत गेला आहे. महादेवाच्या मोठ्या निसर्गनिर्मित पिंडीवर सारखे पाणी टिपकत असतें व आजूबाजूस स्वयंभू पिंड्याच पिंड्या आहेत. गुहेंत बराच अंधार आहे. दिव्याच्या साहाय्यानेंच दर्शन घ्यावें लागतें! विद्युत्दीप काय तो विजय जवळच होता म्हणून तो प्रथम आंत गेला व मागोमाग मंडळीही गुहेंत शिरली. पायाला लागणाऱ्या पाल्यापाचोळयामुळें, गिचपिच जागेमुळें, वरून अखंड निथळणाऱ्या थेंबांमुळें,व थोड्याशा अंधारामुळें, मनाला आंत जातांच मोठेसें प्रसन्न वाटत नाहीं. बटनावरचें बोट सैल झाल्यामुळें दीप मध्येंच विझतांक्षणींच त्या तरुणींची विलक्षण गाळण उडून, त्या भीतिग्रस्त होऊन कुणाकुणाच्या तरी आसऱ्याला गेल्या. विजयनें पुन्हां दिवा लावून पाहिलें तों पुरुषांच्या इतक्या निकट गेलेल्या त्या तरुणी एकाएकी चपापून दूर सरल्या.

मंडळी पुन्हां बाहेर येतांच टिमथीनें हातांतल्या घड्याळाकडे पाहिलें व तो म्हणाला, " चला, पचमढीकडच्या जुन्या वाटेनें जरा आणखी थोडें जाऊन परत येऊं. "

" मी बसतें बाई इथेंच " शकुंतला ओट्यावर बसत म्हणाली.

" वाघाला घाबरतात की काय ह्या माऱ्या मुली ? " टिमथी हंसत म्हणाला.

" आम्ही नाहीं घाबरत मुळींच, चला. " उषा फुशारकीनें उद्गारली.

टिमथी, विश्वास, उषा, शालिनी व विजय जाऊं लागले. शकुंतलेला सर्वांनी आग्रह केला, पण तिनें दमल्याचें सांगितलें व " मी इथं एकटी राहतें. तुम्ही जा सारे. " असेंही ती बोलली. शालिनी तिच्यासाठीं मागें राहण्यासाठीं थबकणार तोंच विजय म्हणाला, " तुम्ही चौघेच जा. मी राहतों इथं शकुंतलेसाठीं. " तेव्हां मंडळी त्या दोघांना तिथेंच सोडून चालती झाली.

आता प्रकाश अधिकच मंदावला होता आणि आपापल्या घरट्याभोंवतीं चिमण्या पक्षांचे थवे किलबिल किलबिल करूं लागले होते. त्या ओढ्यावरून दिसणारें आकाश त्या ओढ्याइतकेंच विशाल होतें. उंच उंच कड्यांना मधमाशांचीं मोठमोठालीं मोहळें लागलीं होतीं. वटवृक्षाच्या मोठमोठाल्या जटा निश्चल होत्या, तर विशाल आम्रवृक्षांचीं हिरवट फळें वाऱ्यांच्या झुळकांना माना डोलवित होतीं. कांहीं पांखरें शीळ देत, कांहीं टुणटुण उड्या मारीत चिंव चिंव करीत, कांहीं ' जक् जक् ' ' पुइ पुइ ' ' टुट् ' असे तऱ्हेतऱ्हेचे आवाज काढीत; तर एखादी चुकलीमुकली कोकिळा मधून मधून त्या कटु संगीताला आपल्या ' कुऊ कुऊ 'ने गोड गोड साथ देई. मुंगळे, खारी, सरडे इत्यादि चिमुकले प्राणीही धांवपळ करतांना दिसत. पलीकडच्या झाडींतून एक कोल्हा निघाला व कान टवकारून, डोळे वटारून, शेपटी ताठ करीत पसार झाला.

पण त्या पशुपक्षाच्या, वृक्षवेलींच्या, ' आ ' वासलेल्या गुहांच्या, व तटस्थ पर्वतशृंगाच्या सान्निध्यांत विजय शकुंतलेला अभूतपूर्व एकांतवास लाभला. त्या किलबिलाटांतही त्यांना शांत शांत वाटलें.

" मला ह्या पुजाऱ्याचा हेवा वाटतो. " शकुंतला त्या शांतिसुखामुळें वाटणाऱ्या प्रसन्नतेनें म्हणाली.

विजय किंचितसा हंसला व म्हणाला, " वाघोबाची वक्रदृष्टि होत नाहीं तंवरच ना? "

" खरंच " शकुंतला म्हणते, " आपण किती क्षणभंगुर आहोत नाहीं का ?...एकाएकीं जर एखाद्या वाघानं मला नेलं, तर क्षणापूर्वींची शकुंतला कुठं जाईल ? "

त्या तिच्या उद्विग्न पण स्वाभाविक विचारानें विजय हळुवारपणें म्हणाला, " असं बोलूं नकोस. आपण कांहींतरी चांगल्या कल्पना नेहमीं कराव्या. "

"इथं भयंकर विचार येतात खरे, पण मनाला किती मोकळें मोकळें वाटतें नाहीं का?" हा साधा प्रश्न विचारतांच तिचे टपोर डोळे पाण्यानें एकाएकी भरून आले! नंतरचे कांहीं मुके क्षण विजयला भेसूर भेसूर वाटले! तो घुटमळत म्हणाला, " पांखरांना आपणासारखं बोलतां येत नाहीं, तरी त्यांची एकशब्दी भाषा कितीतरी अधिक प्रभावी वाटते नाहीं का?

...आपणाला बोलता येत असूनही आपलीं अंतःकरणें ह्या गुहांसारखी अंधारांत गुडूप झाल्यासारखीं वाटतात."

"का बरं?" शकुंतलेनें प्रश्न केला, "माणसंच एकमेकांला सर्व तऱ्हेचे भाव व्यक्त करूं शकतात नाहीं का?"

"करूं शकतात," विजय म्हणाला, "पण कपटामुळे करीत नाहींत."

"सर्वच माणसं का कपटी असतात?" शकुंतलेनें विचारलें.

"एकजात सारीं" विजय ठामपणें उद्गारला, "मला एकही मनुष्य मुलांप्रमाणें स्पष्टवक्ता आढळला नाहीं."

"अगदीं महात्मा गांधीसुद्धां?"

"थोरामोठ्यांसंबंधीं मला बोलायचा अधिकारच नाहीं. मी साधारणतः आपल्या ओळखीच्या माणसांसंबंधीं बोलतों आहे."

"मी पण वाटते तुम्हाला कपटी?" शकुंतलेनें बालकाच्या निर्व्याज्यतेनें पृच्छा केली.

"होय तूं पण वाटतेस." विजयनें स्पष्टपणें जबाब दिला.

"मी कधी कपटभाव दाखविला बाई?" लडिवाळपणें तिनें शंकित झाल्यासारखें दाखविलें. ती आठवल्यासारखें करूं लागली.

"नाहींच तुला आठवायचें कधींच. तूं एम्. ए. होऊन शिक्षकिणीचा पेशा स्वीकारणार असं लिहिलं होतंस ना मला?"

"होय."

"तुझ्या चित्रांतला माझा चेहरा तुला आपोआप कसा जमला हें तुझं तुलाच नाहीं कळलं नाहीं ग लबाडे?"

विजयची ती सौम्य शिवी तिला गोड गोड वाटली. ती बालिशतेनें म्हणाली, "त्यांत बाई मीं कसलं कपट केलं?"

"मला नाहीं तुझ्याशा बोलण्याची इच्छा." विजय रागावलाच एकाएकीं.

"राग का येतो माझ्या बोलण्याचा. बरं तर राहते उगी." तिनें आपली दृष्टि दुसरीकडे वळवली.

"तुझे डोळे मोठे आहेत, पण कांहीं कामाचे नाहींत!"

कांहीं वेळ मुग्ध राहून, शकुंतलेनें हळूंच त्याच्याकडे दृष्टिक्षेप करून म्हटलें, "मला वाटतं जर एखादा वाघ आला, तर तो माझ्या वटारलेल्या डोळ्याला पाहूनच पोबारा करील नाहीं?"

"तुझे डोळे लबाड आहेत!"

" मलाच एकदां लबाड ठरविलंत ह्यांत मारं कांहीं आलं. "

" तूं कांहींएक कपट करीत नाहींस माझ्याशीं ? मांग स्पष्ट. "

" मला तुमच्या बोलण्याचा अर्थच नाहीं कळत. "

" पण मला तुझ्या अशा वागण्याचा कळतो. "

" मीं काय बरं केलं असं आतां ? "

विजय आतांपावेतों तिच्यासमोर उभा होता, तो तिच्या बाजूस जाऊन बसला.

" तूं अविवाहित राहण्याचा आपला बेत मला लिहिला होतास—"

आपल्या पदराला गाठ मारीत अधोमुख शकुंतला म्हणाली,

" अर्धेच लक्षांत राहिलं तुमच्या ! "

" तुझं जन्मरहस्य माहीत असूनही कोणी तुझ्याशीं लग्न करायला तयार असेल, तरच तूं विवाहबद्ध होशील हेंच ना ? "

शकुंतलेनं किंचित्‌शी 'हो' कारार्थी मान हलविली. तिच्या पायाचीं नखें आतां जमीनीवर कांहीं अस्पष्ट चित्रें रेखाटत होतीं.

'असा कोणी मिळेल असं नाहीं का वाटत तुला?' ती दुसरीकडे मान वळवून निश्चल–निस्तब्धच राहिली.

'बोल ना ग कांहींतरी.' पुन्हा त्यानें काकुळतीचा प्रश्न केला. तरी तिनें हूं कीं चूं केलं नाहीं.

'शकू, मी वाटतो का तुला कपटी ?' विजयनें हंसत विचारलें. तरी तिला वाचा फुटली नाहीं. मात्र तिनें पुन्हां त्याच्याकडे पाहिलें व ओशाळत मधुर स्मित केलें.

'मूकतेचा अर्थ संमति होतो.' विजयचा आवाज घोंगरावला.

'मला आजवर नव्हता वाटत तुम्हीं कपटी !' शकुंतलेचे हे बोल किती अस्पष्ट होते !

'काय म्हणालीस ?'

'कांहीं नाहीं.'

पाटाच्या पाण्याला आतां निर्झराचा स्वच्छंदपणा आला. त्यानें एकदम विचारून टाकलें, 'मीच तुझ्याशीं लग्न केलें तर तुला आवडेल ?'

तिनें यावर जो शांत दृष्टिक्षेप केला, त्यांत गंगेचें पावित्र्य, सागराचें गांभीर्य, हिमालयाचें औदार्य, आकाशाचें अनंतत्व, भूमीचें दान, चंद्राचें शीतल तेज, जलवाहिनीची अधीरता, जलदाचें ऋणमोचनत्व, सारें ब्रह्मांड एकवटल्यासारखें विजयला वाटलें. आणखी तिनें उत्तर तें काय द्यायचं होतं ? पण त्याच अर्थाचा प्रश्न त्यानें आणखी दोन चार वेळां विचारतांच, दूरच्या कड्याकडे निश्चल दृष्टीनें पाहात शकुंतला म्हणाली,

"मूकतेचा अर्थ संमति असा होतो ना ?" पण हे शब्द तोंडांतून निघण्यापूर्वीच ती इतकी लाजली कीं तिनें आपल्या तोंडाला पदराचाच आसरा घेतला. बराच वेळ त्या मूक अवस्थेत तो तिच्याकडे अनिमिष नेत्रांनीं पाहत होता, तर ती एकाद्या मूर्तीप्रमाणें त्याच अवस्थेंत अगदीं निश्चल राहिली. तिच्या वेणीच्या टोंकाची फीत त्यानें आपल्या हातीं घेतली. तों ती जराशीं दूरच सरली. इतक्यांत वाघाच्या अस्पष्ट गंभीर गर्जनेनें त्यांच्या सुखतंद्रीचा एकाएकी निष्ठुर भंग केला.

विजय चपापून म्हणाला, "तूं ऐकलीस गर्जना ?"

ती शांतपणें म्हणाली, "ऐकली. पण मला आतां वाघाचं नाहीं वाटत भय."

तो एकाएकी उठला आणि घाईत म्हणाला, "ऊठ वेडे लवकर. त्या झोंपडींत चल." अगदीं मोकळेपणानें तिचा हात आपल्या हातीं घेत त्यानें तिला उठविलें. ती शिडी चढून दोघेही वर गेलीं, व झोंपडींत पाय ठेवतांच विजय म्हणाला, "तूं बैस इथं."

"आणि तुम्ही ?" ती चिंतेनें म्हणाली.

"अग, तीं चौघें गेलीं आहेत, तिकडूनच आला आवाज त्यांच्यावर काय संकट येतें तें बघायला नको का ?"

"मग मी पण येतें तुमच्याचबरोबर." ती पुन्हां परतण्यासाठीं अधीर झाली.

पुजाऱ्यानें हिंदींत विचारलें, "तुम्ही काय करणार जाऊन ? ते चौघे तरी आहेत. अन् बंदूक आहे त्यांच्याजवळ. तुम्हाला मात्र वाघ एकटेच पाहतांना झडप घालायचा एखादा."

"मग आतां काय करायचं ?" विजय घाबरून उद्गारला. "बसा स्वस्थच इथं झालं. इथले वाघ माणसांच्या वाटेस जात नाहींत सहसा." पण असा धीर देऊनही त्यानें आपल्या झोंपडीचें दार मात्र घट्ट लावून घेतलें.

दोघेही नाइलाजानें झोंपडींतच बसलीं. काळजीनें त्याच्या जिभेतून शब्दही फुटेनासा झाला.

इतक्यांत विश्वासच्या मोठमोठ्यानें हांका ऐकूं आल्या. आपल्या बलवान् हातावर उषेला आडवी घेऊन विश्वास धावतच येत होता. ओट्यावर तिला त्यानें खालीं ठेविलें व तो म्हणाला, "आतां चढून जा तुम्ही वर लवकर." तरी उषेच्यानें एक पाऊलही पुढें टाकवेना. त्यानें तिला साहाय्य करून झटकन् शिडीवरून वर चढविलें. विश्वासनें घाईतच पुजाऱ्याला विचारलें, "तुमच्याजवळ कुऱ्हाड आहे का ?" त्यानें त्याला एक कुऱ्हाड दिली व विजय त्याचा दंडा घेऊनच त्याचे मागोमाग गेला. दोघेही भराभर पावलें टाकीत टिमथी व शालिनीच्या वाटेनें चालली होतीं. विजयनें विचारलें,

"कुठें आहेत हो तीं दोघें ?"

"अहो उषाबाईनें केला सारा घोंटाळा. थोडें चालून गेल्यावरच परतते म्हणाली. टिमथीही पडला छांदिष्ट, तो म्हणाला मी पुढें जाणार. अन् त्याच्याचबरोबर शालिनीबाईही

जाऊं लागल्या. पुढें पुढें उषाबाई थबकून, एकट्याच परतलेल्या पाहून मी त्यांची सोबत करायला नाइलाजानें परत फिरलों. चांगले गप्पागोष्टी करीत संथपणें परत येत होतों. तोंच वाघोबाची गर्जना ऐकली. उषाबाई अशा कांहीं घाबरल्या म्हणतां! गबकन् खालींच बसल्या. तोंडचं पाणीच पळालं त्यांच्या. अखेर त्याना उचलून आणावं लागलं मला."

आणखी दोनशें पाऊलें त्यांनीं टाकलीं तेव्हां त्यांना टिमथी व शालिनी ऐटींत संथपणें येत असलेलीं दिसलीं. टिमथीच्या हातीं एक अर्धमेला पक्षी होता. तीं दोघें जवळ जवळ येतांच विजयनें त्याला इंग्रजींत पृच्छा केली, "वाघाची गर्जना नाहीं ऐकूं आली तुम्हाला?"

"Damn that tiger" टिमथी म्हणाला, "My gun is a match for such ten wretches." तो पुढें नेहमीप्रमाणं इंग्रजींतच म्हणतो, "अरे विजय, ह्या शालिनीला माझी कोंकणी मातृभाषा येते थोडी थोडी." आतां आणखीच आंधार पडत चालला होता, वाघाची भीति होती, तरी त्यांचें तें निर्भय वर्तन पाहून विजय त्याला म्हणाला, "चल मूर्ख कुठला! जाळ ती तुझी मातृभाषा." सर्व मंडळी परत फिरली. आणखी पुढें चालून येतांच वाघाची आणखी एक गर्जना ऐकूं आली.

टिमथीनें हंसून म्हटलें, "अरे ही गर्जना ऐकून भ्यायला का लागलास? इथून चांगली मैल दोन मैल असेल वनराजांची स्वारी. त्यांची पहाट झाली म्हणून हें जांभया देणें चाललं आहे त्यांचें उठतांक्षणींच. अजून आपल्या महालाबाहेर कांहीं पडली नाहीं स्वारी."

विजय म्हणाला, "ए, थट्टा काय करतोस ह्यावेळीं? चल झपाझप पाउलें टाकीत आतां."

टिमथी म्हणाला, "हात लेका. भितोस कीं काय? तुझा सविनय कायदेभंग कर वाघोबापुढं म्हणजे झालं!"

विजय म्हणाला, "अरे पण मुली नाहींत कां आपल्या बरोबर? त्यांना सुखरूपणें घरीं पोंचवायची जबाबदारी नाहीं का आपल्यावर?"

"वाघोबा कांहीं स्त्रियांनाच पळवून नाहीं नेत." टिमथीनें थट्टा केली. सर्वांनाच हंसू आलें.

अगदीं वर चढून त्या बांधलेल्या शेळीजवळ जेव्हां मंडळी आली, तेव्हां कुठें संध्याकाळची तांबुस छटा क्षितिजावर विलसत होती. पण खालीं चढत असतांना त्या सर्वांनाच वाटलें कीं रात्रीचा काळोखच जणुं पडूं लागला होता.

टिमथी म्हणाला मी अगदीं जवळच्या रस्त्यानें हा खडक चढून महालाचें दाराशीं उतरणार. शालिनीनें लागलीच त्याचे अनुकरण करायला आरंभ केला. पूर्वेकडचा उंच

चढाव चढून विश्वासनें एकदम रस्त्यावर जायचें ठरविलें. उषा लगलीच त्याचे मागोमाग चढूं लागली. तो म्हणाला, "तुम्ही आपल्या सरळ वाटेनेंच जा कशा! नाहींतर तुमचे पाय पुन्हां लटपटायला लागतील." तरी उषा विश्वासच्याच मागोमाग चढूं लागली.

मोटारसाठीं म्हणून आलेल्या लांब रस्त्यानें विजयला जावेंच लागलें. शकुंतलेनें अर्थातच त्याची सोबत केली.

ती कपाऱ्यांतलीं गरीब कुटुंबें पुन्हां दिसतांच शकुंतला म्हणाली, "वाघाबिघाची यांना बिचाऱ्यांना कशी नाहीं भीति वाटत कुणास ठाऊक!"

"ते बिचारे जिवावर उदार असतात नेहमीं, अन् कुऱ्हाडीनं मुद्दां वाघाशीं झुंज खेळतात तसा प्रसंगच आल्यास."

मोटारींत बसतांना शकुंतला नेहमीप्रमाणें मागें बसूं लागली, तेव्हां विजय म्हणाला, "आतां सारं ठरल्यावर काय हरकत आहे माझ्याजवळ बसायला?"

पण शकुंतला काहीं एक उत्तर न देतां मागेंच जाऊन बसली.

इकडे विश्वास थोडासा थबकला व उषा त्याच्या बरोबरीला येतांच पुन्हां चढूं लागला. चढाव बराच कठीण होता. मधून मधून त्याला आपल्या मजबूत हाताचा आधार उषेला पुन्हां द्यावाच लागला. तेव्हां तो म्हणाला,

"म्हणूनच मी म्हणत होतों तुम्ही नीट वाटेनेंच जा म्हणून." पण तिकडे लक्ष न देतां उषेनें त्याला प्रश्न केला,

"मघाशीं तुम्ही मग मला तुमचं कॉलेज सोडण्याचं कारण सांगत होतां तें तसंच राहिलं.'

"आतां राहूं द्या झालं. काय करायच्यात त्या मागच्या गोष्टी?"

"मग नोकरी कां करतांहात जळगांवला?"

"अहो कसली नोकरी न् काय? बेकार आहे मी."

"मग कॉलेजांत शिक्षण तरी पुरतं करायचं होतंत."

"त्याचं असं झालं, माझे वडील वारले, अन् डोलाराच ढांसळला सारा... यानंतर पैशावांचून शिक्षणबिक्षण काय होणार कपाळ?"

"कुणी दुसरं नाहीं वाटतं मदत करायला?"

"कोण करतो मदत कुणाला आतांशा?"

"मग पुण्याला शिकवण्या वगैरे करून कसेंबसें शिकायचं होतंत."

"छे: पुण्याला नाहींच जमायचं आतां. नाशकाच्या कॉलेजांत तुमच्या वडिलांच्या वशिल्यानं जर फ्रीशिप मिळाली, तर जमण्यासारखं आहे थोडसं. कारण तिथं आमचे चुलत काका असतात. त्यांच्या घरींच राहीन मग. अन् शिकवण्याबिकवण्याही पाहीन जमल्यास."

"मी अवश्य सांगेन तात्यांना ह्यासंबंधीं. पण तुम्ही हा विचार नक्की करायला पाहिजे आधीं. आमच्या प्रभालाही शिकवणी ठेवायची आहे एक."

"मी कळवीन तुम्हाला विचार करून एक दोन दिवसांतच."

ह्याच वेळीं टिमथी आणि शालिनी यांचें मार्गक्रमण चालू असतांना तीं हंसत खेळतच इंग्रजी व कोंकणी भाषेंत बोलत होतीं.

"विजय किती भ्यायला होता मघाशीं पाहिलंस शालिनी."

"मग वाघाची भीति कुणालाही वाटेल जंगलांत."

"मी नाहीं भ्यायलों तो."

"तुम्हाला बंदुकीची मोठी घमेंड आहे. पण असलें भलतें धाडस मोठें Dangerous आहे."

"रूथ गेल्यापासून मला मरण्याची भीतीच वाटत नाहीं." शालिनी काहींच बोलली नाहीं. पुन्हां तोच म्हणाला,

"सर्व हिंदू मुलींत तूंच मला धीट दिसतेस."

"अशा किती हिंदु मुली पहिल्या आहेत तुम्ही टिमथी?"

"कां बरं चौघी पाहिल्या आहेत ना आतां?"

"मग ह्या चौघीत मी ज्यास्त धीट आहे येवढंच ना?"

"अग आम्हा ख्रिश्चन मुलींतसुद्धां तुझ्यासारखी धीट मुलगी एखादीच."

"रूथ कशी होती?"

"तिच्याविषयीं कृपा करून काहीएक विचारूं नकोस मला पुन्हां."

दोघेही कांहीं काळ स्तब्ध झालीं. त्या टेकडीच्या माथ्यावर चढून गेल्यावर चोंहीकडे अंधार पडला होता. तरी ते दूरवर पसरलेले विशाल भुरसट डोंगर, त्यांच्यावर क्षितिजानें रंगविलेली एक चंदेरी रेषा, खालीं 'आ' वासून पसरलेल्या विशाल काळ्याकभिन्न दऱ्या यावेळींही दिसतच होत्या.

"बसूं या जरा इथंच." टिमथी म्हणाला.

"नको जाऊ आतां." शालिनी म्हणाली.

"का भय का वाटतं तुला?"

"होय भय वाटतं खरं. पण तें वाघाचं नाहीं. आपल्या घरांतल्या मंडळीचा जीव आपल्यासाठीं टांगला जाईल म्हणून." वर आकाशांत चांदण्या चमचम चमकत होत्या. दूरवर दऱ्याखोऱ्यांतून वांगलें चारपांच स्थळीं चांदण्यापेक्षांही जास्त तेजःपुंज असें कांहीं तरी चमकतांना मधून मधून दिसत होतें.

" काय आहे तें ? " शालिनीनें विचारलें

" अग वाघाचे डोळे आहेत ते. पण भिऊं नकोस. खूब लांब आहेत इथून. ते देताहेत ताऱ्यांना तारा ! "

"तुमच्या तारायंत्राच्या खात्यांतल्या नोकरीमुळं किती चांगली कल्पना सुचली तुम्हाला."

" अग मी आहे ठोंब्या एक . कॉलेजांत कधीं शिकलों नाहीं. " इतक्यांत दक्षिणेकडे अगदीं जवळ वाघाचे दोन डोळे शालिनीला दिसले. ती घाबरली.

" अग, मोटारीचे दिवे आहेत ते. " टिमथी खो खो हंसून म्हणाला, आणि त्यानें तिच्या खांद्याला मृदु स्पर्श करीत म्हटलें, " उगाच धीट म्हटलें मीं तुला. भित्री आहेस तूंसुद्धां. "

२१

# निराशेंतून उदय पावलेल्या आशा

त्यानंतर आठ दिवसांत आमच्या तरुण मंडळीचा कार्यक्रम असाच जवळ जवळ ठरल्यासारखा झाला होता. सकाळचे वेळी 'लिटल् फॉल्', 'बी फॉल्', 'बिग् फॉल्', 'फेअरी पूल', इत्यादि ठिकाणीं स्नानाला जावयाचें, तर सायंकाळीं धूपगड, पॅनोरमा हिल, बाबू हिल, सरकारी बगीचा, हंडीकोह, पंचमठ हीं पांच लेणीं, छोटा महादेव इत्यादि तऱ्हेतऱ्हेच्या प्रेक्षणीय स्थळी सहल करावयाची. सारे आठच दिवस! परंतु शहरातल्या राहणीच्या तीस वर्षांत जो एकमेकाविषयींचा विशेष परिचय व्हावयाचा नाहीं, तो यक्षिणीच्या कांडीप्रमाणें इथें येवढ्या अल्पावकाशांत झाला.

निसर्गाचें ते विविध सौंदर्य त्यांच्या मनाला प्रारंभीं वेड लावूं शकलें होतें, परंतु लवकरच सृष्टीच्या वैचित्र्यांतही एक तऱ्हेचा तोच तो पण त्यांना वाटूं लागला. निसर्गदेवी आतां मदतीस मात्र राहिली. ठिकठिकाणीं केलेल्या जलक्रीडेमुळें त्याच्या एकमेकाच्या शरीराचे नाममात्र वस्त्रांकित अवयव एकमेकाच्या पूर्ण परिचयाचे झाले अनेक आकस्मिक संकटामुळें स्त्रीपुरुषास परस्पर स्पर्श करणें भागच पडलें, अनेक वेळां मंडळीची फाटाफूट होऊन, त्या एकांतवासांत परस्पराचा अंतःकरणे मोकळा होऊं लागलीं, कोणाच्या नशिबी केव्हा कोणता जोडीदार येईल, याचा कधींमधीं नियम नसे, परंतु त्या जटाशंकराच्या दर्शनापासून कांहीं विशेष व्यक्ति एकमेकाच्या अधिकाधिक सहवासांत राहूं लागल्या! मात्र केवळ निसर्गाच्या निवातपणामुळेंच विजय–शकुंतला, टिमथी–शालिनी, विश्वास–उषा, यांचीं मनं एकमेकाकडे आकर्षलीं गेलीं असें नाहीं त्याला आणखीही कांहीं कारणें घडलीं.

त्या जटाशंकराच्या प्रसंगापासूनें शकुंतलेची वृत्तीच पालटली. ती दुसऱ्या दिवशी-पासून अधिक प्रफुल्लित झाली, जास्तच टवटवित दिसूं लागली, जास्त हंसायला लागली. अतिशय तरतरित झाली. तिचा संकोच अन् लाजाळूपणा केवळ विजय जवळ असला म्हणजेच दृगोचर होई. इतर वेळीं ती आतां पुरुषांच्या समोरही धीटपणें वागूं लागली.

Bee फॉल्च्या धारेखालीं स्नान करितांना शालिनीबरोबर वरच्या किंचित् उंच दगडावरून तिनें पाण्याबरोबर घसरत खालीं यायलाही कमी केलें नाहीं. त्यावेळीं वर लांब एका वृक्षावर आंबे खात गप्पागोष्टी करीत असलेल्या पुरुषांना त्या मुली सुंदर मत्स्यकन्याच वाटल्या.

अंगावर पडणाऱ्या जोरदार धारेखालीं, एक तन्द्रेच्या त्या शीतल आल्हादकारी अवस्थेंत, जलातिरेकामुळें श्वासोच्छास मंदावलेल्या शालिनीनें, पाण्याचा मारा चुकवीत, चेहरा पुशीत, केंस बाजूस सारीत. डोळे घट्ट मिटूनच,डाव्या हातानें शकुंतलेला धक्का दिला आणि ती एकाएकी धारेतून इतक्या सपाटून खालील चिमुकल्या जलाशयांत जाऊन आदळली कीं, तें दृश्य लांबून पाहणारा विजय उद्गारला, "टिमथी तं पाहिलास का उल्कापात ?"

"नाहीं रे बुवा," टिमथी म्हणाला, "माझं लक्ष त्या खट्याळ शालिनीकड होतं." त्याच वेळीं शालिनीनें मुद्दाम अंग ताठ करून आपला देह एखाद्या तीरासारखा खालीं सोडला.

लागलीच खालच्या चिमुकल्या जलाशयांत त्या तिघानीं एकमेकींच्या चेहेऱ्यांवर जोरजोरानें पाणी उडवीत एक मौजेची लढाईच चालविली. कांहीं वेळानें त्यांच्या हस्तप्रघातांचा, पाण्याच्या सळसळीचा, मधुर हास्यध्वनीचा लोप होऊन त्या तिघीही इतक्या हळुहळू बोलू लागल्या कीं विश्वास म्हणाला, "चित्रपटच वाटतोय अगदीं."

तें त्यांचें संभाषण किती महत्त्वाचें होते ह्याची त्या आनंदातिरेकात त्या तिघींना कल्पना तरी होती का ?

शालिनीः—गेल्या तीनचार दिवसांत मी पाहतें आहे शकुंतला, तुझी मूक कळी खूबच खुलली हो.

शकुंतलाः—इश्श ! अन् तुम्हां दोघीं नाहीं वाटतं हंसतीखेळत.

शालिनीः—मी पहिलेपासून आहे तशी आहे बापडी. पण ही निर्ढावलेली अन् निर्लज्ज उषा उलट लाजाळू झाली आहे आताशा. काय ग उषे ! सांगून टाकलंस का एकदाचं आपल्या मनांतलं विजयरावांना ?

उषा रागावून खिन्न स्वरात म्हणाली, "माझ्याशीं नका बोलूं कुणी आतां !" प्रश्नोत्तरें ऐकतांच शकुंतलेच्या भृकुटी वक्र झाल्या.

शालिनीः—काल धूपगडावर तूं मुद्दाम मागे राहिलीस विजयरावासाठीं. तेव्हांच मला वाटलं कांहींतरी उताविळपणा करशील म्हणून.

उषाः—उतावीळपणा झालेला नाहीं वाटतें मला. माझं याबाबतींत अंतःकरण मी पुण्यास तुजजवळ मोकळं केलं, त्यालाही किती काळ लोटला नाहीं का ? एकदां विचारून टाकावं म्हटलं स्पष्ट. बरं झालं बाई. उगाच खुळी आशा वाईटच कसलीही. त्यांतून हा तर माझ्या जन्माचाच प्रश्न !

शालिनीः—मग काय सांगितलं त्यांनीं तुला ? स्पष्टपणं नकार दिला कीं काय ?

उषा:—अगदीं मफ़शेल. खूबच टाकून बोलले मला. “ अरुणाच्या जागेवर मी असतांना अशा घाणेरड्या नात्यानं तूं कां पाहिलंस माझ्याकडे ? ” असा त्यांनींच उलट मला जबाब विचारला. काल रात्रीं डोळ्याला डोळा नाहीं माझ्या.

शालिनी:—शकू, तुला काय वाटतं ह्या विजयरावच्या वर्तनासंबंधीं ?

आतां कुठे शकुंतलेची समाधी उतरली. मात्र ती बोललीच नाहीं मुळींसुद्धा.

शालिनी:—माझ्याही बाबतींत त्यांनीं कशी निराशा केली हें माहितच आहे तुला शकू. म्हणूनच मी गेल्या चार पाच दिवसांत जे काहीं पहातें आहे, त्यावरून तुला आधींच धोक्याची सूचना द्यावीशी वाटलं. तुझं त्यांच्यावर प्रेम आहे, होय ना ?

शकुंतला एकदम लाजली. गोंधळली. असा प्रश्न एकाएकी विचारण्यांत येईल असं मुळींसुद्धां वाटलं नव्हतं तिला. पण तिनें जरा रागानेंच विचारलें,

कशावरून म्हणतेस तूं हें ? ”

मानेला किंचितसा हिसडा देऊन शालिनी म्हणाली, “ अहाहाहा ! तूं बरी कबूल करशील हें ? पण प्रेम कांहीं लपवतां येत नाहीं बरं ! घरांत तूं आतांशा विजयरावचीच जास्त काळजी वाहतेस, त्यानाच लाजतेस, त्यांच्या सहवाससुखामुळें नेहमीच उल्हसित दिसतेस, अन् संधि सांपडतांच लाजतमुरकत निवात वाटेनें त्यांच्याच मागोमाग एकीकडे जायला तुझे अधीर पाय नेहमींच कसे ओढले जातात आतांशा ! ”

शकुंतला:—मग तूंही जातेस टिमथींबरोबर नेहमीं एकीकडे, म्हणून तुझ्याही विषयीं तोच का करायचा तर्क ?

शालिनी:—हट् चावट कुठली. टिमथी खेळाडू आहे. मलाही धीटपणें दऱ्याखो ऱ्यांतून जाणें आवडतं. बंदुकीचा नेम कसा मारायचा हे शिकवितायेत ते मला आतांशा. अन् मी कोंकणी विसरत चाललें होते, तेव्हा त्या भाषेचीही उजळणी होते त्यांचेबरोबर. प्रेम असें एकाएकी जडते वाटतं ? मी लाजतें का कधीं त्यांच्यापुढं ? [redacted]

शकुंतला:—सांभाळ हो. नाहींतर तो तुझ्याचं [redacted] घालायचा [redacted] एखादवेळीं. उडतींबागडती पांखरें आपल्या तावडींत आणण्याची कला चांगलीच जाणतो तो. अन् शिवाय तुम्हा दोघा पांखरांची भाषाही जमली अशी एकच.

उषा:—तुमच्या दोन जोड्या दोन्हीकडे गेल्या म्हणजे मला आपलं विश्वासराव-बरोबर जावं लागतं बरं का. नाहीं तर माझ्यावरही आणाल कांहीं किटाळ असं. तुम्हा दोघींचीं डोकीं ठिकाणावरच नाहींत आता ?

शालिनी:—चोराच्या मनांतलं चांदणं आहे वाटतं हें ?

अशा तऱ्हेचें त्या तरुणींचें संभाषण इकडे चालू असतांना त्या आम्रवृक्षावर बसलेले तिघे तरुण आपसांत कांहींसा विनोद करीत हंसत खिदळत होते. मधून मधून तर त्यांच्य हास्यलहरीचे दूरदूर प्रतिध्वनि उठून सारा आसमंत दणाणून जाई.

टिमथी:—विजय, केवळ सौंदर्याची परीक्षा म्हणून एक गोष्ट तुला विचारूं ? ह्या तिघींपैकीं तुला अधिक सुंदर कोण वाटतें सांग पाहूं ?

विजय:—हे: ! असला काय रे विषय काढतोस आज ?

टिमथी:—छे बुवा, तुझ्या ह्या गांधीशाहीचा वीट येतो अगदी. अगदीं सन्याशा-सारखा सोंवळेपणानेच वागतोस तूं. पण काय रे लेका, बोलायला नको तुला अन् त्या शकुंतलेशी एकांतांत विहार करणे तेवढं रुचतं नाहीं ?

विजयला त्याचा मूळ विषयच आतां अधिक सोयीचा वाटला, तो म्हणाला, "मला शकुंतलाच सुंदर अन् नाजूक वाटते ज्यास्त."

टिमथी:—आकाशात संचार करणारी पाखरेंच मला फुलपाखरांपेक्षा अधिक आव-डतात. नाजुकपणाची शिसारी येते मला. शालिनी कशी खेळाडू अन् धीट आहे.

विजय-—स्त्रियांना लज्जा अन् सुकुमारत्वच खुलून दिसतें. अन् शकू कशी प्रमाण-बद्ध आदर्श तरुणी वाटते ! शालिनीचा धीटपणा कळसास जातो अगदीं. तं म्हणतोच माझा स्विमिंग सूटही घालेपर्यंत परवा मजल गेली तिची ! थक्कच झालों बुवा अगदी. पण काय रुपडं दिसलं तेव्हां तिचं ! तिचे केस लांब नसते तर ती स्त्री कीं पुरुष हेंच ओळखणे त्या वेळीं तिऱ्हाइतास कठीण होऊन बसलं असतं ! स्त्रियांचे सौंदर्यद्योतक वक्राकार तिच्या देहावर कुठंही दिसत नाहींत.

टिमथी:—शालिनीसारखीं स्त्रियांचीं काटक शरीरेंच मला अधिक मोहक वाटतात... काय विश्वास, तुमचं काय आहे मत ?

विश्वास:—मला ह्या बाबतीत मतंच नाहींत मुळीं.

टिमथी:—पण तुमचे डोळे तर दिसतात चांगले घारीसारखे वस्ताद् !

विश्वास:—आपण नाहीं बुवा कधीं स्त्रियांकडे न्याहळून पाहात !

विजय:—त्यांना बायका म्हणजे केवळ उपभोग्य वस्तु वाटतात.

विश्वास तो टोमणा ऐकून बोललाच नाहीं.

टिमथी म्हणाला, "विजय तूं विश्वासला फारच वाईट बोललास. दुसऱ्यावर अशा तऱ्हेचा आरोप करणाराही तशाच मनाचा आहे कीं काय असं वाटूं लागतं."

विश्वास मंद आवाजांत म्हणाला, "नाहीं आम्हां चारचौघांप्रमाणें विजयराव पापी आहेत असं म्हणण्याचं धैर्य मला नाहीं होत."

टिमथी:—मी वाटतो तुम्हांला पापी ?

विश्वास:—तुमचं तुम्हांला ठाऊक, मला काय विचारतां तें ?

अशा तऱ्हेच्या आठ दहा दिवसांच्या सहवासानंतर रोजच्या दुपारच्या वामकुक्षीचे प्रसंगी आपापल्या अंथरुणावर लोळत असतांना त्या प्रत्येक व्यक्तीचे मनांत कांहींतरी

भावना उचंबळून येणें स्वाभाविकच होतें. या दिवसांत विजयला मात्र अशा विचार-विकारांना अवसरच सांपडला नाहीं. कारण त्याचें मन उत्तरोत्तर महात्माजींच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीच्या ताज्या बातम्या वाचण्यांत त्याच दुपारच्या वेळीं अधिकाधिक गर्क होऊं लागलें.

शकुंतलेच्या उल्हासी मनांत विचार चालत, " विजय माझ्यासाठीं किती स्वार्थत्याग करताहेत हा ? पापाचरणांत जन्मलेली स्वैंपाकिणीची मी मुलगी. शालिनीला त्यांनीं उत्तेजन दिलें नाहीं ह्यांत नवल नाहीं. कारण ती जाणूनबुजून वेश्येचीच पोर ! पण उषा ? माझ्यापेक्षां हुशार आहे, श्रीमंताची आहे, चांगल्या घराण्याची आहे, गोरी गोमटी आहे, त्यांच्याच कॉलेजांत शिकणारी व त्यांच्याशीं विशेष मोकळेपणानें वावरलेली आहे. आणखी ती त्यांना रुचत नसली, तर कितीतरी दुसऱ्या सुंदर मुली त्यांना मिळाल्या असत्या. समाजाचा, बाबासाहेबाचा, त्याच निवडीला अधिक पाठिंबा राहील हेंही त्यांच्या लक्षांत आहे. माझ्याशीं विवाह करणें म्हणजे आपल्यावर सर्वांचाच रोष करून घेणेंच होईल, ह्याचीही त्यांना जाणीव आहे. अन् मी तरी काय ? माझ्यांत असं काय विशेष आहे कीं त्यांनीं माझ्यासाठीं स्वतः आयुष्य असं कष्टाचं करून घ्यावं ! किती मी भाग्याची ! ते मला देवासारखे कां वाटूं नयेत ? "

शालिनीची तंद्री लागत असे, " माझे विजयवर किती उपकार आहेत. त्यांनीं मला इकडे बरोबर आणलें नसतें तर माझा अधःपातच झाला असता. मी वेश्याही झालें असतें कदाचित. पण आतां देवाची माझ्यावर कृपादृष्टि आहेसें वाटतें. खासच टिमथी माझ्यासाठीं वेडावले आहेत. मला पण ते किती आवडतात. त्यांनीं मला जे करायला सांगितलें तें मी करीन. विजयचें प्रेम शकुंतलेवर आहे. तिच्या सुखाच्या आड आपण कशाला या आतां ? पण टिमथींचें हें प्रेम टिकाऊ स्वरूपाचें राहील का ? इथंच त्यांना विचारून टाकावं एकदां सारं. अन् नाशकाला न जातां, नागपुरास त्यांच्याच घरीं चांगला एखादा महिना राहून, त्यांच्या घरच्याही मंडळींचीं मनें आपलीशीं करून घ्यावीं. अन् तिथंच त्यांच्या प्रेमाची खरी परीक्षा होईल नाही का ? त्यांचे पापा-ममा मला ख्रिश्चन व्हायला लावतील येवढंच ना ? आनंदानें करीन मी धर्मांतर. धर्मापेक्षां नीतीचं आयुष्य अधिक श्रेष्ठ नाहीं का ? मावशीची पर्वा ! छट् तिला कोण जुमानतो ? चुलींत जावो ते डॉक्टर होणें, अन् तें नरकांतलें सूतिकागृह !..."

उषा अंथरुणांत चुळबुळ करीत असे, " मला काय करायचंय् आतां ह्यां निर्घृण विजयशीं ? मोठा मोकळ्या मनाचा आहे म्हणे ! कपटी कुठला साऱ्या मुलुखांतला ! मीच वेडी. मोठा बंधुप्रेमाचा आव आणतोय. निखालस खोटा कुठचा. त्या शकुंतलेसाठीं वेड लागलं आहे, हें स्पष्ट सांगायला काय होतं म्हणावं ? आतां कुठें लोपला त्याचा स्पष्टवक्तेपणा ? बतावणी करतो अन् उगाच भलतीं कारणं सांगतो. मी कांहीं त्याची सख्खी बहीण नाहीं. असं उदात्तपणाचं पांघरूण बरं घालतां येतं त्याला. त्याच्या रागावर अवि-

वाहित राहूं ? काय म्हणून ? तो एकच का चांगला पुरुष आहे जगांत ? भित्रा साऱ्या मुलुखाचा. बिचारे विश्वासराव तरी बरे त्यापेक्षां. किती धीट आहेत ते ! बुडणाऱ्या शकुंतलेला त्यांनींच बाहेर काढलं. विजय नुसता अजागळासारखा उभाच राहिला जागच्याजागीं तेव्हां. अन् हा म्हणे स्वराज्याचा लढा लढणार ! पोकळ बाता नुसत्या. टिमथीचं धैर्य सारं त्याच्या बंदुकीच्या भंरवशावर. ती नसली कीं गळले हातपाय त्याचे. अन् विश्वासरावांनीं कांहीं एक हातीं नसतांना त्या अजगराच्या शेंपटीला पायानें डिवचून त्याला रस्त्यांतून खोऱ्यांत पळायला लावलें. शाबास त्यांची ! जवळ कांहीं एक नसतांना त्यांना वाघाच्या गर्जनेचंही भय वाटलं नाहीं. मला किती सहज मुलांसारखं उचलून घेतलं त्यांनीं ! अन् प्रभा मला नेहमीं सडका दाबायचं एंजिन म्हणतो. मजबूत अन् दाणगट आहेत ते चांगले !... नाशकाच्या कॉलेजांत झाले तयार यायला ! बरं झालं बाई. शालिनी आतां टिमथीशीं लग्न लावणार म्हणतेय्. विजयचंही पुण्याच्या कॉलेजचं आयुष्य संपलंय् आतां. मग आपणही घरींच राहावं आपलं नाशकाला, अन् तिथल्याच कॉलेजात जावं झालं शिकायला यंदापासून...पण तात्या-माईंना दरिद्री विश्वासरावांना जावई करावंसं वाटेल का ? हात्तीच्या ते नाहींत तर दुसरे चांगले तरुण काय जगांत थोडेथोडके आहेत ? "

# २२

## रानावनांत थाटलेला संसार

टिमथीनें काढलेली सुट्टी १८ मेला संपली आणि तो नागपुरास निघून गेला. त्याच्याबरोबर शालिनीही गेली. मेच्या अखेरीस विनायकराव, लीलेला घेऊन धर्मासमवेत निघून गेले. नंतर चार-दोन दिवसांनींच विश्वासरावांनींही जायची तयारी केली. आणखी पुन्हां नाशकाला जायला सोबत मिळणार नाहीं ह्या सबबीनें उषाही त्यांच्याबरोबर निघून गेली.

गजबजलेलें घर अशा रीतीनें जूनच्या आरंभीं अगदी ओकें ओकें वाटूं लागलें. पण तें कुणाला ? रमाकाकू अन् आचाऱ्याला. कारण बाबासाहेब नेहमीं श्रीमंतांबरोबर असत आणि "विजय व शकुंतला निलाजऱ्यासारखीं घराबाहेरच एकटीं भटकतात." अशी बाबासाहेबांजवळ जेवतांना काकूंची सदोदित पिरपिर चाले. पण बाबासाहेबांना श्रीमंतांच्या अस्वस्थ प्रकृतीमुळें लीलेच्या पांच महिन्यांतच जन्मलेल्या मुलासंबंधीं संशोधन करायलाही वेळ नव्हता. आणखी विजय, शकुंतला ज्यास्त सलगीनें वागतात ह्याविषयीं त्यांच्याशीं पुन्हां बोलून उगाच नव्या भानगडी उपस्थित करायलाही ह्या वेळीं फुरसत नव्हती.

पुढील पंधरा दिवसाचा विजय-शकुंतलेचा कार्यक्रम पुन्हां त्याच स्वरूपाचा गेला. पण या वेळीं त्या दोघांच्या हालचालींवर कुतूहलानें चोरटी नजर ठेवायला कुणी तिसरें माणूस नसल्यामुळें त्यांच्या ह्या वेळच्या सफरी अधिकाधिक रम्यतर झाल्या. एकमेकाच्या राह्यल्यासाह्यल्या सर्व छटा त्यांना ह्या दिवसांत पूर्णपणें कळल्या. त्यांचीं अंतःकरणें आतां एकमेकाच्या पूर्ण परिचयाचीं झालीं. भूत, वर्तमान, भविष्य ह्या तिन्ही कालांचीं सत्य व काल्पनिक चित्रें त्यांनीं मोकळ्या मनानें रंगविलीं. त्या दोघांच्या सहवासांत त्यांना अखिल विश्वाचा कांहीं काळ विसर पडला.

आतां सायंकाळचें घरीं परत येतांना मोटार हांकणाऱ्या विजयशेजारींच शकुंतला निर्धास्तपणें बसूं लागली. तिच्या पोषाखांत व ठेवणींत, ती शक्य तितकें ज्यास्त सौंदर्य

आणण्याचा प्रयत्न करूं लागली. १२ जूनला 'हंडिकोहवरून परत येत असतांना शकुंतला म्हणाली,

" परवांला इथून परत जायचं म्हणून फार वाईट वाटतं मनाला. ह्या रानावनांतल्या लोकांप्रमाणें अन् पशुपक्षांप्रमाणं जर आपणालाही इथंच जन्मभर संसार करायची संधि लाभली असती, तर किती चांगलं होतं, नाहीं?... इथं शहरांतलं कष्टाचं जीवन नाहीं, पाप नाही, कसलंही दुःख नाहीं! "

विजय हंसून म्हणाला, " अग, दुरून डोंगर साजरे, हा आपला रोजचाच अनुभव नाही कां आतांशी. "

" छेः, इथल्या कष्टांत मनाला कसं सुख वाटतं! " शकुंतला म्हणाली.

" तुझी तेवढीच हौस कशाला ठेवायची उगाच? " विजयनें लगेच बेत रचला, " उद्यां आपण पुन्हां मोठ्या महादेवाला जाऊन, वनभोजन करूं, चौऱ्यागडावर एक फेरी मारूं. तो एका दिवसाचा रानावनांतला संसारच होईल आपला. "

दुसरे दिवशीं सकाळीं सहा वाजतां दोघेंही मोटारींतून निघालीं. गांव व सिव्हिललाईन्स ओलांडून त्यांनीं महादेवाच्या रस्त्याचें अखेरचें टोक गाठलें. नंतर पायींच्या प्रवासास आरंभ झाला. भांडीकुंडीं, शिधें, भाजीपाला, पाण्याची बॅग असें बरेंच सामान होतें. एक पिशवी शकुंतलेनें व ओझ्याचे गांठोडें विजयनें धरलें. बैलगाडीच्या फेरीच्या वाटेनें न जातां, मधल्या दोन टेकड्यावरून चढत उतरतच त्यांनीं महादेवाचे स्थान गांठलें. ते रम्य स्थानही गर्द झाडींतच आहे, पण मोठें विस्तृत आणि मोकळें आहे. अनेक विशाल आम्रवृक्षांची इथें राई असल्यामुळें घनदाट छाया आहे, पण इथें अंधार पडल्यासारखें वाटत नाहीं.

जातां जाऊन तेथील विस्तीर्ण चबुतऱ्यावर दोघांनींही समान ठेविलें व शकुंतला विश्रांतीस्तव थोडीशीं बसली. झाडावरचे कांहीं पिकलेले आंबे तोडून आणून, विजयनें तिच्या बाजूस ठेविले व तो म्हणाला,

" दमलीस वाटतं, आंबे खा एक दोन. " विजयनें एक आंबा तोंडाला लावला.

त्या झोंपडींतला वयोवृद्ध साधु बाहेर येऊन त्यांची प्रेमानें हिंदींत चौकशी करूं लागला व तीं दोघें कांहीं काळ त्याच्याशीं गप्पागोष्टी करण्यांत दंग झालीं.

" आणखी मंडळी येताहेत वाटतं? "

" नाहीं आम्ही दोघेच आहोंत. "

" कांही मूलबाळ?

विजय–शकुंतला एकमेकाकडे पाहून हंसलीं.

" नुकतंच लग्न झालेलं दिसतं. पण कांहीं सासू–सासरे, आईबाप? " विजयनें विषय

बदलायला त्यालाच उलट प्रश्न केला,

" ह्या तुमच्या गोठ्यांत किती गाई आहेत?"

" आहेत खंडी दीड खंडी?"

" इथं कांहीं जनावरांची भीति नाहीं वाटतं?"

" नाहीं. वाघ येतात पाण्याबिण्याला, पण महादेवजीच्या कृपेनें कुणास कधीं त्रास देत नाहींत!"

इतकें बोलणें झाल्यानंतर महादेवाच्या दर्शनास तीं दोघें गुहेंत जाऊं लागलीं. विजयनें कोट टोपी बाहेरच काढून ठेवली होती. ह्या गुहेचें मुख विशाल असल्यामुळें, विद्युत् दीपाची अगदीं आंत तेवढी गरज भासली. तरी इथं मनाला प्रसन्न वाटतें. गुहा चांगली पन्नास साठ फूट लांब आहे. आंत उथळ पाणी आहे, व पाळीच्या अलीकडून चालल्यास तर पाणी अगदींच थोडें आहे. पाण्यांत पाय ठेवतांच नारळांचीं असंख्य टोकरें पायांस लागतात. विजयनें सदरा काढून बाहेर फेकून दिला आणि धोतर वर न खोंचतांच तो पाण्यांतून चालू लागला.

शकुंतला लुगड्याचा ओचा वर धरून चालत होती. ती म्हणाली, " आंघोळ करायचा आहे वाटतं विचार?" ह्या प्रश्नाचें उत्तर देण्याच्या भानगडींत न पडतां विजयनें एकदम तिलाही त्या खोल पाण्यांतच एकाएकी ओढलें. ती त्रेधेनें हंसत हंसत म्हणाली, " इश्श, हें काय? अन् मीं दुसरं लुगडं बिगडं नाहीं ना आणलं बरोबर."

" अग तीर्थस्नान!" विजय मौजेनें उत्तरला आणि त्यानें तिला ओढत ओढतच पाण्यांत दूरवर नेलें. शकुंतला हंसत म्हणाली, " मागे बाबासाहेब—"

" अग मामंजी म्हण आतां" विजय मध्येंच मोठ्यानें हंसत म्हणाला.

" बाबासाहेब म्हणाले होते इथंच, काकूंकडं वळून कीं पापी माणसांनीं इथं स्नानें केलीं तर त्यांना साप चावतात म्हणून, अन् म्हणूनच त्या वेळीं काकूंनीं इथं आंघोळ करायचं टाळलं होतं."

विजय थट्टेच्या स्वरांत म्हणाला, " तुला खरंच का वाटलं हें शहाणे? मग आतां कांहीं भयबीय नाहीं ना वाटत?"

" मीं पापच केलं नाहीं मुळीं कधीं."

" लग्नापूर्वी एका परपुरुषाबरोबर तूं एकांतवासांत हिंडली फिरलीस हें पापच नाहीं का?"

" परपुरुष का? होय परब्रह्मालासुद्धां परपुरुष म्हणतां येईल, त्या दृष्टीनं आहांतच माझे देव तुम्ही." शकुंतला अभिमानानें म्हणाली.

" अरे बापरे, परमेश्वर समजतेस कीं काय मला? मग दूर हो माझ्या." असें म्हणत विजयनें तिला पाण्यांत जोरानें ढकललें व तो खो खो हंसू लागला.

आणण्याचा प्रयत्न करूं लागली. १२ जूनला 'हंडिकोहवरून परत येत असतांना शकुंतला म्हणाली,

" परवांला इथून परत जायचं म्हणून फार वाईट वाटतं मनाला. ह्या रानावनांतल्या लोकांप्रमाणें अन् पशुपक्षांप्रमाणं जर आपणालाही इथंच जन्मभर संसार करायची संधि लाभली असती, तर किती चांगलं होतं, नाहीं?... इथं शहरांतलं कष्टाचं जीवन नाहीं, पाप नाहीं, कसलंही दुःख नाहीं!"

विजय हंसून म्हणाला, " अग, दुरून डोंगर साजरे, हा आपला रोजचाच अनुभव नाहीं कां आतांशीं."

" छेः, इथल्या कष्टांत मनाला कसं सुख वाटतं!" शकुंतला म्हणाली.

" तुझी तेवढीच हौस कशाला ठेवायची उगाच?" विजयनें लगेच बेत रचला, " उद्यां आपण पुन्हां मोठ्या महादेवाला जाऊन, वनभोजन करूं, चौऱ्यागडावर एक फेरी मारूं. तो एका दिवसाचा रानावनांतला संसारच होईल आपला."

दुसरे दिवशीं सकाळी सहा वाजतां दोघेंही मोटारींतून निघाले. गांव व सिव्हिललाईन्स ओलांडून त्यांनीं महादेवाच्या रस्त्याचें अखेरचें टोक गाठलें. नंतर पायींच्या प्रवासास आरंभ झाला. भांडीकुंडीं, शिधें, भाजीपाला, पाण्याची बॅग असें बरेंच सामान होतें. एक पिशवी शकुंतलेनें व ओझ्याचे गांठोडे विजयनें धरलें. बैलगाडीच्या फेरीच्या वाटेनें न जातां, मधल्या दोन टेकड्यावरून चढत उतरतच त्यांनीं महादेवाचें स्थान गांठलें. तें रम्य स्थानही गर्द झाडींतच आहे, पण मोठें विस्तृत आणि मोकळें आहे. अनेक विशाल आम्रवृक्षांची इथें राई असल्यामुळें घनदाट छाया आहे, पण इथे आंधार पडल्यासारखें वाटत नाहीं.

जातां जाऊन तेथील विस्तीर्ण चबुतऱ्यावर दोघांनींही समान ठेविलें व शकुंतला विश्रांतीस्तव थोडीशीं बसली. झाडावरचे कांहीं पिकलेले आंबे तोडून आणून, विजयनें तिच्या बाजूस ठेविले व तो म्हणाला,

" दमलीस वाटतं, आंबे खा एक दोन." विजयनें एक आंबा तोंडाला लावला.

त्या झोंपडींतला वयोवृद्ध साधु बाहेर येऊन त्यांची प्रेमानें हिंदींत चौकशी करूं लागला व तीं दोघें कांहीं काळ त्याच्याशीं गप्पागोष्टी करण्यांत दंग झालीं.

" आणखी मंडळी येताहेत वाटतं?"

" नाहीं आम्ही दोघंच आहोंत."

" कांहीं मूलबाळ?

विजय–शकुंतला एकमेकाकडे पाहून हंसलीं.

" नुकतंच लग्न झालेलं दिसतं. पण कांहीं सासू–सासरे, आईबाप?" विजयनें विषय

बदलायला त्यालाच उलट प्रश्न केला,

" ह्या तुमच्या गोठ्यांत किती गाई आहेत? "

" आहेत खंडी दीड खंडी? "

" इथं कांहीं जनावरांची भीति नाही वाटतं? "

" नाहीं. वाघ येतात पाण्याबिण्याला, पण महादेवजीच्या कृपेनें कुणास कधीं त्रास देत नाहींत! "

इतकें बोलणें झाल्यानंतर महादेवाच्या दर्शनास तीं दोघें गुहेंत जाऊं लागलीं. विजयनें कोट टोपी बाहेरच काढून ठेवली होती. ह्या गुहेचें मुख विशाल असल्यामुळें, विद्युत् दीपाची अगदीं आंत तेवढी गरज भासली. तरी इथं मनाला प्रसन्न वाटतें. गुहा चांगली पन्नास साठ फूट लांब आहे. आंत उथळ पाणी आहे, व पाळीच्या अलीकडून चालल्यास तर पाणी अगदींच थोडें आहे. पाण्यांत पाय ठेवतांच नारळांचीं असंख्य टोकें पायांस लागतात. विजयनें सदरा काढून बाहेर फेकून दिला आणि धोतर वर न खोंचतांच तो पाण्यांतून चालू लागला.

शकुंतला लुगड्याचा ओचा वर धरून चालत होती. ती म्हणाली, " आंघोळ करायचा आहे वाटतं विचार? " ह्या प्रश्नाचें उत्तर देण्याच्या भानगडींत न पडतां विजयनें एकदम तिलाही त्या खोल पाण्यांतच एकाएकी ओढलें. ती त्रेधेनें हंसत हंसत म्हणाली, " इश्श, हें काय? अन् मीं दुसरं लुगडं बिगडं नाहीं ना आणलं बरोबर."

" अग तीर्थस्नान! " विजय मौजेनें उत्तरला आणि त्यानें तिला ओढत ओढतच पाण्यांत दूरवर नेलें. शकुंतला हंसत म्हणाली, " मागे बाबासाहेब— "

" अग मामंजी म्हण आतां " विजय मध्येंच मोठ्यानें हंसत म्हणाला.

" बाबासहेब म्हणाले होते इथंच, काकूंकडं वळून कीं पापी माणसांनीं इथं स्नानें केलीं तर त्यांना साप चावतात म्हणून, अन् म्हणूनच त्या वेळीं काकूंनीं इथं आंघोळ करायचं टाळलं होतं. "

विजय थट्टेच्या स्वरांत म्हणाला, " तुला खरंच का वाटलं हें शहाणे? मग आतां कांहीं भयबीय नाहीं ना वाटत? "

" मीं पापच केलं नाहीं मुळीं कधीं. "

" लग्नापूर्वी एका परपुरुषाबरोबर तूं एकांतवासांत हिंडली फिरलीस हें पापच नाहीं का? "

" परपुरुष का? होय परब्रह्मालासुद्धां परपुरुष म्हणतां येईल, त्या दृष्टीनं आहांतच माझे देव तुम्ही. " शकुंतला अभिमानानें म्हणाली.

" अरे बापरे, परमेश्वर समजतेस कीं काय मला? मग दूर हो माझ्या. " असें म्हणत विजयनें तिला पाण्यांत जोरानें ढकललें व तो खो खो हंसू लागला.

तिनें पाण्यांतून कसेंबसें डोकें वर काढलें व विजयनें तिला सांवरून धरतांच ती म्हणाली, " काय हें ? नाकीं डोळीं पाणी गेलं ना माझ्या अन् वेणी पण सारी ओली झाली. ही बरी थट्टा ! "

" अरे, अरे, अरे, " विजय च्‌च् करीत म्हणाला, " शृंगारसाज बिघडला कीं काय सारा ? " इतकें म्हणून त्यानें तिला घट्ट धरून ठेविलें, व जबरदस्तीनें तिने मानेला हिसके देत असतांनाही तिचें कुंकू पुसून काढलें.

शकुंतला त्रस्त चेहेरा करून म्हणाली. " ताळतंत्रच सोडलात म्हणायचा अगदीं अ ज. कुंकू पण पुसून टाकलंत ना माझं ? ही कसली मेली अभद्र जीवघेऊ लीला ! "

" अग अभद्र काय नि जीवघेऊ काय ? तुझं कुंकू पुसलं तर कुणाचा जीव जाणार ? माझा ? "

" हें पहा आतां इथंच थांबू या. पलीकडेच महादेवाची पिंडी आहे ना पाण्यांत ? बिचाऱ्याला नेहमीं पाण्यात राहावें लागतें. दर्शनमुद्धां होत नाहीं त्याचं " हें तिचं भक्तिभाव-पुरःस्सर भाषण ऐकतांच तिला त्यानें पाण्यात एक जोरानें डुबकीच दिली. पाण्यांतून खोल खोल आवाज आला, तरी तिची मान त्यानें जबरदस्तीनें आंतच कांहीं काळ दाबून ठेवली व बऱ्याच वेळानें तिला पाण्याबाहेर काढलें. ' ऊ ऊ ऊ ' करीत तिनें मानेला खूब आडवें तिडवें हलविलें. चेहेऱ्यावरचें पाणी पुसलें. तिचा जीव अगदीं निर्बुजून गेला होता. तो म्हणाल, " झालं का महादेवाचं दर्शन ? " तिचे गाल रागानें फुगीर झाले. म्हणून तिला आपल्या हृदयाशीं घट्ट आवळून तो म्हणतो, " अशी एकाएकी रागाऊ नकोस बुवा " तरी तिच्या कोपाचें शमन होईना, म्हणून त्यानें एक गंमतीची युक्ती योजिली. तो म्हणाला, " हें बघ आपण जोड्याने महादेवाला नमस्कार करूं, अन् आजपासूनच खरेखुरे विवाहबद्ध झालो म्हणून शपथ वाहूं. " त्यानें खरोखरच दोन्ही हात जोडून ध्यान लावलें. तोंच शकुंतलाही त्याचे शेजारीं उभी राहिली, व तिनेंही भक्तिपूर्ण अंतःकरणानें हात जोडून आपले डोळे मिटले. त्या क्षणाला तिचा ऊर आनंदानें अगदी भरून आला होता.

बाहेर येतांच तिनें गाठोड्याचें धोतर सोडलें, आणि आडोशाचे जागेला जाऊन ती तें धोतरच गुंडून आली. तिची चोळी आणि तीवरचें झंपर हीं दोन्हीं ओलीं चिंब झालीं असल्यामुळे तीही तिला काढावी लागली. आपलीं वस्त्रें तिनें थोड्याशा चढावावर वाळत घातलीं व त्यावर दगड ठेविले. विजयनें आपला सदरा व कोटच कंमरीभोंवतीं गुंडाळून धोतर वाळत घातलें. शकुंतला झोंपडीच्या तोंडाशीं जाऊन त्या साधूला हिंदींत म्हणाली, " जरा तुमचा आरसा अन् थोडेसें कुंकू देतां का ?"

तो म्हणाला, " आरसा अन् कुंकू दोन्हीं नाहींत बेटा माझ्याजवळ" ते मोकळे सोडलेले तिचे केंस, त्या लहानशा धुडक्यानें कसेंबसे झांकलेलें अंग, हा सारा अवतार तिला विजयला दाखवायचा नव्हता. म्हणून ती पुन्हां झोंपडीमागें लुगडें वाळत घातलें

होतें, त्या उंचवट्यावर चढली. तिथेंच वस्त्रें वाळतपर्यंत बसायचा तिचा विचार होता. तोंच सदराकोट कंबरीभोंवती गुंडाळलेला विजयच तेथे येऊन तिच्यापुढें दत्त म्हणून उभा राहिला.

"जा गडे, इकडे नाहीं ना यायचं." ती ओशाळून म्हणाली. त्या त्याच्या विचित्र पोषाखाकडे पाहून तिला हंसूच आलें.

"अग अजूनही आपण अगदीं पूर्ण रानटी नाहीं बनलों म्हणून वाईट वाटतंय मला. मोठालीं पानें जर का असतीं इथें कुठं, तर मी तींच गुंडाळलीं असतीं!"

"कुंकू अन् आरसा आणायला विसरलें, म्हणून केवढा घोटाळा झाला पाहिलंत." शकुंतला लज्जेनें म्हणाली, "तसं नाहीं. ह्या तुझ्या इयररिंगजमुळें अन् सोन्याच्या बांगड्यामुळें होतोय् घोटाळा आतां." असे म्हणताच त्यानें तिच्या कानाला हात लावला,तोंच शकुंतला गपकन् खालींच बसली!

"छे बाई! मी काढतें गडे स्वतःच हवें तर." पण विजयनें आपलाच हट्ट चालविला आणि तिच्या कानांतले ईयररिंग अन् हातांतल्या बांगड्या काढून एका दगडावर ठेवीत तो म्हणाला, "शकू आज तूं किती गोड, किती मोहक दिसतेस. अगदीं साधेपणांतच खरं सौंदर्य असतं, हें मला आज पूर्णपणें पटलं." तो तिच्याकडे अनिमिष नेत्रांनीं पाहूं लागला. तिच्या उरोभागाचा कांहीं उघडा भाग त्याला आजच प्रथम इतक्या मोकळेपणानें पाहता आला. तिच्या ते लक्षांत येतांच तिनें त्या बाजूचा हृत्प्रांत झांकला, तोंच वस्त्र अपुरें असल्यामुळे दुसरा भाग उघडा पडला. शकुंतला म्हणाली, "काय करावं बाई. लुगडं वाळतही नाहीं मेलं लवकर."

"अग तें वाळूं नये म्हणून माझी महादेवाला प्रार्थना चालली आहे सारखी...तूं कशी दिसतेस ह्या वेळीं सांगूं तुला? ...तपश्चर्येंत तल्लीन झालेल्या मिल्लीण पार्वतीसारखी."

"आत्मस्तुती आहे बरं ही." शकुंतला म्हणाली, "मला पार्वती म्हणायचं म्हणजे स्वतःला महादेव म्हटल्यासारखं होतं."

"तूंच ना म्हटलंस मला देव आत्तांच."

नंतर विजय सरपणासाठीं काड्याकुड्या वेंचायला गेला आणि शकुंतलेनें पुन्हां आपलीं थोडीबहुत वाळलेलीं वस्त्रें परिधान केलीं. त्यानंतर आपलीं साधीं आभरणेंही ती ल्याली. हें सर्व होतांच तिनें दगडांची एक चूल केली, चुलीभोंवतीची जागा झाडून स्वच्छ केली, गरज नसताना ती हौसेनें सारविली, विजयनें जमविलेल्या काड्याकुड्या नीट लावल्या. तो धोतर नेसून सदरा घालून तयार होतांच ती म्हणाली, "पाणी?"

त्यानें तें पाण्यानें मोठ्या कढईयेवढं लहानसें खडकांतलें डबकें तिला दाखविलें. आधीचें शिळें पाणी त्यानें उपसून टाकलें तोंच कांहीं वेळांत पुन्हां नेमकें तेवढेंच ताजें पाणी तयार! तें झऱ्यांचें पाणी पुन्हां पूर्णपणें स्थिरावतांच विजय म्हणाला,

"पाहतेस काय? भर ना तें पाणी भांड्यांत."

तिनें त्या चिमुकल्या पल्वलाचा आरशासारखा आतां उपयोग केला होता !

वाऱ्यामुळें विस्तव पेटविण्यापासून त्रास झाला. लांकडेंही किंचित् ओलींच होतीं. परंतु पाहतां पाहतां शकुंतला स्वयपाकांत रंगली. विजयनें साधूच्या झोंपडीचा एक वेळूचा तुकडा घेतला व चाकूनें तो त्याच्या शिळका करूं लागला. नंतर त्यानें पळसाच्या कांहीं डहाळ्या तोडून आणल्या व पत्रावळी करण्याचा प्रयत्न चालविला. हा त्याचा उद्योग पाहून शकुंतला त्याचेकडे पाहून हंसली.

" अग, " तो म्हणतो, " हंसायला काय झालं ? पूर्वी जांवई व्हायला असलीच परीक्षा द्यावी लागत असे "

" इश्श ! पण आतां परीक्षा पाहायची आहे कुणाला आपली ? "

तें पिठलें–भात, पोळ्याचें अन् आमरसाचें वनभोजन दोघानाही किती किती गोड वाटलें ! त्या झऱ्याचें गार पाणी तर प्रत्यक्ष अमृतासारखें मधुर मधुर वाटलें. जेवतांना विजय उठला व झोंपडींत डोकावून परत आला.

शकुंतलेनें विचारलें, " जेवायला का बोलावता आतां त्या साधुबोवाला ? "

" छे ग ! पाहिलें तो इकडे पाहण्याचा संभव आहे का म्हणून ! वामकुक्षी चालली आहे स्वारीची ! "

" पण कशाला तें ? " असें तिनें विचारतांच त्यानें तिच्या तोंडात घासच घातला.

जेवणें झालीं, भांडीबिंडीं घांसूनपुसून बांधून ठेविलीं, थोड्या वेळ गोठ्यांतल्या गाई पहिल्या, चबुतऱ्यावर विश्रांति घेतली, आणखी अकराचे सुमारास त्यांनीं चौऱ्याची वाट धरली.

आपली चामड्याची पाण्याची पिशवी विजय भरूं लागला, तेव्हां " कशाला ती ? तीन तासांत पुन्हां का पाण्याची जरूर पडणार आहे ? " असें शकुंतला म्हणाली.

चौऱ्याचा पहिला, दुसरा, व तिसरा असे डोंगर, व शेंवटच्या शेकडो पायऱ्या चढून जातांना शकुंतलेला देवत्र दिसले. डोईवर सूर्य तापत होता, उन्हाचे चटके बसत होते, आणि छायेसाठीं वाटेनें एकही वृक्ष नव्हता. त्यांचीं तोंडें इतकीं शुष्क झालीं, घसा इतका कोरडा झाला, कीं त्यांना सारखें पाणी प्यावें लागलें.

चौऱ्याचें शिखर गांठलें तेव्हां एक वाजून गेला होता. लहान मोठे हजारो त्रिशूळ त्या शिखरावरील लहानग्या मैदानावर आहेत. त्यावर जागजागीं शेंदरांचीं पुटें चढलीं आहेत.

शकुंतला अगदीं दमून गेली होती. माथा लागतांच अंग सैल सोडून धापा टाकीत ती खालीं बसली. एका त्रिशूळाचा थोडासा शेंदूर विजयनें काढला, पिशवींतल्या शेवटच्या चार दोन थेंबांनीं तो ओला केला आणि तिच्या कपाळीं आपल्या हातानें टिळा लावीत म्हटलें, " शकू ह्या त्रिशूळांची, तळपत्या सूर्य नारायणाची, अनंत आकाशाची साक्ष ठेऊन मी शपथ वाहतो, कीं जन्मजन्मांतरीं मी तुझ्यासाठीच राहीन. "

हें त्याचें चिमुकलें भाषण चालू असतांना तो अशा रीतीनें उभा राहिला कीं, थकून बसलेल्या शकुंतलेच्या अंगावर त्याची इवलीशी छाया पडली. त्यावर ती सहज म्हणाली, "तुमच्या सावलीनं मला जरासं बरं वाटतंय आतां."

तो त्या उदात्त अवस्थेंत म्हणाला, "तुला मी असाच जन्मभर माझ्या छायेंत ठेवीन."

यानंतर त्यानें दूरवर दृष्टि रोखली. ती अथांग खोल दरी आणि त्यानंतरचा आसमंतांत विलीन झालेला तो दूरवरचा विस्तीर्ण सपाटीचा प्रदेश! दोघांनींही अगदीं टोंकाशीं जाऊन खूब बारकाईचं निरीक्षण चालविलें. दक्षिणेकडच्या डोंगरास विळखा घालून सुतासारखा दिसणारा तो नागमोडी रस्ता, त्यानंतरचे इवलेसें दिसणारें नंदिग्रा खेडें, तें अनंत निळें आकाश, आणि निळसर होत होत अनंताशीं एकजीव झालेली ती भूमि! किती विशाल, किती अज्ञात–अज्ञात भासत होतें सारें!

"पुढं पाय ठेऊं नये गडे आतां. मला भय वाटतें." शकुंतला घाबरून म्हणाली.

"शकू, आपलें आयुष्य अन् मृत्यूनंतरचें अस्तित्वही असेंच आहे नाहीं का? पुढं पाऊल टाकतांना नेहमीच आपणाला भय वाटतें तें यामुळंच!"

परत येतांना उतार होता तरी शकुंतलेला शीण आल्यामुळे मार्गक्रमण मोठें जड वाटलें. पुन्हां इतकी तहान लागली कीं प्राण अगदीं कासावीस झाले. दुसऱ्या डोंगराच्या एका गुहेसमोर एक लहानसें, पाण्याचें डबकें होतें. परातीएवढाच आकार होता त्याचा! एक वीतभरही खोल नव्हतें तें. त्या पाण्याच्या तळाशीं सापाच्या पिलांसारखे लांब लांब जीव होते. पिपासेनें व्याकूळ झालेली शकुंतला त्या घाणेरड्या पाण्याकडे धांवून गेली. आणि विजय नको म्हणत असताही ती तें पाणी ओंजळीं ओंजळीनें प्यालीच! नंतर 'तुला कांहीं ह्या पाण्यापासून अपाय झाला तर माझीही तीच अवस्था व्हायला मीही तें पितों' असें म्हणत तहानलेला विजयही तेंच पाणी पोटभर प्याला! तें जीवन त्या वेळीं दोघांनाही अमृततुल्य वाटलें.

महादेवाजवळची भांडीकुंडीं घेऊन, साधूला दक्षिणा देऊन व जोड्यानें नमस्कार करून, तीं दोघें मोटारीजवळ आलीं तों तीन वाजून गेले होते!

सायंकाळीं दिवेलावणी झाल्यावर, पांढर पातळ परिधान केलेल्या, व आपल्या आंथरुणावर विसावा घेत निपचित पडलेल्या शकुंतलेजवळ येऊन विजय म्हणतो, "शकू अगदीं थोडं फिरून येऊं चल."

तिच्यांत चालण्याचेंही त्राण नव्हतें, परंतु विजयचा विरस करणें तिला आता शक्य तरी होतें का?

जवळच्याच पश्चिमेकडील एका टेकडीच्या माथ्यावर दोघेंही जाऊन बसलीं. गार वारा सुटला होता. दमलेली शकुंतला 'अहाहा' म्हणत वर आकाशाकडे पहात आडवी झाली! अष्टमीचा अर्धचंद्र आपल्या शीतल करांची तिच्यावर सुखद वृष्टि करीत होता. आकाशांतल्या तारका तिच्याकडे पाहून जणुं तिच्या तेजःपुंज पवित्र नयनयुगुलांचा

मत्सर करीत होत्या. विजय डावा हात तिच्या पलीकडे आधारून, तिच्याकडे सारखा निश्चिल दृष्टीनें पाहतच राहिला. चोहींकडे शांत शांत होतें. विजयच्या मंद श्वसनाचा मोहक मृदु नाद काय तो तिला ऐकूं येई. मुग्धावस्थेंतच सारा वेळ गेला. विजयच्या तळ-हाताची उन्मादक ऊब जेव्हां तिच्या कपोलाला मिळाली, तेव्हां तिला सुख-सुख वाटलें! गेल्या दीड महिन्यांत विजयचा स्पर्श तिला कितीतरी वेळ झाला होता, कितीतरी वेळ ती भीतिग्रस्त होऊन त्याला बिलगली होती, कितीतरी तऱ्हेतऱ्हेचे प्रेमाचे स्वैर खेळ तो तिच्याशीं खेळला होता. पण आजचा तो इवला स्पर्श!

तिची तंद्री एकाएकी नाहींशी झाली. ती चपापून अस्पष्ट आवाजांत म्हणते, " जाऊं या आतां परत. "

पण तिचीं जड पडलेलीं गात्रें कांहीं वेगळीच मुग्ध भाषा बोलत होतीं. लागलीच तिला त्या अर्धचंद्राऐवजी विजयचें मोहक मुखच आपल्याकडे येत आहेसें तिला वाटलें, चांदण्याऐवजीं त्याच्या पुढें पुढें येणाऱ्या आतुर नेत्रावरच तिची दृष्टि खिळली, तें त्याचें मंद श्वसन तिला आतां अधिकाधिक स्पष्टपणें ऐकूं येऊं लागलें, आणि विजयच्या त्या चिमुकल्या निश्चल वदनानेंच तें अनंत आकाश क्षणार्धांत व्यापून टाकलें!

कांहीं वेळानें दोघेंही मुग्धावस्थेंतच निमूटपणें परत घरीं आलीं!

---

## २३

# दोन निरोप.

नागपुरास मंडळी १५ जूनला पोंचली. पचमढीचे वातावरणांत बाबासाहेब व विजय यांच्या भेटीगोष्टीचे प्रसंग फारच दुर्मिळ होऊन गेले होते. आता पुन्हां पितापुत्राचे भेटीचे योग वरचेवर येऊं लागले,

लागलीच एक योग्य संधि साधून बाबासाहेबाजवळ त्यानें आपल्या लग्नासंबंधीं गोष्ट काढली. पापांना त्या दोन्ही मायलेकींबद्दल वाटणारा आदरभाव त्याच्या चांगलाच परिचयाचा होता. म्हणून ते नकार देतील ही शंकाही त्याचें मनास शिवली नाहीं.

त्यांनीही स्पष्टपणें नकार तरी कुठें दिला होता ? पण त्यांच्या त्या वेळच्या मनःस्थितींत त्याला बाबासाहेबांच्या बोलण्यावरून थोडासा युक्तीच्या विरोधाचा भास झाला.

ते म्हणाले, " अरे, यंदा कुठं तूं बी. ए. झालास. वकील वगैरे झालास म्हणजे संसारात पड...शिवाय शकूच्या लग्नासंबंधी जानकीबाईची संमतिही हवीच. आणखी तूंही विचारांना सारें कांहीं ठरीव, मागच्या पुढच्या गोष्टीचा विचार कर. घराण्याच्या नांवालाही जपायला पाहिजे."

ह्या संभाषणाचा आशय शकुंतलेला कळला, तेव्हा तिचा काळजीनें ग्रस्त झालेला चेहेरा पाहून विजयला हंसूच आलें. तो तिला म्हणाला, " वेडे, इतकी का घाई सुटली तुला लग्नाची ? '

" इश्श, तसं नाहीं कांहीं ! "

आणखी पाहतां पाहतां पंधरा दिवस निघून गेले. हा काळ मोठा धामधुमीचा होता. अखिल भारतवर्षांत स्वातंत्र्ययुद्धाचीं लक्षावधी निशाणें आतां फडकूं लागलीं होतीं. 'झेंडा ऊंचा रहे हमारा' ह्या निशाणगीताचें पालुपद अहोरात्र कानांत घोंघावत होतें. महात्मा गांधींच्या नांवाचे जयघोष मध्यरात्रीचे सुमारासही अंजनीच्या तुरुंगांतून आसमंत दणाणून सोडत होते. स्त्रियांच्या प्रभातफेऱ्या, सायंफेऱ्या, मुलांची वानरसेना, अर्धा एक मैल

लांबीच्या त्या प्रचंड मिरवणुकी, मोठमोठालीं मैदानें अपुरीं पडणाऱ्या व संग्रामभूमीलाही लाजविणाऱ्या त्या विराटस्वरूपी सभा, तीं बहिष्कृत दुकानें, विदेशी कापडाच्या पेटलेल्या त्या मोठाल्या होळ्या, आणि एक पाय तुरुंगांत ठेऊन बेधडक छातीनें चोंहीकडे हिंडणारे, वीरश्री संचारलेले ते असंख्य देशभक्त! त्यावेळीं कुणी कशाची पर्वा केली?

शिक्षांचें सत्र सुरू झालें. घोड्यांच्या टापांनीं कपाळमोक्ष झाले, लाठ्यांच्या वर्षावांनीं देह फुटून निघाले. छातींत बंदुकीच्या गोळ्या लागून धारातीर्थी मरण आलें. वीर स्त्रियांना बुटाच्या ठोकरा खाव्या लागल्या.

विद्यार्थ्यांनीं शाळा सोडल्या, सेवकांनीं नोकऱ्या सोडल्या. म्हाताऱ्यांचीं वांकलेलीं शरीरें उत्साहानें ताठ झालीं. मायाळू मातांनीं लडिवाळ लहानग्यांचे कांहीं काळ पाश तोडले, वीररमणींनीं पतीच्या रोषाची पर्वा केली नाहीं. कायद्याची तरवार मानेवर लटकत असतांना लष्करच्या हिंद लढवय्यांनीं गोळ्या झाडण्याचा हुकूम भिरकावून दिला!

विजयनेंही आपल्या बंगल्याचें अंगणांत एक विशाल होळी पेटविली. त्यांत मौल्य-वान् वस्त्रांच्या अनेक पेट्या रित्या केल्या. खादीच्या वस्त्रांनीं त्या सुंदर बंगल्याला हिमालयाच्या उत्तुंग शिखराची शोभा आली.

८ ऑगस्ट रोजीं गढवाल दिन साजरा झाला. शहराच्या सर्व भागांतून सशस्त्र गोरें लष्कर आपल्या धमकीची टिमकी वाजवूं लागलें! सभाबंदीच्या कलमाची द्वाहा फिरविली गेली. तरी मिरवणूक व सभा हा कार्यक्रम पार पाडणारच हा स्वातंत्र्ययुद्धाचा दुंदुभीनाद कर्णोपकर्णीं घुमूं लागला.

ह्या कार्यक्रमांत भाग घेण्याचा आपला निश्चय विजयनें घरीं जेवतांना बोलून दाखविला. बाबासाहेबांचें पितृप्रेम उचंबळून आलें. ते म्हणाले, "तूं तुरुंगांत गेलास तर पर्वा नाहीं, पण आज लाठीमार, गोळीबार इत्यादिकांची भीति आहे. आजच्या कार्यक्रमांत सामील होणार नाहींस तर बरं होईल." एकुलत्या एका मुलासाठीं आंतड्याला असा पीळ पडणें साहजिकच होतें!

पण शकुंतलेची मनःस्थिति अधिकच केविलवाणी झाली. दुपारीं माडीवर चढून ती त्याच्यापुढें जाऊन मुकाट उभी राहिली. तिच्या नारिंगी खादीच्या पातळांत ती हुबेहूब देशसेविकेसारखीच दिसत होती.

"काय शकू?" विजयनें सूत कांतीत असतांना तिला प्रश्न केला.

"कांहीं नाहीं!" ती त्याच्या वेलबुट्टी काढलेल्या खादीच्या बैठकीवर पाय दुम-तून संथपणें त्याच्या बाजूस जाऊन बसली.

"घे, तूंही कर थोडी संवय." असें म्हणून विजयनें तिच्यापुढें एक तकली व कापसाचा पीळ टाकला. तिनें कसाबसा सूत कांतण्याचा प्रयत्न चालविला. धागा पुनःपुन्हां तुटूं लागला. तिचीं बोटें तिला गळून पडल्यासारखीं वाटूं लागलीं.

" मला नाहीं बाई जमत हे " असें म्हणत तिनें मधुर स्मित केलें. आपल्या चरक्याकडे दृष्टि लावून, सूत कांतीतच विजय तिला म्हणतो, " चित्रकर्त्रीला हें पाहतां पाहतां जमेल. " तुटलेला धागा जुळवायला त्यानें चरका थांबवला व सहजच तिच्याकडे एक दृष्टिक्षेप केला. पाहतो तों तिच्या गालावर मोत्याचा दाणा !

" वारे रडणारी देशसेविका " आकुंचित भुवयांनीं तिच्यावर नजर रोखून विजय स्मित करीत म्हणाला.

तिनें लटकें हास्य करीत म्हटलें, ' नेहमीं मला आपल्या छायेंतच ना ठेवायचं होतं !

" मग, आतां कोण नाहीं म्हणतो ? "

" तुरुंगांत मला एकटीला सोडून जायची हौस आलीय तीं ? "

" म्हणजे कर्तव्य सोडायचं असा नाहीं कांहीं माझ्या शपथेचा अर्थ...तुरुंगांत गेलों तर बाहेर नाहीं का येणार पुन्हां परत ?...मग तूं अन् मी आहोंतच पुन्हां दोघें. "

" माझं ऐकायचं येवढं. नाहीं ना भाग घ्यायचा या चळवळींत. "

येवढा नाहीं पुरविता येत हट्ट मला. तूंच चल उलट आज भाग घ्यायला...आजच खरी धैर्याची कसोटी आहे आपल्या. लाठ्या, टापा, गोळया ! चल, हातांत हात घालून स्वर्गारोहण करूं दोघें. "

रात्रीं महालाच्या चौकांत किती गंभीर दृश्य दिसत होतें. आजूबाजूच्या इमारतीच्या माड्या, रस्त्याचा प्रत्येक कानाकोपरा, नगरभुवन, वाचनालय, नाट्यगृह, त्यापुढील मैदानें, चारही रस्ते स्त्रीपुरुषांच्या अथांग गर्दीनें फुलून गेले होते. आणि अडविलेल्या मिरवणुकींतले ते हजारो स्वयंसेवक रांगारांगांनीं बसलेले दिसत होते. घोडेस्वार, पलटणी, पोलीस अधिकारी—किती उग्र रूप धारण केलें होतें राजसत्तेनें ! क्षणाक्षणांत बातम्या पोंचत कीं आतां लाठीमार होणार, गोळ्या झडणार ! तसा वेतांचा प्रसाद अनेकांनीं गोड मानून घेतला. पण त्या तसल्या मरणाच्या द्वारांही, स्वयंसेवक गप्पा गोष्टी करीत, हास्यविनोद चाले, देशसेविकांच्या हातची मेवामिठाई खात, गोड पाणी पीत. स्वास्तिक मंडळ सुश्रूषेसाठीं व औषधोपचारासाठीं सुसज्ज होतें. त्या मिरवणुकीच्या पहिल्या रांगेंत बसलेल्या विजयला जेव्हां शकुंतलेनें खायला व प्यायला दिलं, तेव्हां, दोघेंही एकमेकाकडे पाहून गंभीरपणें हंसलीं !

तो उठून तिच्या कानाशीं तोंड लावून म्हणाला, " ए गोड देशसेविके, मलाच नकोस देऊं खायला सारखी. पक्षपात नको व्हायला इथं ! "

" इश्श ! " ती उद्गारली.

" एकदम मागे वळून पहात त्यानें घाबरल्याची बतावणी केली—

" अरे बापारे, गोळीबार होणार वाटतं आतां. "

शकुंतला चपापून तिकडे पाहू लागली, तेव्हां तो खो खो हसून तिच्या कानांत गुणगुणला, "मरणाचं भय का वाटतं तुला वेडे?" मृत्यूचें भय! त्यावेळीं भीतीचा लवलेश कुणाही निःशस्त्रांच्या मुखांवर दिसत होता का?

त्यानें इकडे तिकडे पाहून हळूंच तिची पाठ एकवार थोपटली व म्हटलें, "घाबरूं नकोस. मीही आहे इथंच."

ती मात्र दोन पावलें दूर सरली व म्हणाली, "हें काय? कुणी पाहील ना!"

—शकुंतलेला मरणाची भीति वाटत होती काय?

इतक्यांत समोरून कांहीं पोलीस अधिकाऱ्यांबरोबर जिल्हाधिकारी आले व विजयला म्हणाले, "तुम्ही बी. ए. आहांत ना?"

"होय!"

"मग बेकायदेशीर वर्तन करितां? इथून चालते व्हा."

"मला उचलून न्यावें लागेल."

"अजून झोंप येत नाहीं तुम्हाला?"

"सर्व राष्ट्र अन् जग जागते आहे ह्या लढ्यासाठीं, मग मीच कसा झोंपेन?" विजयला पकडलें. 'महात्मा गांधी की जय' ह्या प्रचंड घोषांत त्याची तुरुंगांत रवानगी झाली. शकुंतला बारा वाजेपर्यंत थांबली. नंतर दोन्ही पक्षाचा विजय होऊन सर्व निर्विघ्नपणें पार पडलें. दुसरे दिवशीं सकाळीं विजयलाही सोडून देण्यात आलें!

सप्टेंबरांतील मेघांचे गडगडाट, गांधींच्या जयघोषांपुढें लाजू लागले, पेटलेल्या डोळ्यांनीं जलधांतलें पाणी आटून गेलें, शोकविव्हळ वीरमातांच्या व वीरपत्नींच्या अश्रुधारांपुढें झिम् झिम् पावसाकडे कुणीही लक्ष दिलें नाहीं, खादीच्या नारिंगी पातळांमुळें इंद्रधनुष्यें अंतर्धान पावलीं, आणि भरून आलेल्या अभ्रांमुळें पडलेल्या काळोखांपेक्षा भारतांतील तुरुंगांतल्या अंधारकोठड्यांकडेच सर्व जगाचें लक्ष वेधलें!

—पण बिचाऱ्या शकुंतलेचें लक्ष?

—ती आपली मळमळ आतां कशी लपविणार?

—तिच्या ओकाऱ्याचा आवाज कसा थांबवणार?

—तिच्या चेहऱ्यावरच्या सुवर्णकांतींत तिच्या मुखाला काळें फांसण्याचें सामर्थ्य होतें!

—तिची घट्ट होत चाललेलीं स्तनयुगुलें?—

—वेड्या विजया! दूरदूरच्या बातम्यांकडे तुझे डोळे लागले आहेत, पण तुझ्या सन्निध असलेल्या शकुंतलेकडे तुझें लक्ष नाहीं का?

—ती बिचारी त्या पुरुषाला हें स्पष्टपणें कसें सांगणार?

एक दिवस विजयला अचानकपणें पकडलें. ती त्याला लवकरच कांहींसें सांगणारच होती. २० सप्टेंबरला त्याच्या शिक्षासुनावणीचा दिवस. बाबासाहेबाबरोबर तीही त्या दिवशीं तुरुगांत शिरली. तें उंच सळाखांचें स्वर्गद्वार, त्या मधल्या रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या उत्तुंग दगडी भिंती, ती आंतली बाग, आणि गवताळ गालिच्यावरचा, चार दोन खुर्च्याबेंचांनीं, हंसऱ्या चेहऱ्याच्या न्यायाधीश-अधिकाऱ्यांनीं, गंभीर शिपायांनीं, खिन्न प्रेक्षकांनीं गजबजलेला, तो सित रंगाचा, काळ्या काळजाचा तंबू! खुर्चीवर बसलेल्या विजयच्या चेहऱ्यावर आधींच स्मित झळकत होतें, आणि आपल्या शकूला पाहतांच तो गोड हंसला. त्याला एक वर्षाची शिक्षा सुनाविण्यांत आली, तरी आपला तो तिच्याकडे पाहून हंसतच होता! आणि ताटातुटीच्या त्या शेवटच्या क्षणांतही त्यानें मनाची शांती ढळूं दिली नाहीं. बाबासाहेबांना अगदीं पायावर डोकें ठेवीत त्यानें म्हटलें "येतो हं पापा." आणि डोळे डबडबलेल्या पण मधुर स्मित करणाऱ्या शकुंतलेकडे येऊन तो म्हणाला, "थेट मेरी फिल्बिन् शोभतेस बुवा आज."

आणखी आठ दिवसांनींच त्याची तुरुंगात भेट घेण्यासाठा तिनें खटपट केली. पण तिची निराशा झाली. शिवनीच्या तुरुंगात त्याची रवानगी झाली होती.

आणखी एक शेवटचा उपाय म्हणून बाबासाहेबांना तिनें विचारलें, "तुरुंगांत पाठविलेंलं पत्र फोडतात का बाबा?" तिला कल्पनाही नव्हती कीं ते रागावतील. पण ते त्यांचे शब्द तिचें हृदय भेदून गेले.

"फोडतात तर काय! अन् काय ग पोरी, हे काय नानाचार चालविले आहेस तूं...आपल्या प्रेमाच्या गुल्गुल् गोष्टी का लिहिणार आहेस त्याला! आणखी लग्नबिग्न पण ठरवून टाकलं आहेत म्हणे तुम्हीं. तोच निलाजरा सागत होता मला. त्याला काय! स्वैर वृत्तीचा पुरुष तो. तुझ्यासारखी तरणीताठी पोर पाहिली अन् झाला अमळ वेडा. पण आम्ही डोळे मिटले नाहींत म्हणावं अजून. आमच्या घराण्याची पत कुठं, अन् तुझ्यासारखी स्वैंपाकिणीची पोर का सून होणार आमची!...प्रत्येकानें आपले पायरीपायरीनेंच वागावं. तूं नाद सोडच त्याचा आतां. माझं तूं मीठ खाल्लं आहेस. निमकहराम नको होऊस अशी... नाहीतर नागिणीला दूध पाजल्यासारखं होईल हें सारं."

दोन्ही हातांनीं तिनें डोळ्याला पदर लावला, आणि ती हुंदके आवरण्याचा आटोकाट प्रयत्न करूं लागली.

बाबासाहेब खुर्चीवरून उठून तिच्याजवळ गेले. त्यांनी तिच्या पाठीवरून वात्सल्यप्रेमानें हात फिरविला व तिचें ते सांत्वन करू लागले, "मुली, तुझी कीव येते मला, तुझं त्याच्यावर प्रेम असेल. कबूल सारं. पण हें पहा. तुझ्याजवळ मला इतकं निर्दय होण्याचं स्पष्ट कारण नाहीं देतां येत. उद्याला येणारच आहे तुझी आई. ह्या येत्या डिसेंबरांत मी तुझं एखाद्या चांगल्या शिकल्यासवरल्या मुलाशी लग्न करून देतों, माझ्या मुलीसारखीच आहेस तूं मला."

शकुंतलेला आतां तर ओक्साबोक्सी रडायला आलें.

" बरं हें पहा. " बाबासाहेब म्हणाले, " तूं हवं तर शिवनीला जाऊन भेटून ये त्याला येत्या रविवारीं. मी तुला पैसे देईन, सारें देईन...पण पत्र तुरुंगांतल्या अधिकाऱ्यानें वाचलं तर बभ्रा व्हायचा. तूं भाऊ मान त्याला आपला. पण हा तुमचा लग्नाचा हट्ट मला नाहीं पुरविता येणार तुम्हां दोघांचा. अन् तो बघ माझं ऐकतो किनाई तें. एखाद्या चांगल्या घराण्याची सुंदर मुलगी जर मीं त्याला मिळवून दिली तर तो तिच्याशीं एका पायावर लग्न करायला होईल तयार. अन् तुझं पण लग्न झालं कीं तुलाही नाहीं यायची त्याची आठवण......आपल्या लीलेचंच बघ ना. इतके दिवस त्रास देऊन अखेर ती गेलीच कीं नाहीं सासरीं नवऱ्याशीं गुल्गुल् गोष्टी करीत......तुझं आपलं हें तात्पुरतं दुःख आहे सारं झालं. "

त्या रात्रीं शकुंतलेचें उसें ओलें चिंब झालें ! ती स्फुंदत स्वतःलाच दोष देऊं लागली. " बाबांचं काय चुकलं ? त्यांनीं उलट आपलं आईला दिलेलं वचन पाळलं. एक शब्द तरी बोलले का माझ्याजवळ माझ्या जन्मरहस्याचा. हेंच तें कारण असावं. मीच विचार करायचा होता. इतक्या थोर घराण्यांत असली पापाचरणांत जन्मलेली सून केली तर घराची काय शोभा होईल ?......पण विजयला तरी कळूं नये का आधीं हें सारं ?...माझ्यासाठीं प्राण द्यायला ते तयार होतील. पण बाबासाहेबांचे प्राण एकुलत्या एक मुलाच्या पोरखेळामुळें अगदीं कसे कासावीस होतील...आईला कळवूं का हे सारं उद्या येतांक्षणींच ? देऊं का माझ्यावरच्या संकटाची तिला कल्पना ?...देवा, आतां काय करूं रे मी ? "

त्या रात्रीं तिला आत्महत्या करण्यापर्यंत भयानक विचार आले. पण दुसरे दिवशीं तिच्या तांबूस डोळ्याशीं स्पर्धा करीत ओशत्री पहाट उगवली.

तें सकाळचें पत्र शालिनीचें होतें. तिनें लिहिलें होतें—

"३०, व्हिजिटेरियन् मॅन्शन्
पोयबावडी, परेळ, मुंबई
३० सप्टेंबर १९३०.

प्रिय शकू,

मीं पचमढी सोडल्यापासून तुला दोन ओळींचेंही पत्र लिहिलें नाहीं, म्हणून तुझे ते वटारलेले वाघाचे डोळे मला भिववितात इथं, अन् आतां टिमथी नि मी दोघंही शिकारी राहिलों नाहीं. हो विसरलेंच, एकदां त्यांचं हिंदु नांव मला घेऊं देच बाई. थट्टा नाहीं हो करायची.

" हिंदुस्थानांत झाला स्वराज्याचा उदय, ख्रिश्चन् टिमथी झाले उदय. " असा आहे त्यांच्या नांवाचा मीं जोडलेला उखाणा.

पण हें सारें व्हायला किती त्रास पडला दोघांनाही. दिवसा ढवळ्या डाकाच पाडला कीं मीं सायमन् कुटुंबांत. अन् ह्यांच्यासारखं रत्न त्यांच्या आईबापापासून हिसकावून आणलें.

आम्ही परोपरीनें सांगितलें पपा—ममांना समजावून. पण आमचें ते कांहीं केल्या ऐकेचनात. पापांनीं स्पष्ट सांगितलें कीं ' ह्या वेश्येच्या हिंदु पोरीशीं लग्न केलेंस तर मी तुला हांकून लावीन घरांतून म्हणून. ' तरी मी ख्रिश्चन् व्हायला तयार होतें. अखेर हेंच पडले घराबाहेर मला घेऊन. ममानीं तर हंबरडाच फोडला ह्यांच्या गृहत्यागाचे वेळीं. मला ' वेश्ये, सटवे, तुझा सत्यानाश होईल, प्रभु येशू तुझं कधीं बरं करणार नाहीं. ' कितीतरी बिचारीनें शिव्या देऊन घेतल्या.

ह्यांनी आणखी सुट्टी काढून घेतली व एक वरिष्ठ अधिकारी त्यांच्या परिचयाचे असल्यामुळें त्यांची बदलीही इथें होऊं शकली. मीही शिक्षकिणीची नोकरी करतेय् आतांशा.

आम्ही रजिस्टर विवाहच केला. पण ह्या गांधींच्या अहिंसावादी चळवळीमुळें हेंच अखेर आवडीनें हिंदु झाले. आतां दोघांनाही कांहीं भलतेंसलतें खायची इच्छा होऊं नये, म्हणून मुद्दाम आम्ही ह्या सोवळ्या इमारतींतच राहतों आहोंत.

हो, मावशीचं सांगायचं राहिलंच तुला. ती इतकी रागावली आहे माझ्यावर कीं तोंड पहात नाहीं माझं. पण इतकंही असून खूब सुखांत आहे मी आतांशा.

तुमची कुठवर आली आहे प्रगति ? सांभाळ हो. विजय वेड लावतो अन् वेळ आली कीं नकार देतो. आधीं लग्न लाव म्हणावं माझ्याशीं अन् मग मला हात लाव. घाणेरडी थट्टा वाटते का तुला ही ? अग लग्नानंतर माणसें कां नाहीं उघड उघड बोलतात चालतात. विजयरावला दाखवू नकोस बाई हें पत्र.

—तुझी शालिनी सत्यवादी ( हें आमचें नवें आडनांव ) "

हें पत्र वाचून होतांच तिनें पक्का निश्चय केला कीं, आपलं रहस्य आईलाही कळवूं नये आतां. बाबासाहेबांचें, आईचें, कुणाचेंच मन दुखवूं नये. साऱ्या प्रसंगांना धीरानंच तोंड द्यावं.

विजय तरी पत्करतात कीं नाहीं अखेर मला कुणास ठाऊक ? अन् समजा विजयला आतां प्राणांतिक दुःखही झालें माझ्यासाठीं तरी कांहीं काळानं विसरून जातील ते मला. पुरुष आहेत ते. शालिनीसारखे मला त्यांच्या वडील मंडळीचे शिव्याशाप घ्यायला नकोत कीं त्यांना दुःखांत लोटायला नको. त्यागांतच सुख आहे, भोगांत नाहीं...अन् माझी आई ?...तिच्या मायेसाठीं मी सर्वांनाच कशाला कष्टांत नि दुःखांत लोटूं ? "

त्याच दिवशीं त्या मायलेकींची कडकडून भेट झाली. रात्रीं खूब खूब गप्पा झाल्या. शकुंतला मधून मधून उठे आणि अंगधुण्यांत जाऊन ओकाऱ्या दाबण्याचा प्रयत्न करी. पण तिला खूब मळमळून आलें, आणि ती खूबच भडभडून ओकूं लागली. रोज तिच्याकडे कुणाचें लक्ष असणार? पण आजचे ते कुतूहलनानें टवकारलेले कान, काळजीनें पाहत असलेले मायेचे डोळे ! त्या डोळ्यांची तिला खूबच भीति वाटली.

आईनें अखेर तिला विचारलेंच.

"शकू, आल्यापासून पाहतें आहे, तुझा चकाकणारा चेहरा, अन् ह्या ओकाऱ्या. काय अर्थ समजूं मी ह्याचा?" पोरी, कांहीं संकट तर नाहीं ना घेतलंस ओढवून?"

ती चपापली, भेदरली. पण तिनें मन घट्ट करून जणुं अजाणतेनं विचारलं, "काय! कसलं ग संकट आई?"

"मला भलताच संशय येतो तुझ्याकडे पाहून."

"म्हणतेस तरी काय आई तूं? स्पष्टच कां नाहीं विचारीत?"

"अग कुणा दुष्टाच्या फंदांत पडून कांहीं दिवसबिवस तर नाहीं ना गेले तुला?"

तिनें खोट्या हास्याचा शिताफीनं आविर्भाव केला आणि म्हटलें, "वा ग वा आई. यांत्रेवरून ही नवी पारख शिकून आलीस वाटतें. सारे सात–आठ दिवस झाले गेला महिना उलटून मला. विचार हवं तर उद्यां रमाकाकूना."

"मग कांहीं माशीबिशी गेली कीं काय आज?"

नाहीं अलीकडे किनई पोटांत दुखतं माझ्या नि भूकबीक लागत नाहीं बरोबर."

❦ ❦ ❦ ❦

रविवारीं सकाळीं तिने बाबासाहेबांना सांगितलें, "बाबा, मी जाऊन येते शिवनीला. द्या मला पैसे."

त्यांना पांच रुपये तिच्या हातावर ठेविले.

"आणखी दहा रुपये द्या बाबा. विजयरावांनीं मला धार्मिक पुस्तकें आणायला सांगितले होतें मागेंच."

त्यांनीं आणखी एक नोट तिच्या हातावर ठेविली.

"हें पहा आतां तें जुने नांव विसरायला लाव त्याला समजलीस. मग तुला जन्मभर मी माझीच मुलगी समजेन."

"हो का बाबा! मग आतां नको हो तुम्हाला काळजी. मी त्यांची दृष्टि निवळविते आतां."

"शाबास पोरी मोठी शाहाणी आहेस तूं. म्हणून तर मला तूं आवडतेस." असें म्हणून बाबासाहेबानें तिच्याकडे फार समाधानानें पाहिलें. तिला किती आनंद झाला बाबांना पुन्हां सुख दिल्याचा!

तिनें वांकून त्यांना नमस्कार केला व ती म्हणाली,

"येतें हं बाबा."

आईला नमस्कार करतांना तिचा ऊर दाटून आला. पण तिनें आपलें मन पाषाणापेक्षांही घट्ट केलें.

ती म्हणाली, " आई, मी जाऊन येते हो जरा शिवनीहून."

" कशाला ग ?"

" बाबा, सांगतील बघ तुला सारं, विचार त्यांना नंतर." तिलाही तिनें नमस्कार करतांना म्हटलें,

" येते हं आई."

चूल सारवीत असलेल्या व आपल्यासाठीं भरल्या हातानें बाहेर येऊन उभे राहिलेल्या जन्मदात्रीकडे, मोटारींत बसेपर्यंत तिनें तीन तीन वेळ वळून डोळे भरून पाहून घेतलें.

विजय सुरुंगांत गेला. त्याची छाया दुरावल्याक्षणींच तिला आईचा आसरा लागला. परंतु तें तिचें आईचें दर्शनही तिला त्या वेळीं सूर्यास्तानंतरच्या बीजेच्या चंद्रकोरीसारखेंच पुसट व क्षणासाठीं मिळालें.

मोटार चालू होतांच तिनें शोफरला सांगितलें,

" अरे एकदम शिवनीच्या मोटार स्टँडवर नको चलूस, मला स्टेशनजवळच उतरवून दे. एका मैत्रिणीला भेटून जायचं आहे मला."

आणि हें वाक्य पुरतें करतांच तिचा कंठ दाटून आला आणि तिच्या उष्ण कपोलावर अश्रूंचे घळघळ ओघळ वाहूं लागले !

---

२४

# निराशा

कुणाला आपल्या दीर्घ प्रवासाचा संशयही येऊं नये म्हणून तिनें एका लहानशा गाठोड्यांत लुगडेंबिगडें जें कांहीं थोडेसें आवश्यक सामान घेतलें होतें तेवढेंच. तिला वाटलें होतें कीं गाडीच्या डब्यांत तरी तिला एकदां मोकळेपणानें रडायला मिळेल. पण तेवढेंही समाधान दैवानें तिला दिलें नाहीं. डब्यांत चांगल्या २०।२५ बायका होत्या. त्यांपैकीं एक पडदानशीन मुसलमान स्त्री, एक गुजराथी कुटुंब म्हणजे आई आणि तिच्या चार मुली, आणखी बाकीच्या साऱ्या आपल्या महाराष्ट्र बायकाच होत्या. इतक्या जणींच्या समोर कसें रडायचें? चांगलें जळगांवपर्यंत कुणाचें तिच्याकडे विशेष लक्ष गेलें नाहीं. प्रत्येक बाईला वाटे कीं ही दुसऱ्या कुणाची कुणीतरी असेल. पण त्यांतील दीर्घ प्रवास करणाऱ्या स्त्रियांना ह्या मुलीजवळ अंथरूण पांघरूण नाही अन् ही आपली न झोंपतां बसूनच आहे, हें ध्यानात आलें. डब्यांत सर्वांनीं फराळ केले होते, पण ही आपली तशीच. त्या पोक्त बाया आपल्या सुनालेकी व जावयांच्या अनेक लहानसहान गोष्टी सांगून जेव्हां एकदांच्या झोंपल्या, तेव्हां हिच्याकडे तिच्या येवढ्याच एका मुलीचें लक्ष गेलें. ती तास दीड तासापासून आपल्या अंथरुणावर सारखी चुळबुळ करीत होती. आणि आतां ती हळूच उठली व शकुंतलेजवळ जाऊन म्हणते,

" कुठं जायचं आहे तुम्हाला ? "

" मुंबईला. "

" मग एकट्याचशा."

" होय तिकडं तुरुंगांत जायचं झालं आहे नागपुरला, अन् इकडे माझ्या एका मैत्रिणीच्या आजारपणाची तार आली म्हणून निघालें एकटीच मुंबईला जायला. "

" पण कांहीं सामानसुमान बरोबर घ्यायचं होतंत कीं नाही ? "

" अहो, गाडी सुटायला मुळीं अगदींच थोडा अवकाश होता तार आली तेव्हां. "

" तुमचं माहेर कुठचं ? "

" नाशिकचं ? "

" काय नांव बरं आपल्या वडलांचं ? "

" केतकर सबजज्जांची मी मुलगी—"

हें ऐकतांच त्या मुलीच्या भृकुटी आकुंचित झाल्या, तिच्या निटिलावर एक सुतासारखी रेषा प्रगटली, आणि तिच्या मर्मरी कपोलावर हास्याच्या खळया उमटल्या, तिनें पुन्हां प्रश्न केला,

" तुम्ही किती भांवंड आहांत ? "

" होतों चौघं, पण आतां आहोंत तिघे. "

" नांवं काय आहेत तुमच्या भांवडांची ? "

" उषा, अन् प्रभा. अरुण भाऊ वारला. "

ती मुलगी आणखी प्रश्नांवर प्रश्न विचारूं लागली. तेव्हां शकुंतला ' मला झोंप येते आतां ' असं सांगून तिथेंच गुडघ्यांत मान घालून बतावणी करूं लागली.

" मग मी देतें तुम्हाला माझ्यांतले अंथरायपांघरायला. " असं म्हणून तिनें तिला थोडेसें आंथरायचें पांघरायचें घ्यायलाच लावलें. काय असेल तें असो. शकुंतलेला ते अंथरूण मिळतांच अगदीं गाढ झोंप लागली.

त्या अनोळखी स्त्रीनें जेव्हां तिला उठविलें तेव्हां ती म्हणाली,

" कोणतं स्टेशन आहे हें ? "

" अहो नाशिक आहे हे. उतरायचंय् मला इथं...अन् ती चादर अन् ओढायचं राहूं द्या बरोबर आपल्या. परत नागपुरला जातांना नाशकाला उतरालच किनाई एक दोन दिवस. तेव्हां मिळेल मला सारं. "

" अहो, पण मग नांवबिव तरी तुमचं "

" उषेला आहे माहीत सारं. " इतकें बोलून ती निघून गेली. शकुंतलेनें खिडकीबाहेर डोकावून पाहिलें. दूरवरच्या त्या अंधारांत तिला काय तिनें आजवर नुसतें ऐकलेलें नाशिक दिसायचें होतें ? ती आपल्या मनाशींच म्हणाली, " केवढा घोंटाळा झाला ! तात्यांना काय वाटेल आतां माझ्यासंबंधीं ? मी प्राण गेला तरी हें रहस्य फोडणार नव्हतें. तें असं एका अनोळखी मुलीनें मजजवळून सहजासहजीं काढून न्यावें...आणखी आता काय राहिलें ? शालिनीचा पत्ता उषेलाही ठाऊक असेलच. मी शालिनीकडेच राहिलें तर माझा पत्ता लागायला कितीसा वेळ लागणार ?...अन् आतां हें त्या मुलीचें आंथरूणही परत कसें करायचें ? "

यानंतर तिच्या डोळयाला डोळा लागला नाहीं. सर्व बाया घोरत, लोळंपोळ झाल्या होत्या. तिनें डोक्यावरून पांघरूण घेऊन सारखें उजाडतपर्यंत मनसोक्त रडून घेतलें.

कल्याणच्या स्टेशनची जेव्हां धांवपळ ऐकूं आली, तेव्हां पांघरुणांतल्या पांघरुणांत तिनें पदरानें आपले डोळे व चेहेरा पुसून काढला आणि ती उठून बसून बाहेर पाहूं लागली.

सर्व जगाचा भूगोल ती शिकली होती. पण आईबरोबर व पार्वतीकाकूंबरोबर ती एक दोन वेळांच काय ती साऱ्या जन्मांत आगगाडीत बसली होती. आणि तो प्रवास म्हणजे तरी काय ? सारा तासा दीड तासाचा. ते क्षण मौजेचे असत आणि सोबत आई व वडीलधारीं माणसें बरोबर असत.

आणि आज ? तिला किती भांबावल्यासारखें झालें होतें. तिचा भविष्यकाळ तिला अज्ञात भेसूर स्वरूपाचाच वाटूं लागला. असा विचार येतांक्षणींच तिला विजयचे चौऱ्या-गडावरचे ते भविष्यकाळांतील भेसूरतेचे शब्द आठवले आणि आजूबाजूच्या बायांचा क्षण-भर विसर पडून तिच्या डोळयाला पाहतां पाहतां टचकन् पाणी आलें.

" काय ग मुली, चांगलं घरदार सोडून चळवळींत पडतां, अन् मग आतां असं रडायला काय होतं ? " एका पोक्तबाईनें तिला विचारलें.

त्या बाईच्या त्या अनाहूत प्रश्नाला तिनें उत्तर दिलें नाहीं, पण देशसेविकेचें सोंग आपणाला आणतां येण्यासारखें आहे, ही कल्पना दिल्यामुळें, तिचें तिनें मनांतल्या मनांतच आभार मानले.

या नव्या विचारानें तिला नवें चैतन्य आणलें. कल्याणला ती लोकल गाडींत बसली. मंडळी बदलली. कल्याणनंतर तिकडच्या प्रदेशांत, भाषेंत, पोषाखांत, हवेंत, जो फरक पडला होता व त्यामुळें जें तिला किंचित्सें चमत्कारिक वाटलें होतें तो भाव आतां पार लोपला. धिटाईनें तिनें कांहीं बायांकडून अवश्य ती माहिती, मुंबईला आपण विशेष अपरिचित आहोंत हें न दाखवितां, मिळवून घेतली.

ती परळ स्टेशनवर उतरली तेव्हां आठाचा सुमार असेल. पूल ओलांडला, फुटपाथ-वरून ती जाऊं लागली. तिनें तो शालिनीचा पत्ता अगदीं मुखोद्गत करून घेतला होता तिला काय कल्पना मुंबईच्या इतक्या विशालतेची ? पायधावडी चौकांतल्या त्या मुंबईच्या इतर भागाच्या मानानें ठेंगण्या इमारती तिला किती भव्य वाटल्या ! तिथली ती विरल गर्दी, ती बेताचीच धांवपळ, रस्ता ओलांडतांना अगदीच मोजकी लागणारी शिताफी, पण शकुंतलेला तिथंच अगदीं गोंधळून गेल्यासारखें झालें. व्हिजिटेरिअन मॅन्शन-साठीं शोध करीत ती मुख्य रस्ता ओलांडून पलीकडे गेली. तिच्याबरोबर असलेल्या हमालानेंच विचारपूस करीत तिला तिकडे नेलें.

त्यानंतर एका कापडाच्या दुकानांत त्याला तिनें चौकशी करायला सांगितलें. तेव्हां आणखीच एक नवा प्रश्न उपस्थित झाला, ' कोणतें व्हिजिटेरियन् मॅन्शन तें विचार ' असें तो दुकानदार म्हणाला.

ती म्हणाली, " तीस नंबरचें "

त्यावर तो हंसून म्हणतो, " ३० नाहींत, दोनच आहेत परळला व्हिजिटेरियन् मॅन्शन्स !"

एका व्हिजिटेरियन मॅन्शनमध्यें मद्रासीच राहत होते. दुसऱ्यांतला भैय्या बाहेर गेला होता.तरी तिनें एका गृहस्थाला प्रश्न करतांच तो म्हणाला कीं, " असलें कुणी जोडपंच ह्या अख्ख्या इमारतींत नाहीं."

'आतां काय करावं बरं ?' तिनें आपल्या मनालाच प्रश्न केला. तिनें हमालाला सांगितलें 'चल परत स्टेशनवरच.' असें म्हणून तिनें स्टेशन गांठलें. बोरीबंदरावर ती उतरली व एक व्हिक्टोरिया करून, जाहिरातींमुळें तिला ऐकून माहित असलेल्या 'माधवाश्रमांत' जाऊन उतरली.

येवढें सारं व्हायला ११ वाजून गेले. ते उंच उंच प्रासाद, सर्व तऱ्हेचीं चमत्कारिक माणसें, दुकानेंच दुकानें, ट्रामा, गाड्या, धांवपळ, धांदल, बेपर्वावृत्ति, रस्तेच रस्ते, वळणेंच वळणें, तऱ्हेतऱ्हेच्या भाषा, पाट्याच पाट्या, जाहिरातीच जाहिराती, जिकडे तिकडे आवाजच आवाज. बरें झालें तिनं गाडी केली. तिला तो चिमुकला घोडागाडीचा प्रवास चक्रव्यूहासारखाच घोंटाळयाचा वाटला. आपण कुठून निघालों, कुणीकडे जातों आहोंत, कांही कांहीं कळेना. अखेर ती 'माधवाश्रमा'ची इमारत आणि तो त्यापुढील बोळ पाहून तिचें भांबावलेलें मन शांत झालें. गाडीवाल्यानें तिच्याजवळून १॥ रुपया घेतला.

आंत जातांच उजव्या बाजूच्या बैठकीवर एक उघडे, स्मश्रू केलेले, शेंडी वाढवलेले व्यवस्थापक दिसले. नांव गांव पत्ता तिनें लिहिला. आपलें नांव तिनें ऐटींत " सौ. शकुंतलबाई भावे, " असें लिहिलें.

तिला तिथला थाटमाट चांगला वाटला. आधींच संकोचानें अन् भांबावल्यानें अर्धमेली झाली होती ती. पुन्हां जास्त चौकशी केली तर आपण गांवढळ ठरूं ही पर भीति॰ जसें जसे तिथल्या गडी माणसांनी तिला दाखविलें, त्या त्या प्रमाणें तिनें तोंडधुणें, स्नान, जेवण वगैरे आटोपलें अन् लागलीच शालिनीच्या पत्त्यावर एक पत्र लिहिलें.

आपल्याजवळचे पैसे तिनें मोजले. सारे चार रुपये १३ आणेच शिल्लक होते जवळ. तिनें ती चादर अन् ओढायचें नाशकाला पार्सल करून पाठवून दिलें. नंतर ती दिवसभर आपल्या खोलीबाहेर पडलीच नाहीं. दुपारच्या वेळीं चहा आणला तेव्हां तिनें तो नको म्हणून सांगितलें. रात्रा तिनें अगदी थोडा भातच खाल्ला.

तिच्या इच्छेप्रमाणें ती एकटीच होती खोलीत. दारावर कुणीशी थाप मारली. तिनें दार उघडलें. तिच्याजवळ कांहीं सामानबिमान नसल्यामुळें तिला त्याच दिवशीं पैसे देण्याविषयींची ती सूचना होती.

ती हंसून म्हणाली, " पळून का जाते आहे मी ? किती द्यायचे ? "

" ३ रुपये. फर्स्टक्लासचे दर आहेत हे. म्हणजे उद्याला अकरावाजेपर्यंतचें बिल चुकतं होईल. "

तिनें पैसे त्याच्या हातावर ठेविलें व दार लावून घेतलें.

" १ रु. १३ आणेच सारे शिल्लक आहेत आतां. उद्याला शालिनी आली नाहीं तर कसें ? " त्या रात्रीं तिला काळजी वाटत नव्हती असें नाहीं. ' पण शालिनी पत्र पाहता येईलच ' हाही तिला तेवढाच विश्वास होता. म्हणून तिला अगदीं गाढ झोंप लागली.

दुसरे दिवशीं तिनें किती उत्कंठेनें त्या दोघांची वाट पाहिली. आतां तिला पहिल्या दिवशीपेक्षा त्या वसतिगृहांत जरासा कमी संकोच वाटूं लागला होता. पण सायंकाळ झाल्याबरोबर ती चपापलीच.

तिनें व्यवस्थापकाकडे जाऊन मला जरा आपणाशीं खाजगी बोलायचें आहे असें सुचविलें. तिनें त्यांना आपली अडचण सांगितली. पण त्यांनीं स्पष्टच जबाब दिला. "बिलाचे पैसे रोजचे रोज चुकते झालेच पाहिजेत तुमच्या. तुमच्याजवळ सामानसुमान कांहीं नाहीं. आणखी देशसेविकेला केव्हा पकडून नेतील याचा नियमच नाहीं. आम्हाला ह्या बाबतींत कांहीं एक करता येण्यासारखें नाहीं. "

शकुंतला मुंबईस पोंचली त्याच दिवशीं नाशकाच्या कॉलेजांतून चार वजतां दोन मैत्रिणी घरीं परत येत होत्या.

उषा म्हणाली, ' खरंच का मालती हे सारं ? कीं आपली नेहमीप्रमाणं थट्टा तुझी? "

" अग सारंच खोटं असतं ते, " मालती आपलीं पुस्तकें हृदयाशीं घट्ट आवळीत म्हणाली, " तर तात्या-माईनाच हें सारं विचारायला का सांगितलं असतं मी तुला ? "

आपल्या गोलाकार चेहऱ्याचे बारीक डोळे माजरासारखे संकुचित करून उषा मनाशींच पुटपुटली, " त्या मुलींचं लग्न झालं आहे. तिचा नवरा तुरुंगात आहे. तिची एक मैत्रीण मुंबईस आहे. ती खूब आजारी आहे. आणखी अरुण, उषा व प्रभा हीं आपलीं भावंडें नि तात्या वडील असं तिनं सांगितलं ! "

घरीं येताच तिनें आपल्या वह्या पुस्तकाचें मेंडोळें जोरानेच टेबलावर भिरकावून दिलें, आणि धूम ठोकीतच माईच्या शोधांत मागच्या बाजूस ती जात होती, तोंच आपल्या आईशीं तिची टक्कर होऊन, तिच्या हातचा चहाचा कप खालीं पडून फुटलासुद्धा.

" भूत का संचरलंय् तुझ्या अंगांत आतांशा ? " माई आपल्या पदरावर पडलेले चहाचे थेंब झटकत म्हणाल्या.

" तात्या आले का घरीं ? " अधीरतेनें तिनें विचारलें.

" मग हा चहा कुणाला नेऊन देत होतें तर ? " रागारागानें माईनीं उलट तिलाच विचारले.

तात्यांना तिनें मालतीने सांगितलेली सर्व आश्चर्यजनक गोष्ट विस्तृतपणें निवेदन केली. तिला तात्यांच्या त्या वेळच्या एकदम कावराबावरा झालेल्या चेहऱ्याचा अचंबाच वाटला. ते ताडकन् खुर्चीवरून उठले आणि पट्टेवाल्याला त्यांनीं मोठ्यानें हांक मारली. नंतर ते उषेला म्हणाले, " उषे, अग शकुंतलाच आहे ती. बाबासाहेबांना तार करितोंच आत्ताच्या आत्तां. तिचें लग्न काय झालें न् ती एकाएकी मुंबईला सामानावांचून एकटी काय जातें ? "

" पण तात्या ! " ती कांहींसें घुटमळत विचारणारच होती.

" कांहीं विचारूं नकोस आतां. मग सांगेन तुला सारं कांहीं निवांतपणें. तुझ्या त्या शालिनीचा पत्ता घेऊन ये लवकर जा. तिलाही करूं एक तार. "

रात्रीं लागोपाठ दोन्हीं तारांचीं उत्तरें आलीं. नागपूरच्या तारेंत मजकूर होता कीं, ' शकुंतला मुंबईकडे गेलीच नाहीं, ' आणि मुंबईहून कळलें कीं, 'शालिनी आजारीही नाहीं, व शकुंतलाही तिथे आली नाही. '

त्या सायंकाळीं नाशकाहून तशी चमत्कारिक तार आल्यामुळें शालिनी जी बुचकळयांत पडली होती, ती दुसरे दिवशीं शाळेंत जाण्यासाठीं खोलीला कुलुप लावीत असतांना आपल्या पतिराजाकडे पाहून पत्र लपवीत हंसली व म्हणाली, " कुणाचं पत्र असेल ओळखा पाहूं ? "

उदय नामाभिधान धारण केलेला हिंदु टिमथी तिला कोकणींत म्हणाला, "तात्यांचें?"

" छट् " म्हणत तिनें शकुंतलेच्या पत्रांतील मजकूर त्याला सांगितला. दोघेंही सायंकाळीं माधवाश्रमांत जाऊन पोंचलीं, तेव्हां त्यांच्यासमोरच गड्यानें विद्युद्दीपाचें बटन दाबलें.

त्या दोघांनी कु. देशपांडेसंबंधी व्यवस्थापकाजवळ प्रश्न करतांच आपल्या शेंडीला गांठ मारून, दोन्ही मांड्यावर थाप मारीत, स्वारी डुलत म्हणाली.

" या नांवाचें इथं कुणीच उतरलें नाहीं ! "

" म्हणजे ? " एक भ्रुकुटी वक्राकार करीत शालिनीनें उदयकडे पाहून आश्चर्यानें उद्गार काढला,

" अहो कुमारी शकुंतला देशपांडे म्हणून कुणीच नाही इथं ? " त्या साहेबी थाटाच्या गृहस्थाचा तो इंग्रजी प्रश्न ऐकून, व्यवस्थापकानें आपल्या तुळतुळीत डोक्यावरील कानाशिलेमागचा भाग जरा खाजवला. आपल्या पोटावर घाईघाईनें हात फिरवीत तो म्हणतो, " सौ. शकुंतलाबाई भावे म्हणून कुणी नागपूरच्या बाई-"

शालिनी उदयकडे पाहून मध्येंच हंसत उद्गारली, " लग्न झालं कीं काय शकूनं ? काय लबाड आहे पण ! " आणि तिनें आतुरतेनें त्या व्यवस्थापकाला विचारलें, " कुठं आहे ती ? "

" अहो त्या अर्ध्या तासापूर्वीच इथचं भाडं पूर्ण चुकवून इथनं गेल्या बघा. "

" कुठं गेली ? कांहीं कळवून नाहीं का ठेवलं तुम्हाला ? " त्यानें दोन्हीं हाताचे आंगठे व प्रथम बोटें एकमेकाला चिकटवून नंतर पूर्ण पंजे मोकळे केले व एकमेकापासून हात दूर करीत म्हटलें,

" कांऽऽऽहि नाहीं. "

---

## २५

# कुंकू पुसलें–कुंकू लावलें !

तात्यासाहेब व उषेसंबंधीं विजयकडून बरेच वर्षांपासून बाबासाहेबांना माहिती होती. अरुण त्याचा अत्यंत जिव्हाळ्याचा एकमेव मित्र होता हें त्यांच्या लक्षांत होतें. पचमढीला उषेबरोबरही ते कांहीं प्रसंगीं बोलले होते. परंतु तात्यासाहेबांच्या असंदिग्ध तारेचा उलगडा म्हणून त्यांना कांहीं केल्या होईना. ती शिवनीस त्यांच्या एका ओळखीच्या डॉक्टरकडे जाऊन उतरणार होती. तेव्हां तिची केवळ २४ तासांची गैरहजेरी कांहीं एक चिंताजनक नव्हती. मग त्या तारेचा अर्थ हास्यास्पदच नव्हता काय? म्हणे 'शकुंतला आपल्या आजारी मैत्रिणीच्या भेटीसाठीं मुंबईस कालच्या मेलनें गेली काय?'

परंतु आणखी २४ तास उलटल्यावर मात्र बाबासाहेबांस त्या तारेचा कांहीं अर्थ उलगडला. आपण तिला रागानें बोललो. तिचा प्रणयभंग केला. पंधरा रुपये तिनें बरोबर नेले. शॉफरला स्टेशनजवळ उतरवून देण्यास सांगितलें. झट्‌दिशीं त्यांनीं शिवनीस तार केली. तिचे उत्तर दुसरे दिवशीं सकाळीं येतांच त्यांचे डोळे एकाएकीं विस्फारित झाले.

भीतभीतच जानकीबाईस त्यांनीं सर्व हकीकत सांगितली. त्या पाट धुवून भिंतीला ठेवीत होत्या. हे वर्तमान कळतांच हातांतील पाट आपोआप गळून पडून त्यांच्या घोंट्यावर आदळला.

लागलीच त्यांना तिच्या ओकाऱ्यांची आठवण झाली आणि विजय व शकुंतलेचें लग्न त्यांनीं जुळविलें असून, बाबासाहेबांनीं त्या दोघांचा विरस केला, हें कळतांच शकुंतलेवर आलेल्या संकटाची त्यांना एकाएकीं कल्पना आली. तात्यासाहेबांच्या कुटुंबाचा व बाबासाहेबांचा असा निकटचा संबंध आढळून येतांच, त्यांच्या कपाळीं काळजीच्या रेषाच उमटल्या. आपलें तात्याचें नातें बाबासाहेबांना कळलें कीं काय व तसें असल्यास तिकडच्या दृष्टीनें हें किती वाईट झालं ही ओझरती शंकाही त्यांना डिंवचून गेली. पण शकूच्या धैर्याचें त्यांना कौतुक वाटलें. त्या मनांत म्हणाल्या कीं, 'माझंच रक्त सळसळतं आहे तिच्या शरीरांत. आपल्या जिवाचं कदापि बरंवाईट करणार नाहीं" ती.'

तो सुटलेला पाट, कपाळावरच्या आंठ्या, वासलेला ' आ ', चिंताग्रस्त चेहरा, गपकन् खालीं बसणें, ही जानकीबाईची अवस्था पाहून बाबासाहेबांना कांहीं सुचेनासें झालें. लागलीच विजयच्याही भावी क्रोधाची कल्पना त्यांच्या मनांत एकाएकीं उसळली. जगांत त्यांना कुणा एकाचें विशेष भय वाटत असलें तर तें आपल्या ह्या एकमेव मुलाचें.

बाबासाहेब प्रसंगावधान साधून म्हणाले, " हें पहा जानकीबाई, तुम्ही तयारी करा. मेलनेंच निघूं या इथून नाशकाला जायला. तिथं नक्की माहिती काढून तसेच मुंबईला जाऊं पोरीच्या शोधांत. "

बाबासाहेबांची ही योजना ऐकतांच जानकीबाईही मुलीच्या शोधार्थ अधीर झाल्या. पण एका उग्र शंकेनें त्यांचे उतावीळ मन कांहीं काळ मागें खेंचलें गेलें. ' समजा माईला माझं तिथं उतरणं खपलं नाही, तिकडेही बभ्रा होईल म्हणून भय वाटलं, अन् बाबासाहेबांना माझ्या आयुष्यांत संबंध आलेले ते हे तात्यासाहेबच, हें माहित नसलं तर माहित व्हायचं. '

जानकीबाई संथपणे म्हणाल्या, " मीच येऊन काय विशेष शोध करणार आहे ? "

बाबासाहेब म्हणाले, " अहो, असल्या चिंताग्रस्त अवस्थेंत एकापेक्षां दोघं बरीं... अन् तुम्ही आलांत तर तुमच्या मुलीसाठीं पूर्णपणें शोध केल्याचं तुम्हाला समाधान मिळेल. चलाच तुम्ही. "

जानकीबाईनें शंका काढली, " तसल्या थोरामोठ्यांचें घरीं आपणासारख्यांच्या बरोबर एका सैपाकिणीनें उतरणं बरं दिसेल का ? "

" वा म्हणजे, " बाबासाहेब म्हणाले, " तुमची ती मुलगी, तुम्हीच मुळीं निघतां आहांत तिच्या शोधात. मी आपला तुम्हाला सोबत येणार. "

" मग नाशकाला मी तेवढी एखाद्या पंड्याकडे उतरेन. तेवढं कबूल असेल तर येतें. " जानकीबाईनी अगदी गंभीरपणें तोंड सुचविली.

बाबासाहेब जरा त्रासल्यासारखे होऊन म्हणाले, " कुठें उतरायचं न् काय काय करायचं, ह्याचा इथपासूनच कशाला काथ्याकूट ? कुठंही उतरू झालं...लवकर करा आता सारी तयारी. "

ताराचीं तीं उत्तरें आल्यानंतर उषेनें आपल्या आईचा सारखा पिच्छाच पुरवला. शकुंतलेच्या जन्मरहस्यांत जानकीबाईशीं संबंध आलेले ते अधिकारी गृहस्थ म्हणजे आपले वडील व जानकीबाईस हांकण्यास कारण झालेली ती आपली माईच, हें सर्व ताडण्यास तिला आतां विशेष वेळ लागला नाहीं. तिनें त्या रात्रीं आपल्या आईची खूबच निर्भत्सना केली. तात्यांच्या हातून झालेली चूक तिला सौम्य स्वरूपाचीच वाटली, पण जानकीबाईशीं लग्न करण्याचें त्यांनीं पूर्वीच्या काळीं दाखविलेलें औदार्य, तिच्या मनांत आपल्या वडिलां-

विषयींचा आदरभाव द्विगुणित करण्यास कारणीभूत झालें. माईला खूब खूब टाकून बोलल्या-नंतर ती आईची मुग्धावस्था मोडण्यास तिच्या अंथरुणांतच तिला हलवून म्हणाली, "आई, बोल ना ग कांहीतरी, तूं असं निष्ठुरपणानं जानकीबाईशीं कां वागलीस ? " माईनीं बोटाच्या पेरानें आपले पाणावलेले डोळे अंमळ पुसून म्हटलें " बाई ग, तुला नाही कळायचं तें. "

" काय कळायचं नाहीं ? " उषा फणकाऱ्यानें म्हणाली, " शहाणपण कांहीं वयानंच येतं वाटतं ? अनेक पुस्तकं वाचून तुझ्यापेक्षां मला जगाचं जास्त ज्ञान आहे समजलीस. " माईचे डोळे आणखीच डबडबले.

आणखी दोनेक दिवसांनी रात्रीं उषेनें तो सोडून दिलेला विषय पुन्हां काढला. आईला तिने रात्रभर झोपूं दिलं नाहीं, कारण त्याच दिवशीं दुपारी मुंबईच्या माधवाश्रमांतून ते मालतीच्या चादरीपांघरुणाचें पार्सल आले होतें. तिनें आईला स्पष्टच सांगितलें कीं, 'पहाटेच्या मेलनें, मी मुंबईला जातें स्वतःच. मालतीही येणार आहे माझ्या बरोबर.' शकूला इथं आणतें परत. अन् तिकडून आल्यानंतर जानकीबाईना इथं मीच घेऊन येतें. तुला तिची क्षमा मागायला सांगते अन् तात्यांना ह्या उतारवयांत तरी पुन्हां शांति मिळवून देतें.'

माईचें मूक रुदन हेंच यावर उत्तर होतें. मोटारींतूनच रात्रीं उषा व मालती नाशिक स्टेशनवर मुंबईमेल गांठायला गेल्या. तात्यासाहेबही त्या दोघींना नीटपणें गाडींत बसवून द्यायला त्यांच्याबरोबर गेले.

डब्यांतली नीट व्यवस्था जमल्यावर दोन खिडक्यांतून दोघीही बाहेर डोकावूं लागल्या. तेव्हा तात्यासाहेबांनी समाधानानें विचारलें कीं, " सारी व्यवस्था नीट जमली ना आतां ? "

पण त्या प्रश्नाचें उत्तर देण्याऐवजीच उषा एकाएकी उद्गारली, " अगबाई बाबासाहेब कुठं इथं! " तात्यांनी मागें वळून पाहिलें तोंच त्यांना ते वयोवृद्ध गृहस्थ जवळूनच सोबतच्या बाईबरोबर कांहींसें आपल्या तंद्रींत बोलत चाललेले दिसले. आणि त्या बाईकडे त्यांचे लक्ष जातांच ते तिच्याकडे मंत्रमूढासारखे टकमक पाहातच राहिले. तीं दोघेंही चार पावलें पुढें गेलीं तरी ही मंडळी आपली स्वस्थच ! अखेर उषा मोठमोठ्यानें हांका मारु लागली, " बाबासाहेब, अहोऽऽऽ बाबासाहेब ."

तीं दोघेंही थबकलींच एकाएकी. बाबासाहेब एकदम वळून मागें आले अन् आश्चर्या-नंदानें उद्गारले, " कोण उषा ? "

" होय. हे तात्या. " असें म्हणत तिनें तात्यांकडे बोट दाखविलें. पण तात्यांचें लक्ष यावेळीं जानकीबाईकडे व त्यांचें तात्याकडे होतें. किती केविलवाणी दृष्टभेट होती ती ! उषेनें ओळख करून देतांच तात्यांच्या स्वप्नाळू तंद्रीचा एकाएकी भंग झाला व ते बाबासाहे-बांना नमस्कार करून स्मितपूर्वक त्यांचेकडे नुसते पाहूं लागले. तोंच एंजिननें शीळ दिली !

तात्या एकदम गडबडींत म्हणाले, " ह्या पोरीही शकुंतलेसाठींच नाशकाला चालल्या आहेत कीं. ती माधवाश्रमांत उतरली आहे हें नक्की कळलं आम्हाला. "

" होय का ? अरेच्या ! ए कुली, कुलीऽऽऽ. " बाबासाहेब धांदलींत धांवपळ करूं लागले, " चल सारें सामान ठेव पुन्हां डब्यांत. "

ते सामान आंत कसें बसें ढकलीत, फेंकीत–अंमळ वेळ लागलाच. नंतर बाबासाहेब जानकीबाईकडे वळून म्हणाले, " हं चढा आतां लवकर. " त्या घोंटाळत म्हणाल्या "तुम्ही व्हा पुढं. मी चढतेंच तुमच्या मागोमाग. " तोंच गाडी हालली. बाबासाहेब दारांत चढतांच डाव्या हाताने दाराजवळील बार धरून जानकीबाईस हात देऊं लागले, कारण गाडी आतां चालू झाली होती. जानकीबाई संकोचल्या. धावत धांवत कांहीं वेळ त्यांनीं दुसरा बार आपल्या हातांत आणण्याचा प्रयत्न केला, पण अखेरीस धैर्य गळून, त्या धापा टाकीतच दूरावणाऱ्या बाबासाहेबांकडे पाहत म्हणाल्या, " तुम्ही आणाच शकूला परत. "
हे धांदलीचे निरोपाचे शब्द उच्चारतांच एकदम जानकीबाईंच्या पायाला इतक्या जोराचा झटका बसला कीं, त्यांच्या शरीराचा तोलच गेला. प्लॅटफॉर्मच्या टोंकाच्या घसरंडीहून त्या चांगल्याच खालीं येऊन आदळल्या.

तात्यासाहेब कांहींसें धांवतच तेथें येऊन थडकले. त्यांनीं जानकीबाईंना त्या अंधुक प्रकाशांत उचलून उभे करायला आधार दिला. त्यांना एकदम हंसायलाच आलें. त्या दूर स्टेशनकडे पाहत म्हणाल्या, " कुणी पाह्यलं तर काय म्हणतील ? "

" तुला लागलंबिगलं नाहीं ना विशेष ? "

" पाय लचकलाय थोडा. सारा गोंधळच झाला म्हणायचा. " त्या चढाव चढतांना जराशा कष्टानें म्हणाल्या.

तात्यांनीं त्यांच्याकडे एकवार नजर लावून गंभीरपणें स्मित करीत म्हटलें, " अग, घोटाळा कसला त्यांत ? " शकूच्या ह्या गृहत्यागानें तूं थेट पुन्हां आपल्या घरीं आलीस. तुझा बारा वर्षांचा वनवास संपला आतां ? "

जानकीबाईचे डोळे एकाएकी पाण्यानें भरून आले. त्या आपल्या गोंधळलेल्या खिन्न मुखावर लटकें हास्य आणित म्हणाल्या, " माई रागावतील ना पण ? "

" छे, छे ! " बाबासाहेब त्यांना धीर देत हंसून म्हणाले, " तिचं आतां मी घेतों पाहून सारं ! "

दुसरे दिवशीं सकाळीं स्वतः माईनीं जानकीबाईंना कुंकूं लावलें व एक काळ्या पोतीचें मंगळसूत्र त्यांच्या रित्या गोंडस गळ्यांत बांधलें !

❀ ❀ ❀ ❀

माधवाश्रमाच्या व्यवस्थापकानें जेव्हां ते उमर्टपणाचे उद्गार काढले, तेव्हां राग तसाच गिळून शकुंतला वर गेली. कोंवळ्या टवटवीत वांग्याची विस्तवांत जी स्थिति

होते तशी तिच्या अंतःकरणाची झाली होती. तिच्या उसण्या धैर्याचा एकाएकी उल्कापातच झाला !

' ह्यात्तिच्या ' ती एकदम् खुदकन् हंसली व तिनें आपल्या कृश मनगटाकडे दृष्टि-क्षेप केला. तिचे डोळे लागलीच चांदण्यासारखे चमकले. " चार तोळयाच्या आहेत ह्या. शंभर तरी रुपये खासच येतील ह्यांचे...आपली गाठोडी घेऊन नि ह्यांचे पैसे चुकवून आपणच पुन्हां जावं परळला. बघूं या तर खरी पुन्हां शालिनीचें बिऱ्हाड सांपडतें कीं नाहीं तें... "

ती बिल चुकवून बाहेर पडली. रस्त्यावरचे ते विद्युद्दीप जणुं तिला ' काय कुठं चाललीस ? ' म्हणून खुणावीत होते व विकट हास्य करीत होते. तिचे पाय लटपटू लागले.

—" बाबासाहेबांना, विजयला, आईला तूं कांहीं कळवलं नाहीस अन् आतां शालिनीला काय सांगणार कपाळ ? वरं तिच्यापुढं एक तूं आपलं अंतःकरण उघडं केलंस, नि तिनंच कळविलं नागपूरला सारं तर ?—पुन्हां तुला न्यायला येतीलच कुणीतरी. आणखी ४–५ महिन्यातच काय शोभा होईल ? बरं, तेही तुरुंगांतच राहतील तेव्हां...छेः ! कांहीं-तरी दुसरीकडेच काढावं आपलं आयुष्य अज्ञातवासांत. कॉंग्रेस हॉऊसमधेंच जावं झालं—"

एक मंदगतीनें चालत असलेल्या व्हिक्टोरिआ हांकणारा तिच्याकडे वळून अदबीनें विचारतो, " गाडी हवी का बाईसाहेब ? "

" मुगभाट नाक्याला जायचंय्. काय घेशील ? " तिनें विचारलें.

" सहा आणे. "

" चार आणे देईन चल. " पांचच आणे होते सारे तिच्या खिशांत.

" बरं बसा कीं. "

गाडींत पुन्हां तिला नवी उमेद आल्यासारखें वाटलें. तिला मोठ्या महादेवापुढं विजयनं आपलं कुंकू पुसून टाकलं होतं, तो प्रसंग आठवला. आजूबाजूच्या इमारती जणुं तिच्याकडे डोकडोकावून पाहात होत्या, अन् तिला तुसडेपणानें म्हणत होत्या—" तूं का चांगल्या समाजांत राहण्यासारखी आहेस ? पापांत तुझा जन्म, लग्नाआधींच तुला मूल होणार ! अशा पापिणीला नाहीं देणार कुणी थारा ! कपाळीं मोठा कुंकवाचा टिळा लावलास म्हणून कुणी तुला पवित्र का म्हणणार आहे ? नायकिणीकडे जायचं तर ह्यावेळीं कुंकवा-वांचूनच जा. म्हणजे तिथं तरी सत्कार होईल. "

तिनें कुंकू पसून टाकलें. गाडी थांबतांच ती म्हणाली, " हीच ना रे नायकिणीची इमारत ? " त्यानें मान डोलवली. उतरून त्याचे हातीं पैसे ठेवतांच त्या घोड्याच्या ऐटीं-तल्या टापाबरोबरच तिचे कानीं शब्द पडले,

" देशसेविका वाटली न् नायकन् निघाली नव्हं का ! "

चौरागड चढतांना तिला इतके कष्ट पडले नाहींत. ते जिने चढतांना तिच्या पायांत

जणुं कुणी तरी लोखंडाच्या बेड्याच घालीत होते. वेणी घालीत असलेल्या एका नायकिणीला तिनें विचारलें, "रेवतीबाई कुठं आहेत?"

एक कुणबीण तिला रेवतीबाईकडे घेऊन गेली. पण जातांना कितीतरी दाराच्या फटी मोठ्या झाल्या, किती नवखे विलासी डोळे तिच्यावर रोखले गेले, किती कुतूहलानें कुजबुज चालली!

रेवतीबाई एका विशाल आरशाकडे पाहत, शृंगारसाज करण्यांत दंग होत्या. दार आपटल्या आवाज होतांच, त्यांना त्या मुकुरांतच ती शकुंतलेची कावरीबावरी मूर्ति दिसली! फणी केंसांत रोवलेली असतांना, ती तिथेंच स्थीरावून त्यांनीं आश्चर्यानें टांचेवर गिरकीच घेतली व त्या म्हणाल्या—"–कोण ग तूं?"

"मी–मी–बडोद्याच्या सरदार आंगऱ्यांची—"

"कोण नायकीण कां? अंगवस्त्रासारखीच ना? काय नांव तुझं"

"श्यामा निर्गुणकर."

"मग इथं कशी?"

"त्यांच्या पत्नीनं मला दिवस जातांच, एका लुगड्यानिशीं घराबाहेर काढलं अन् आपली कीर्ति ऐकून आलें मुंबईला."

---

२६

# कोळशांतलें माणिक

शाकुंतलेनें लिहिलेली स्वतःची कहाणीः—

कधीं बरं येऊन पडले मी ह्या वेश्यागारांत ? हां, ऑक्टोबरच्या एक तारखेस नागपूरहून निघालें—नि ३ तारखेला संध्याकाळींच आलें नाहीं का इथं ? फेब्रुआरीच्या तेराला कर्णाचा जन्म झाला अन् त्याच्या जन्माबरोबरच मागच्या साऱ्या दुःखाकष्टाच्या गोष्टी विसरून गेलें कीं काय मी ? आठवूनसुद्धा नीटसें कांहीं एक आठवत नाहीं. रेवतीबाईंनी लागलीच माझ्याभोंवतीं किती मोहक प्रेमाचें जाळें गुंफलें ! खरोखर त्यांची मी आजन्म ऋणीच राहीन. त्यांनीं आसरा दिलाच नसता मला तर—

मुंबईची ती दिवाळी मीं प्रथमच पाहिली. खिडकीतून बाहेर डोकावतांच किती ऐश्वर्य दिसत होतं सारं. विजेच्या रंगीबेरंगी दिव्याच्या त्या रांगाच रांगा ! आमची इमारत तर जणूं इंद्राची अमरावतीच बनली होती तेव्हां. हो ते थाटामाटाचे शेठ लोक म्हणजे सहस्र छिद्रांच्या भपकेबाज देवेन्द्रासारखेच नव्हते तर काय ? तो अत्तर–गुलाब-पाण्यांचा घमघमाट, तें गाणें बजावणें, ते नाचरंग, शयनगृहाचे ते शृंगार, पैंजणांची रुणझुण, कांचेच्या पेल्यांचे खणखणाट, रुप्यांचा नाण्यांचा छन्‌छनाट, नायकिणींचे ते तांबुस डोळे, आरक्त ओंठ, अन् ती डाळिंबी रंगाची दारू ! हा सारा दिव्यांच्या लखलखाटांतला देखावा पाहून, माझ्यासारख्या गरोदर स्त्रीचे डोळे दिपले, तर त्या श्रीमंत चैनी पुरुषांना ह्या अप्सरांनीं वेड लावलें तर कांहीं नवल का आहे त्यांत ? खरोखरच ह्या नायकिणींच्या हावभावांत किती आकर्षकपणा असतो, असेंच वाटलें मला प्रथम प्रथम ! पण लागलीच ?—

रात्रीं एकनंतर इमारतींत पुन्हां काळोख झाला म्हणजे–छेः ! शहारे येतात अंगावर. केवढ्या जोरजोरानें त्या कैदाशिणी भांडत एकमेकींशीं. सारीं गिऱ्हाइकें पळवल्याचीं भांडणें. पूर्ण इमारत गरजून उठे. काय त्या शिव्या, ऐकवत नसत अगदीं ! कांहीं

सुमार का होता त्यांच्या जिभांना ? मारायलाही धांवत, केशाकेशी होई. त्या अप्सरांचे ते राक्षसिणींचे अवतार पाहून मला बाई मोठी मौज वाटे. प्रकाशांत किती नाजुक, किती मोहक दिसत साऱ्या, अन् अंधारांत—आफ्रिकेचें जंगल जसें कांहीं.

दिवसभर सूर्याच्या पवित्र प्रकाशांत आणखीच वेगळं दृश्य दिसे. त्यांच्या रंगीबेरंगी अंगांतलीं तीं काळसर बॉडिसें, ती घाणेरडी पातळें, त्या गुंतलेल्या जटा, त्या उघड्या अंगावर स्पष्टपणें दिसणारे ते काळे पांढरे चट्टे, तोंडाच्या घाणी, थुंकण्याच्या चिळकांड्या, कंटाळलेले उग्र चेहेरे,—एकीचा तरी होता का धड अवतार ! दुपारी रुग्णालयांत कितीतरी वेश्या बिचाऱ्या विव्हळत पडलेल्या असत. आणि साऱ्या पुरुषजातीला मनसोक्त शिव्या देऊन घेत. तरी पुन्हां रोज सायंकाळीं वेणीवर ताज्या कळ्यांचे गजरे चढतच.

हो, गजऱ्यावरून तरी आठवली ती महत्त्वाची सायंकाळ. मी काळजींतून मुक्तच झालें नाही का त्या रात्रा... रेवतीबाईबरोबर मी चौपाटीहून परत येत होतें. वैकुंठ-चतुर्दशीचीच होती सायंकाळ ती. मला आधल्या वर्षीचा तो प्रसंग आठवला अन् कल्पना आली की त्या जागोबाच्या देवळात जर भेटच झाली नसती, तर हे असले पुढचे प्रसंग कशाला येते माझ्या अभागी आयुष्यांत. मला रेवतीबाईनी प्रेमानें कुरवाळलें नि म्हटले, " बरं बाई, रडूं नकोस, तूं मॅट्रिक झालेली एका सरदारांची नायकीण. मी नाही तुला धंदा करायला लावणार ! मग तर झालें ? "

इतक्यांत आम्ही आमच्या इमारतीजवळ आलों. माझें लक्ष त्या खिडक्यांना लट-कलेल्या अनेक वाळलेल्या गजऱ्याकडे गेलें नि मी म्हणालें, " नायकिणीचीं खरीं स्वरूपंच दिसतात बाई ह्या सुकलेल्या वेण्यात ! "

त्यावर रेवतीबाई म्हणाल्या, " बरं बरं, आम्हांला नावें देऊं नकोस अशी. खाल्ल्या-घरचे वासे मोजतेस तूं. अग पोटासाठीं सारीं सोंगं आणावीं लागतात. एरव्ही हौस का आहे कुणाला अशी शेणात लोळायची ? "

" पोटासाठीं म्हणायचं तेवढं ! " मी उमटपणानें म्हटलें, " पोटाला असे चांदी-सोन्याचे पत्रे का मढवावे लागतात ? मोलकरणी नाही काबाडकष्ट करून पोट भरत वाटतं? '

रेवतीबाईला राग आला एकाएकी माझ्या बोलण्याचा. कां बरें येऊं नये ! मीं अशीं नावें नको होती ठेवायला त्यांच्या व्यवसायाला. आश्रित होतें मी तेव्हां. असहाय होतें, त्यांच्यावर अवलंबून होतें.

त्या म्हणाल्या, " मग तूं नीघ जा इथून. इथं आलीसच कशाला. कर जा कुठं मोलमजुरी ? दिमाखखोर कुठली."

मी भेदरलेच बाई. खोलांत पाय ठेवतांच मला रडेंच कोसळलें. मीं रेवतीबाईची दहादां क्षमा मागितली पण त्याचा परिणामच होईना कांहींमुद्दां. त्यांनी मला स्पष्टच सांगि-तलें, " एकतर इथं तूंही धंदा कर, नाही तर चालती हो इथून...पण जाण्यापूर्वी तुझ्या बांगड्या दे मला. फुकट नाहीं मी खाऊं घातलं तुला ! "

कल्पनांचें काहूर मनांत उठलें तेव्हां ! ' मीं कशाला बरं घर सोडलं ? आईलाच आपली अडचण सांगितली असती, तर तिनें तेव्हांच त्या अनाहूताला जगांत येऊंच न देण्याची व्यवस्था करूनही टाकली असती. नंतर बाबांनीं माझें लग्न कुणाशीं तरी लावून दिलें असतें, म्हणजे मीं पुढें सुखानें संसार केला असता. आत्तांच पुन्हां कुठें तरी निघून जावें. त्या कारट्याला जन्माला येऊं तरी देऊं नये, अगर इलकेंही करून उपायच चालेनासा झाला, तर तो जन्माला येतांक्षणींच त्याची संपवावी इथली यात्रा. येवढं एकवार पचवतां आलं कीं घरीं परत जायला हरकतच नाहीं. मग सारा जन्म सुखांत जाऊं शकतो पुन्हां. किंवा अनाथालयांत द्यावा त्याला ठेऊन. नको बाई. पुढे मागें पुन्हां शोध लागला कीं माझ्या जन्माचे मातेरे व्हायचें !...अन् ती बालहत्या उघडकीस आली तर—

आज कशी राक्षसीण झालें मीं ! एका पारड्यांत माझी अब्रू अन् दुसऱ्यांत बाळाचा जीव ! माझ्या नांवाच्या चांगुलपणासाठीं मला त्या अजाण जीवाचा प्राण कमी मोलाचा वाटला ! साधें पाप लपवायला आणखी अघोर पाप करायचें ? तें कशाला ?—स्वार्थासाठीं ? स्वतःच्या सुखासाठीं ? यापेक्षां मनाचा निर्धार करावा आणि परिस्थितीला तोंड देऊन सर्व आपत्ति फुलांसारख्या झेलाव्या. पुन्हां म्हणून पाप करायचें नाहीं. प्राण गेला तरी बेहेत्तर !

माझें मनच तेवढें पक्कें झालें पाहिजे. एकदां स्त्रीनें कोणत्याही परिस्थितींत पवित्र राहायचें मनावर घेतलें, तर काय बिशाद आहे कुणाची तिला भ्रष्टवायची ? दहा दांडगे अंगावर येऊन पडले, तरी स्त्रीचें मन पक्कें असल्यावर त्यांच्या आसुरी इच्छेला यशच येणार नाहीं कदापि. मग रेवतीबाई काय करील माझें ? मला पापाचारांत लोटायचें सामर्थ्य कोणत्याही प्रचंड शक्तींत नाहीं ! पवित्र स्त्री हीच जगांत एक अत्यंत प्रबल शक्ति आहे.

समाजाची भीति ! शेणकिड्यांनीं गजबजलेला पोहटा. त्यालाच ना म्हणायचें समाज? त्यानें कधीं कुणाला चांगले म्हटलें आहे, तर त्याला भ्यायचें ?

माझ्या उदाहरणानेंच उलट माझ्यासारख्या अभागिनींना धडा मिळेल. लग्नापूर्वीं कुणाही पुरुषाबरोबर चार हात दूरच रहावें असेंच मी सांगेन बिचारींना. असुखी सुवासिनिना व विधवांना सांगेन, कीं तसें राहावतच नसेल, तर निर्लज्ज व्हा अथवा विवाह करा, पण स्वतःच्या मौजेसाठीं अर्भकांचे बळी देऊन, उज्ज्वल मातृपदाला नको उगाच काळिमा लावायला. जीवनिर्मिति, जीवसंगोपन व जीनसंवर्धन हेंच खरें स्त्रीचें ध्येय ! स्वतःचें पाऊल वांकडें पडलें तर स्वतःच त्या पापाचें प्रायश्चित्त भोगा. आपल्या सुखासाठीं कोंवळ्या बालकांच्या कशाला देतां आहुति ? ह्यापेक्षां स्वतः वेश्या झालेलें पत्करलें अन् पुन्हां पाप करायचें नसेल तर दुःखाकष्टांत का होईना पण जगांत निभाव लागू शकतो आपला !

अखेर यायचा तो प्रसंग आलाच माझ्यावर. पण मी कचरलें नाहीं. एका अटीवर झाली रामेट. मी बाळंत होऊन चांगली होतपर्यंत असें ठरलें, कीं फक्त मद्याचे पेले भरून

देणाऱ्या परिचारिकेचेंच काम करावें. ' ऊठ साकी, दे भरुनी माधवीचा एक प्याला '–ह्या कुठेंशा वाचलेल्या ओळींचा मला असा राग आला तेव्हां.

मी शृंगार करून गेलें शयनमंदिरांत. पहिलेच दिवशीं एक दांडगा मेला खोलींतल्या त्या मढवलेल्या अप्सरेला म्हणाला, " तुझ्यापेक्षा मला ती पेला भरणारी पोरच गोड वाटते. "

झालें माझी रवानगी दुसरे रात्रीं दुसऱ्या खोलींत झाली. कारण मत्सरानें अधिकच लाल झाले होते बिचारीचे डोळे !

दुसरे रात्रीं त्या घाणेरड्या कामगिरींतून माझ्या पोटांतल्या गरागर फिरणाऱ्या बाळानेंच माझी सुटका केली. ओकारी दाबायचा किती किती प्रयत्न केला मीं. अखेरीस धांवतच खोलीबाहेर पडले, आणि सज्जांतच भडभड ओकलें. रेवतीबाईनीं मला चापटा मारल्या. पण मी काय करणार ओकायला आलें त्याला ? तेव्हांपासून तिसऱ्याच दिवशीं मला सारखा हिंवताप सुरुं झाला. उपकारच म्हणायचे देवाचे !

तापांतच रेवतीबाई येऊन बसत माझ्याजवळ. आणि तेव्हांच त्यांच्या दयाशील अंतः-करणाची साक्ष पटली मला.

मी एकदा त्राग्यानें म्हणालें, मरावंसं वाटतं मला. "

रेवतीबाईनीं हंसून विचारलें, " कां ? "

" मला कुणीच नाहीं जगांत म्हणून. "

" मी आहे ना तुझी मावशी— "

" तुझ्या दुष्टपणामुळेंच तर मला मरावंसं वाटतं. "

" मीं काय केलं बाई असं. "

" मला नको ते तूं करायला सांगतेस— "

" सांग, तुला काय फुकटचं खाऊं घालूं ? "

" हें घाणेरडं काम मोडून कांहींही काम सांग करायला. "

" माझ्या हरामखोर शालिनीची घेतेस जागा ? "

" म्हणजे काय बाई ? "

" म्हणजे तिच्याऐवजी मी तुला पुढं शिकवून डॉक्टरीण करीन्. "

" किती चांगल्या आहात रेवतीबाई तुम्ही ? "

" अग मला आतां मावशीच म्हण तूं. "

" मग आतां नाहीं मला मरायचं मावशी ! "

त्या दिवसानंतर मला त्या तापाचें अन् घाणेरड्या वातावरणाचें कांहींएक वाटेनासें झालें. मला दुःखही वाटेनासें झालें.

डिसेंबरांत पुन्हां गेल्या गोष्टी आठवल्या. पण मीं मुळीं आपलें मनच पक्कं केलं होतं !

—फेब्रुवारीच्या दहा तारखेपासून तीन दिवस मला कोण वेदना झाल्या. सारीं सांगतात कीं बाळ नि मी मरतां वांचलों—बाळाच्या जन्मानंतर—

## २७

# अंतरपाट

" मावशी, आज अकरा की बारा तारीख ग ? "

" कां अगदी बोटावर दिवस मोजते आहेसशी ? "

" नाही म्हटलं, १३ ला कर्णाला एक महिना होईल पुरा नाही का ? "

" मग महिन्यामहिन्याला का वाढदिवस करणार आहेस सारखा ? महात्मा गांधीच लागून गेला की नाही तो. "

आपल्या पांढऱ्या स्वच्छ खादीच्या चादरीवर पांढुरक्या चेहेऱ्याची शकुंतला निजली होती, आणि तिच्या हातीं कर्ण-बाळाच्या पाळण्याची दोरी असून पाळणा ' किर किर ' आवाज देत होता मावशी कसलें तरी पत्र हातीं घेऊन आपल्या बैठकीवर लोळत होती.

" श्यामे, बाकी तुझा बाळ मात्र भाग्याचा हो. तो जन्माला आल्याबरोबर २० दिवसांनीच गांधी नि व्हॉइसरॉय यांचा समेट झाला. नि आतां परवांला तर सारे राजबंदीही सुटले म्हणतात ! "

" अग असे किती जीव जन्मले असतील ह्या येवढ्यांत. " शकुंतला तिच्याकडे पाहात हंसत म्हणाली " ह्या एकट्या गाढवाचीच का आहे सारी पुण्याई ही ? "

" हें काय! त्याला जनावराच्या कोटींत बसवितेस?, " मावशी तिच्याकडे पाहून भिवयाचीं दोन्हीं टोकें शक्य तितकीं वर नेत म्हणाली. " अन् जनावर ठरवायचंच असेल त्याला तर श्यामकर्ण तरी म्हण. "

आपल्यालाही डोकें आहे या अभिमानानें रेवतीबाई स्वतःशीच हंसली !

" श्यामेचा कर्ण आहेच मुळीं तो. " शकुंतलेनें ' टँ टँ ' करणाऱ्या आपल्या मुलाला बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत म्हटलें.

रेवतीबाई एकदम उठून, तिच्याजवळ गेली अन् तिला हलकेंच चापट मारीत म्हणाली,

" निज नीट पुन्हां. तुझं आपलं ' ये रे माझ्या मागल्या ' आहेच. डॉक्टरीण बिचारी जीव तोडून सांगते..."

" अग पण मावशी, एक महिना झालाना आता ! काय झालं थोडेसे हातपाय हलविलें तर ? "

" चूप, बोलू नकोस तूं माझ्याशीं." रेवतीबाई तिला नीट निजवीत म्हणाल्या. " मरतां मरतां वांचलीस. चांगले तीन महिने हूं कीं चूं करतां कामा नाहीं. "

शकुंतलेच्या गालावर पुन्हां हंसता हंसता गंगा यमुना धावून आल्या. ती कंठ भरून येऊन म्हणते, " मावशी ग, तूं माझी कां येवढी काळजी वाहतेस ! मी मेलें तर जगाचं काय होईल नुकसान. "

" त्या सरदार आंग्र्याचं अंगवस्त्र जाईल ना उडून वाऱ्यावर ! "

" त्यांना आतां माझी कधीं आठवण तरी येईल का ?" सुस्कारा देत शकुंतला म्हणाली.

" अन् माझं नुकसान तूं हिशेबांतच घेत नाहींस कधीं." बाळाला तिच्या पदराखालीं देत रेवतीबाई म्हणाली. " गेल्या पांच सहा महिन्याचें जर मीं त्या सरदाराला बिल केलें तर ते कमीतकमी दोन तीन हजार तरी होईल.

" कांही तरीच मावशी ! " शकुंतला हंसल्यासारखें करून म्हणाली, " येवढा काय खर्च केलास ग तूं माझ्यासाठीं ? "

" अग, " बैठकीवर बसत मावशी म्हणाली, " आतां दोघांची किंमत नको का लावायला. बाळ किती गोड आहे तो. "

" त्याचेंही श्रेय तूं आपल्याकडेच घेतेस का काय ? " शकुंतला आतां मोठ्यानें हंसली.

" हे पहा श्यामे, कसंही करून त्यानें तुला नेऊं नये परत, हीच माझी इच्छा. तुझ्यामुळं माझ्या आशा उफाळल्या पुन्हा. तुला मी करीन डॉक्टरीण आतां माझ्या सूतिकागृहासाठीं...अन् मग तुझा थाटमाट पाहि ग, कीं त्या शालिनीला वाटेल तुझा हेवा." येवढें म्हणून रेवतीबाईनीं तें पत्र पुन्हां आपल्या हातीं घेतलें, आणखी वाचता वाचतां ती मधेंच खुदकन् हंसली.

" मावशी, " शकुंतला म्हणाली, " तुझी ती भाची दिसायला कशी होती ग ? "

" होती म्हणजे ? " मावशी उगाच बोलायचें म्हणून बोलल्या. " अग ती आहे अजून. अन् इथंच आहे मुंबईला...चोर कुठला, कावेबाज, हरामखोर ! "

" हें काय मावशी, कुणाला ग शिव्या देतेस त्या पत्राकडं पाहून ? कुणाचं आहे तें ? " शकुंतलेनें अधीरतेनें विचारलें. रेवतीबाईनीं तें पत्र जोरानें आपटलें आणखी त्या उद्गारल्या,

" येऊं दे म्हणावं आतां इथं पुन्हां. "

" अग पण आहे कुणाचं तें, काय आहे येवढं त्यात ? " शकुंतला उगाच कुतूहलानें विचारूं लागली.

तेव्हां ते पत्र तिच्या अंथरुणावर रागाने भिरकावून देत, तिनें कपाळयावर आंठ्या चढवीत म्हटलें, " तें वाच आधीं तूं. मग तुला सांगीन सारं रामायण. " असें म्हणत रागारागानें मावशीने जवळच्या डब्यांतल्या दोन पट्या एकदम तोंडांत कोंबल्या व लागलीच पिकदाणींत ती थुंकली.

" नांवाची मी बाळंतीण पण माझ्यापेक्षां दसपट जास्त विडे खातेस तूं. " असें कांही तरी म्हणत तिनं तें पत्र अगदीं संथपणें आपल्या हातीं घेतलें, पण त्या अक्षरांकडे नजर जातांच तिच्या निःशक्त डोळयापुढं कांहीं काळ आंधारीच आली. नंतर ती कांपऱ्या हातानेंच त्या पत्रांतील पुसट अक्षरें वाचण्याचा प्रयत्न करूं लागली.

धंतोली, नागपूर

९ मार्च १९३१

श्री. रेवतीबाई यांस कृ. सा. न. वि. वि.

माझें हें पत्र तुम्हाला मुळींच चमत्कारिक वाटणार नाहीं ही आशा आहे. कु. शकुंतला देशपांडे नांवाची आमच्या येथील ओळखीच्या बाईची एक मुलगी गेली चार पांच महिने बेपत्ता आहे. मी तुरुंगांत होतों, तों आजच सुटून येथें आलों. आणि येतांक्षणींच आपणास हें पत्र पाठवीत आहें. माझें पश्चात् आमच्या वडिलांनीं व नाशिकहून शकुंतलेच्या आईवडिलांनीं चोंहीकडे शोध केला. प्रत्येक अनाथालयाला व सूतिकागृहाला पत्रें घातलीं. वर्तमानपत्रांत तिच्यासंबंधां नोटिशी दिल्या. पण अजून त्या तरुण मुलीचा शोध लागला नाहीं.

या सर्व मंडळींनीं ओळखीचें असें एकच स्थान शोधायचें ठेविलें आहे. तें म्हणजे तुमचें वेश्यागार. शकुंतला असल्या घाणेरड्या ठिकाणीं कदापि जाऊन राहणार नाहीं, असें सर्वांनाच वाटत होतें. परंतु, शालिनी इथें जेव्हां येऊन राहिली होती तेव्हां तिची आणि शकूची विशेषच गट्टी जमलेली असल्याकारणानें तुमच्याविषयीं, तुमच्या वेश्यागाराविषयीं, व तुमच्या सूतिकागृह, अनाथालय इत्यादिकांविषयीं तिला सर्व माहिती देऊन ठेविली होती. तेव्हां ती मुलगी तुमच्याकडेच आपलें आयुष्य कंठीत असेल हा माझा क्यास आहे. मनुष्याचें अंतःकरण कितीही उदार, नीतिमान् आणि कोमल असलें, तरी तें निराशेंत वाटेल तिथें उडी घ्यायला मागेपुढें पाहात नाहीं.

ती तुमच्याकडे निवाऱ्यासाठीं चुकून आली असेल, आणि तुमच्या वेश्यागारांत अशा लुसलुशीत पोरीचा धंद्याचे दृष्टीनें फारच उपयोग होईल, म्हणून तुम्हीं तिला आपणाकडे उदार आश्रय दिला असला पाहिजे. आतां तर ती बंदिखान्यांत आहे तुमच्या. गळांत अडकलेली मासोळी आहे ती.

पण ध्यानांत ठेवा आतां माझ्याशीं गाठ आहे. माझें तिच्यावर प्रेम आहे, मी तिच्याशी मनाने विवाहबद्ध झालों आहे. आतां लौकिकविवाह काय तो व्हावयाचा आहे. तुम्हीं जर तिला दुराग्रहानें आजवर भ्रष्टविलें असेल, तरी मी तिचा पत्कर करीन. मला माझी पत्नी परत पाहिजे आहे आणि आपण जर बऱ्या बोलानें कबूल झालां नाहींत, तर मुंबईच्या पोलिसांचेंही या बाबतीत मला साहाय्य घ्यावें लागेल.

आपला
विजय माधव भावे.

पत्र वाचून होतांच तिनें त्यावरची तारीख पाहिली व नंतर पाकिटावरच्या छापातली तारीख पाहिली. आणि ती रेवतीबाईला हंसतच म्हणाली, " मावशी, फारच आळशी दिसते आहे स्वारी! पत्र लिहिलंय नऊ तारखेला अन् पोस्टांत टाकलंय अकरा तारखेला...कोण ग हा विक्षिप्त प्राणी? तुझ्यावर केवढे भयंकर आरोप केले आहेत त्यानें."

" अग दरोडेखोर आहे तो." मावशी रागानें म्हणाली, ह्याला मीच, टाकू, शकले तुरुंगांत पुन्हां. माझी शालिनी माझ्याकडून दूर न्यायला, हाच मेला सैतान कारण झाला!"

" हो कां?" अगदीं आश्चर्याचा आव आणून शकुंतला म्हणाली.

" सांग तरी बाई एकदाची त्या बिलंदराच्या आख्यायिका!"

" हें बघ, त्याचं असं झालं—" इतक्यांत कुणीसें दारावर 'टक् टक्' केलें व लागलीच एक कुणबिण आंत आली.

" काय ग गिरिजे?" रेवतीबाईनें त्या आख्यायिकेचा मध्येंच भंग करणाऱ्या त्या कुणबीणीकडे पाहून कपाळावर आठ्या चढवीत विचारलें.

" कोणी भावे म्हणून नागपूरकडले गृहस्थ आले आहेत." पुन्हां दोन्ही भुंवया आकुंचित करीत मावशी मनाशींच पुटपुटली, "कोण जातंय् त्या हलकटाला सामोरं. इथंच आण त्याला." आणि तिनें हंसत शकुंतलेकडे पहात म्हटलें, " श्यामे, तुझ्या मावशीचा रुद्रावतार तूं कधी पहिला नसशील तो आज पाहशील."

" हो कां?" शकुंतला हंसत हंसत म्हणाली. " मग मला हंसायलाच येईल बाई पोट धरधरून. मी आपली तोंडावर पांघरूण घेऊन मोकळेपणानें हंसतेंच कशी!"

विजय धाड् धाड् पावलें टाकीतच आला. दार जोरानें लोटण्याचा आवाज झाला. शकुंतलेनें त्या पातळ पांघरुणांतून त्याला अस्पष्टपणेंच पण डोळे भरून एकदां पाहून घेतलें. तो रोडावला होता. आणि मग तिच्या आंसवांमुळे तो तिला दिसेनासाच झाला. पण तिचे अधीर कान त्याच्या प्रत्येक हालचालीकडे, प्रत्येक शब्दाकडे टंवकारलेले होते.

" बसा असें" रेवतीबाईचा तिरसट आवाज आला.

" मी बसण्यासाठीं आलों नाहीं, माझ्या पत्नीला शोधायला आलों आहे." त्याचें

दमदार उत्तर मिळालें. पुढें कांहीं वेळ खूबच खडाजंगी उडाली. आणि अखेर त्यांचा दरडावून आवाज आला, " रेवतीबाई, त्या मागच्या गोष्टीबद्दल मी जबाबदार नाहीं. तुमच्या ह्या इमारतींतला प्रत्येक कानाकोंपरा मला पहायचा आहे. चला दाखवा मुकाट्यानं. प्रत्येक नायकीण दाखवा. उठतां कीं नाहीं ? "

आणि त्यानंतर नरमावलेल्या मावशीचा आवाज आला, " ओरडतां काय असे ? संभाविती सोडिली कीं काय ! मीं सांगितलं दहा वेळ कीं अशी मुलगी इथं नाहीं म्हणून. विश्वासच वाटत नाहीं तर चला दाखवितें सारं तुम्हाला ! असें म्हणत त्या दोघांचीही पावलें वाजूं लागली, आणि शकुंतलेकडे वळून मावशी म्हणाली, " खद्खद हंसतेस काय अशी ! " तों खाडकन् दारही वाजलें.

शकुंतला खदखदून हंसत होती कीं गद्गदून रडत होती ! कुणास ठाऊक ! पण तिच्या मनांत मात्र त्या वेळीं असें कांहीसें वाटत असलें पाहिजेः—" किती भाग्याची मी. आतां सारं काहीं गोड होईल माझं. इतका इकडे निर्धारच असल्यावर येवढ्यांतच अज्ञातवासांतनं बाहेर पडण्याचं कारण ? होईल पुढंमागं लग्न. थाटं सावकाश संसारं... आई कां नाशकाला जाऊन राहिली असा अर्थ घ्यायचा त्या ओळीचा ?...पण बाबासाहेबांचं मत पालटलं असेल का ? कीं त्यांचा निर्धार अजून कायमच असेल ?...घेऊं का भेट आतांच ? करून घेऊं क एकदाचा सारा खुलासा ?...पण बाबांच्या विरुद्ध एकाएकी वागतील हे, अन् पडतील घराबाहेर...नकोच बाबांना त्रास द्यायला असा... आपण त्यांना कबूली दिली आहे...अन् उगाच येवढ्यांतच कशाला वितुष्ट आणायचं असं ? सारं कांहीं निपटलं म्हणजे जावं वाटेल तेव्हां घरा परत...इकडे इतकी मनाची तयारी असल्यावर बाळ आणखी थोडा मोठा झाला म्हणून कुठं बिघडेल ?—"

इतक्यांत पुन्हां तीं दोघं बोलत बोलतच खोलींत शिरलीं.

" माफ करा हं रेवतीबाई " ते म्हणाले " मी ती बेपत्ता झाल्याचे ऐकल्यापासून अगदीं वेडावलोंच आहें. तेव्हां अशा परिस्थितीत— "

" पण असे घाणेरडे आरोप नव्हते करायचे माझ्यावर. मी आजवर कधीं तरी एका चांगल्या मुलीला बिघडविली आहे का ?...शालिनीलाच विचारा हवें तर– "

ह्या कोण निजल्या आहेत इथं ? "

" ही ह्या गोजिरवाण्या मुलाची आई — "

"अहो रडका आहे तो चांगला, मघापासून त्याचा पोंगा तर सुरुच आहे सारखा. "

" असं का! मग बघाच जरा गंमत. तुम्ही उभे रहा त्याच्या पुढं जाऊन जरा. "

" ऑं! खरंच कीं. रडतां रडतां हंसला लबाड. जशी कांहीं गेल्या जन्मींचीच ओळख होती माझी! "

" ह्याही बाई नायकिणीपैकींच वाटतं — "

" तर काय ! हिथं कोण कुलीन असणार. बडोद्याच्या सरदार आपट्यांची ही अंगवस्त्र–श्यामा निर्गुणकर. "

" बरं आहे. येतां हं मी आता. माफ करा मला."

" विडा तरी घ्या एक."

त्यांत कांहीं गुंगीचं औषध बिवषध तर नाहीं ना टाकलंत ? " असें म्हणून ते व मावशी त्या दोघांचीही पावलें पुन्हां वाजली, अन् दोघांचाही आवाज मंदावला.

शंकुतलेनें आतां तोंडावरून पांघरुण काढलें आणि डोळे पुसले. त्या तसल्या विरह-दुःखांतही तिच्या मनांत एक गोडसा विचार आला कीं, ' आपल्या प्रीतिविवाहांत अंतर-पाटाचा प्रसंग नव्हता आला कधीं. आज तोही सोहळा एकदांचा पार पडला आमचा.

ती हळूच कर्णाकडे पाहत म्हणाली, " बाळ, आवडले का रे तुला तुझे वडील ? " तोंच तिच्या डोळ्यांत पाणी आलें, आणि पुन्हां दार वाजलें म्हणून तिनें झटदिशी पांघरुण घेतलें. रेवतीबाई म्हणाल्या, " अग गेला तो...काढ पांघरुण आतां. किती पण हंसत होतीस. पोट दुखेल ना पुन्हां. " मावशीनेंच तिच्या तोंडावरचें पांघरुण काढलें तों ती रडतांना दिसली. " पोट का दुखायला लागलं पुन्हां ? " तिनें विचारलें. आणि शंकुत-लेनें ' हो ' कारार्थी मान हलवली.

मावशी पुन्हां पुटपुटली, " बाकी गृहस्थ मोठा दिलदार. अगदीं चिमुकला गांधीच आहे जसा कांहीं ! "

---

२८

## पेंच !

" नाशिक

ता. २८ जून १९३१

प्रिय विजय,

माफ करा हं मी विजूदादा लिहीत नाहीं म्हणून. गेला संबंध उन्हाळा तुम्ही इथं घातलांत. किती बरं वाटलें मनाला. पण तुमची केविलवाणी स्थिति पाहून वाईट वाटत होतं सारखं. गंगेवरचा चिवडा तुम्हाला विषासारखा वाटायचा, अन् उसाचा ताजा रस पितांना ओकारी व्हायची! आणखी संन्यास घेऊन कुठं तरी निघून जातों, नाही तर आत्महत्या करितों असंही सारखं उद्वेगानं म्हणत होतां. हृदयाचें पाणी पाणी होत होतं सारखं.

बरें झाले बाई आतां लॉ कॉलेज जॉईन करायचा विचार केलांत तो. मनाला किती बरें वाटलें. एक वर्ष गेलें तर गेलें. अन् शिवाय चांगल्या कामांत गेलें.

अजूनही शकूच्या शोधाची आशा वाटते का मनाला? मला संशयच वाटतो आतां. पण तिच्यासाठीं सारखें अविवाहित का राहणार जन्मभर? तुमच्या ह्याच हळुवार अवस्थेंत एखाद्या तुमच्यावर मनापासून प्रेम करणाऱ्या स्त्रीच्या सानिध्याची तुम्हाला गरज आहे असं नाहीं का वाटत तुम्हाला?

आणखी मी आपणाला कांहीं काळ देतें विचार करायला. येत्या डिसेंबरपर्यंत थांबत. मग तरी पत्कराल का मला?

हें पहा, हे मानलेल्या बहिणी बहिणीचें नातें, म्हणजे थोतांड आहे कांहीं तरी. आणखी मी जर तुमची बहीण झाले, तर शकू बहीणच नाही का होणार?

प्रेमावर सुद्धां माझा अगदीं इतपत विश्वास नाहीं. समजा तुमचं व शकूचें लग्न झालें असतें, आणि ती लागलीच वारली असती, तर काय तुम्ही अविवाहितच राहिला असतां?

आतां आपलें लग्न होतांच शकू सांपडली, तर काय करायचें म्हणत असलांत, तर तेंही सांगतें. जर तिला तुमच्याशींच पुन्हां लग्न करायचें असेल, तर मी तिलाही सुखानें

आपल्या घरांत घेईन. मग तर झालें. बहुपत्निकत्व अशा वेळीं क्षम्यच ठरेल नाहीं का ? आम्ही मैत्रिणी सुखानेंच नांदूं.

पण तिच्या अंधुक आशेसाठीं जिवाचें कशाला बरें रान करून घ्यायचें असें ? तिनें कदाचित् आत्महत्या केली असेल, किंवा कुणाशीं विवाह सुद्धां केला असेल. तिला तुमची पर्वा नाहीं, मग तुम्हालाच तिची कां ? येत्या दिवाळीच्या सुटींत यायचें बरें इकडे.

आपली ( कोण लिहूं ? )

—उषा—"

"अग मावशी, मावशी, ए ऽऽ—"

"केवढ्यानें ग दचकलें मी ?"

"हें बघ किती सरपटलं बाळ तें—"

"श्यामे, आतां आली तुझी कॉलेजांत नांव घालायची वेळ. उद्याला तें सर्टिफिकिट मागून घे तुझं बडोद्याहून."

"बरं तर लिहितें हो पत्र. पण कुणास ठाऊक तेवढं तरी करतात कीं नाहीं तें."

नाहीं तर दुसरं नाही का घेतां यायचं युनिव्हर्सिटींतनं ?" शकुंतलेनें जेव्हां तें पत्र लिहिलें, तेव्हां तिच्या मनाला सारख्या गुदगुल्याच होत होत्या. आणखी त्या काल्पनिक व्यक्तीचा जेव्हां तिनें पाकिटावर पत्ता लिहिला तेव्हां त्याच क्षणीं कर्णानें सरपटत पुढें होऊन तें पाकीट एकदम घेतलें व आपल्या तोंडांत घातलें. "पाहिलें ग मावशी, सारं पुसटून टाकलन् लुच्चानं…अन् हंसतोय वर पुन्हां." शकुंतला अगदीं त्रासल्याचें सोंग आणून म्हणाली. तें पत्र कुणाबिणीच्या हातीं देत असतांना, ती मनांतच म्हणाली, "शोधा म्हणावं सारं त्रिखंड ह्या सरदारासाठीं आतां." आणि ती जातांच टुनकन् उडी मारीत तिनें बाळाला घेतलें व मावशीकडे पाहत ती हंसत म्हणाली, "अहो कर्ण महाराज, तुमची आई डॉक्टरीण होणार बरं का !" तिला कल्पनाही नव्हती की पोस्टखातें अगदीं तिचा इतका पिच्छा पुरवील म्हणून. आठच दिवसांत खूप छापे मारलेलें तें फुटलेलें पत्र तिच्या नांवें परत आलें व त्यावर घाणेरड्या अक्षरांत दोन चार जागीं, इंग्रजी, गुजराथी मोडींतून खरडलें होतें कीं मालक मिळत नाहींत." या नवाचे कोणी नाहीं" वगैरे. मावशीनें तिला ह्या साऱ्या प्रकाराचा प्रश्न विचारला तेव्हां ती जणुं नवलानें म्हणाली, "कसं झालं बाई असं?"

पण रेवतीबाईंच्या लक्षांत त्यावेळीं तिचे बनावट हावभाव आलेच.

ती खूपच रागावली व तिनें आपल्या अंतरंगांतील भडभड ओकून टाकली. "हें पहा श्यामे, तुला एक तर डॉक्टरीण तरी झालं पाहिजे, नाहीं तर दुसऱ्या कांहीं तरी रीतीनें माझें ऋण फेडायला पाहिजेत."

"दुसरी रीत कोणती कळूं दे बाई एकदां" तिनें सहज प्रश्न केला.

" माझ्या धंद्यांत मला मदत करून. "

ते शब्द ऐकतांच तिचे विशाल डोळे अधिकच विस्फारले. ती म्हणाली " मावशी, माझ्या बाबतींत तूं ही अशी अपेक्षा करशील असं नव्हतं वाटलं मला कधींच. " तिच्या क्षणापूर्वींच्या हंसऱ्या डोळयांत टचकन् पाणी आलं.

" कां बरं ? " मावशीनें तिला आग्रहपूर्वक पृच्छा केली, " अंगवस्त्र म्हणून एका-जवळ राहणं काय, अन् वेश्याव्यवसाय करणं काय दोन्ही अनीतीचेच ना पंथ ! "

" अनीति वगैरेचं असो मेलं " आपल्या वेणीचा शेपटा पुढें घेऊन फितीला गांठ बांधित शकुंतला म्हणाली.

" पण एकाच पुरुषाजवळ लग्न न होतां राहण्यांत अन् विवाह होऊन राहण्यांत मला तरी बाई पहिलीच ज्यास्त पक्क्या मनाची वाटते. कारण ती बांधलेली नसूनही, स्वखुषीने बंधनांत राहते. "

" ए वेडे " रेवतीबाई मध्येंच म्हणाली, " तुझ्या व्याख्यानबाजीची गरज नाही मला. तूं होतेस तयार त्या दुसऱ्या अटीला कीं नाही बोल ? आजच येणार आहेत एक शेठ तुला पाहायला. "

शकुंतला भेदरली पण प्रसंगावधानानें म्हणाली, " कसाई खाऊ घालून शेळी गलेलठ्ठ करतात अन् मग तरी विकतात. बाळ चार महिन्याचाही झाला नाही. माझ्या पोटांत अजून दुखतं ना ग मावशी ! "

" किती गोड बोललीस आतां. " मावशी हंसून म्हणाली, " तुझं मनच पाहायचं होतं मला नुसतं. आणखी चारेक महिने तूं विश्रांति घेतलीस, तर माझी कांहीं ना नाहीं त्याला ! "

" नागपूर

ता० २२ ऑक्टोबर १९३१

प्रिय विजू,

तात्या, माई, जानकीबाई, उषा, इत्यादिकांच्या आग्रहास बळी पडून अखेर तूं उषेशीं लग्न करावयास तयार झालास हें चांगलें कीं वाईट झालें, हेंच लिहवत नाहीं.

शकुंतला ही तात्यांची मुलगी हें कळल्यापासून व जानकीबाईला त्यांनीं स्वीकारल्या-पासून, तर मला गेल्या गोष्टीसंबंधानें राहून राहून आश्चर्य वाटतें. ती सालस मुलगी जर परमेश्वरानें आजच प्रकट केली तर मी तिच्या पायावर डोकें ठेवीन. त्या पोरीची सर नाहीं येणार कुणाला.

पहा, तूं सूज्ञ आहेस. विचार कर. आणखी एक दोन वर्षें तिच्यासाठीं वाट पाहि-ल्यास बरें.

कॉलेजसाठीं आतां इकडे कधी येणार ?

तुझा,

पापा."

" मला खरंच वाटत नाहीं मुळीं हें. तीन दिवसानंतर तूं आज झालीस कबूल."

" मग आतां काय करूं मावशी—उपाशी किती दिवस राहूं ? बाळाला दूध नाहीं येत. तशांतनं आतां जन्म काढायचा तुझ्याबरोबर. मारखं कोंडून तरी किती दिवस घेऊं ?" ती ओक्साबोक्शी रडूं लागली.

रेवतीबाईनीं तिला कुरवाळलें आणि म्हटलें, " उगी, उगी, वेडे मन घट्ट करीतपर्यंत तुला असं वाटतं. पुढं त्याच व्यवसायांत तुला गोडी वाटूं लागेल.

सायंकाळीं जेव्हां तिचा शृंगार कुणबिणी करीत होत्या, तेव्हां तिच्या मनांत सारखा झगडा सुरूं होता—देवा, तूंच ये रे आजच्या त्या पुरुषाच्या रूपानं···मी पायावर डोकं ठेवीन त्या गृहस्थाच्या. माझ्या सोन्याच्या बांगड्या देऊन घेईन पैसे त्याच्या जवळून. कसंही करून आज रात्रीं पवित्र राहिलं म्हणजे झालं···उद्यां मग खासच इथून निसटता येईल—"

तिनें आपल्या झोंपलेल्या बाळाचें चुंबन घेतलें व भीत भीत त्या शयनमंदिरांत पाय ठेवला ! त्या गृहस्थाकडे पाहतांच ती चपापलीच. पण कोणतीही विशेश आश्चर्यकारक गोष्ट घडलीच नाहीं, असें दाखवीत तिनें आंतून दार लावून घेतलें व ती हलक्या आवाजांत म्हणाली, " विश्वासराव, तुम्ही कसें इथं ?"

"अहो," विश्वास शांतपणें उदात्ततेचा आव आणून म्हणाला, "तुमचा शोध करायचं विजयरावांनीं सोडून का दिलं आहे असें समजतां ? दिवाळीची सुटी लागताच त्यांनीं पाठविलं मला इथं. मुंबईच्या प्रत्येक वेश्येला जाऊन भेट म्हणून सांगितलं. बरं झालं तुम्ही लवकरच सांपडलांत." त्यावर शकुंतलेनें त्याला आपणावरच्या सर्व संकटाची कल्पना दिली.

" मग आत्तांच का जायचं इथून निघून ? माझी आहे तयारी. एक क्षणभरही थांबणं धोक्याचं आहे इथं." शकुंतला अगदीं अधीर होऊन म्हणाली. " थांबा मी असं करतों, एक टॅक्सी येतों घेऊन...तंवर तुम्ही रेवतीबाईला सांगा, कीं शेठ मला बाहेर सहलीला एक तासासाठीं न्यायचे ५० रुपये देतो म्हणताहेत म्हणून."

" अन् मग काय करायचं ?"

" शालिनीबाईचा पत्ता आहे ठाऊक मला. आज सकाळींच जाऊन आलों मी त्यांच्याकडे."

" अन् बाळाचं कसं करायचं ?"

" मी परत इथं सकाळींच येईन. पोलिसचं सहाय्य घेईन जरूर असल्यास. अन् आणीन त्याला इथं. "

अधीर झालेल्या शालिनी आणि शकुंतला सकाळीच उदयची आणि विश्वासरावची वाट पाहत बसल्या. त्या दोघांनीं जेव्हां कर्णाला सुरक्षितपणें आणून पोंचविलें, तेव्हां कुठें त्यांचा जीव खालीं पडला. दुपारींच विश्वासराव नागपूर मेलनें निघून गेले.

त्या दिवशीं शालिनी नोकरीवर गेलीच नाहीं. शकुंतलेनें तिच्या कुशात डोकें खुपसून मनमोकळेपणानें रडून घेतलें. मागच्या साऱ्या गोष्टी तिला सांगितल्या. आपले असे वागण्याचे उद्देश कळविले. आणखी ती पुन्हां रडूं लागली.

त्यावर तिला पोटाशी धरून शालिनी म्हणाली, " तुझा कर्ण तरी पहा. हंमतोंग् मारखा. उगी आतां...अरे, अरे, अरे, फोडलीन् बाई बशी त्यानें. "

रडतां रडतां शकुंतला खुदकन् हंसली व बाळाकडे धावून त्याला धरीत म्हणाली, " असाच सारखा दांडगाई करतो आतांशा—" असे म्हणतच तिनं 'म्यॉव म्यॉव' म्हणत मांजरीचा आविर्भाव करीत त्याच्याकडे 'हुश' केलें तोंच तो खदूखदू हंसला. घारे डोळे, गोरे तांबुस गाल, कुरळे भुरके केंस, पातळ गुलाबी सदरा, गुटगुटीत हात-पाय—तिनें त्याचा कडकडून चावाच घेतला.

शालिनी म्हणाली, " मी गोंधळांतच पडले बाई. "

" कसल्या ग ? " बाळाला वर उचलून, कपाळानें गुदगुल्या करीत शकुंतलेनें विचारलें.

" उषेचें पत्र, विजयरावचें पत्र, अन् विश्वासरावचें हें असें वागणें, ह्या सर्वांची नीटशी सांगड कशी घालायची हेंच कळेनासं झालंय् मला. "

" दाखव मला सारं. मी सांगतें तुला. "

शालिनीनें तीं दोन पत्रें शकुंतलेपुढें टाकलीं.

तीं वाचून होतांच कांहीं काळ तिच्या मोठाल्या डोळ्यांचीं मांजरासारखीं बुबुळें अगदीं कोपऱ्यांत जाऊन दडलीं व नंतर तिनें सुस्कारा सोडून शांतवृत्तीनें म्हटलें,

" मला नाहीं कांहीं एक काळजी करण्यासारखं वाटत त्यांत. उलट एका बाबतींत खूबच आनंद झाला. बाबांना मी आतां हवी आहे..." तिनें पुन्हां रांगत रांगत भांड्याशी खेळ करणाऱ्या कर्णाला पकडलें व त्याचा पापा घेत म्हटलें. " समजलीस, मला हीच एक काळजी होती, आतां बाबांना मी हवी आहे. हें पाहिलंस का रे बाळ..." ती त्याला उभी राहून वर झेलूं लागली. " तुदे आदोबा म्हनतात कीं मादी थर नाहीं कुनाला गायची म्हनून. त्यांना मीच हवी आहे ! "

" हषवायू झाला कीं काय तुला ? " शालिनीनें मध्येंच प्रश्न केला. " मला त्या विजयची खात्रीच नाहीं येत. तो पुन्हां तुला तोंडघशी पाडेल बघ. "

“ पण मी त्यांना तुझ्यापेक्षां ज्यास्त चांगल्या रीतीनें ओळखतें–हो कीं नारे बाळ ? ” असें म्हणत ती मोठ्याने हंसूं लागली, “ त्यांनी उगेला आश्वासन दिलं उगाच तिची समजूत घालावी म्हणून. कारण नाहीं तर हे ते विश्वासरावला पुन्हां कशाला पाठविते मला शोधायला ? अं ! बाळ, छांग म्हनावं आता मावशीला ? ”

पण विजयबद्दल शकुंतलेला जरी इतका विश्वास होता तरी शालिनीनें तिच्याच सल्ल्यानें एक विस्तृत पत्र १५ नोव्हेंबर रोजीं विजयला लिहिलेंच. त्या पत्राचें उत्तर येईना, तेव्हां त्या संबंधीची शंका तिनें तिला प्रदर्शित करतांच शकुंतला बेफिकिरीनें म्हणाली. “ याचा अर्थ असा कीं ते तुझ्यावर रागावले आहेत, तूं कां अशी भलतीच शंका प्रदर्शित करावीस त्याच्याजवळ ? ”

२० डिसेंबर रोजीं नागपूरहून एक पाकीट आलें, ते एटींत शालिनीकडे भिरकावून देत शकुंतला म्हणाली, “ हें हस्ताक्षर त्यांचेंच आहे. घे फोड नि वाच तुझ्या पत्राचं उत्तर. ”

दोघीही कुतूहलाने पाहूं लागल्या—

उर्मिलाच्या व विजयच्या लग्नासंबंधीची ती गुलाबी पत्रिका होती !

———

## २९.

## गटंगळ्या !

उभे होण्याचा प्रयत्न करणारा, मधूनच 'हुं' 'हुं' असा ठसक्यानें आवाज काढणारा, आणि लागलीच–' व्या--व्या--व्या--व्या--' असे वळवळणाऱ्या जिभेतून निरर्थक बोल काढणारा, शकुंतलेचा जीव कीं प्राण कर्ण, याच वेळी धाडकन् आदळला व प्रथम बराच वेळ नुसता मुग्ध 'आ' वासून त्यानें डोळे मिटले, आणि नंतर डोळे किलकिले करून वाफेवरील झांकणाप्रमाणें त्याचा जोराचा रूदनध्वनि बाहेर पडला. तरी त्याच्या आईचे यावेळीं त्याच्या दुःखाकडे कुठें लक्ष होतें. ?

शालिनी तिला घाईत म्हणाली, " घे ग त्याला, जोरानं आपटला तो ! "

शकुंतलेनें उत्तर दिलें, " मरे ना का मेला ! "

अखेर शालिनी मावशीनें त्याला उचललें, गॅलरींत नेलें, ' उगी उगी ' म्हटलें ' छु छु छु छू ' असे कांहींसे आवाज काढले, तरी त्याचें रडें कांहींकेल्या थांबेचना. अखेर कंठ दाटून आलेली शकुंतला रडक्या आवाजांत म्हणाली, " आण त्याला, पाजतें म्हणजे राहील उगा."

इतक्यांत उदय घरीं आला. शालिनीनें सारा वृत्तांत आपल्या कोंकणींत त्याला घडघड सांगितला. त्यावर मराठीचा प्रयोग करीत तो म्हणतो, "फार च्यांगला झ्याला !"

तें त्याचें मराठी अन् त्यानें साधलेला उपरोध पाहून डोळयांत आसूं असूनही शकुंतलेला हसूं आलें.

पण शालिनी आपल्या नवऱ्याला रागावून इंग्रजींत म्हणाली, " थट्टेवारी काय नेतां असं ? नागपूर मेल सुटायला एक तास आहे अजून. आपण दोघेंही आत्तां नागपूरला जाऊन विजयची भेट घेऊन त्याला ताळयावर आणूं या. "

" अग, पत्रिकाही वाटल्यावर का लग्न मोडणार आतां ? " उदयनें प्रश्न केला.

" बाटलेला हिंदु अधिकच सोंवळा होतो म्हणायचा. " शालिनीनें त्याला टोमणा देत म्हटलें. " रूथशीं जमलेलं लग्न मोडतां आलं तुम्हाला ! "

" ए साली, " उदयचें तें संबोधन शालिनीच्या नेहमीच्याच परिचयाचें होतें, पण त्या तसल्या अवस्थेंतही त्या शिवीवजा वाटणाऱ्या नांवामुळें, शकुंतलेला आणखी एकवार हंसूंच आलें. तेव्हां मधेंच तिच्याकडे वळून शालिनी त्वेषानें म्हणाली, " प्रसंग काय तुझ्यावर नि हंसतेस काय अशी ! अग मुलाची आई आहेस तूं. पण कांहीं अक्कल आहे का थोडी तरी ? ही वेळ निघून गेली की, कपाळ पिटीत बसशील जन्मभर. तुला, तुझ्या मुलाला कुणी कुत्रें हुंगणार नाही ! " तें तिनें काढलेलें आपल्या भविष्यकाळचें भेसूर चित्र काय शकुंतलेला कल्पनेनें जाणण्यासारखें नव्हतें ? पण हे शब्द ऐकतांच तिनें एकाएकीं, गुडघ्यांत मानच घातली.

शालिनी तिच्याकडे कांही काळ दुर्लक्ष करून पुन्हां आपल्या पतीला विचारूं लागली, " काय सुचविणार होता तुम्ही ? "

" हें पहा, मग शकूलाही घेईनास बरोबर. एकदम कींव येईल त्याला..."

" नको नको बाई. " आपल्या आवळलेल्या डाव्या मुठीचीं पहिलीं बोटें लांब करून, हात व मान आडवी हलवित शालिनी मराठींत म्हणाली: " तो तिला नाकारायचा अन् तिथंच तिची शोभा करायचा एखाद् वेळ. आणखी पहा, पुरुष असतात मतलबी. विसराळू. हे मूल त्याचेंच आहे, हें सांगून सुद्धां खरं नाहीं वाटायचं त्याला. उगाच संशय घ्यायचा एखाद् वेळ. म्हणून म्हणते, तिला तर न्यायचेंच नाहीं पण नागपुरास त्याला मुलासंबंधींही काहीं एक सांगायचं नाहीं. एकदां इथं आणलं, म्हणजे सारा खुलासा करावा. "

उदयला मराठी अजून विशेष बोलता येत नसलं, तरी आतां सारं कळत होतं. तो टाळी देऊन एकदम म्हणाला, " Allright, I am your most obedient servant ! "

इतके झाल्यावर शालिनीनें रुदन करीत असलेल्या शकुंतलेला पाहून म्हटलें, " शकू, तुला काय वाटतं ह्या बेतासंबंधीं. "

तिनें गुडघ्यांतली मान बाहेर न काढतांच हुंदके देत उत्तर दिलें, " मला अक्कलच नाहीं. मग कशाला कांहीं विचारतेस ? "

ती तिची अवस्था पाहून उदयनें शालिनिला गॅलरीत चलायला खुणावलें आणि तिच्या कानांत तो कोंकणींतच कुजबुजला, " एखादे वेळीं आत्महत्या करायची ही आपल्या पश्चात्. एकटंच हिला सोडून जाणं धोक्याचं नाहीं का ? "

" छेः छेः , ती खंबीर आहे चांगलीच. आत्महत्या करायची, ती तिनं मागंच केली असती कितीतरी प्रसंगीं. अन् आतां तर तिला मुलाचा मायापाश आहे. " शालिनीने कोंकणींतूनच निश्चितपणें उत्तर दिलें.

" तरी तूं शेजारच्या शारदाबाईना व वेणूला सारं नीट समजाऊन साग अन् तिच्यावर सारखी दृष्टि ठेवायला सांग. "

ही नवऱ्याची आधीपासूनची काळजीची सूचना, तिलाही पटली व ती शेजारच्या खोलीकडे जाऊन, पंधरा वीस मिनिटांत परत येऊन कोंकणींतच म्हणाली, " सारं कांहीं नीट जमलं आतां. त्या दोघीही तिच्यावर सारखी पाळत ठेवणार आहेत आपल्या मागें... पण किनई आपण पाहूं या हिच्या अवस्थेची परिक्षा आतांच एकवार. " असें म्हणून तिनें आपले कोंकणी कुजबुजणें थांबवून ती कर्णाला कडेवर घेऊन पुन्हां गॅलरींत गेली व त्याला थोडा वेळ लाडवून अगदी कठड्याच्या टोकाशीं खालच्या खोल रस्त्याकडे पाहत-ओरडली, " अहो, अहो, सुटला ना बाळ माझ्याहातून-अग बाऽऽई ! "

तोंच शकुंतला विद्युद्वेगानें तिच्याकडे धावत गेली व कर्णाला तिच्या हातीं सुरक्षित पाहून, कांहींसें घाबरत,, कांहींसें रडत, कांहींसें हंसत, कांहींसें काळजीत, कांहींसें रागांत, म्हणाली, " ही ग काय तुझी अशी दळभद्री थट्टा ? "

* * * *

" २८ तारखेस गोरज मुहूर्तावर लग्न. तसें म्हटलें तर परवांलाच सायंकाळीं शालिनी इथून गेली." अंथरुणावर जराशी कडेवर असलेली व बाळाला पदराखालीं पाजत असलेली शकुंतला सकाळींच विचार करीत होती, " आणखी कालच आपण तिच्या पत्राची वेड्यासारखी अपेक्षा करीत होतों !...आज बहुधा येईल तिचें पत्र...तंवर वाट पाहावी, अन् मनांतले भेसूर विचार भित्र्या गावकुत्र्यासारखे पळवूनच लावावेत—"

तोंच दारावर कुणीसें " टक् टक् " केलें.

" कोण आहे आतां पुन्हां ? " ती त्रासिक स्वरानें म्हणाली.

" टक् टक् " उत्तर आले.

" बाळ पितो आहे. थोडं थांबाल तरी कि नाहीं ? " ती रागांतच उठली व पाय आपटत तिनें त्वेषानेंच दाराचा कोंडा खाटकन् खालीं ओढला, आणि येणाऱ्या व्यक्तीचें तोंडही न पाहता पुन्हां त्रासिकपणें अंथरुणावर तिनें आपलें अंग धाडकन् सैल सोडलें.

" चहा घ्या ना थोडासा. " चहाचा कप तिच्यापुढें करून हंसरी वेणू म्हणाली.

तशी ती रागानें म्हणते, " मला बरं वाटत नाहीं म्हणून हजारदां सांगितलं तुम्हांला, पण तुम्हीं कांहीं पिच्छा सोडीत नाहीं माझा. मला नकोय चहा जा." जवळच्या टी पॉयवर चहाचा पेला हलकेंच ठेऊन, तोंडाला पदर लावून हंसतच वेणू खोलीबाहेर गेली, आणि आदळआपट करीतच शकुंतलेने पुन्हां दाराचा कोंडा घट्ट लावून घेतला. त्या चहाकडे तिरस्कारानें एकवार नजर फेंकली, आणि हलकेंच पुन्हा अंथरुणावर आडवें होऊन बाळाला पदराखाली घेतलें.

—" ह्या हंसणाऱ्या वेणटलीचा असा कांहीं राग येतो ! अवदसा कुठली... स्वतःवर पुढं प्रसंग आले म्हणजे कळेल म्हणावं. तरी बरं आपल्या भिकार खोलींत अडचण होत होती पाहुण्यामुळं म्हणून शारदाबाईच्या आग्रहानें मी गेल्या दोन्ही रात्रीं ह्या कार्टीला ती नकोशी असतांनासुद्धां माझ्या खोलींत निजवलें...अन् शालिनीच्या तरी विसरभोळेपणाची कमालच कीं नाहीं ? अंमळ गॅलरींत तरी बरं वाटलं असतं तों त्या दरवाजाला कुलूप लावून किल्लीही घेऊन गेली बरोबर !...कोंडवाडा करून ठेवलाय गाईचा जसा कांहीं."

इतक्यांत कर्ण पदरांतून आपला चेहेरा बाहेर काढून तिच्याकडे टक लावून पाहूं लागला व तिच्या शून्य दृष्टीकडे पाहून जेव्हां गोड हंसला, तेव्हां कुठें ती भानावर आली.

" तुलाही हंसायला येतं नाहीं रे लबाडा ? " असें म्हणतच शकुंतला वात्सल्यपूर्ण दृष्टीनें हंसली.

आणि आईनें आतां ज्यास्त बोलूं नये म्हणूनच कीं काय त्यानें आपले चिमुकले गोंजिरवाणें तळहात तिच्या ओंठावर फुलामारखेच रोवले व तो उठून उभें राहायचा प्रयत्न करूं लागला .

ती मुलाशीं खेळण्यांत अगदीं रंगून गेली होती, तोंच पुन्हां दारावर—
" टक् टक् ! "

रिता कप परत न्यायला आलेली ही वेणूच असावी, असा तर्क करीत, ती त्राग्यानें तिथूनच ओरडली, " आतां नाहीं उघडत मी दार जा. मग मीच आणून देईन तुमची कपबशी धुवून विसळून. "

" जरासं उघडा तरी बाई दार. "

शारदाबाईचा आवाज आला.

" कोण शारदाबाई कां ? " हलक्या आवाजांत शकुंतलेनें नम्रपणें प्रश्न केला. " उघडतें हो. असें म्हणून तिच्या अंगावर चढून लीला करणाऱ्या कर्णाला अंथरुणावरच ठेऊन तिनें दार उघडलें. तोंच शारदाबाई ओरडल्या, " अहो, पडतो, पडतो– तो. "

त्या धरायला जाण्यापूर्वीच पलंगावरून आपटली सुद्धां स्वारी !

शारदाबाईनीं धावूनच त्याला उचललें, त्याच्या कुरळया केंसावरून हात फिरवला, व तो ' ढ्यँहा ' ढ्यँहा ' करीत असतांनाच त्याला शकुंतलेजवळ देत म्हटलें, " आई चहा घेईना, म्हणून स्वतःच तो घ्यायची धडपड चालली होती स्वारीची !

शारदाबाईंना राग येऊ नये म्हणून कर्णाचें रडें थांबतांच, शकुंतलेनें तो निवालेलाच चहा घेतला व थोडेसें बोलून त्या बाहेर जातांच पुन्हा दार आंतून लावून घेऊन, ती खेळतच अंथरुणावर उताणी पडली.

पुन्हां आपली आहेच ' टक् टक्.' तिला असा कांहीं राग आला " व आतां नुसतें टेकूनच ठेवतें बाई दार " असें कांहींसें पुटपुटतच तिनें कर्णाला कडेवर घेऊन त्रासिक मुद्रेनें दार उघडलें, तोंच पोस्टमननें तिच्या हातीं एक कार्ड दिलें. दार तसेंच लोटल्यासारखें करून ती पत्रावरून नजर फिरविणार तोंच, कर्ण तें कार्ड हातीं घ्यायला चांगलीच दांडगाई करू लागला.

ती त्याच्याकडे पाहत हंसत म्हणाली, " चूप, अरे तें मावशींचं पत्र आहे तुझ्या. वाचूं दे मला जरा. " असं म्हणून ती खालीं जमिनीवरच बसली, आणि कर्णाला मोकळे करतांच तो जेव्हां भांड्यातांब्यांच्या दिशेनें भरभर रांगूं लागला, तेव्हां तिनें तें पत्र अधीरतेनें वाचायला प्रारंभ केला.

शालिनीनें पेन्सिलीतच घाईघाईत लिहिलें होतें.—

"

नागपूर
२२ डिसेंबर

शकू,

दोन तीन तासापूर्वीं पोंचलें. आजच दुपारच्या मेलनें सर्व मंडळी जाणार आहेत. सामायन सकाळींच गेलें. तयारी जय्यत आहे. मंडळी खूबच आहे.

अजून विजयरावची एकांतांत गांठ पडायला संधीच येत नाहीं. काय करावं सुचत नाहीं.

बाबासाहेबांचं मन मात्र ठीक नाहीं. मला पाहतांच त्यांनीं तुझी आठवण केली. आश्चर्य असं कीं कर्णाचा बाप मात्र हंसतोखिदळतोय्. विस्तृत पत्र उद्यांला नक्की.

—तुझी,
शालिनी "

आणखी एक दिवस कसाबसा पार पडला, आणि २४ तारखेची सकाळ उजाडली. लग्नाचा दिवस जसजसा जवळ येत चालला तसतसी शकुंतलेच्या हृदयाची धडधड सारखी वाढूं लागली.

तिनें नावडत्या वेणूला अखेर विनविलें, " वेणूताई, आज किनई, दिवसभर बाळाला तुम्हीच ठेवा आपल्याकडे. कराल का येवढं माझ्यासाठीं ? "

वेणू हंसतच म्हणाली, " आणा त्याला. आतांच नेतें मी. " वेणू गेल्यानंतर तिनें पुन्हां आंतून दार घट्ट लावून घेतलें व तें शालिनीचें पत्र पुन्हां आपल्या थरथरत्या हातानें धरीत, आणि आंसवांनीं डबडबलेल्या डोळ्यांनीं पुन्हां वाचीत, ती अंथरुणावर उताणी झाली.

तिनें त्या पत्रांत केलेल्या अनेक चुका, आतां कुठें तिच्या लक्षांत आल्या व तिला खुदकन् हंसूच आलें. ती आपल्या मनाशींच बोलूं लागली, " तरी बरं चांगली शिकली सवरली आहे...पण ह्या चुकांचा अर्थ तिला लिहायला येत नाहीं असा का होतो ? तिच्या उद्विग्न मनःस्थितींचं चिन्ह आहे हें...हंसत खिदळत नवरदेवाची स्वारी गुडघ्याला बाशिंग बांधते आहे का ? सारे पुरुष एकजात निमकहराम !...नाही पण बाबासाहेबही पुरुषच नाहीत का ? बिचारे देवमाणूस आहेत तें...आतां हें लग्न मोडण्याची आशाच नको मुळीं...अन् मग मी नि बाळ ? काय करायचं ह्या जगांत राहून दोघांनीं ? बाळाला घेऊन उडी घ्यावी झालं. म्हणजे आटोपलं सुखदुःख. काय करायचं तें भेसूर भविष्यांत चाचपडणं ?...पण कर्णाचा कशाला जीव घ्यायचा. त्याला कुणीही सांभाळील. त्याच्या जिवावर माझा काय हक्क ? हें दार उघडं असतं, तर आतां घेतली असती उडी गॅलरीतन् !...तोडूं का कुलूप हें ? नको धडपड होईल उगाच. चार मंडळींपुढं आपला मरणापूर्वी तमाशा होईल..." हे भयानक विचार येतांच ती किती विकट हंसली. फळी-वरच्या आगपेटीचा एक भाग तिच्याकडे पाहून जणूं तिला आमंत्रणच देत होता. आडवी असलेली ती कष्टानें उठूनच बसली.

तोंच दारावर वाजले " टक् टक् ! "

धस्सच झालें तिच्या हृदयांत एकाएकी ! एक आवंढा गिळीत नासिकाग्र किंचित् ' फुर ' करून वक्र करीत, डोळे पुशीत ती आवाज बदलण्याचा प्रयत्न करीत म्हणाली, " कोण आहे ? "

तरी पुन्हां आपले, " टक् टक् ! "

रागच आला तिला त्या आहूताच्या मूकतेचा. तिनें त्राग्यानें उद्गार काढले, " कोण आहे तें सांगितल्याशिवाय नाहीं उघडणार ! "

तरी पुन्हां तें जीवघेऊ ' टक् टक् ! '

वेणूच ती. दुसरें कोण असणार ? बाळाला घेऊन परत आली असेल झालं. ती काकुळतीनें मोठ्यानें म्हणाली, " वेणूताई, असं काय बरं, मला आज बरं नाहीं ना ? खेळवाना बाळाला तुम्हींच आज ! "

हास्यध्वनीचा तिला भास झाला. लागलीच दारावरच्या टिचकींचें, थापांत, आणि नंतर तर ' धडधड ' आवाजांत डोके ठणकतपर्यंत रूपांतर झालें. तेव्हां नाइलाजानें उठून तिला दार उघडावेंच लागलें.

—पण तें आलेलें माणूस पाहतांच तिच्या डोळ्यावर एक निमिषभर तिचाच विश्वास बसेनासा झाला. तरी लागलीच तिच्या तळपायांची आग मस्तकाला गेली, आणि अंथरुणावर पुन्हां धाडकन् अंग फेंकून, ती तळहाताच्या खोंवणींत डोकें खुपसूनच हुंदके देऊं लागली.

दाराच्या फळीचें फट् झालें, आणि मागोमागच कोंडा वर सारल्याचा खटकन् आवाज झाला. लगेच लकेरीची गुणगुण सुरू झाली.

" शालिनी गे, शकुंतलेचें कुशल आहे ना ?

असेल तर होय म्हण, नसेल तर नाहीं म्हण, खरें असेल तें सांग ? "

खुंटीकडे जातांना पावलें वाजलीं, टोपी खुंटीला लटकावण्याचा पुसट भास व पाठोपाठ कांहीं तरी उत्साहांत बरळणें सुरू झालें !

" पापा, नेहमीं पाटणकराच्या साध्या भोळ्या गाण्याची स्तुती करतात, त्यांतली गोडी आज कळली मला !... काय बरं तें पद ?—

' सारिके गे, चंद्रिकेचें कुशल आहे ना ?

असेल तर होय म्हण, नसेल तर नाहीं म्हण, खरें असेल तें सांग ? '

नाहीं तर खाडिलकराची ती रागडी धडधड ! काय म्हणे—

धिःक्कार मन साहिना. धिःक्काऽऽऽ—"

तें वेंडेवाकडें संगीत वाऱ्यावर तत्क्षणी विरलें, व धडपडणाऱ्या शकुंतलेला उताणें करून तिचें तापलेलें डोकें मांडीवर घेत स्वारी तिचे डोळे पुशीत म्हणाली, " एऽऽऽ, आतां बस्स झालं हें माझं रडकं स्वागत ! "

शकुंतलेनें आपले डोळे आणखीच घट्ट मिटले, आणि पिकला आंबा खूब जोरानें दाबला म्हणजे रसाची चिरकांडी उडते, तशाच तिच्या नाकाडोळ्यांतून धारा वाहूं लागल्या.

तिचें डोकें हलकेंच उशीवर ठेविलें, विजय उठला व त्यानें तिच्या वरखालीं हलणाऱ्या उरोभागावर एक कागद ठेवीत म्हटलें, " माझ्या हातून तुझा असा अक्षम्य अपराध व्हायला काय कारण घडलें त्याचा हा जणुं शिलालेखच आहे. वाच हें. "

शकुंतलेनें पदरानें डोळे पुसले, आणि ती तो कागद वाचूं लागली. त्यांत लिहिलें होतें—

" नाशिक

२४ ऑक्टोबर १९३१

श्री. विजयराव यास, सा. न. वि. वि.

आपला उषेशीं लग्न करण्याचा बेत ऐकून, प्रथम आपली कींवच आली, पण आतां आपल्या ह्या निर्णयाबद्दल आपले अभिनंदनच करितो.

मी दिवाळीच्या सुटीनिमित्त मुंबईला गेलो होतों, हें कदाचित् उषाबाईकडून आपणांस कळलं असेलच. मला तिकडे जायची देवानें चांगलीच बुद्धि दिली म्हणायची. जातांक्षणींच मला कळलें कीं मुगभाट नाक्यावरच्या वेश्यागारात शकुंतला राजरोस वेश्येपणाचा धंदा करीत आहे व खूषच आहे. मी तेथे एका रात्री तें खरें आहे कीं नाहीं हें अजमावून पहायला मुद्दामच गेलों व ' अशा तऱ्हेची जी नायकीण आहे ती मला पाहिजे ' म्हणून थेट शकुंतलेचें वर्णन त्या मुख्य नायकिणीजवळ केलें.

शकुंतला मला पाहूनही चरापली नाहीं. तिचे डोळे मद्यानें आरक्त झाले होते व ती विषयलोलुप दिसत होती. मला पाहतांच ती म्हणाली,

" कोण विश्वासराव, वा खूबच मौज आहे म्हणायची आजच्या रात्रीं ! नाशकाचीं द्राक्षें मिळतील म्हणायची आज ? "

किती निर्ढावली होती ती ! केवढा तिचा थाटमाट. काय चाळे ? अगदीं थेट नखशिखांत वेश्याच जशी कांहीं !

मला फार राग आला. ! मी म्हणालों, " शकुताई, विजयरावला हें मीं कळविलं तर ते इथं येऊन तुमचा प्राणच घेतील. "

त्यावर ती निर्भत्सनेनं म्हणाली, " कोण आहे हो माझा तो येवढा हक्क गाजवायला ?...एकदा शोध करायला आला होता मेला, अन् फजिती होऊन गेला तोंड काळं करून...अंधेरनगरी नाही म्हणाव ही कुणाचाही जीव घ्यायला !

मग माझ्या मनांत एक कल्पनाच आली. म्हटले पाहावें अशानें तरी हिचे डोळे उघडतात काय ते. मी तिला म्हटलें, " चल लाडके, आपण बाहेर सहल करून येऊं नि मग इथं मौज करूं. मी देतो तुला ५० रु. आताच. "

तोच ती मोहकपणें हंसली आणि माझ्यावर तिनें नेत्रकटाक्षांचा वर्षाव केला. तिनें ते कबूल केलं नि माझा जिव अंमळ खालीं पडला.

मीं तिला तडक शालिनीकडे पोंचती केली. तो तिनें मला शिव्या देऊन हंबरडाच फोडला ! म्हणाली कीं ' माझं मूल आहे तेवढं तरी घेऊन या. त्या पापागारात जन्मलेल्या कारट्यालाही मी जेव्हां पोंचतं केलं, तेव्हां मनांत एक ओझरता विचार आला कीं त्याचं नरडंच दाबावं ! ती पुन्हां शालिनीकडून केव्हां पळून जाईल ह्याचा कांहीं एक नेम नाहीं !

विजयराव, अशी त्या कुलटेची दुःखद आख्यायिका आहे. आता तिच्यासाठीं कृपा-करून व्यर्थ आपल्या जिवाचे रान करून घेऊं नका.

उर्वशी लग्न केलंत, तर मला वाईट वाटेल असेंही नाहीं. माझें लग्न उषेच्या एका मालती नांवाच्या सुंदर मैत्रीणीशीं ठरलेलें असून तें येत्या नाताळांतच होणार आहे.

कळावें,

तुमचे कल्याण चिंतणारा,

तुमचा मित्र,

विश्वास"

हें पत्र शकुंतला वाचत होती, तों तों त्या अग्निकुंडांत तिचीं सारीं असावें जळून खाक झालीं व क्रोधाचा डोंब तिच्या अंतःकरणांत उठून ती त्वेषातिरेकानें त्या पत्राचें तुकडे तुकडे करीत उद्गारली,

" खोटं आहे हें सारं, निखालस खोटं आहे. "

तिच्या पाठीवरून हात फिरवीत हंसत हंसत विजय म्हणाला, " अग, माहित आलं आतां मारं मला. म्हणूनच मी इथं आलों नाहीं कां ? "

पण शकुंतलेनें रागानें व अधिकारानें विचारलं,

" माझ्यासंबंधी हें आधींच कसं खरं वाटलं ? ह्याचं स्पष्टीकरण हवं मला आधीं."

"ह्यात्तच्या, माझ्या पुराव्याचा कागद फाडून टाकलास, अन् आता काय माझी जबानी घेतेस ? " असें म्हणत तो खो खो हंसूं लागला.

इतक्यांत दरवाजावर कुणींसे ठोठावलें व म्हटले, "शकुताई, घ्या ह्याला आतां अंमळ, रडतोय् सारखा."

" उघडतें हो दार, " अशी गोड ' ओ ' देत शकुंतलेनें दार उघडलें, कर्णाला कडेवर घेतलें व दार लावून, ती त्याला पदराखालीं घेणार तोंच विजयनें तिला केंविलवाण्या आवाजांत म्हटलें, " अरेरे, शकू, चरितार्थासाठीं तुला अशीं लोकांचीं का कारटीं खेळवावीं लागतात ? "

" शिवी का हो देतां बिचाऱ्याला ? " असें म्हणून ती आणि तो एकमेकाकडे पाहून हंसलीं आणि नंतर कर्ण विजयकडे पाहूनही आश्चर्याचे डोळे करीत मधुर हंसला.

" दे परत त्याला त्यांचा नेऊन. " विजय तिरस्कारानें म्हणाला. " आतां मी तुला न्यायला आलों असतांना, असं लोकाचं उसणं खेळणं नकोय् करमणुकीला तुझ्या. एक वर्षांत देतों बघ तुला असलं बक्षीस. "

" इश्श ! "शकुंतला मोठमोठ्यानें हंसून म्हणते, " आतां नको बाई येवढ्यांतच दुसरं कांहीं . "

विजयचा प्रफुल्लित चेहरा मलूल झाला . तो खुर्चीवर धाडकन् अंग फेंकून म्हणतो , " तूं म्हणतेस तरी काय ?

कुणाचं कारटं आहे हे ? "

" ओळखा तुम्हीच. कांहीं दिसतं का साम्य ? "

विजयनें बारकाईनें त्याचें नावडतें निरीक्षण चालवलें व तो कपाळावर हात ठेवीत उद्विग्नतेनें म्हणाला , "थेट तुझेच आहेत ग डोळे. "

" मग येवढं वाईट कां वाटतं त्यांत ? " शकुंतला हंसून म्हणाली. तों विजय गरजलाच , " लाज वाटत नाहीं असं विचारायला ?...पापागारांत जन्मलेलं तें हेंच कारटं तर ? अरेरे , विश्वासच खरा . तूं पाठविलेली तीं दोघें म्हणजे पढवून ठेविलेले खोटे वकीलच होते तर ? शिव शिव , उगाच आलों मी इथं तुझं पापी तोंड पाहायला. " असें म्हणत तिच्या कपोलावर त्यानें एक त्वेषानें चापट मारली , त्या पोराला कडेवरून ढकलून दिलें , तो एकदम तिच्या हातून निसटून खालीं पडला , आणि त्यानें झटकन् डोक्यांत टोपीच घातली !

---

२०

# स्फोट !

शकुंतलेने पडलेल्या कर्णाची पर्वा न करितां ती दाराकडे धाव घेऊन विजयला आडवी झाली. तो तिला जोराने बाजूला सारत म्हणाला, " रेवतीच्या वेश्यागारांतली ही नेहमीची मात्रा इथं चालणार नाहीं. "

पुन्हां कष्टानें त्याला अडवीत व त्वेषाने त्याच्या छातीवर बुक्क्या मारीत शकुंतलेनें किंकाळीच फोडली,

" पहा बरं त्याच्या नाकाकडं. तं तुमच्यासारखं नकटं आहे की नाहीं तें ? "— तरी तो हात उंचावून कोंडा खाली ओढूं लागला.

" जरा त्याच्या वयाचा तरी हिशेब करा. मी केव्हा घर सोडलं ? "

तरी तिनें ती ओढलेली पाटी पाठीने जोरानें मागें आपटावी व त्याने ती दाराची फळी पुन्हां ओढावी असा प्रकार चालूच होता.

अखेर जिवाचा धीर सुटून तिनें शेवटचें निर्वाणीचे कठोर बाण सोडले, " पुरुष आपमतलबी. विसराळू. तरी बरं पचमढीच्या टेकडीवरचा तो अष्टमीचा चंद्र! "

ह्या मंत्रानें मात्र विजयच्या अंगांतलें संशयाचें भूत पार कुठच्या कुठं पळालें. त्यानें आपल्या रडणाऱ्या मुलाला धावून उचललें. त्याचे पापे घेतले. त्या धापा टाकीत अंथरुणावर निपचित पडलेल्या शकुंतलेच्या डाव्या पावलाच्या घोट्याकडे पाहून तो म्हणाला, " शकू, तुला दार लागलं वाटतं ? रक्त लागलं ग ! "

" लागूं द्या, लागूं द्या. " ती आपले दोन्ही हात घट्टपणें चेहऱ्यावर आवळून म्हणाली, " खाटकाला, कसायाला, रक्ताचं काय ? "

✿ ✿ ✿ ✿

हँगिंग गार्डनच्या कठड्याजवळून तीं दोघें त्याच दिवशीं सायंकाळीं सूर्यास्त पाहत होतीं. आणि तिसरा एक अजाण जीव त्या दोघांच्याही चेहऱ्याकडे आळीपाळीनें गोड दृष्टिक्षेप फेंकीत होता. दूरवर पसरलेल्या त्या सागराच्या नीलवर्ण लाटांवर मध्येंच चमटलेला तो तांबुस रंगाचा, सुवर्ण कांतीचा मुलामा दिलेला, तो बाणाच्या टोंकाच्या आकाराचा तरंगता पट्टा, त्याच्या विस्तृत टोकाचें चुंबन घेत, समुद्रांत बुडी घेणाऱ्या सूर्याचा तो विशाल तांबडा तेजोगोल, क्षितिजावर पसरलेले ते लाल, पिवळे व पांढरे रंगाचे पट्टे, मध्येंच पिंजलेल्या कापसासारखा दिसणारा तांबुस रेषेनें अंकित असा चुकला मुकला पांढरा मेघ ! तें दृश्य पाहतांच समाधानाने जेव्हां विजयनें एकवार शकुंतलेवर नजर रोखली, तेव्हां तो म्हणाला, " तुझ्या गालावरचा सफरचंदासारखा पूर्वीचा गुलाबी रंग आज पुन्हां मला दिसला. "

तीहि त्याला हंसतच म्हणाली, " तुमचेही गाल आतांच चकाकताहेत टमॅटोसारखे ! "

" अन् ह्या लबाडाचे कसे दिसताहेत ? "

" रबराच्या रंगीत चेंडवासारखे ! " दोघेही मोठ्याने हंसलीं, तेव्हां तोही शाहाणा 'हिऽकी हिऽकी' हंसायला लागला.

एकदम गंभीर होऊन शकुंतला म्हणाली, " हें पहा , ह्या सूर्याबरोबरच आपल्या गतायुष्यातले दुःखाचे प्रसंगही जर बुडाले— "

" तर दुसरे दिवशीं पूर्वेकडून ते वर येतील. " विजय हंसत मध्येंच म्हणाला. " वेडे ते तात्त्विक विचार सार आता बाजूला...मला बुवा, तूं ठेविलेले बाळाचं नांव नाहीं आवडलं अगदी . "

" कां बरं ? " तिने अभिमानानें प्रश्न केला, " नाव ठेवायची ही मुळीं मीं तुम-चीच पद्धत उचलली ! लीलावन्संच्या मुलाचं नांव तुम्ही धर्म ठेवलंत, त्याचं कारण काय दिलं होतंत , आठवतं का ? "

" चांगल आठवतं. पण तुला बाळ कुंतीप्रमाणंच कुंवारपणीं झाला असला, तरी आता त्याच्याच वडिलाशीं तुझं लग्न व्हायचंय. होय ना ? बरं झालं सूर्य अस्ताला गेला. नाहीं तर आपल्या कर्णाचंच नाव बदललेलं त्या जुनाट कर्णाच्या ह्या बापाला कदाचित् खपलं नसतं ! "

" मग आतां काय ठेवणार ह्याचं नांव ? " पायवाटेवरून संथपणें चालत चालत शकुंतलेनें उत्सुकतेनें प्रश्न केला.

" हा लेकाचा फारच उतावीळपणें जन्मास आला. " विजय हंसत हंसत म्हणाला. " अन् त्यामुळंच हा असा सारा घोंटाळा झाला ... तेव्हां ह्याचं नांव काय बरं ठेवावं ? ... काय रे लुच्चा, तूंच सांग ना. "

गवताच्या गालिच्यावर बसत शकुंतला म्हणाली, " काय ठेवणार मग, उतावळा ? घोंटाळा ? लुच्चा ? "—

खाली गवतावर बसून गवत उपटण्याचा प्रयत्न करणाऱ्या आपल्या चिरंजिवाकडे पाहून, टाळी वाजवून विजय म्हणाला, " अग, सुचलं मला ! 'उत्साह' म्हणूं या त्याला.'

" हें काय ? कांहीं तरी बाई. " शकुंतला म्हणाली. " पण नांवाचं असो मेलं. तुम्ही इकडे एकाएकी निघून आलांत, तर तिकडे नाशकाला गोंधळ उडाला असेल ना सारा ? "

" ॲः ! अग ते दोन वस्ताद् वकील आहेत ना आपले ? " गवतावर आडवं होत आकाशाकडे पाहत विजय बेफिकीरीनें म्हणाला. "...शकू, अष्टमीचा चंद्र नाहीं ग आज आकाशांत ? "

" इश्श ! " शकुंतला लाजत म्हणाली. " मग काय तिथल्या लग्नांत विघ्नच आलं म्हणायचं. साऱ्यांची निराशा होईल. अन् विशेषतः उषेची—"

" अग उषेपेक्षांही पापा–अन् तात्या ह्यांची चारचौघांत फजीति होईल ह्याची वाटते मला काळजी विशेष ! "

" आपलाच प्रताप सारा " असं म्हणताच तिनें बाळाला खांद्यावर घेतलें व दोघेंही परत जायला उठलीं.

उतार लागतांच शकुंतलेच्या तोंडून उद्गार निघाले, " दिवेलागणीनंतर मुंबई किती छान् दिसतेय इथून नाहीं का ? "

" अग माझं मुळी तिकडे लक्षच नाहीं. " विजय उत्तरला. " ही थोडीशी झाडें-झुडपें पाहताच मला पचमढीची आठवण झाली एकाएकी ! "

" मलाही किनई तिथले धबधबे विशेषच आठवतात हो. " शकुंतला म्हणाली. " त्या Bee फॉलवरून घसरतांना किती मौज वाटते ! "

दोघेंही उतरत उतरत ह्यावेळी खाली येत होतीं. विजय म्हणाला, " शकू, आपलं आयुष्य म्हणजे नदीच्या प्रवाहासारखंच नाहीं का ? मध्येंच एखादा धबधबा येतो आणि त्याच्या धारेंत माणूस सांपडलं म्हणजे कोसळतं खाली. किती गटंगळ्या मिळतात जिवाला

त्यावेळीं ! पापा, तात्या, रमाकाकू, लीला, विलास, शालिनी, टिमथी, तूं, मी–सारेच त्या धारेत सांपडलों ! – आतां पुन्हां संथ प्रवाह सुरू होईलसं वाटतंयू— ”

“ पण विश्वाससारखं चांगलं पोहणारं माणूस ! ” शकुंतला मध्येंच म्हणाली. “त्याला धबधब्याच्या कितीहि उंचावरच्या धारेंतून द्या ना लोटून ! मौजच वाटेल उलट–”

“ त्या दुष्टाचं कशाला नांव काढतेस मधेंच ? ” विजयनें तिला बोलतांना थांबवलें. “ बिचारा अरुण मात्र पहिल्याच झपाट्यासरशी बुडाला ! ” तो एकाएकी खिन्न झाला व लागलीच त्याचे डोळे चकाकून तो म्हणतो , “ अग , बाळाचें नांव अरुणच ठेऊं या. ”

“ हो गडे , छान आहे नांव ! ”

खोलीचें कुलुप उघडून दोघेही आंत शिरतांच, वेणूनें त्यांच्या हातीं एक तारेचें पाकीट ठेविलें. दोघेही अधीरतेनें वाचूं लागलीं—

“ Usha's marriage with Vishwasrao. Same date, same time as settled. Do attend the ceremony with Shakuntala.
—Papa. ”

“ अरे बापरे, ” विजय उद्गारला. “ आतां कसं ? हा गळेकापू तिथंही धुडगूस घालूं लागलाच कीं...आजच पहिली गाडी गांठली पाहिजे आतां लग्न मोडण्यासाठी हें.”

“ मग बाळाचं कसं ? ”

“ म्हणजे, त्यालाही घ्यायचा बरोबर ! नाहींतर शालिनीनें व टिमथीनें तेवढीच गोष्ट लपवून मला पुन्हां संशयांत टाकलं तसं व्हायचं ! ”

“ नाही गडे. त्याला इथंच ठेऊं या शारदाबाईकडे. मला बाई लाज वाटते. तिथं सारी मंडळी असेल जमलेली. ”

त्या दोघांनीं बाळाचा निरोप घेतला , तेव्हा तो लुच्चा आपले चिमणे हात पुढे करून जणुं म्हणत होता , “ मलाही न्या आजोबाकडे. ”

स्टेशनवर त्यांना शालिनी व तिचे पतिराज भेटले. तेव्हा कळलं कीं, ह्या दोघांनीं तावडतोब निघून यावें. म्हणून केलेली ती त्या दोघांची युक्ति होती. विश्वासला उजळमाथ्यानें वावरायला तोंड तरी होतं का आतां ? बेत असा रचला होता कीं, विजयशीं आतां शकुंतलेचं लग्न व्हावं. कारण तीही तात्यांचीच मुलगी होती. आणि वधूंची ही अदलाबदल कुणाच्या लक्षांत येऊं नये म्हणून, उषेनें कुठेंतरी लपून राहावें व शकुंतलेनें अगदीं लाजाळूपणें बुरखा घ्या . बाबा , तात्या यांच्या संमतीनेंच सारं ठरलं होतं. हा

बेत सांगून होतांच शालिनी म्हणाली, " बाळाला काढा ना गाडींतनं, सुटेल ना ती ? हे किनई जातील त्याला घेऊन मालतीच्या इथं. कारण वडील मंडळींना कुणालाच बाळासंबंधीं लग्नाआधींच कांहीच कळायला नको. नाहीं तर पुन्हा कुणीतरी अडचण आणायची एखादी ! "

" अग, मी आणलाच नाहीं त्याला. " शकुंतला हंसत म्हणाली.

" पण त्या विश्वासनं सांगितलं असेल ना साऱ्यांना ? " विजयनें शंका काढली.

" अहो, त्यानं केलाय् पोबारा इथनं. त्याच्या पत्रांतला सर्वच मजकूर मुळीं सर्वांना वाटतोय् खोटा." अन् त्यानं कल्पिलेलं बाळही पापागारांत जन्मलेलं होतं, हें विसरलांत तुम्ही ?

" जुळलंच म्हणायचं सारं मग ! "

विवाह समारंभ धडाक्यानें पार पडला ! सोहाळ्यांत वधूवराची कोण करतो पर्वा ? कुणाच्याही कांहीं एक लक्षांत आलं नाहीं , कीं कुणाचा कांहा विरसही झाला नाहीं. नाशकाच्या भटांनीं यथास्थित लाडवावर ताव मारून घेतला !

तात्यांच्या ओळखीचे एक अधिकारी गृहस्थ हंसत म्हणाले,

" वा: ! देशभक्त जावईबुवांनीं उषेलाही खादी वापरायला भाग पाडलं कीं ! "

आणखी दुसरे कुणीसे म्हणाले,

" ह्यं: ! ह्यं: ! काय पण घुंगुरटं घेतलं आहे उषेनं ! अहो , चांगलं रोज हिंडतांना पाहिलं मी दोघांना गेल्या उन्हाळ्यांत — "

सर्व सोहाळा आटोपल्यानंतर ती चांडाळचौकडी बाबा-तात्या बसले होते तिकडे गेली. अजून बहुतेक वऱ्हाडी मंडळी लग्नघरांतून बाहेर पडायचीच होती. शालिनी हंसत म्हणाली , " आम्ही चौघे जाणार आजच मुंबईला ! "

" दोघेंच जा. चौघांमुळे दोन्ही जोडप्यांना अडचण होईल. " तात्या बाबांकडे पहात हंसत म्हणाले.

" ह्या वधूवरांना कुठं नेतां इतक्या गडबडींत ? " बाबासाहेबांनीं मिष्कीलपणानें प्रश्न केला, "गंगेच्या घाणेरड्या घाटापेक्षां जुहूचा समुद्रकिनारा Honey Moon ला ज्यास्त Suitable होईल म्हणतां ! पण वऱ्हाडी काय म्हणतील अशानं ? " असं म्हणत बाबासाहेब ह्यं: ह्यं: करू लागले !

विजयनें पापाचे पाठीमागून टिमथीला खुणावलें. तो इंग्रजींत हंसून म्हणाला, ' दोघांनाही नातू नको का लवकर ? "

त्यावेळीं ! पापा, तात्या, रमाकाकू, लीला, विलास, शालिनी, टिमथी, तूं, मी–सारेच त्या धारेंत सांपडलों ! – आतां पुन्हां संथ प्रवाह सुरू होईलसं वाटतंयू— ”

“ पण विश्वाससारखं चांगलं पोहणारं माणूस ! ” शकुंतला मध्येंच म्हणाली. “त्याला धबधब्याच्या कितीहि उंचावरच्या धारेंतून द्या ना लोटून ! मौजच वाटेल उलट–”

“ त्या दुष्टाचं कशाला नांव काढतेस मधेंच ? ” विजयनें तिला बोलतांना थांबवले. “ बिचारा अरुण मात्र पहिल्याच झपाट्यासरशी बुडाला ! ” तो एकाएकी खिन्न झाला व लागलीच त्याचे डोळे चकाकून तो म्हणतो , “ अग , बाळाचें नांव अरुणच ठेऊं या. ”

“ हो गडे , छान आहे नांव ! ”

खोलीचे कुलुप उघडून दोघेही आंत शिरतांच, वेणूनें त्यांच्या हातीं एक तारेचें पाकीट ठेविलें. दोघेही अधीरतेनें वाचूं लागलीं—

“ Usha's marriage with Vishwasrao. Same date, same time as settled. Do attend the ceremony with Shakuntala.
—Papa. ”

“ अरे बापरे, ” विजय उद्गारला. “ आतां कसं ? हा गळेकापू तिथंही धुडगूस घालूं लागलाच कीं...आजच पहिली गाडी गांठली पाहिजे आतां लग्न मोडण्यासाठी हें.”

“ मग बाळाचं कसं ? ”

“ म्हणजे, त्यालाही घ्यायचा बरोबर ! नाहींतर शालिनीनें व टिमथीनें तेवढीच गोष्ट लपवून मला पुन्हां संशयांत टाकलं तसं व्हायचं ! ”

“ नाहीं गडे. त्याला इथंच ठेऊं या शारदाबाईकडे. मला बाई लाज वाटते. तिथं सारी मंडळी असेल जमलेली. ”

त्या दोघांनीं बाळाचा निरोप घेतला , तेव्हां तो लुच्चा आपले चिमणे हात पुढें करून जणुं म्हणत होता , “ मलाही न्या आजोबाकडे. ”

स्टेशनवर त्यांना शालिनी व तिचे पतिराज भेटले. तेव्हां कळले कीं, ह्या दोघांनीं तावडतोब निघून यावें. म्हणून केलेली ती त्या दोघांची युक्ति होती. विश्वासला उजळमाथ्यानें वावरायला तोंड तरी होतं का आतां ? बेत असा रचला होता कीं, विजयशीं आतां शकुंतलेचं लग्न व्हावं. कारण तीही तात्यांचीच मुलगी होती. आणि वधूंची ही अदलाबदल कुणाच्या लक्षांत येऊं नये म्हणून, उषेनें कुठेंतरी लपून राहावें व शकुंतलेनें अगदीं लाजाळूपणें बुरखा घ्यावा. बाबा , तात्या यांच्या संमतीनेंच सारं ठरलं होतं. हा

बेत सांगून होतांच शालिनी म्हणाली, " बाळाला काढा ना गाडींतनं, सुटेल ना ती ? हे किनई जातील त्याला घेऊन मालतीच्या इथं. कारण वडील मंडळींना कुणालाच बाळासंबंधीं लग्नाआधींच कांहीच कळायला नको. नाहीं तर पुन्हा कुणीतरी अडचण आणायची एखादी ! "

" अग, मी आणलाच नाहीं त्याला. " शकुंतला हंसत म्हणाली.

" पण त्या विश्वासनं सांगितलं असेल ना साऱ्यांना ? " विजयनें शंका काढली.

" अहो, त्यानं केलाय् पोबारा इथनं. त्याच्या पत्रांतला सर्वच मजकूर मुळी ..ोना वाटतोय् खोटा." अन् त्यानं कल्पिलेलं बाळही पापागारांत जन्मलेलं होतं, हें विसरलात तुम्हीं ?

" जुळलंच म्हणायचं सारं मग ! "

विवाह समारंभ धडाक्यानें पार पडला ! सोहाळ्यांत वधूवराची कोण करतो पर्वा ? कुणाच्याही कांहीं एक लक्षांत आलं नाहीं , कीं कुणाच्या कांहीं विरसही झाला नाहीं. नाशकाच्या भटांनीं यथास्थित लाडवावर ताव मारून घेतला !

तात्यांच्या ओळखीचे एक अधिकारी गृहस्थ हंसत म्हणाले,

" वाः ! देशभक्त जावईबुवांनीं उषेलाही खादी वापरायला भाग पाडलं कीं ! "

आणखी दुसरें कुणीसें म्हणाले,

" ह्यॅः ! ह्यः ! काय पण घुंगुरटं घेतलं आहे उषेनं ! अहो , चांगलं रोज हिंडतांना पाहिलं मी दोघांना गेल्या उन्हाळ्यांत — "

सर्व सोहाळा आटोपल्यानंतर ती चांडाळचौकडी बाबा–तात्या बसले होते तिकडे गेली. अजून बहुतेक वऱ्हाडी मंडळी लग्नघरांतून बाहेर पडायचीच होती. शालिनी हंसत म्हणाली , " आम्ही चौघे जाणार आजच मुंबईला ! "

" दोघेंच जा. चौघांमुळे दोन्ही जोडप्यांना अडचण होईल. " तात्या बाबांकडे पाहत हंसत म्हणाले.

" ह्या वधूवरांना कुठं नेतां इतक्या गडबडींत ? " बाबासाहेबांनीं मिष्कीलपणानें प्रश्न केला, "गंगेच्या घाणेरड्या घाटापेक्षां जुहूचा समुद्र किनारा Honey Moon ला ज्यास्त Suitable होईल म्हणतां ! पण वऱ्हाडी काय म्हणतील अशानं ? " असं म्हणत बाबासाहेब ह्यॅः ह्यॅः करू लागले !

विजयनें पापाचे पाठीमागून टिमथीला खुणावलें. तो इंग्रजींत हंसून म्हणाला, " दोघांनाही नातू नको का लवकर ? "

" मग असं झटपट् का पोर होतं लेकांनो ? " तात्यांनी आभाळी हास्य केलें.

" कचकड्याचें बाळ विकत घेणार कीं काय मुंबईच्या बाजारांत ? " बाबांनीं विश्वदर्शन दिलें.

तो हास्यांचा गडगडाट अन् बनावट दांतांचा लखलखाट मंदावल्यानंतर गंभीरपणें शालिनी म्हणाली , " बाबा , तात्या, पहा शकु किती लाजलीय् ती ! अहो हिचें मूल—म्हणजे तुम्हां दोघांचा नातू—आतां चांगला वर्षाचा आहे. त्याच्यासाठींच जायचंय् हिला येवढ्या घाईनं ... "

तात्यांनीं संथपणें चष्मा डोळ्याला लावला , व बाबांनीं डोळ्यावरची आरशी कपाळावर नेली ; आणि मागें विजयकडे वळून बॉंबच्या स्फोटाप्रमाणें दोघेही एकदम उद्गारले, " आँ ! "